NUTA BULLETIN
OFFICIAL JOURNAL OF NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION
Regd. No. MAHBIL/2001/4448 : Licensed to post without prepayment No. NR/ATI/78/2001
YEAR : 32 ) 15th September 2007 ( No : 06

# असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प

**प्रा. बी.टी.देशमुख,** *विधान परिषद सदस्य*

*****

*१६१ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या निम्न पेढी प्रकल्पाच्या साठवण जलाशयातून उपलब्ध होणारे पाणी 'नैसर्गिक प्रवाह सिद्धान्ता'नुसार, (Natural Flow Doctrine) ज्यांना मिळत आहे किंवा मिळणार आहे, त्या लोकांना ते पिण्यासाठी नको आहे व सिंचनासाठीसुद्धा नको आहे, हे जर खरे असेल तर, 'विवेकाधारित यथायोग्य वापर सिद्धान्ता'नुसार (Reasonable Use Doctrine) नदीच्या खालच्या व वरच्या भागातील ज्या हजारो लोकांना ते पाहिजे आहे व उपलब्ध होणार आहे त्यांच्याकडून, जसा आम्ही त्या पाण्याचा वापर करीत नाही किंवा करणार नाही, तसा तुम्हीसुद्धा त्याचा वापर करू नये व नदीच्या काठावर बसून हे पाणी अरबी समुद्राला जावून मिळतांना कसे दिसते? हे डोळे भरून पहावे, अशी अपेक्षा करणे हा पराकोटीचा भाबडेपणा आहे.*

*****

*संघटनेतर्फे सन १९९२ मध्ये "जलसिंचन अनुशेष बुलेटीन" प्रकाशित करण्यात आले होते. सन १९९८ मध्ये "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष - क्ष किरण परीक्षा" हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले होते. त्या त्या वेळची जलसिंचन अनुशेषाची स्थिती त्या प्रकाशनामध्ये नमूद करण्यात आली होती.*
*आज २००७ मध्ये निम्न पेढी प्रकल्पाचे निमित्त आहे, पण जलसिंचन अनुशेष निर्मूलनाच्या या युद्धामध्ये आम्ही कोठे उभे आहोत? हे दर्शविणे हा या बुलेटीन प्रकाशनाचा मुख्य हेतू आहे.*

# असामान्य गुणवत्तेचा निम्न पेढी प्रकल्प

**प्रा. बी.टी.देशमुख,** *विधान परिषद सदस्य.*

**१.** कुणी आग्रह धरला म्हणून जलसिंचनाचा एखादा प्रकल्प होत नसतो व कुणी दुराग्रह केला म्हणून तो रहात नसतो. तो प्रकल्प लोकांच्या उपयोगी पडण्याच्या त्याच्या गुणवत्तेमुळे होत असतो किंवा अशा गुणवत्तेच्या अभावी तो बाजूला पडतो. एक मात्र खरे की विधायक किंवा रचनात्मक प्रवृत्ती तसेच विध्वंसक किंवा विघातक प्रवृत्ती यांनी केलेल्या किंवा न केलेल्या संघर्षाचा परिणाम तो प्रकल्प वेळेच्या आत पूर्ण होऊन लाभधारकांना वेळीच समाधान मिळण्यास किंवा अतिविलंबाने पूर्ण होऊन लाभधारकांची वाताहत करण्यास कारणीभूत होऊ शकतो. राज्यशासनाची प्रशासकीय मान्यता मिळालेली आहे, तांत्रिक मान्यता मिळालेली आहे, निविदा वगैरे सर्व प्रक्रिया पार पडून कंत्राटदाराला कार्यारंभ आदेश देण्यात आलेला आहे, देशाच्या मा. पंतप्रधानांनी विदर्भातील ६ जिल्ह्यांसाठी जे २१७७ कोटी रुपयांचे पॅकेज जाहीर केलेले (ते जाहीर होण्यामध्ये हेल्पलाईनचासुद्धा खारीचा वाटा आहे) आहे, त्यापैकी निम्न पेढी प्रकल्पाच्या कामी लागणारा संपूर्ण म्हणजे १६१.१७ कोटी रुपयांचा निधी या धरणासाठी राखून ठेवण्यात आला आहे, आतापावेतो या धरणावर ११.४० कोटी रुपयांचा खर्च होऊन गेलेला आहे. मुख्यत्वे हा खर्च प्रकल्पाचे सर्व्हेक्षण, प्राथमिक कामे, बांधकामाचे नियोजन, पुनर्वसन व भूसंपादन यावर झालेला आहे. कार्यारंभ आदेश नुसता रद्द करतो म्हटले तरी कंत्राटदाराला कोट्यावधी रुपयांची नुकसान भरपाई द्यावी लागेल. **सारांश काय तर निम्न पेढी धरण होणार व ते निश्चितपणे होणार याविषयी अजिबात शंका असण्याचे कारण नाही, इतका या धरणाचा प्रवास पुढे गेलेला आहे. ते धरण ५ वर्षात पूर्ण होणार की ५० वर्षात पूर्ण होणार? एवढाच निर्णय या धरणाला विरोध करणाऱ्या संघर्ष समितीला करावयाचा आहे.** प्रकल्प बाधीत लोकांना वर्षानुवर्षे त्रास भोगावा लागून ते पूर्णत्वाला जाणार की राज्यात शासननिर्णयांनी ज्या सोयी सवलती प्रकल्पबाधितांना दिल्या जातात त्या सर्व सोई सुविधा निम्न पेढी प्रकल्प बाधितांना विनाविलंब उपलब्ध करुन देऊन ५ वर्षाच्या आत पूर्ण होणार, एवढाच प्रश्न आता राहिलेला आहे.

### प्रकल्प पूर्ण होण्याला ५० वर्षेसुद्धा कमीच

**२.** सर्व समाजाने, लोकप्रतिनिधींनी व शासनाने समोर येवून खंबीरपणे प्रकल्प बाधितांच्या सहाय्यासाठी धावले पाहिजे. हजारो लाभधारकांनी या सर्व प्रकरणी मूक प्रेक्षकांची भूमिका न घेता ठामपणे त्यांच्या पाठीशी उभे राहिले पाहिजे, ते इतके की अत्यंत अल्पकाळात सर्व शासननिर्णयांनी देऊ केलेले सर्व लाभ प्रकल्पबाधितांना मिळावेत व त्यांच्यात आनंदाचे वातावरण निर्माण होऊन आपणच खरे लाभधारक आहोत अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली पाहिजे. महाराष्ट्राचा इतिहास असे सांगतो की, असे ज्या ज्या ठिकाणी झाले तेथे मोठमोठे सिंचन प्रकल्प २ किंवा ३ वर्षात, जास्तीत जास्त ४ किंवा ५ वर्षात उभे राहिले. याच्या उलट जेथे लक्षावधी लाभधारकांनी मूक प्रेक्षकांची भूमिका घेतली व काही शेकड्यात असलेल्या प्रकल्प बाधितांना वाऱ्यावर सोडून दिले, हा त्रास फक्त आपल्याच नशिबी आहे, कोणीहि आपल्या पाठीशी नाही अशी भावना त्यांच्या मनामध्ये निर्माण झाली तेथे एक प्रकल्प पूर्ण होण्याला ५० वर्षेसुद्धा कमी पडतात याचीही महाराष्ट्राच्या इतिहासामध्ये नोंद आहे. विदर्भाच्या दप्तरात तर अशा अनेक नोंदी आहेत.

### ह्या कामासाठी 3 ते ५ वर्षे लागणार की ५० वर्षे?

**३.** प्रथम पुनर्वसनाचे व त्यामागोमाग धरणाचे काम या धोरणाचा स्वीकार करुन आनंदाने ३ ते ५ वर्षात पार पडू द्यायचे की ते पूर्ण होण्यास ५० वर्षे लावावयाची? **यातील आपली भूमिका संघर्ष समितीला ठरवावी लागेल.** वर वर पहाता मी केलेला ५० वर्षाचा उल्लेख काहींना गमतीचा वाटेल पण अप्पर वर्धा धरणाची मुळ प्रशासकीय मान्यता सन १९६५ सालची आहे, हे लक्षात घेतले तर ते धरण पूर्ण होण्यासाठी लागलेल्या एवढ्या विलंबाचे फार मोठे श्रेय सुरुवातीच्या काळात तेथे काम करणाऱ्या संघर्ष समितीलासुद्धा आहे. त्यातही अशा संघर्ष समितीचे नेतृत्व एखाद्या अविवेकानंदाकडे असेल तर प्रकल्प बाधितांच्या हालअपेष्टांना पारावारच रहात नाही व सर्वत्र 'आनंदी आनंद'च दिसून येतो. स्वतः बाजूला राहून आयाबहिणींना आमरण उपोषणाला बसविण्याचा निर्णय व पुढे ते उपोषण नव्हते तर उपवास होता असे भंपकपणे सांगणाऱ्या अविवेकानंदाच्या कुचेष्टा म्हणजे पुढे होणाऱ्या हाल अपेष्टांची संघर्ष समितीने दाखविलेली लहानशी चुणूक आहे. त्याच्याही पुढे जाऊन "साधकांनी उपवास" सोडला असे या प्रसंगाचे आपल्या शबनम बॅगमधून काढलेल्या ठेवणीतल्या शब्दात वर्णन करून या 'थोर' नेत्याने गोरगरिबांच्या भावनांची घोर थट्टा केलेली आहे.

### जलसंपदा व भूसंपदा

**३.१** जलसंपदा ही सर्व समाजाच्या मालकीची असते, भूसंपदा ही भूस्वामीच्या मालकीची असते, मात्र शासनाला समाजाच्या हितासाठी भूसंपादन करता येईल अशी देशाच्या घटनेमध्ये तरतूद आहे. त्यासाठी योग्य तो मोबदला द्यावा लागेल अशी कायदेशीर व्यवस्था आहे. याच्या विपरित वर्तन हे संपूर्णपणे घटनाबाह्य व बेकायदेशीर आहे, हे सुसंस्कृत समाजातल्या प्रत्येक सुसंस्कृत व्यक्तीने लक्षात ठेवले पाहिजे.

### खाऱ्या पाण्याचा उपसा व गोड पाण्याचे पुनर्भरण

**४.** मी सुरुवातीलाच नमूद केले आहे की उत्तम गुणवत्तेवर आधारित हा प्रकल्प असल्यामुळे तो होणारच हे निश्चित आहे. सामान्यपणे इतर प्रकल्पांमध्ये जी गुणवत्ता असते, ती तर या प्रकल्पामध्ये आहेच, पण दोन असामान्य व दुर्मिळ अशा गुणवत्ता या प्रकल्पामध्ये जास्तीच्या आहेत. खारपाण पट्ट्यामध्ये जन्म घेतलेल्या काही ज्येष्ठ संशोधकांनी व शास्त्रज्ञांनी तसेच इतरही अनेक **संशोधकांनी व शास्त्रज्ञांनी अनेक वर्षे केलेल्या मेहनतीच्या पोटी झालेल्या शास्त्रीय संशोधनावर आधारित खाऱ्या पाण्याचे Pumping व गोड पाण्याचा Recharge या द्विसूत्रीचा आधार घेवून खारपाण पट्ट्यातील मानवी समूहाचे असह्य जीवन सुसह्य करण्याच्या इतिहासाची सुरुवात या प्रकल्पापासून होत आहे ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.**

### एकमेव प्रकल्प स्थळ

**५.** "खारपाण पट्ट्याच्या या क्षेत्रात काळ्या मातीचा भूस्तर साधारणपणे १० ते १२ मिटर किंवा त्यापेक्षा जास्त असल्यामुळे पाटबंधारे योजनांना पायासाठी लागणारा कठीण खडक व्यवहार्य खोलीवर उपलब्ध होत नाही" असे महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने आपल्या अहवालांत नमुद केले आहे. (संदर्भ ३, पृष्ठ २३२) वस्तुतः खारपाण पट्ट्यामध्ये रहाणाऱ्या प्रत्येकालाच ही गोष्ट माहिती आहे. पण आयोगाच्या अहवालात या वस्तुस्थितीची नोंद झाल्यामुळे या विधानाला अधिकृत व शास्त्रीय बैठक प्राप्त झाली आहे. सिंचन प्रकल्पांचा अभाव हे खारपाण पट्ट्याचे मोठेच दुर्दैव असतांना रिद्धपूरच्या वरच्या भागात तलांक ३९८ वर उगम पावलेली पेढी नदी अमरावती जिल्ह्यातून बाहेर पडून ११४ मिटर खाली उतरून अकोला जिल्ह्यात २८४ तलांकावर शिरर्ला येथे पूर्णा नदीला मिळते. **या नदीच्या ७० किलोमिटरच्या प्रवासात सिंचन प्रकल्प बांधता येवू शकेल असे हे मध्यम प्रकल्पासाठीचे एकमेव प्रकल्प स्थळ उपलब्ध झाले आहे. बाकी कितीही मेहनत केली तरी 'असफल' चा शेरा नशिबी येतो, असा अनुभव आहे. ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.** सामान्य व असामान्य अशी या प्रकल्पाची काय गुणवत्ता आहे? याची तपशिलवार माहिती पुढील परिच्छेदातून दिलेली आहे.

### प्रकल्प स्थळांचा दुष्काळ

**६.** पेढी नदीच्या ७० कि.मी. च्या प्रवासामध्ये चोपण मातीचे खूप खोल थर असल्यामुळे प्रकल्पाच्या बांधकामासाठी पाया मिळत नाही व त्यामुळे सुयोग्य प्रकल्पस्थळाचे कमालीचा दुष्काळ दिसून येते. पिण्याच्या पाण्यासाठी सतत कूपनलिकांवर अवलंबून राहावे लागत असल्यामुळे पेढीच्या उगमस्थाना जवळ एखादा लघू किंवा मध्यम प्रकल्प घेण्यात यावा अशाप्रकारची बाब रिध्दपूर विकास योजनेमध्ये त्यावेळी समाविष्ट करण्यात आली होती. राज्याच्या मा. मुख्यमंत्र्यांनी स्वतः रिध्दपूर येथील जाहीर सभेत सन १९९२ मध्ये या विकास योजनेचा शुभारंभ करतांना अशा प्रकल्पाची नुसती घोषणा केली नव्हती तर

***ज्या गोड पाण्याच्या तुषार सिंचनाने जून, जुलै, ऑगस्टमध्ये आमच्या जमिनी, गेल्या शेकडो वर्षात खराब झालेल्या नाहीत त्याच जमिनी त्याच गोड पाण्याच्या तुषार सिंचनाने ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबरमध्ये कशा काय खराब होतात?***

*परिच्छेद ६८ पहा*

***निम्न पेढी प्रकल्पामुळे त्याच गोड पाण्याच्या तुषार सिंचनाची मानवनिर्मित बारमाही व्यवस्था आम्हाला उपलब्ध होत आहे ही या प्रकल्पाची मोठी गुणवत्ता होय.***

*परिच्छेद ६८ पहा*

त्यासाठी १० लक्ष रुपयांची तरतूद सुध्दा जाहीर सभेतच घोषित केली होती. पुढे तशी तरतूद अंदाजपत्रकामध्ये सुध्दा रिध्दपूर पाटबंधारे प्रकल्पासाठी समाविष्ट करण्यात आली होती. स्वतः मुख्यमंत्र्यांनी केलेली घोषणा असल्यामूळे पाटबंधारे विभागाने तडाख्याने कामाला सुरुवात केली. आम्ही सभागृहामध्ये आमच्या पद्धतीने व आमच्या शक्तीनुसार त्या प्रकल्पाचा पाठपुरावा केला पण २-३ वर्षाच्या मेहनतीनंतर प्रकल्प असफल म्हणून सोडून द्यावा लागला. तपशिलवार सर्वेक्षणानंतर अशी आणखी काही प्रकल्पस्थळे असफल ठरलीत. त्या साऱ्या प्रकल्प स्थळांचे तपशिल देण्याचे हे ठिकाण नव्हे. **बांधकामासाठी पायाच मिळत नसल्यामुळे उत्तम प्रकल्प स्थळांचे कमालीचे दुर्भिक्ष असलेल्या या उपखोऱ्यामध्ये एक अतिउत्तम प्रकल्पस्थळ उपलब्ध झाले याविषयीचा आनंद व्यक्त करण्याचे बाजूला ठेवून त्याला ज्या भावनेने विरोध चालू आहे, ती गोष्ट चिंताजनक व लाजिरवाणी आहे.**

### १९८७ च्या राष्ट्रीय जलधोरणाचा तपशिल

**७.** जलसंपदा ही मौल्यवान अशी राष्ट्रीय सम्पत्ती (Precious National Asset) असून ती मानवाची मूलभूत गरज आहे. निसर्गाने मानवी जीवनाला पुरविलेली ती एक महत्वपूर्ण साधनसामुग्री आहे, असे राष्ट्रीय जलधोरणामध्ये स्पष्टपणे नमूद केले आहे. भूपृष्ठावर उपलब्ध असलेल्या कोणत्याही जलाशयावर पहिला हक्क हा पिण्याच्या पाण्याचा असतो व त्यामुळे जलसंपदेचे नियोजन व विकास राष्ट्रीय धोरणानुसारच झाला पाहिजे, असे सुध्दा या राष्ट्रीय जलधोरणामध्ये निःसंदिग्धपणे घोषित करण्यात आले आहे. केंद्र शासनाने प्रसिध्द केलेल्या "सी.पी.एच.ई.ई./ओ. मॅन्यूअल" या चार पाचशेंच्यावर पृष्ठांच्या मुद्रित पुस्तकामध्ये ४७५ ते ४८२ या पृष्ठावर १८ वे प्रकरण समाविष्ट असून त्या प्रकरणाचा मथळा 'Legal Aspect' असा आहे. राष्ट्रीय जलधोरणाचा मोठा स्पष्ट व पारदर्शक उल्लेख या प्रकरणाच्या परिच्छेद १८.३.२ मध्ये आहे. मी हा परिच्छेद मुद्दाम पुढे जसाच्या तसा नमूद करीत आहे :-

"**18.3.2 National water policy :** Water is a prime natural resource, a basic human need and a precious national asset. Therefore, planning and development of water resources need to be governed by national perspectives.

**The Government of India have therefore formulated a National Water Policy in 1987,** according to which, in the planning and operation of systems, water allocation priorities shall be broadly as follows :

Drinking

Irrigation

Hydro-power

Navigation

Industrial and other used

However these priorities can be modified, if necessary, in particular regions with reference to area specific consideration. The National Water policy has directed that adequate drinking water facilities should be provided to the entire population both in urban and rural areas by 1991, **that irrigation and multipurpose projects should invariably include a drinking water component wherever there is no alternative source of drinking water, and that drinking water needs of human beings and animals should be the first charge on any available water."**

या राष्ट्रीय जलधोरणामध्ये पुढे अनेक बदल झाले, पण पाणी वापराचा हा प्राथम्यक्रम अबाधित राहीला.

### सन २००२ चे राष्ट्रीय जलधोरण

**८.** सप्टेंबर १९८७ मध्ये जे राष्ट्रीय जलधोरण अंमलात आले होते त्यानंतर पाण्याचे उद्भव, व्यवस्थापन व विकास हयाबाबत अनेक नवे मुद्दे पुढे आलेत. त्या मुद्यांचा विचार करुन केंद्र शासनातर्फे सन २००२ चे राष्ट्रीय जलधोरण जाहीर करण्यात आले. या धोरणामध्ये सुध्दा पिण्याच्या पाण्याला पहिले प्राधान्य देण्यात आले असून सिंचन हे दुस-या क्रमांकावर ठेवण्यात आलेले आहे ते पुढील शब्दात. :-

"**Water Allocation Priorities.**

In the planning and operation of systems, water allocation priorities should be broadly as follows:

* Drinking water
* Irrigation
* Hydro-power
* Ecology
* Agro-industries and non-agricultural industries
* Navigation and other uses.

However, the priorities could be modified or added if warranted by the area / region specific considerations." (संदर्भ ७, परिच्छेद ५)

### पिण्याचे पाणी सर्वात महत्वाचे

**९.** शक्यतोवर जलसाठ्यांचा विकास करीत असतांना प्रकल्पाचे नियोजन हे बहुउद्देशिय प्रकल्प म्हणून असावे, मात्र अशा प्रत्येक प्रकल्पामध्ये पिण्याच्या पाण्याची व्यवस्था ही प्राथम्याने असावी असे प्रतिपादन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये पुढील शब्दात करण्यात आलेले आहे. :- "Water resource development projects should as far as possible be planned and developed as multipurpose projects. Provision for drinking water should be a primary consideration." (संदर्भ ७, परिच्छेद ६.१)

### पिण्याच्या पाण्याची गरज

**१०.** पुरेसे पिण्याचे पाणी ग्रामीण व शहरी भागाकरिता उपलब्ध करण्याच्या सोयी असाव्यात. जेथे पर्यायी पिण्याच्या पाण्याची व्यवस्था नाही तेथे सिंचन व बहुद्देशिय प्रकल्पामधे पिण्याच्या पाण्याची तरतूद असावी. कोणत्याही उपलब्ध स्त्रोतावर मनुष्य व पशुंकरिता पिण्याचे पाणी ही प्राथमिक बाब असावी. असे मोठे जोरदार प्रतिपादन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये करण्यांत आलेले आहे, ते पुढील शब्दांत. :- "Adequate safe drinking water facilities should be provided to the entire population both in urban and in rural areas. Irrigation and multipurpose projects should invariably include a drinking water component, wherever there is no alternative source of drinking water. Drinking water needs of human beings and animals should be the first charge on any available water." **(संदर्भ ७, परिच्छेद ८)**

***राष्ट्रीय जलधोरणानुसार अधिकाअधिक जलस्त्रोत वापरण्यायोग्य कक्षेमध्ये आणण्याची गोष्ट देशाच्या पातळीवर ठरली असतांना आम्ही पेढी नदीच्या पात्रात उपलब्ध झालेला पहिला आणि एकमेव उद्भव गमावून बसण्यासाठी संघर्ष करीत आहोत.***

*परिच्छेद ८६ पहा*

***अत्युत्तम पेयजलाचा भूपृष्ठावर मोठा साठा झाल्यामुळे, गोड पाण्याचे पुनर्भरण वाढल्याने, खारपाण पट्ट्याच्या भूगर्भातील जलसाठ्यांच्या दर्जावर परिणाम होवून ते उत्तम पेयजलात रुपांतरीत होणार, हे शास्त्रिय प्रयोगांनी आता सिद्ध झाले आहे.***

*परिच्छेद १९ पहा*

### पेयजल म्हणून पेढी धरणाची उपयुक्तता

**१०.१** सबंध भारतासाठी लागू असलेल्या राष्ट्रीय धोरणानुसार भूपृष्ठावरील जलाशयावर पहिला अधिकार हा पिण्याच्या पाण्यासाठीचा आहे. या कसोटीवर पेढी प्रकल्प कितपत उपयुक्त आहे याचा विचार करु. असा विचार करतांना तुम्ही सत्यशोधन समिती नेमा व त्या समितीने आम्हाला पाहिजे ते सत्य काढून दिले पाहिजे अशी भूमिका घेता येणार नाही. हजारो लोकांनी ज्या सत्याचा अनुभव घेतला आहे व हजारो लोक ज्याचे जिवंत साक्षीदार आहेत त्यांनी त्याची पुन्हा उजळणी करण्याची ही वेळ आली आहे.

### पेढी नदीचे धावते पाणी हे उत्तम पेयजल

**११.** पेढी नदीचे धावते पाणी किंवा धरुन ठेवलेले पाणी हे पेयजल म्हणून उत्तम होते व आहे. १९६० पर्यंत अमरावती शहराचा पाणीपुरवठा वडाळी आणि छत्री तलावामध्ये साठविलेल्या पाण्यावर प्रामुख्याने अवलंबुन होता आणि या दोन्ही तलावातून होणारा पुरवठा २.५ दशलक्ष लिटर्स दरदिवशी एवढा मर्यादित होता. शहराच्या त्यावेळच्या लोकसंख्येच्या मानाने हा पुरवठा फारच अल्प असा वाटत असल्यामुळे, १९६० साली शहरापासून १४ कि.मी. अंतरावरील रेवसा या गावाजवळ पेढी नदीचा उद्‌भव धरून पाणी पुरवठ्याची योजना आखण्यात आली. रेवसा पाणीपुरवठा योजनेची एकुण क्षमता ही ११ दशलक्ष लिटर्स दरदिवशी इतकी होती. पेढी नदीचे धावते पाणी किंवा रेवस्याजवळ लहानसा कच्चा बंधारा बांधून जमा करुन ठेवलेले पाणी हा पिण्याच्या पाण्याचा अतिशय उत्तम उद्‌भव होता व ते उत्तम प्रतिचे पेयजल होते हा अमरावतीकर जनतेने घेतलेला जिवंत अनुभव आहे. **१९६० ते १९७२ या काळात पेढी नदीचे धावते पाणी हा अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याचा एकमेव उद्‌भव होता व ते उत्तम प्रतिचे पेयजल होते हे सांगण्यासाठी अमरावती शहरातील हजारो लोकांना कोणत्याही अहवालाची व कुणाच्याहि प्रमाणपत्राची गरज नाही, हे संघर्ष समितीने लक्षात ठेवले पाहिजे. ग्रामीण भागातील व शहरातील सुद्धा पिण्याच्या पाण्यासाठी अशा पेयजलाचा साठा असलेले भावी साठवण जलाशय ही या निम्न पेढी प्रकल्पाची एक उत्तम गुणवत्ता होय.**

### पेढीवरून प्रवास पूर्णेपर्यंत गेला

**१२.** पुढील ८-१० वर्षामध्ये पेढी नदीचे पाणी कमी कमी होत गेल्यामुळे आणि शहराची लोकसंख्या वाढत गेल्यामुळे पाणीपुरवठ्याची ही व्यवस्था अपुरी पडायला लागली आणि म्हणून १९७२ सालच्या दरम्यान अमरावती शहरापासून ३० कि.मी.अंतरावर असलेल्या आसेगांव जवळील पूर्णा नदीचा उद्‌भव योजून अंदाजे २२.५० दशलक्ष लिटर दरदिवशी पाणीपुरवठा करू शकेल अशी योजना कार्यान्वित करण्यात आली. पेढी आणि पूर्णा या दोन्ही योजना, एकत्रितरित्या शहराला २२.५० दशलक्ष लिटर दरदिवशी पाणीपुरवठा करू शकतील अशी त्यांची क्षमता होती. दोन्ही नद्यातून पाण्याचा उपसा करणे, आसेगाव वरून एका पाईप लाईनच्या द्वारे रेवस्यापर्यंत पाणी आणणे, रेवस्यापासून जॅकवेल मधून उपसा करून दोन पाईप लाईनच्या द्वारे अमरावती शहरात मालटेकडीजवळ असलेल्या जल शुद्धीकरण केंद्रावर पोहोचविणे आणि शुद्धीकरणानंतर त्या पाण्याचे वितरण करणे अशी ही योजना होती आणि या योजनेची क्षमता २२.५० दशलक्ष लिटर दरदिवशी इतकी होती. ही योजना सुरू झाल्यापासून सुरुवातीचे १०/११ वर्ष योग्य रितीने चालू होती. १९८२ सालापासून पेढी आणि पूर्णा या दोन्हीही नद्यांचे प्रवाह उन्हाळ्यामध्ये फार मोठ्या प्रमाणावर कमी होऊ लागले आणि योजनेच्या क्षमतेइतके (२२.५० दशलक्ष लिटर दरदिवशी) पाणी सुद्धा या दोन्ही नद्यातून ऐन उन्हाळ्यामध्ये उपलब्ध होऊ शकत नाही अशा प्रकारची स्थिती निर्माण झाली.

### पेढी पूर्णेचे प्रवाह शून्यावर गेले

**१३.** २२.५० दशलक्ष लिटर दरदिवशी पुरवठा व्हावयाचा असेल तर दोन्ही नद्यांमधून किंवा दोनपैकी कोणत्याही एका नदीत पाण्याचा प्रवाह किमान १० क्यूसेक्स इतका असावयास पाहीजे. परंतु तो त्याहीपेक्षा कमी झाल्यामुळे पाणीपुरवठ्याच्या क्षमतेत फार मोठ्या प्रमाणावर घट झाली. १९८२ ते १९८६ या ४ वर्षांचे पेढी आणि पूर्णा नद्यांच्या प्रवाहाचे अधिकृत आलेख काळजीपूर्वक पाहीले तर १९८३ ते १९८६ च्या उन्हाळ्यामध्ये (किंवा लगतपूर्वी) आसेगावजवळ पूर्णेचा प्रवाह व रेवसानजिक **पेढीचा प्रवाह १० क्युसेक्स पेक्षा (दर दिवसाला २२.५० मि.लिटर) कमी कोणत्या तारखेला झाला, तसेच तो संपुर्णपणे आटल्यामुळे शून्य पातळीपर कोणत्या तारखेला आला याचा तपशील पुढील प्रमाणे आहे. :-**

*प्रवाह १० क्युसेक्सपेक्षा कमी झाल्याची तारीख*

| उन्हाळा वर्ष | पेढी | पूर्णा |
|---|---|---|
| १९८३ | - | १५ जानेवारी १९८३ |
| १९८४ | २७ फेब्रुवारी १९८४ | १४ मार्च १९८४ |
| १९८५ | १९ डिसेंबर १९८४ | २१ फेब्रुवारी १९८५ |
| १९८६ | १ नोव्हेंबर १९८५ | ७ जानेवारी १९८६ |

*प्रवाह शून्य पातळीवर आल्याची तारीख*

| उन्हाळा वर्ष | पेढी | पूर्णा |
|---|---|---|
| १९८३ | १२ डिसेंबर १९८२ | १६ मे १९८३ |
| १९८४ | २७ मार्च १९८४ | १६ मे १९८४ |
| १९८५ | २५ एप्रिल १९८५ | २३ मे १९८५ |
| १९८६ | ६ मार्च १९८६ | २ मे १९८६ |

### शहराच्या लोकसंख्येमध्ये होत गेलेली वाढ

**१४.** १९८२ ते १९८६ या कालखंडामध्ये उन्हाळ्यात पेढी आणि पूर्णा या दोन्ही नद्यांचे प्रवाह शून्यावर येत असतांना या चार वर्षाच्या कालखंडात या शहराच्या लोकसंख्येमध्ये वेगवेगळ्या कारणांनी वाढ झालेली व होत असलेली दिसून आली. १९८१ पासून अमरावती येथे महसूल विभागीय कार्यालय सुरू झाले. १ मे १९८३ या दिवशी अमरावती विद्यापीठाची स्थापना करण्यात आली. १९८३ च्या ऑगस्टमध्ये अमरावती नगरपालिकेचे महानगरपालिकेमध्ये रूपांतर झाले आणि या महानगरपालिकेच्या क्षेत्रात बाजूला १०-१२ कि.मी. अंतरावर असलेले बडनेरा हे शहरसुद्धा समाविष्ट करण्यात आले. अमरावतीच्या सभोवताली असलेली १७ खेडीसुद्धा अमरावती महानगरपालिकेच्या क्षेत्रामध्ये समाविष्ट करण्यात आली. अमरावती शहराच्या लगतच्या भागात याच कालखंडामध्ये निरनिराळ्या १५० कॉलनीज् नव्याने उभ्या झाल्याचे दिसून येते. १९८१ च्या जनगणनेप्रमाणे या शहराची लोकसंख्या ३.३५ लक्ष होती ती १९८५ च्या दरम्यान ४ लक्षापर्यंत पोचली व ती वेगाने वाढतच राहिली. आज ती ७ लाखापर्यंत पोचली आहे.

### साठवण जलाशय

**१५.** कोणत्याही शहरासाठी, गावासाठी किंवा खेड्यासाठी पाणीपुरवठा सुरळीतपणे चालू रहावयाचा असेल तर शास्त्रीय दृष्ट्या "साठवण जलाशय" हे कोणत्या स्थितीमध्ये अपरिहार्य असते याचे उत्तम विवेचन हार्डेनबर्ग व रॉडी या आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या पाणीपुरवठा तज्ज्ञांनी त्यांच्या "वॉटर सप्लाय अँड वेस्ट डिस्पोजल" या ग्रंथामध्ये केलेले आहे. सदर ग्रंथाच्या प्रकरण सहाच्या पहिल्या परिच्छेदात ते असे म्हणतात की,

"सामाजिक गरजांकरिता लागणाऱ्या पाण्याचे सर्वोत्कृष्ट उगमस्थान, मग तो नविन पुरवठा असो अगर विद्यमान पुरवठ्याच्या मर्यादा संपल्याने तो वाढविण्यासाठी

***एका बाजूला भुपृष्ठावर अत्युत्तम पेयजलाचा साठा उपलब्ध होत असतांना दुसऱ्या बाजूला भूगर्भातील निकृष्ट जलसाठ्यांचे रुपांतर उत्तम पेयजलामध्ये करुन खारपाण पट्ट्यातील भूजलसंपदेचे मुल्यांकन वाढविण्याची निम्नपेढी प्रकल्पाची शक्ती ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.***

*परिच्छेद १९ पहा*

असो, नदी अगर झरा असते. जर सरासरी गरजेपेक्षा प्रवाह कमी असेल तर त्यातून (पुरवठ्यात) वाढ करणे निष्फळ ठरते. जर नदीतून/नाल्यातून घेण्यात येणाऱ्या (पाण्याच्या) कमाल राशिपेक्षा त्यातील किमान प्रवाह जास्त असेल तर, जलाशयाची जरूरी लागणार नाही. जर सरासरी मागणीपेक्षा नाल्यातील/नदीतील सरासरी प्रवाह जास्त असेल पण किमान प्रवाह सरासरी मागणीपेक्षा कमी असेल तर जलाशयाची गरज पडते. अशा जलाशयाला '**साठवण जलाशय**' असे संबोधिले जाते."

### कुपनलिकांचा सपाटा

**१६.** वापरल्या जाणाऱ्या पाण्याच्या कमाल राशीपेक्षा किमान प्रवाह जास्त असणारी नदी किंवा झरा ज्यांच्याजवळ नसेल, त्या मानवी समुहाला पिण्याच्या पाण्यासाठी साठवण जलाशयावर अवलंबून रहावे लागते. ज्यांची साठवण जलाशयेसुद्धा संपुष्टात आली किंवा मुळातच ज्यांच्या जवळ साठवण जलाशये नाही त्यांना भूगर्भातील पाण्याकडे वळावे लागते. १९८३ ते ९४ या काळात अमरावती शहराला या स्थितीला तोंड द्यावे लागले होते. १९८३ मध्ये २० कूपनलिका, १९८४ मध्ये १२ कूपनलिका, १९८५ मध्ये ५ कूपनलिका व १९८६ मध्ये आणखी १० कूपनलिका, त्यानंतरच्या ४-५ वर्षात तर लहानमोठ्या कूपनलिकांची संख्या ३०० ते ४०० च्या घरात गेली होती. पेढी-पूर्णेचे पाणी कमीकमी होत गेल्यामुळे व उन्हाळ्यात ते झिरोवर येत असल्यामुळे अमरावती शहराला टप्प्याटप्प्याने भूगर्भातील पाण्यावर तहान भागविण्याच्या या स्थितीला सामोरे जावे लागले होते.

# (२)
# खाऱ्या पाण्याचा उपसा व गोड पाण्याचे पूनर्भरण

**१७.** पेढीचे क्षेत्र हे मुख्यत्वे खाऱ्या पाण्याच्या पट्ट्यामध्ये मोडणारे क्षेत्र आहे, असे असतांना सुद्धा अमरावती शहरावर आलेल्या एक मोठ्या संकटातून बाहेर पडण्यासाठी खारे पाणी पट्ट्याच्या भूगर्भातील पाण्यावर आम्हाला अवलंबून रहावे लागले. अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामाच्या या काळात डॉ.सुधाकर धबडगांवकर यांच्यासारख्या खारपाण पट्ट्यामध्ये जन्म घेतलेल्या एका शास्त्रज्ञाची या योजनेचे मुख्य तांत्रिक सल्लागार म्हणून शासनातर्फे अधिकृतपणे नियुक्त करण्यात आलेली होती. खारपाण पट्ट्यातील भूगर्भातील पाणी हे क्षारयुक्त आहे. प्रथमतः तोंडात गुळणा करण्याच्या सुद्धा लायकीचे ते नसते. मात्र खाऱ्या पाण्याचा सतत उपसा (Pumping) व गोड पाण्याचे पूनर्भरण (Recharge) या जोडतंत्राचा वापर केल्यास काही दिवसात पिण्यायोग्य पाण्यामध्ये त्याचे रुपांतर होवू शकते, या डॉ. सुधाकर धबडगांवकर यांनी दार किलकिले करून दाखविलेल्या प्रमेयाचे प्रथम व ओझरते दर्शन आम्हाला त्यावेळी झाले.

### भूगर्भातील 'खारे' पाणी पिण्याच्या योग्यतेचे आहे की नाही?

**१८.** चारशे ते पाचशे कुपनलिका काढून खारपाण पट्ट्याच्या भुगर्भातील जे पाणी आम्ही अमरावतीमध्ये पेयजल म्हणून वापरत होतो त्याची पेयजल म्हणून काय लायकी होती? याची माहिती करुन घेणे आवश्यक आहे.

(१) १९८० ते १९८५ च्या काळात सुरुवातीला कुपनलिका काढली की पाणी चुळ भरण्याच्या लायकीचे सुद्धा नाही इतके खारे राहत असे. सुरुवातीचे काही दिवस तर ते नदीत सोडून द्यावे लागत असे.

(२) त्यानंतर काही दिवसांनी खारेपणा कमी झाल्यावरसुद्धा ते पाणी पेढी व पूर्णेचे धावते गोड पाणी आणणाऱ्या पाईपलाईनमध्ये मिसळून पिण्यासाठी वापरावे लागले.

(३) आमच्या पिण्याच्या पाण्यासाठी आमच्या जवळ भूपृष्ठावरील जलाशये (गावतळे, तलाव, बंधारा, धरण, प्रकल्प) उपलब्ध नव्हती. त्यामुळे भूगर्भातून उपसा केल्यावर त्याच्या पुनर्भरणासाठी आम्ही गोड पाणी कुठून आणणार? पण १९८० पासून ५-७ वर्षात व त्यानंतर पुढे दरवर्षीच्या पावसामुळे 'देरे हरी खाटल्यावरी' या पद्धतीने का होईना, गोड पाण्याचे पूनर्भरण भूगर्भात थोडे तरी होत असे. त्यामुळे पेयजलाच्या दर्जामध्ये पुढे पुढे चांगलाच फरक पडत गेला.

(४) **पंपिंगच्या माध्यमातून दरवर्षी होणारा प्रचंड उपसा व पावसाळ्याच्या पाण्यामुळे निसर्गतः होणारे गोड पाण्याचे पूनर्भरण यामुळे या कुपनलिकांतून अमरावतीकडे येणाऱ्या पाण्याची प्रत दरवर्षी चांगल्या प्रतीची होत गेली. १९९० ते १९९४ या कालखंडात तर ते उत्तम दर्जाचे पेयजल होते व या शहराचा पाणी पुरवठा वर्षातून बरेच महिने बव्हंशी व उन्हाळ्यात पूर्णाशांने या खारपाणपट्ट्यातील कुपनलिकांवर अवलंबून होता.**

(५) १९९० ते १९९४ या कालखंडातून मिळणाऱ्या या पाण्याला मी उत्तम पेयजल म्हटले आहे. १९९४ नंतर अप्परवर्धा धरणातून मिळणाऱ्या (किंवा उद्या निम्न पेढी धरणातून उपलब्ध होणाऱ्या) अत्युत्तम पेयजलाच्या बरोबरीचे ते पेयजल होते काय? असा प्रश्न कोणी विचारला तर त्या प्रश्नाचे उत्तर 'नाही' असेच द्यावे लागेल. धरणातून उपलब्ध होणाऱ्या पाण्याला 'अत्युत्तम पेयजल' म्हटले तरच या कुपनलिकांतून १९९० ते १९९४ च्या काळात मिळालेल्या पेयजलाला 'उत्तम पेयजल' म्हणता येईल. त्याला 'उत्तम' म्हटले तर याला 'चांगले' म्हणावे लागेल.

(६) अमरावती शहरातील हजारो नागरिकांनी जो अनुभव घेतला तो मी साध्या शब्दात वर मांडला आहे. ते काही शास्त्रीय विवेचन नव्हे. एक मात्र मी नमुद करुन ठेवतो, ते असे की कुपनलिकांच्या या पाण्यामध्ये विरघळणाऱ्या क्षारयुक्त मातीचे प्रमाण (Total desolved Solids) कसकसे कमी होत गेले व त्यामुळे क्षारांचे (Clorides) प्रमाण कसकसे कमी होत गेले. याची तपशिलवार आकडेवारी जीवन प्राधिकरणाकडे उपलब्ध आहे. माझ्याकडे याबाबतचे उपलब्ध असलेले दप्तर उघडून पहाण्याची सुद्धा मला आवश्यकता वाटत नाही, कारण तो वेळेचा अपव्यय आहे. हजारो अमरावतीकर नागरिकांनी ९० ते ९४ च्या काळांत जो 'सूर्य' उघड्या डोळ्यांनी पाहिला, त्यांच्यासमोर ती दप्तरबंद आकडेवारी मांडून तो 'सूर्य' होता बरे का! असे सांगण्याचे धाडस मी कां म्हणून करावे?

### निकृष्ट जलसाठ्यांचे रुपांतर उत्तम पेयजलामध्ये

**१९.** सारांश काय तर पंपाच्या मदतीने बाराही महिने कुपनलिकांमधून मोठ्या प्रमाणात उपसा करणार व गोड पाण्याचे पुनर्भरण मात्र फक्त पावसाळ्यात नैसर्गिकरित्या जेवढे होईल तेवढेच होणार, ही स्थिती संपुष्टात येवून **अत्युत्तम पेयजलाचा भुपृष्ठावर मोठा साठा झाल्यामुळे, गोड पाण्याचे पुनर्भरण वाढल्याने, खारपाण पट्ट्याच्या भूगर्भातील जलसाठ्यांच्या दर्जावर परिणाम होवून ते उत्तम पेयजलात रुपांतरीत होणार, हे शास्त्रिय प्रयोगांनी आता सिद्ध झाले आहे. एका बाजूला भुपृष्ठावर अत्युत्तम पेयजलाचा साठा उपलब्ध होत असतांना दुसऱ्या बाजूला भूगर्भातील निकृष्ट जलसाठ्यांचे रुपांतर उत्तम पेयजलामध्ये करुन खारपाण पट्ट्यातील भूजलसंपदेचे मूल्यांकन वाढविण्याची निम्नपेढी प्रकल्पाची शक्ती ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.**

### भूगर्भातील जलसाठे

**२०.** "तर जलयुद्ध टळेल" या मथळ्याखाली "कोकणचे वारे" या सदरात सोमवार, दिनांक ३० जुलै २००७ च्या लोकसत्तेच्या अंकात सतिश कामत यांचा एक लेख प्रसिद्ध झाला आहे. जलसिंचनाच्या क्षेत्रात कोकणाचे मागासलेपण व ते दूर करण्याच्या उपाययोजना याची चर्चा प्रामुख्याने या लेखात त्यांनी केलेली आहे. या लेखाचा पहिलाच परिच्छेद आमच्या डोळ्यात झणझणीत अंजन घालणारा आहे. तो पुढील प्रमाणे :-

**"कोणत्याही प्रदेशातील जलसंपत्तीचे मोजमाप जमिनीच्या पृष्ठभागावर पडणाऱ्या पाण्यापेक्षा भूगर्भामध्ये किती पाण्याचा साठा होतो, यावरून केलं जातं. ही पाण्याची पातळी जेवढी जास्त तेवढा प्रदेश जलसाठ्याबाबत श्रीमंत, असं सरळ समीकरण आहे.** त्यासाठी भूजल सर्वेक्षण विभागातर्फे राज्यभर भूगर्भातील पाण्याची पातळी (ग्राऊंडवॉटर लेव्हल) दरवर्षी मे आणि ऑक्टोबर या दोन महिन्यांत मोजून त्याची नोंद ठेवली जाते. त्यातून पावसाळ्यामुळे भूगर्भातील पाणीपातळीमध्ये पडणारा फरक समजू शकतो."

हा परिच्छेद काळजीपूर्वक वाचला व आपला चेहरा आरशात पाहिला तर काय दिसून येते? भूपृष्ठावर पडलेले पाणी आम्ही धरून ठेवण्याचा कधी विचारच केला नाही. पेढी नदीचे वाहते पाणी सुद्धा १९६० पासून तर १९८० पर्यंत दररोज १० दशलक्ष लिटर्स एवढ्या प्रमाणावर आम्ही आमच्या पिण्यासाठी वापरत होतो. त्यानंतर त्याशिवाय त्या जलदेवतेचा **भूपृष्ठावरील प्रवाह पूर्णपणे**

***पेढी नदीचे धावते पाणी हा अमरावती शहराच्या पाणीपुरवठ्याचा एकमेव उद्भव होता व ते उत्तम प्रतिचे पेयजल होते हे सांगण्यासाठी अमरावती शहरातील हजारो लोकांना कोणत्याही अहवालाची व कुणाच्याहि प्रमाणपत्राची गरज नाही, हे संघर्ष समितीने लक्षात ठेवले पाहिजे. ग्रामीण भागातील व शहरातील सुद्धा पिण्याच्या पाण्यासाठी अशा पेयजलाचा साठा असलेले भावी साठवण जलाशय ही या निम्न पेढी प्रकल्पाची एक उत्तम गुणवत्ता होय.***

*परिच्छेद ११ पहा*

***या नदीच्या ७० किलोमिटरच्या प्रवासात सिंचन प्रकल्प बांधता येवू शकेल असे हे मध्यम प्रकल्पासाठीचे एकमेव प्रकल्प स्थळ उपलब्ध झाले आहे. बाकी कितीही मेहनत केली तरी 'असफल' चा शेरा नशिबी येतो, असा अनुभव आहे. ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.*** *परिच्छेद ५ पहा*

**संपुष्टात आल्यावर तिच्या कुशीत ४०० ते ५०० कूपनलिका काढून धो धो १३ दशलक्ष लिटर्स दर दिवशी तो प्रवाह मालटेकडीवर आणून आम्ही आमची तृष्णा भागविली. 'हे खारपाणपट्ट्यातले पाणी आहे' असे आज म्हणणाऱ्या कोणत्याही पठ्ठ्याने त्यावेळी 'ते पाणी पिऊ नका' असा आवाज जरासुद्धा काढला नाही. आज तिच्याच पाण्याने तिचीच क्षतिग्रस्त कुस समृद्ध करण्याची संधी निम्नपेढी प्रकल्पाच्या निमित्ताने, (संघर्ष समिती स्थापन करुन काही हातपाय न हालविता) आम्हाला चालून आलेली असतांना या पाण्याच्या खारेपणाचे ढोल आम्ही निर्लज्जपणे एवढ्या जोरजोराने वाजवित आहोत की ते एक महान कृतघ्नपणाचे कृत्य आहे याचेही ज्ञान आमच्याजवळ उपलब्ध नाही** व त्यानंतर गंगेचे पाणी गंगेलाच अर्घ्य म्हणून अर्पण करण्याच्या आमच्या संस्कृतिचा संपूर्णपणे विसर पडलेल्या 'शबनम बॅग संस्कृती'ला शेवटी त्या जलदेवतेचे काय आहे? जे काही आहे ते आपलेच आहे ना? याचेही भान राहीलेले नाही.

### उत्तम प्रतिच्या पेयजलामध्ये रुपांतर

**२१.** १९८३ पासून तर १९९४ पर्यंतच्या १०-११ वर्षात पेढीच्या भूगर्भातील या खाऱ्या पाण्यावर आम्ही आमची पिण्याच्या पाण्याची गरज भागवित होतो. **अगदी सुरुवातीला खारवट व त्यानंतर खारवटपणा कमी झालेल्या व शेवटच्या चार पाच वर्षात तर तो खारवटपणा बराच कमी झाल्याने उत्तम प्रतिच्या पेयजलामध्ये रुपांतर झालेल्या त्या भूगर्भातील पाण्यावर पोषण झालेल्या हजारो लोकांना त्या जलदेवतेच्या ऋणातून थोडेतरी उतराई होण्याची संधी निम्न पेढी प्रकल्पाच्या निमित्ताने उपलब्ध होत आहे ही या प्रकल्पाची एक मोठी गुणवत्ता होय.**

### खारपाण पट्ट्याची स्वातंत्र्यपूर्व काळातील स्थिती

**२२.** हजारो वर्षे इतरत्र मानवी समुह ज्या रितीने आपले जीवन जगत होते, तसेच जीवन जगणे खारपाण पट्ट्यातील लोकांच्यासुद्धा नशिबी होते. 'ठेविले अनंते तैसेचि रहावे' याशिवाय त्यावेळी मानवी समुहाच्या हाती दुसरे काही नव्हते. संघटीत समाज सुसंघटीत शासनाच्या नेतृत्वाखाली आपले जीवन जगायला लागला आणि स्वाभाविकपणे चांगले जीवन जगण्याच्या त्याच्या अपेक्षा वाढल्या. स्वातंत्र्यपूर्व कालखंडात या अपेक्षांना काही मर्यादा निश्चितच होत्या. संरक्षण, परराष्ट्र संबंध, कायदा-सुव्यवस्था व न्यायव्यवस्था ही शासनाची चार प्रमुख कामे आम्ही करु. इतर 'फालतु' कामात आम्ही लक्ष घालणार नाही. शिक्षण, आरोग्य, सिंचन, कृषी मालाला भाव या गोष्टी परकीय राज्यकर्त्यांना फालतु वाटत होत्या, तर मग खारपाण पट्ट्याकडे लक्ष देणे तर दूरच राहीले. असे असले तरी त्या काळात काही लेखकांनी, कृषी शास्त्रज्ञांनी खारपाण पट्ट्याबाबत काही लिखाण व संशोधन केल्याचे दिसून येते. भूवैज्ञानिक अभ्यास करणाऱ्या कोणत्याही औपचारिक शासकीय यंत्रणा १८५१ पूर्वी भारतात अस्तित्वात नव्हत्या. भारतीय भूवैज्ञानिक सर्वेक्षण (जिऑलॉजीकल सर्व्हे ऑफ इंडिया) या संस्थेची स्थापना (१८५१) झाल्याच्या काळापासून पूर्णा खोऱ्यातील या खारपाण पट्ट्याने अनेक संशोधकांना व शास्त्रज्ञांना चक्रावून सोडलेले दिसते. (संदर्भ १, पृष्ठ ३०) १८६९ मध्ये डब्ल्यु.बी.वायने (W.B.Wynne) यांनी "Valley of Poorna River, West Berar" या मथळ्याखाली केलेले लिखाण Records of Geological Survey of India Volume II Part 1 पृष्ठ १ ते ५ वर उपलब्ध असून पूर्णा खोऱ्यातील खाऱ्या पाण्यविषयीची चर्चा करणारे **हे पहिले लिखाण** समजले जाते. १९१४ मध्ये सी.एस.फॉक्स (C.S.Fox) यांचा एक अहवाल ("Report on the water supply of Akola District") त्यावेळच्या मध्यप्रांत व वऱ्हाड सरकारने प्रसिद्ध केला होता. या खोऱ्यातील 'सलाईनिटी' ही गांभीर्याने घेण्याची गोष्ट आहे **असे सांगणारा पहिला मार्गदर्शक** म्हणून सी.एस.फॉक्सचा उल्लेख केला जातो. खोऱ्याच्या उत्तरेकडील भागाकडून दक्षिण भागाच्या **खारपाण पट्ट्यातील** शहरांना व खेड्यांना गोड पाणी पाईप लाईनने पुरविले पाहिजे, याचे मोठे जोरदार समर्थन या अहवालात करण्यात आले आहे. क्रुकशँकने १९२६ मध्ये शिलाशास्त्रीय (Lithology) दृष्टीकोनातून या खोऱ्यातील क्षारयुक्त साठ्यांचा काही अभ्यास मांडल्याचे दिसून येते. स्वातंत्र्यपूर्व काळात शासनाने प्रत्यक्ष कृति करण्याचा तर प्रश्नच नव्हता पण उपरोक्त तीन प्रयत्नांच्या व्यतिरिक्त खारपाण पट्ट्याची समस्या लक्षात घेऊन ती सोडविण्याच्या दृष्टीने कुणी फारसे लिखाण केल्याची माहिती उपलब्ध होत नाही.

### त्यांना १९१४ मध्ये कळले ते आम्हाला २००७ मध्ये कळत नाही

**२३.** सी.एस. फॉक्स यांनी आपल्या अहवालात नमूद केलेल्या निरिक्षणाविषयी ज्येष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ डॉ.पी.जी. अड्याळकर आपल्या शोधनिबंधात लिहितात :-

"Fox (1914) was the first to realise that the salinity is not of a casual nature but deep rooted and hence suggested to divert fresh water of the northern part of the valley by pipeline for water supply to villages and township of the saline tract in the south." (संदर्भ १, पृष्ठ ३०)

**१९१४ साली एक ब्रिटीश अधिकारी अकोला जिल्ह्याच्या पाणीपुरवठ्या विषयी अहवाल देतांना लिहून ठेवतो की मध्यप्रांत वऱ्हाडच्या या खोऱ्यातील उत्तर भागातून पाईपलाईनने गोड पाणी आणून या खेड्यांना व शहरांना दिले पाहिजे. इथे २००७ साली गोड्या पाण्याचा ७५ दशलक्ष घनमिटरचा जलसाठा आमच्या दारात शासनातर्फे उभा केला जात असतांना आम्ही हा प्रकल्प नको म्हणतो. या दुर्बुद्धीला काय म्हणावे?** "तुमच्या सारखे कर्मदरिद्री तुम्हीच" असे जर फॉक्सने आपल्याला म्हटले तर त्याला आपण काय दोष देणार?

### स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र राज्य निर्मितीपर्यंतच्या काळातील प्रयत्न

**२४.** स्वातंत्र्योत्तर काळामध्ये स्वाभाविकपणे लोकांच्या शासनाकडून अपेक्षा वाढल्या. **'नुसते जीवन जगणे'** या कल्पनेपासून तर **'सुसह्य जीवन जगणे'** व त्याच्याही पुढे जावून **'उत्तम जीवन जगणे'** यासाठी आवश्यक स्थिती निर्माण व्हावी म्हणून शासनाने सर्वतोपरी मदत केली पाहिजे अशी अपेक्षा व्यक्त केली जावू लागली व त्यामध्ये अस्वाभाविक असे काहीही नव्हते. स्वातंत्र्योत्तर महाराष्ट्र राज्य निर्माण होईपर्यंतच्या काळात खारपाण पट्ट्याच्या समस्येबाबत काही उपाययोजना सुचविण्यात आल्या असे दिसून येत नाही. काही अभ्यास मात्र शोधनिबंधांच्या स्वरुपात प्रसिद्ध झालेले दिसून येतात. ज्येष्ठ भूगर्भशास्त्रज्ञ डॉ. पी.जी.अड्याळकर यांनी एका शोधनिबंधात त्याचा आढावा घेतला आहे. तो पुढील शब्दात :-

"Taylor (1950) later suggested to probe into the problem of salinity by qualitatively testing the existing wells to attempt an isochlor map of the valley and by drilling in depth in a follow up exploratory programma. Mathew (1955) was the first to carry out electrical logging of the boreholes in the Purna valley and suggested possibility of separating the saline water zone, identified fresh water zone in the saline tract, observed increase in salinity from north to south and in depth and suggested reduction in the width of the saline zone from east to the fresh water zone in depth of saline beds even underneath the fresh water zone in depth of 25-30 m below ground level. However, saline tract was precisely delineated abinitio by Roy (1956) as a result of systematic well inventory and analysis of well and river water samples." (संदर्भ १, पृष्ठ ३०)

भूजल सर्वेक्षण व विकास यंत्रणा या शासकीय यंत्रणेचे त्यावेळचे संचालक व एक भूजलतज्ञ श्री. एम.एम. सारभूकम यांनी एका शोध निबंधात या प्रयत्नांचा आढावा पुढील शब्दांत घेतला आहे. :-

"Tylar (1950) suggested proper exploration by drilling

***बांधकामासाठी पायाच मिळत नसल्यामुळे उत्तम प्रकल्प स्थळांचे कमालीचे दुर्भिक्ष असलेल्या या उपखोऱ्यामध्ये एक अतिउत्तम प्रकल्पस्थळ उपलब्ध झाले याविषयीचा आनंद व्यक्त करण्याचे बाजूला ठेवून त्याला ज्या भावनेने विरोध चालू आहे, ती गोष्ट चिंताजनक व लाजिरवाणी आहे.*** *परिच्छेद ६ पहा*

***पंपिंगच्या माध्यमातून दरवर्षी होणारा प्रचंड उपसा व पावसाळ्याच्या पाण्यामुळे निसर्गतः होणारे गोड पाण्याचे पूनर्भरण यामुळे या कुपनलिकांतून अमरावतीकडे येणाऱ्या पाण्याची प्रत दरवर्षी चांगल्या प्रतीची होत गेली. १९९० ते १९९४ या कालखंडात तर ते उत्तम दर्जाचे पेयजल होते व या शहराचा पाणी पुरवठा वर्षातून बरेच महिने बव्हंशी व उन्हाळ्यात पूर्णाशांने या खारपाणपट्ट्यातील कुपनलिकांवर अवलंबून होता.*** परिच्छेद १८ पहा

and sparing of tubewells. Roy (1949) surveyed these deposits and studied in great detail the aquifer characteristics of different formations and recommended sites for exploration. Kalia (1949) and Mathew (1950) carried out geophysiscal survey of purna valley and identified sweet water aquifers and saline water aquifers. Roy Choudhary (1963) described the soils of Purna valley." (संदर्भ १, पृष्ठ ५३)

### महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतर

**२५.** महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीच्या सुरुवात वर्षात म्हणजे जून १९६० पावेतो महाराष्ट्रातील जलसिंचन क्षमता ३,८६,२०० हेक्टर होती. जून १९८२ पावेतो ती २१,५७,३९० हेक्टर झाली. जुन १९९४ मध्ये ती प्रमाण रब्बी सुमतुल्यमध्ये ६७,२६,७५० हेक्टर झाली. वाढत असलेल्या जलसिंचन क्षमतेबरोबरच प्रादेशिक असमतोल सुद्धा मोठ्या प्रमाणात वाढला. जलसिंचनाचा विकास समतोल झाला असता तर कदाचित खारपाणपट्ट्याकडे शासनाचे लक्ष लवकर गेले असते. पण तसा तो न झाल्यामुळे महाराष्ट्र राज्याच्या निर्मितीनंतरच्या पहिल्या २५-३० वर्षात प्रादेशिक असमतोल हाच एकूण चर्चेचा केंद्रबिंदू झाला. खारपाणपट्ट्याचा प्रश्न शासनस्तरावर मागे पडला. खारपाणपट्ट्याच्या एकूणच विकासाबाबत १९६० ते १९९० या कालखंडातील घडामोडीसंदर्भात यापेक्षा जास्त काही माहिती देता येईल असे वाटत नाही. एक गोष्ट मात्र नमूद केली पाहिजे की खारपाणपट्ट्याच्या गावातून निदान उत्तम पेयजल उपलब्ध झाले पाहिजे. यासाठी प्रादेशिक पाणी पुरवठा योजना शासनातर्फे याच काळात बांधण्यात व राबविण्यात आल्या.

### १९९० ते २००७ चा कालखंड : शासनाने केलेल्या उपाययोजना

**२६.** एका बाजूला प्रादेशिक असमतोलाची व त्याच्या परिणामाची होत असलेली तीव्र जाणीव, त्यातही जलसिंचनाचा प्रादेशिक असमतोल आपण आज ज्याला "पंतप्रधान पॅकेज मधिल सहा जिल्हे" म्हणतो या सहा जिल्ह्यात अति जास्त आहे ही लक्षात आलेली वस्तुस्थिती, त्या सहा जिल्ह्यातील फार मोठे क्षेत्र (जवळ जवळ ४.६९ लक्ष हेक्टर) खारपाण पट्ट्याने व्यापलेले असल्यामुळे खारपाण पट्ट्याच्या प्रश्नाला हात लावल्याशिवाय प्रादेशिक असमतोल दुर करण्याची चर्चा निष्फळ ठरते या स्थितीचे झालेले दर्शन, यामुळे १९९० नंतरच्या काळात फार मोठ्या नसल्या तरी काही लहान सहान उपाययोजना या क्षेत्रासाठी शासनातर्फे करण्यात आल्याचे दिसून येते. समस्येच्या स्वरुपाची निश्चिती, उपाययोजनांचा आराखडा, आकडेवारी गोळा करणे, अभ्यास, प्रयोग, प्रात्यक्षिके, शास्त्रीय निष्कर्ष, उच्चाधिकार समितीची नियुक्ती, असे या उपाययोजनांचे स्वरुप होते. वरवर पहाणाऱ्याला ह्या उपाययोजना जुजबी वाटत असल्या तरी एका जुनाट पण रोगट अशा लागट समस्येचे दीर्घमुदती समाधान शोधण्यासाठी उपरोक्त उपाययोजनांचे महत्व व उपयुक्तता कोणीही नाकारु शकत नाही.

### संशोधक, शास्त्रज्ञ, समाजसेवक, स्वयंसेवी संघटना

**२७.** शासकीय प्रयत्नांबरोबरच इतरही अनेक समस्यांचे समाधान शोधतांना खारपाणपट्ट्यामध्ये (सिंचनासोबतच) निदान उत्तम प्रतिचे पेयजल तरी उपलब्ध झाले पाहिजे याचा ध्यास घेतलेले संशोधक, शास्त्रज्ञ, समाजसेवक व सामाजिक कार्यकर्ते यांच्या एका समुहाने एक चळवळ म्हणून १९९० नंतरच्या काळात काम करायला सुरुवात केली असे दिसून येते. त्यातूनच पूर्णा खोरे मित्रमंडळ या स्वयंसेवी संघटनेचा जन्म झाला. या चळवळीचे स्वरुप स्पष्ट करणाऱ्या घटनाक्रमाचा आढावा मी माझ्या शब्दात मांडण्यापेक्षा त्या चळवळीमध्ये सहभागी व समभागी असलेले एक ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुधाकर धबडगावकर यांच्या एका शोधनिबंधामध्ये आलेला त्याबाबतचा मजकूर जसाच्या तसा उद्धृत करणे मला जास्त श्रेयस्कर वाटते. शब्दशः पुढील प्रमाणे :-

"The pressing need of problem and interest of all the concerned agencies in providing sustained drinking water supply to the people in saline groundwater belt of PRB is gathering the desired momentum. Several notable events have taken place in this respect. A brief outline of these events, being appropriate, is given here :

1. **International Conference on Rural Water Supply** and Sanitation for Developing Countries organized by the Indian Water Works Association at Nagpur, January **1992.** This event was instrumental to emphasize and focus more attention to the drinking water supply problem in saline groundwater belt of PRB.

2. **Workshop on Groundwater Recharge** organized by Indian Water Resources society at Amravati, during February **1993.** This event helped to consolidate the efforts towards solution of the problem.

3. **Formation of Purna Khore Vikas Mitra Mandal** (PKVMM) (February 1995 with its subsequent Registration in the year 1997: Registration No.F/5195 Akola / 1997).

4. **Constitution of Vidarbha Statutory Development Board** (VSDB) in 1995 and creation of Purna Khore Vikas Samitee (PKVS) thereunder (1995).

5. **Symposium on,** Integrated Approach to Management of Water & Soil of Purna River Basin with Special Reference to Salinity characteristics , February 2-4, 1996. organized by VRCE Nagpur with Vidarbha Statutory Development Board Nagpur as the Principal Sponsor.

6. **Interim Report** and Recommendations by Purna Khore Vikas Samiti (PKVS) to VSDB, 2nd February 1996.

7. **Sanction of funds** by Vidarbha Statutory Development Board Nagpur for the GSDA Desalination Project (1996-97).

8. **An interim appraisal** of work carried out by GSDA by PKVS (1997).

9. **A regional Workshop** for Sarpanch/Farmers in the belt at Daryapur by PKVMM (1999).

10. **A National Seminar on,** Groundwater Salinity, Water Resource Development and Management of purna Alluvial Basin organized by Government College of Engineering Amravati (January 1999). (This is a good indication of the interest generated in the area where the problem exists).

11. **Constitution of an Expert Committee** by the Water Supply & Sanitation Department. Maharashtra Government during January 1999, under the Chairmanship of Prof. H.B.Ulemale to review the GSDA Programme of

***संशोधकांनी व शास्त्रज्ञांनी अनेक वर्षे केलेल्या मेहनतीच्या पोटी झालेल्या शास्त्रीय संशोधनावर आधारित खाऱ्या पाण्याचे Pumping व गोड पाण्याचा Recharge या द्विसूत्रीचा आधार घेवून खारपाण पट्ट्यातील मानवी समूहाचे असह्य जीवन सुसह्य करण्याच्या इतिहासाची सुरुवात या प्रकल्पापासून होत आहे ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता होय.*** परिच्छेद ४ पहा

***कोणत्याही प्रदेशातील जलसंपत्तीचे मोजमाप जमिनीच्या पृष्ठभागावर पडणाऱ्या पाण्यापेक्षा भूगर्भामध्ये किती पाण्याचा साठा होतो, यावरुन केलं जातं. ही पाण्याची पातळी जेवढी जास्त तेवढा प्रदेश जलसाठ्याबाबत श्रीमंत, असं सरळ समीकरण आहे.***

*परिच्छेद २० पहा*

Desalination. (So far only one meeting of this Committee was held, GSDA presented a review of the work done by them till that time. Broadly there was a general satisfaction on the work. However, certain shortcomings in the process of monitoring and control were high lighted for improvement in future.)

12. A Meeting by the Hon. Chief Minister Shri. Vilasrao Deshmukh at Mumbai on 16.2.2000.

13. Constitution of a High Power Committee under the Chairmanship of Hon. Smt. Wasudhatai Deshmukh, following the above meeting.

14. Green signal by Govt. to the Mega Regional Rural piped Water Supply of MJP for 158 Villages and Two Townships in Saline Groundwater Belt of PRB during August 2000.

15. Constitution of a Sub-Committee by Hon. Shri. Harshavardhan Deshmukh, Chairman VSDB under the Chairmanship of Dr.B.G.Bathkal, to review the GSDA Programme." (संदर्भ २, पृष्ठ २ व ३)

### डॉ. सुधाकर धबडगांवकर

**२८.** डॉ.सुधाकर धबडगांवकर हे खारपाणपट्ट्यात जन्म घेतलेले एक ज्येष्ठ पर्यावरण शास्त्रज्ञ. अमरावती जिल्ह्याच्या खारपाणपट्ट्यातील खोलापूर हे त्यांचे जन्मगाव. राष्ट्रीय व आंतरराष्ट्रीय स्तरावर पर्यावरण अभियांत्रिकेचे तज्ञ म्हणून नाव मिळविलेले धबडगांवकर यांनी विद्यार्थी म्हणून इंजिनिअरिंग शाखेतील सर्व पदव्या 'डिस्टींक्शन' क्लासमध्ये व 'मेरीट'मध्ये येऊन उत्तीर्ण केलेल्या. १९७८ मध्ये पर्यावरण अभियांत्रिकी या विषयावर नागपूर विद्यापीठाची 'पीएच्डी' त्यांना मिळाली. नागपूरच्या व्ही.आर.सी.ई. मधून पर्यावरण अभियांत्रिकी विभागाचे विभाग प्रमुख व प्रोफेसर म्हणून ते आज सेवानिवृत्त झाले. माणसे मोठ्या पदावर गेलीत की त्यांना आपल्या ग्रामीण भागाचा विसर पडतो. तेथील समस्या, तेथील अडचणी या जणू काय अस्तित्वातच नाहीत अशा भावनेने ती वागायला लागतात. खारपाणपट्ट्याच्या ग्रामीण भागात पेयजल समस्येचे जे अक्राळविक्राळ स्वरुप आहे त्याचा धबडगावकरांना कधीही विसर पडला नाही. या समस्येचे चिंतन, मनन, अभ्यास याचा त्यांनी मोठा ध्यास घेतला. त्यांचा अभ्यास, अध्ययन व अध्यापनाचा विषय सुद्धा तोच असल्यामुळे निरनिराळ्या परिषदांमधून आपला अभ्यास मांडून त्याला मान्यता मिळविण्यासाठी त्यांनी केलली धडपड निश्चितच स्पृहणीय आहे. त्यांच्या या धडपडीतूनच ते पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाच्या स्थापनेमध्ये सहभागी झाले व त्या संस्थेचे पदाधिकारी सुद्धा राहिलेत. आजच्या अमरावती पाणी पुरवठा योजनेच्या बांधकामामध्ये अनेक उपकामांच्या बाबतीत शासनाने त्यांना सल्लागार म्हणून नेमले होते. मोर्शीजवळ सिंभोरा येथील धरणातून पाणी गोळा करण्याऱ्या टाकीचे (Intake sump) डिझाईन व तपोवन जवळील ट्रिटमेंट प्लॅन्टचे डिझाईन हे त्यांच्याच मार्गदर्शनाखाली तयार झालेले असून हे जल प्रक्रिया केंद्र सुरळीत कार्यरत होण्यासाठी त्यांचेच मार्गदर्शन होते. मोर्शीपासून तर तपोवनपर्यंत जी पाईपलाईन टाकण्यात आली त्या पाईपलाईनचे (पिंगळादेवी येथील दाबखंड टाकीसह) डिझाईनसुद्धा त्यांच्याच (डॉ.इंगळे यांचेसह) मार्गदर्शनाखाली तयार झालेले आहे.

डॉ.सुधाकर धबडगांवकर यांनी अनेक समित्यांवर तज्ञ सदस्य म्हणून, अध्यक्ष म्हणून काम केलेले आहे. अनेक अहवाल शासनाला सादर केलेले आहे. अनेक परिषदांमध्ये भाग घेतलेला आहे. त्या सर्वांचा येथे उल्लेख करणे शक्य नाही, मात्र पुढील तीन बाबी प्रकर्षाने लक्षात घेण्यासारख्या आहेत. (१) १५ ते १७ ऑगस्ट १९९६ या कालखंडात फिलीपाईन्स मधील मनीला येथे इंटरनॅशनल वॉटर सप्लाय असोसिएशन (IWSA) आणि फिलीपाईनस् वॉटर वर्क्स असोसिएशन (PWWA) यांच्या संयुक्त विद्यमाने "नदी खोऱ्यांचे व्यवस्थापन" या विषयावर आयोजित करण्यात आलेल्या आंतरराष्ट्रीय कार्यशाळेमध्ये "Indian Scenario and a CASE STUDY on Integrated Approach in Saline Groundwater Belt of Purna River Basin." या विषयावरील त्यांनी सादर केलेला प्रबंध अतिशय महत्वपूर्ण म्हणून गाजला. या कार्यशाळेसाठी त्यांना इंटरनॅशनल वॉटर सप्लाय असोसिएशनने निमंत्रित केले होते.

(२) महाराष्ट्र शासनाच्या नगरविकास विभागाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अध्यक्ष या नात्याने "Investigation of the Cholera Epidemic in Amravati during December 1992 " या विषयावरील त्यांनी सादर केलेला अहवाल अतिशय महत्वपूर्ण होता.

(३) त्यावेळच्या महाराष्ट्र शासनाच्या पाणी पुरवठा व स्वच्छता विभागाने नेमलेल्या तज्ञ समितीचे अध्यक्ष या नात्याने त्यांनी सादर केलेला "Pipelines for Drinking water supply in Maharashtra State" या विषयावरचा अहवाल सुध्दा अत्यंत अभ्यासपूर्ण, उपयुक्त व मार्गदर्शक अहवाल समजला जातो.

### डॉ.धबडगांवकर यांची धडपड

**२९.** अमरावती पाणी पुरवठा योजनेचे बांधकाम १९८७ पासून तर १९९४ पर्यंत सुरु होते. या काळात डॉ. धबडगावकर यांचा या योजनेच्या बांधकामाशी व एकूणच अमरावती पाणी पुरवठ्याशी जवळून संबंध आलेला होता. खुद्द खारपाणपट्ट्यात ४०० ते ५०० कुपनलिका काढून ४ लाख लोकसंख्येचे हे शहर आपली तहान भागवित आहे हे त्यांनी प्रत्यक्ष पाहिले होते. या कुपनलिकांचे पाणी सुरुवातीला इतके खारे होते की ते पिण्याच्या लायकीचे नव्हते व त्यामुळे नाल्यात वा नदीत सोडून द्यावे लागत असे. दोनचार महिन्यात त्याचा खारेपणा कमी होत असे. विशेषतः एक दोन पावसाळे अंगावरून गेल्यावर गोड पाण्याच्या पुनर्भरणामुळे हा खारेपणा मोठ्या प्रमाणात कमी होत असे. पावसाच्या पाण्यावरच पुनर्भरणासाठी अवलंबून रहाण्यापेक्षा पावसाळी पाण्याचे साठे करुन ठेवून बाराही महिने गोड पाण्याचे पूनर्भरण झाले तर भूजलाचा पेयजल म्हणून दर्जा सुधारु शकतो असा विचार त्यांच्या मनात घर करून गेला. खारपाणपट्ट्याच्या ग्रामीण भागातील पेयजलांची समस्या मोठ्या प्रमाणात सुटू शकते असे त्यांना वाटू लागले.

### १९९२ ची इंटरनॅशनल कॉन्फरन्स

**३०.** "International Conference on Rural Water Supply and Sanitation for Developing Countries" organized by the Indian Water Works Association ही नागपूर येथे ४ ते ७ जानेवारी १९९२ या काळात झाली. निरनिराळ्या १० देशांचे प्रतिनिधी या परिषदेला हजर होते. या परिषदेमध्ये डॉ. धबडगांवकर यांच्या प्रबंधावर विस्तृत चर्चा झाली. पूर्णा खोऱ्यातील खारपाणपट्ट्यातील ग्रामीण भागाला पेयजलाचा पुरवठा या विषयावर या क्षेत्रातील तज्ञांचे लक्ष वेधण्यामध्ये या परिषदेने महत्वाची कामगिरी बजावली.

### १९९३ ची भूजलभरण कार्यशाळा

**३१.** "Workshop on Groundwater Recharge organized by Indian Water Resources society at Amravati, during February 1993." १९९३ मध्ये ही कार्यशाळा आयोजित करण्यात आली होती. खारपाणपट्ट्यातच ही चर्चा व्हावी या हेतूने ही कार्यशाळा १० फेब्रुवारी १९९३ रोजी अमरावती येथेच घेण्यात आली होती. काही निवडक शेतकऱ्यांनासुद्धा या कार्यशाळेसाठी बोलाविण्यात आले होते. या कार्यशाळेचे नाव सुद्धा "भूजलभरण कार्यशाळा" असे ठेवण्यात आले होते. १९९२ च्या आंतरराष्ट्रीय परिषदेत जो शोधप्रबंध डॉ. धबडगावकर यांनी इंग्रजीत सादर केला होता, त्यात सुधारणा

***कार्यशाळेच्या समारोपीय अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने भाषण करताना ज्या उत्स्फुर्तपणे "खारा पानी चलेजाव" ही घोषणा प्राचार्य श्री. उलेमाले यांच्या तोंडून त्यांच्या शैलीमध्ये बाहेर पडली तेव्हा सभागृहात उपस्थित असलेल्या अनेकांना शहारुन आले.***

*परिच्छेद ३५ पहा*

***खाऱ्या पाण्याचा उपसा व गोड पाण्याचे पुनर्भरण या डॉ.सुधाकरराव धबडगांवकर यांनी १९९२-९३ मध्ये मांडलेल्या सिध्दान्ताला किंवा "खारापानी चले जाव" या प्राचार्य श्री. एच.बी.उलेमाले यांनी त्याच दरम्यान केलेल्या घोषणेला २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने जोरदार पाठिंबा दिलेला आहे.*** परिच्छेद ३६ पहा

करुन त्यांनी तो फेब्रुवारी १९९३ च्या कार्यशाळेमध्ये सादर केला. सहभागी होणाऱ्या शेतकऱ्यांची संख्या लक्षात घेऊन हा प्रबंध मराठीतून सादर करण्यात आला होता. डॉ. रमेश इंगळे हे या प्रबंधाचे सहलेखक होते.

### खारपाणपट्ट्यातील समस्या

**३२.** सन १९९३ च्या कार्यशाळेत सादर करण्यात आलेल्या या शोधप्रबंधाचा मथळा "**पूर्णा नदीच्या खोऱ्यातील भूजल-क्षेत्राचा पुनर्प्रभारण व उपसा याद्वारे गोड भूजल-क्षेत्रात रूपांतरण व विकास**" असा होता. त्यामध्ये सुरुवातीलाच खारपाणपट्ट्याच्या समस्यांची थोडक्यात माहीती दिली होती ती पुढील शब्दात :-

"ह्या प्रदेशातील मुख्यत्वे खाऱ्या पाण्याच्या समस्येमुळे जनता त्रस्त आहे. पिण्याचे पाणी गेल्या दशकापर्यंत दुर्मिळ होते. त्यासाठी नदी लगतच्या गावी ४ ते ५ कि.मी. एवढ्या अंतरावरुन विशेषतः स्त्रियांना डोक्यावर नदीतून पिण्याचे पाणी वाहून आणावे लागे. त्यासाठी फार कष्ट व वेळ लागत असे. पिण्याच्या पाण्याशिवाय इतर उपयोगासाठी सर्रास खाऱ्या पाण्याचा वापर करावा लागे. त्यासाठी खाऱ्या पाण्याच्या विहिरी आजही त्या भागात आहेत. महाराष्ट्र सरकारने नळाद्वारे खेडोपाडी पाणी पुरवठा योजना राबविल्यामुळे तूर्त पिण्याच्या पाण्याची समस्या थोडी कमी झाली आहे. एकंदरीत अजुनही पाहिजे तिथे मुबलक गोड पाणी उपलब्ध नाही, आणि म्हणूनच या भागात जमीन अत्यंत सुपीक असूनही फक्त खरीप (कोरडवाहू) शेतीच करतात. पाणी नाही म्हणून उद्योगधंदेही या भागात उभारता आले नाहीत. या सर्व बाबींमुळे या प्रदेशाचा विकास इतर भागाच्या तुलनेने झाला नाही."

### प्रबंध लेखकांचा हेतू व लेखकांची विनंती

**३३.** शोधप्रबंधाच्या उभय लेखकद्वयांनी त्यांच्या प्रयत्नाबाबतची त्यांची भूमिका पुढील शब्दात मांडली होती. :-

"**लेखक अमरावती जिल्ह्यातील मूळ रहिवासी असून या सर्व समस्यांशी परिचित आहेत. या भागातील खाऱ्या पाण्याची समस्या दूर केल्यास इथलाही सर्वंकष विकास ठामपणे साधता येईल असा विश्वास आहे. खाऱ्या पाण्याऐवजी या प्रदेशात गोड पाणी नेहमीकरता रुजविण्यासाठी एक असाधारण परंतु प्रत्यक्षात येण्यालायक योजना या प्रबंधात लेखकांनी मांडली आहे.**"

अतिशय तळमळीने व कळवळून उभय लेखकांनी, लोकप्रतिनिधी, अधिकारी व तंत्रज्ञ यांना पुढीलप्रमाणे विनंती केली होती :- "त्यासाठी लागणारा वेळ व पैसा सध्या जरी जास्त वाटत असला तरी समस्या कायमची दूर होत असल्याने व राष्ट्रीय दृष्टिकोनातून त्याकडे पाहिल्यास, तोच सर्वात उचित मार्ग आहे असे लेखकांनी या सम्मेलनात उपस्थित असलेले **जनतेचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे इतर सर्व संबंधित संस्था, उच्चपदस्थ अधिकारी व तंत्रज्ञ यांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या योजनेचा सरकारकडे योग्य पाठपुरावा करावा अशी अपेक्षा आहे.**"

आपल्या ६ परिच्छेदांच्या लहानशा शोधप्रबंधामध्ये ६ व्या परिच्छेदात ही अपेक्षा पुन्हा मांडण्यात आली होती. ती पुढील शब्दात :- "शास्त्रीय, आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून या समस्येचा विचार केल्यास ही एक लोकोपयोगी योजना असून तिचा पाठपुरावा या भागाशी निगडित जनता, त्यांचे पुढारी, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वयंसेवी संघटनांनी व सरकारने केला पाहिजे असे आम्हाला वाटते. **या प्रयत्नातून योग्य जलसंपत्ती अभावी उपेक्षित असलेल्या या भूभागाचा निश्चित विकास होईल असे लेखकांना कळकळीने सांगायचे आहे.**"

### शोधप्रबंधाचा गाभा काय?

**३४.** डॉ. सुधाकर धबडगांवकर व डॉ. रमेश इंगळे यांनी मांडलेल्या या शोधप्रबंधात प्रतिपादन करण्यात आलेले गृहितक अथवा मांडावयाच्या सिद्धांताचे प्रारुप थोडक्यात पुढील प्रमाणे मांडले होते. त्यांच्याच शब्दात जसेच्या तसे :-

"पूर्णा नदीच्या खोऱ्यात भूजल खारे मिळण्याची कारणे काहीही असली तरी त्याची तीव्रता हळूहळू कमी करुन सरतेशेवटी त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत राखण्यासाठी खाऱ्या पाण्याचा उपसा (पंपींग) व भूजल पुनर्प्रभारण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा समन्वय साधल्यास हे सहज शक्य आहे हे कोणासही पटेल. त्यामुळे क्षारयुक्त मातीतून पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षारविरहित बनेल."

आपल्या प्रतिपादनाच्या समर्थनार्थ या लेखकद्वयांनी खारपाणपट्ट्यातील पाणीपुरवठा योजनेला पाणी पुरविणाऱ्या चेंडकापूर येथील कुपनलिकेचे उदाहरण पुरावा म्हणून दिले होते. ते पुढील शब्दात :-

"**अमरावती तालुक्यातील चेंडकापूर येथे पूर्णा नदीच्या काठावर महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल निःसारण मंडळाच्या कूपनलिका (ट्यूब वेल्स) गेल्या किमान ५ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यातील कूपनलिका क्र. १३ ही ताशी ४५,००० लिटर्स या दराने पाणी उपसत आहे. सुरुवातीला म्हणजे १६.३.८८ रोजी त्यातील उपसलेल्या पाण्यात क्लोराईडचे प्रमाण ५००० मि. ग्रॅ./लि. एवढे होते. इतर काही पर्याय नसल्याने हे पाणी काही दिवस नदीत सोडून व त्यानंतर इतर पाण्याबरोबर मिसळून वापरले गेले. त्यानंतर जवळ जवळ ३ वर्षांनी दिनांक ३.११.९० रोजी तपासलेल्या पाण्यात फक्त ७०० मि. ग्रॅ./लि. एवढे कमी क्लोराईडस नोंदले गेले. हा झालेला बदल वर दिलेल्या संकल्पनेस पृष्ठी देतो. केंद्रीय भूजल मंडळाचाही असाच निष्कर्ष आहे.**"

**आपल्या या प्रबंधाच्या परिच्छेद ३.३.२ मध्ये कृत्रिम भूजल पुनर्प्रभारण या विषयावर या लेखकद्वयांनी पुढील विचार मांडलेले आहेत :-**

"खाऱ्या भूजल क्षेत्रातून निदान वरच्या ४-५ मी. थरातुन खाऱ्या पाण्याऐवजी त्या जागी गोड पाणी रुजविणे तसेच रुजविण्याचा वेग कृत्रिम भूजल पुनर्प्रभारणद्वारे अनेक पटीने व अधिक फायदेशीररित्या वाढविता येणे शक्य आहे." हा ६ परिच्छेदांचा छोटासा प्रबंध या विषयात रस असलेल्या प्रत्येकाने मुळातून वाचण्यासारखा आहे. म्हणून सोबत ते **सहपत्र : एक** म्हणून दिलेला आहे.

### 'खारा पानी चलेजाव' - प्राचार्य उलेमाले

**३५.** प्राचार्य श्री. एच.बी.उलेमाले हे अनेक वर्षापासून खारपाणपट्ट्याच्या समस्यांची जवळून जाणीव असलेले तज्ञ म्हणून विदर्भाला परिचित आहेत. सुरुवातीच्या काळात श्री.शिवाजी कृषी महाविद्यालयामध्ये प्राध्यापक व त्यानंतर प्राचार्य म्हणून त्यांनी काम केले. डॉ. पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठाचे कुलगुरु या नात्याने त्यांचे काम सर्वपरिचीत आहे. अनुशेष व निर्देशांक समितीवर सदस्य म्हणून काम केल्यामुळे अनुशेषजन्य समस्यांचा त्यांना अतिशय जवळून परिचय झालेला होता. विशेषतः खारपाणपट्ट्यातील समस्यांची त्यांना जवळून जाणीव होती. १९९३ मध्ये इंडीयन वॉटर वर्क्स सोसायटीने 'ग्राउंड वॉटर रिचार्ज' ह्या विषयावर अमरावती येथे जी कार्यशाळा आयोजित केली होती. त्यात त्यांचा सक्रीय सहभाग होता. खाऱ्या पाण्याचा उपसा व भूपृष्ठावरील गोड पाण्याचे पुनर्भरण या सिध्दान्तावर अमरावतीचे रहिवासी या नात्याने त्यांचा स्वतःचा अनुभवजन्य विश्वास होता. डॉ. सुधाकरराव धबडगांवकर व डॉ.रमेश इंगळे यांच्या सहभागाने या सिध्दांतांची मोठी साधकबाधक चर्चा या कार्यशाळेच्या निमित्ताने झाली. 'भुजल पुनर्भरण' हाच कार्यशाळेचा मुख्य व एकमेव विषय होता, त्यामुळे त्या प्रश्नाला चांगलाच न्याय मिळाला. प्रत्यक्ष अनुभव घेतलेल्या अनेक शेतकऱ्यांनी आपला अनुभव या सिध्दांताशी मिळताजुळता व अनुकूल आहे असे सांगितल्यामुळे या चर्चेमध्ये मोठे आशेचे वातावरण निर्माण झाले. **सदरहू कार्यशाळेच्या समारोपीय अधिवेशनाचे अध्यक्ष या नात्याने भाषण करताना ज्या उत्स्फुर्तपणे "खारा पानी चलेजाव" ही घोषणा प्राचार्य श्री. उलेमाले यांच्या तोंडून त्यांच्या शैलीमध्ये बाहेर पडली तेव्हा सभागृहात उपस्थित असलेल्या**

***'सलाईनिटी'च्या समूळ उच्चाटणासाठी भूगर्भामध्ये गोड पाण्याच्या पुनर्भरणाचे जोरदार समर्थन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने केले असतांना आमच्या दारात अजिबात न थांबता गोड पाण्याचा हा जलसाठा सालाबादप्रमाणे अरबी समुद्रालाच जावून मिळाला पाहिजे यासाठी ही संघर्ष समिती संघर्ष करीत आहे हा केवढा दैवदुर्विलास होय.*** परिच्छेद ३६ पहा

***१९१४ साली एक ब्रिटीश अधिकारी अकोला जिल्ह्याच्या पाणीपुरवठ्या विषयी अहवाल देतांना लिहून ठेवतो की मध्यप्रांत वऱ्हाडच्या या खोऱ्यातील उत्तर भागातून पाईपलाईनने गोड पाणी आणून या खेड्यांना व शहरांना दिले पाहिजे. इथे २००७ साली गोड्या पाण्याचा ७५ दशलक्ष घनमिटरचा जलसाठा आमच्या दारात शासनातर्फे उभा केला जात असतांना आम्ही हा प्रकल्प नको म्हणतो. या दुर्बुद्धीला काय म्हणावे?***

*परिच्छेद २३ पहा*

**अनेकांना शहारून आले.** या समारोपीय अधिवेशनाच्या वृत्तांतातील याबाबतचा उल्लेख पुढीलप्रमाणे :-

"Indian Water Resources Society (IWRS) in 1993 organized a workshop on Groundwater Recharge at Amravati. Being pertinent to the region, Dhabadgaonkar and Ingle (1993) pursued the matter in this workshop, where the reaction of some of the farmers was quite favorable to the proposition as their experience was in conformity with the hypothesis that the quality of groundwater gradually improves with time. At that juncture, the spontaneous slogan Khara Pani Chale Jao that emerged in the presidential address at the concluding session by Prof. H.B.Ulemale, may still be in the memory of many who attended the workshop."

### खाऱ्या पाण्याचा नायनाट व गोड पाण्याचे पुनर्भरण

**३६.** समुद्राच्या पाण्यामुळे खाजण जमिनीत आलेले खारे पाणी असो किंवा अन्य तऱ्हेचे खारेपण असो ते दुर करण्यासाठी गोड पाण्याचे भूगर्भातील कृत्रिम पुनर्भरण या सिध्दांताचा वापर केला पाहीजे व त्याच बरोबर अशा भुजल पुनर्भरणासाठीच्या अन्य अपारंपारिक पध्दतीचा सुध्दा वापर केला पाहीजे, असे सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये ठामपणे मांडण्यात आले आहे. वेगळया शब्दात सांगायचे झाल्यास **खाऱ्या पाण्याचा उपसा व गोड पाण्याचे पुनर्भरण या डॉ.सुधाकरराव धबडगांवकर यांनी १९९२-९३ मध्ये मांडलेल्या सिध्दातांला किंवा "खारापानी चले जाव" या प्राचार्य श्री. एच.बी.उलेमाले यांनी त्याच दरम्यान केलेल्या घोषणेला २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने जोरदार पाठिंबा दिलेला आहे.** तो पुढील शब्दात. :- "Non-conventional methods for utilisation of water such as through inter-basin transfers, artificial recharge of ground water and desalination of brackish or sea water as well as traditional water conservation practices like rainwater harvesting, including roof-top rainwater harvesting, need to be practiced to further increase the utilisable water resources. Promotion of frontier research and development, in a focused manner, for these techniques is necessary." (संदर्भ ७, परिच्छेद ३.२) **'सलाईनिटी'च्या समुळ उच्चाटणासाठी भूगर्भामध्ये गोड पाण्याच्या पूनर्भरणाचे जोरदार समर्थन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने केले असतांना आमच्या दारात अजिबात न थांबता गोड पाण्याचा हा जलसाठा सालाबादप्रमाणे अरबी समुद्रालाच जावून मिळाला पाहिजे यासाठी ही संघर्ष समिती संघर्ष करीत आहे हा केवढा दैवदुर्विलास होय.**

### उपसा व पुनर्भरणाचे संतुलन

**३७.** भूगर्भातून आपण मोठया प्रमाणावर पाण्याचा उपसा करतो व तो उपसा करीत असतांना आपली जी पुनर्भरणाची ताकद आहे त्यापेक्षा जास्त असा उपसा अनेकदा केला जातो. सामाजिक संतुलन राखण्याच्या दृष्टीने पुनर्भरणाच्या प्रमाणातच उपसा केला पाहीजे असे मोठे ठाम प्रतिपादन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये करण्यांत आलेले आहे ते पुढील शब्दात :- "Exploitation of ground water resources should be so regulated as not to exceed the recharging possibilities, as also to ensure social equity. The detrimental environmental consequences of overexploitation of ground water need to be effectively prevented by the Central and State Governments. Ground water recharge projects should be developed and implemented for improving both the quality and availability of ground water resource." **(संदर्भ ७, परिच्छेद ७.२) आतापर्यंत आम्ही एकतर्फी उपसाच करीत राहिलो, पुनर्भरणाचा विचार हा काही विचार करण्यासारखा विचार आहे असा विचार आमच्या मनातही कधी आला नाही. आता राष्ट्रीय जलधोरणाने मार्गदर्शन केल्यानंतर सुध्दा आम्ही तो विचार करणार नसु तर तो एक मोठा अविचार होय.**

### क्षारमुक्ती ही लाभक्षेत्र विकासामध्ये समाविष्ट पाहीजे

**३८.** लाभक्षेत्रातील ज्या जमीनी क्षारयुक्त आहेत, त्यांना वैज्ञानिक उपाययोजनेद्वारे दुरुस्त करणे हा लाभक्षेत्राच्या विकासाचा एक भाग असला पाहीजे असे प्रतिपादन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये करण्यांत आलेले आहे. ते पुढील शब्दात. :- "Reclamation of water logged / saline affected land by scientific and cost- effective methods should form a part of command area development programme." (संदर्भ ७, परिच्छेद ९.६)

### पृथ्वीच्या पोटातील इतके खारे पाणी कसे उपसणार?

**३९.** १९९० ते १९९४ या कालखंडामध्ये अमरावती वाढीव पाणी पुरवठा योजनेच्या कामाला जोरदार वेग आलेला होता. या काळामध्ये त्या कामाशी संबंधित असलेले पाणी पुरवठा मंडळाचे कार्यकारी अभियंता श्री.दहासहस्त्र हे होते. त्या योजनेमध्ये अधिकृत सल्लागार म्हणून काम करीत असलेले डॉ. सुधाकरराव धबडगांवकर यांचेशी अनेकदा औपचारिक अनौपचारिक चर्चा करण्याची संधी मला प्राप्त झाली. "पूर्णा नदीच्या खोऱ्यातील भूजल-क्षेत्राचा पुनर्प्रभारण व उपसा याद्वारे गोड भूजल-क्षेत्रात रूपांतरण व विकास" या त्यांच्या मराठी प्रबंधाची व तत्पूर्वीच्या इंग्रजीतील मजकुराची प्रत मला मिळालेली होती. १९९३ मध्ये झालेल्या कार्यशाळेचे अहवाल माझ्या दप्तरी निट लावून ठेवलेले होते. लोकप्रतिनिधींनी याबाबतीत काहीतरी धडपड केली पाहीजे अशी चिंता व तळमळ डॉ.सुधाकरराव धबडगांवकर सातत्याने व्यक्त करीत असत. त्यांच्या प्रबंधातूनसुद्धा त्यांनी "जनतेचे प्रतिनिधी', त्याचप्रमाणे इतर सर्व संबंधित संस्था, उच्चपदस्थ अधिकारी व तंत्रज्ञ यांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या योजनेचा सरकारकडे योग्य पाठपुरावा करावा अशी अपेक्षा आहे." असे आवाहन केले होते. खारपाणपट्ट्यातील जनजीवनाच्या समस्यांची बालपणापासून व जवळून माहीती असल्याने त्यांचा प्रबंध वाचून मनामध्ये आलेल्या काही शंका दूर कराव्या म्हणून एका दिवशीच्या अनौपचारिक चर्चेमध्ये मी त्यांच्याकडे अशी विचारणा केली की, "पृथ्वीच्या पोटातील इतके मोठे खारे पाणी उपसणे हे कसे काय शक्य आहे.?" त्यावर त्यांचे उत्तर असे होते की, "बी.टी.साहेब! साऱ्या पृथ्वीचा तुम्ही कशासाठी विचार करता? अमरावती पासून तर रेवसा व पुढे आसेगाव पर्यंतच्या भागात १५-२० कि.मी.च्या परिसरामध्ये हा प्रयोग आता पूर्णपणे यशस्वी झाला आहे. समोर आणखी ५-१० किलोमिटरचा पट्टा निवडून पंपींग आणि रिचार्जचे हे तंत्र पुढे वापरत राहीले तर तेवढया तेवढया भागामध्ये भुजलाचा दर्जा दुरुस्त होत जाईल."

### उपाययोजना बिनचुक आहे किंवा नाही हे पहिल्यांदा पहा

**४०.** मी त्यांना दुसरी शंका अशी विचारली की, "अहो! तुमच्या प्रयोगामध्ये गोड पाण्याचे पुनर्भरण हा एक महत्वाचा घटक आहे. आता येथे प्यायला गोड पाणी नाही, तर भूगर्भातील पुनर्भरणासाठी इतके मोठे गोड पाणी कुठून आणावे.?" त्यावर त्यांचे उत्तर अशा अर्थाचे होते की, ऐवीतेवी पावसाच्या पाण्यामुळे थोडेफार

***आतापर्यंत आम्ही एकतर्फी उपसाच करीत राहिलो, पुनर्भरणाचा विचार हा काही विचार करण्यासारखा विचार आहे असा विचार आमच्या मनातही कधी आला नाही. आता राष्ट्रीय जलधोरणाने मार्गदर्शन केल्यानंतर सुध्दा आम्ही तो विचार करणार नसु तर तो एक मोठा अविचार होय***

*परिच्छेद ३७ पहा*

***कुपनलिकेतून मोठया प्रमाणावर नदीत खारे पाणी फेकले जात असतांना नदीतळातील गोड पाण्याचा प्रवाह वेगाने कुपनलिकेच्या दिशेने येतो. येतांना तो प्रवाह विरघळणाऱ्या क्षारयुक्तमातीसह आल्याने त्याचे क्षारत्व कमी होत जाते व काही दिवसांनी कुपनलिका सुध्दा गोड पाणी देवू लागते.***

*परिच्छेद ५२ पहा*

पुनर्भरण दरवर्षी होतच असते आणि शेकडो वर्षात त्यामूळे भुजलाचा दर्जा सुधारत जातो. जिथे उपसा नसेल तिथे तो सुधारत नाही. उपाययोजना बिनचुक आहे किंवा नाही हे पहिल्यांदा पाहा व ती उपाययोजना बिनचूक असेल तर आपण सारेजण आपल्या शक्तीनुसार त्या उपाय योजनांचा वापर करु. लहान लहान गावतळे, शेततळे, कोल्हापूरी बंधारे, नदीमध्ये छोटे छोटे कच्चे बंधारे बांधून या पुनर्भरणाच्या कामाला गती देता येवू शकते. सध्या ते काम आपण पूर्णपणे निसर्गाच्या भरवश्यावर सोडून दिलेले आहे. काळ्या मातीचा थर खुप खोलवर असल्यामूळे प्रकल्पासाठी पाया मिळत नाही. एखाद्या ठिकाणी लहान मोठा प्रकल्प झाला तर त्या पाण्याचा सुध्दा पुनर्भरणासाठी खूपच चांगला उपयोग होवू शकेल.

### भूगर्भातील हे खारे पाणी किती खोल वरुन उपसावे लागेल?

**४१.** माझी तिसरी शंका मी त्यांना विचारली ती अशी की, "भुगर्भातील हे खारे पाणी किती खोल वरुन उपसावे लागेल. इतक्या खोलवरुन इतके पाणी समजा उपसले तरी थोडयाशा गोड पाण्याच्या पुनर्भरणामुळे किती फरक पडेल.?" त्यावर त्यांचे उत्तर असे होते की, खुप खोलवरचे पाणी उपसले पाहीजे असे नाही, ५-१० मिटरचा उपसा झाला तरी फायदा होतो. खोलवर जावून पाणी उपसत बसण्याची गरज नाही. साधारणपणे पावसाळयाच्या अगोदर आणि पावसाळयामध्ये मोठया प्रमाणात उपसा केला तर पावसाळयातील भूगर्भात गेलेले गोड पाणी हे वर राहते व खा-या पाण्याचा गुणधर्म असा आहे की, ते खालचे खालीच राहणार. त्यावेळच्या चर्चेमध्ये त्यांनी एक उदाहरण दिल्याचे मला आठवते ते म्हणाले तुम्ही आता नेहमी मुंबईला जाता हायकोर्टाच्या इमारतीच्या बाहेर मुख्य रस्त्यावर फुटपाथमध्ये एक विहीर आहे. ती बरीच उथळ आहे तिचे पाणी चांगले गोड आहे. आता पिण्यासाठी वगैरे कोणी वापरत नाही. पुजेसाठी वगैरे ताजे पाणी काही लोक तेथुन नेतात. आता १० अश्वशक्तीचा एखादा पंप बसवून त्या विहीरीतून जर उपसा केला तर तासा दोन तासाने तुम्हाला त्यातुन खारे पाणी मिळेल याचे मुख्य कारण असे की, पावसामूळे आलेले गोड पाणी विहीरीच्या वरच्या थरात असेल व भुगर्भाच्या आत असलेले समुद्र संपर्कामूळे खारे असलेले पाणी दार्ढ्यतेमूळे तळात बसलेले असते. साध्या अनौपचारिक चर्चेमध्ये त्यांनी हा जो विचार व्यक्त केला तो शास्त्रीय पध्दतीने त्यांनी त्यांच्या शोध निबंधातून मांडलेला आहे तो शब्दशः त्यांच्याच शब्दात जसाच्या तसा :-

"**पाण्यात जितके अधिक क्षार मिसळले असतील तितक्या प्रमाणात त्याची दार्ढ्यता (डेंसीटी) अधिक असते. कमी क्षार असलेले पाणी अलगद जास्त क्षाराच्या पाण्यावर सोडल्यास ते तसेच वरचा स्तर राखते.** समुद्राच्या पाण्यात साधारणपणे ४०,००० मि.ग्रॅ./लि. एवढे क्षार आढळतात व त्याची दार्ढ्यता १.०४ एवढी असते. त्यामुळेच समुद्र किनाऱ्या लगतच्या भूभागात गोड पाणी खाऱ्या पाण्यावर वरच्या स्तरात आढळते. त्याठिकाणी जर जमिनीतून गोड पाणी उपसण्यावर योग्य निर्बंध ठेवला तर खारे पाणी वर येऊ शकत नाही. म्हणून समुद्र किनारी खोलवर जरी खारे पाणी असले तरी वरचे भूजल गोड असते. याला प्रमुख कारण म्हणजे पाण्याची त्याच्या दार्ढ्यतेनुसार स्तर राखण्याची प्रवृत्ती."

### दापुरा ता. मुर्तिजापूर येथील प्रात्यक्षिकाचे निष्कर्ष

**४२.** भुगर्भातून कुपनलिकेच्या सहाय्याने मोठया प्रमाणात पाण्याचा उपसा करणे व त्या ठिकाणी भुपृष्ठावरील गोड पाण्याचे पुनर्भरण करणे यामूळे भुगर्भातील पाण्याचा खारेपणा कसकसा कमी होत जातो व त्याचे उत्तम पेयजलामध्ये कसे रुपांतर होत जाते, याविषयीचा एक प्रायोगिक प्रकल्प दापुरा, ता. मुर्तिजापूर, जि.अकोला येथे गेले काही वर्षे राबविण्यात येत आहे. वैधानिक विकास मंडळाने सन १९९६ ते २००० या काळात या कामासाठी रुपये २.७५ कोटी एवढा मोठा निधी उपलब्ध करुन दिलेला होता. अकोला जिल्हा परिषदेने सुध्दा या कामासाठी याच काळात जवळजवळ १८.९० लक्ष रुपये उपलब्ध करुन दिलेले आहेत. महाराष्ट्र शासनाच्या भूजल सर्वेक्षण यंत्रणेच्या नेतृत्वाखाली हा प्रयोग राबविण्यात आला/येत असून या प्रयोगामध्ये दापूरा सोबतच अकोला, अमरावती व बुलढाणा जिल्ह्यातील इतरही काही ठिकाणी हा प्रयोग राबविण्यात येत आहे. **दापूरा येथील प्रयोगाबाबत असे नमुद करता येईल की २ ऑगस्ट १९९३ रोजी या प्रयोगाला सुरुवात करण्यात आली. दर आठवड्याला पाण्याच्या रासायनिक गुणधर्माची तपासणी होत होती व त्यांच्या उत्तम नोंदी ठेवण्यात आल्या आहेत. कुपनलिकेत पाणी भुपृष्ठापासून १२ मिटर इतके खोल होते. सतत ५७०० तास उपसा केल्यानंतर असे आढळून आहे की विरघळणाऱ्या क्षारयुक्त मातीचे प्रमाण सुरवातीला ३२०० ppm होते ते १०८८ वर आले. क्षारांचे प्रमाण (Cloride) 1800 mgl होते ते 402 mgl वर आले.**

**४३.** महाराष्ट्राच्या भुजल सर्वेक्षण व विकास यंत्रणेचे संचालक श्री.एम.एम.सारभुकम यांनी आपल्या DESALINATION OF THE GROUNDWATER FROM DEEPER AQUIFER IN PURNA BASIN BY SIMULTANEOUS DEWATERING AND FRESH WATER INJECTION TECHNIQUE या शोध निबंधामध्ये दापूरा येथील या प्रकल्पाचे भौतिक तपशील पुढीलप्रमाणे नमूद केले आहे. :-

"DETAILS OF THE EXPERIMENT CONDUCTED : For the purpose of conducting pilot experimental studies. a tubewell at village Dapura in Murtizapur Tahsil of Akola district was selected. The village Dapura is located due north-west of Murtizapur town and 15 km. away from Murtizapur on Durgawada-Mana all weather road. It falls in survey of India toposheet No. 55 H/5 and falls in PTU-2 watershed. It is bounded by north latitude $20^0 51'$ 10" and east longitude $77^0 27'$ 30" . The tube well is located 300 meters away from river Purna. The lithological section that has been observed in the tub well indicate a soil thickness of 1.0 meter followed by yellow clay up to 10 meters. A sand horizon, which is grew in color with fine texture is encountered from 10 to 18 meters. This again is followed by a coarse sand, which acts as a productive zone and it continues up to 26 m., 26 m. onwards again a clay mixed sand zone is encountered having a thickness of 26 to 33 meters and from 33 to 38 meters again clay mixed with lime is encountered in the tub well, These clay zones acts as impermeable zone and do not allow vertical infiltration of rainwater. From 38.00 meters to 42.00 meters again a medium grained sand with basalt pieces is encountered and the tube well ends in it as hard basalt is likely to be encountered below. The yield of the tube well is 21 $M^3$/ hour with chemical character of water as saline." (संदर्भ १, पृष्ठ ५४)

**४४.** यंत्रणेचे सर्वोच्च अधिकारी या नात्याने श्री.सारभूकम हे स्वतःच या प्रायोगिक प्रकल्पाचे नेतृत्व करीत असल्याने त्यांच्या मताला स्वाभाविकपणे महत्व प्राप्त होते. ५७०० तासाच्या खाऱ्या पाण्याच्या उपस्यानंतर जे निष्कर्ष या प्रयोगातून हाती आले त्याबद्दल संचालक म्हणतात :-

"The experimental study at village Dapura was proposed to be undertaken by the Department. As per the exploratory work, the depth of tube well is 42 meters, the thickness of clay zone from ground level was 10 meters followed by 10 to 18 meters thickness of medium to coarse grained sand and followed by intermediate bands of sand zone and clay

***जलसिंचनासाठी वापरावयाचे पाणी व पावसाचे पाणी यांना भुगर्भात प्रवेश देणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास खारपाणपट्टयातील भुगर्भ जलाशयातील खारेपणा मोठया प्रमाणात कमी होवू शकेल***

*परिच्छेद ५६ पहा*

> ***"भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे (जी.एस.डी.ए.) मार्फत गेल्या ४-५ वर्षात अनेक गावांत टयुबवेलव्दारे खारे पाणी उपसण्याचा प्रयोग केला. ५-६ महिने खारे पाणी या टयुबवेलव्दारा उपसल्यानंतर या टयुबवेलला गोडे पाणी लागले आहे आणि हे पाणी पिण्यायोग्य आहे हे चाचणी अंती सिध्द झाले."***
>
> *परिच्छेद ५८ पहा*

upto 42 meters and underlain by trap rock. It was interpreted that during the river action at the time of formation of the basin, the sand deposited on the basement rock during the Geological period and once the trough has reached certain level, the river sediments in the form of silt are deposited and thus the contact of enriched sand zone and direct recharge during rainall is cut-off due to the thick layer of non permeable layer of salty alluvium.

Based on the above studies, the Pilot Project for washing salts in sand zone by dewatering process is started at Village Dapura, Taluka Murtizapur of Akola district on 2nd August, 1993. The initial water level was 12.00 meters from ground level. Total dissolve salt were 3200 ppm and chloride were 1800 mgl/litre. Chemical quality tests were checked mostly during each week. After pumping of 5700 hours, it was observed that the TDS reached to 1088 ppm and chloride 402 mgl. This has encouraged the further studies: Accordingly, a detailed geophysical profiling work was carried out in order to understand the thickness of sand and clay layer. Similarly, the base flow quality of groundwater underlair sand zone." (संदर्भ १, पृष्ठ ५३)

### श्री. भय्यासाहेब कुटासकर

**४५.** श्री.व्ही.डब्ल्यु.देशमुख उर्फ भय्यासाहेब कुटासकर हे अमरावतीच्या विदर्भ महाविद्यालयाचे १९५० ते ६० च्या दशकातील एक तडफदार विद्यार्थी नेते. सन १९५८ साली ते विदर्भ महाविद्यालयाच्या विद्यार्थी संघाचे सरचिटणीस म्हणून थेट निवडणूकीने निवडून आल्याचे मला आठवते. माझ्यापेक्षा २-३ वर्षानी सिनीयर असलेले श्री.व्ही.डब्ल्यु. देशमुख यांचे मुळ गांव कुटासा. त्यावरुन पुढे ते भय्यासाहेब कुटासकर या नावानेच ओळखले गेले. कुटासा हे सुध्दा खारपाणपट्टयातील एक समस्याग्रस्त गांव. विद्यार्थी जीवन संपवून आपल्या गावाला परत गेल्यानंतर खारपाणपट्टयाच्या समस्या व त्यावरील उपाययोजना यासाठी श्री.कुटासकर यांनी स्वतःला वाहून घेतले. अनेक नेते, सामाजिक कार्यकर्ते, शास्त्रज्ञ यांच्याशी वारंवार चर्चा करुन अनेक सभा, संमेलने, परिषदा आयोजित करुन किंवा त्यामध्ये सहभागी होऊन त्यांनी या प्रश्नांचे अध्ययन, चिंतन व मनन सुरु ठेवले. पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाच्या स्थापनेमध्ये त्यांचा अतिशय महत्वपूर्ण सहभाग होता. या समस्यांशी चिरपरिचीत असल्यामूळे उच्चाधिकार समितीचे सदस्य म्हणून महाराष्ट्र शासनाने त्यांची नेमणूक केली होती. या समितीच्या शिफारसींना आकार देण्यामध्ये त्यांचा महत्वपूर्ण सहभाग होता. प्रत्यक्ष अनुभव व शास्त्रज्ञांशी विचारविनिमय या आधारावर त्यांनी खारपाण पट्ट्याच्या समस्यांवर विपूल लेखन केले असून त्यांच्या या लेखनाचा मी माझ्या प्रतिपादनामध्ये ठिकठिकाणी निर्देशासह वापर केला आहे. जीवनाच्या उत्तरार्धामध्ये असलेल्या श्री.भय्यासाहेब कुटासकराचे चिरंजीव श्री. शिवाजीराव कुटासकर हे तेवढ्याच तडफेने पूर्णा खोरे विकास मंडळाच्या कामात लक्ष घालून आहेत.

### पूर्णा खोरे विकास मित्रमंडळ

**४६.** पूर्णा खोरे विकास मित्रमंडळ : पूर्णा खोऱ्यातील त्रस्त व असह्य जनजिवन सुसह्य व्हावे यासाठी कार्य करणारी ही एकमेव पंजिबद्ध (रजि.नं. एफ. ५१९५) अशी स्वयंसेवी संस्था आहे. पूर्णा नदीच्या खोऱ्यातील पाण्याशी निगडीत विकासाचे कार्यक्रम म्हणून (१) खारपाणपट्टयातील पिण्याच्या पाण्याची व्यवस्था व (२) शेती व्यवस्था व ओलिताचा विस्तार यासाठी कार्यरत संस्था असे या संस्थेचे स्वरुप असून त्यासाठी सातत्याने ही संस्था कार्य करित आहे. पूर्णा खोरे विकास मित्रमंडळाने ज्या विविध प्रकारच्या उपाययोजनांचा पाठपुरावा करण्याचे ठरविले आहे. त्यातील काही उपाययोजना नमूद करण्यासारख्या आहेत. त्या पुढीलप्रमाणे :-

(१) खोदलेल्या बोअरवेल मधील खारेपाणी उपसून व त्याला नैसर्गिक किंवा अन्य प्रयत्नांची जोड देवून गोड पाण्याचे पुनर्भरण करण्याच्या संभाव्य प्रकल्पांचा पाठपुरावा करुन तेथील बोअरवेल संचालनाची दीर्घकालीन व्यवस्था गावकऱ्यांपर्यंत सोपविली जाण्यात सहाय्य करणे.

(२) पूर्णा खोरे विकासाच्या संदर्भात महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने केलेल्या शिफारशीच्या अंमलबजावणीचा पाठपुरावा करणे.

(३) पूर्णा नदीच्या पात्रात व उपनद्यांवरही सुयोग्य ठिकाणी प्रभावशाली व टिकावू बंधारे बांधण्यासाठी कार्यप्रणाली व कार्यक्रम सूचविणे.

(४) ठिबक सिंचन, तुषार सिंचन अशाप्रकारच्या आधुनिक सिंचन पध्दतीचा यथायोग्य प्रमाणावर सुयोग्य वापर करुन किमान खरीप-रब्बी दुहंगामी पीक पध्दती बसविण्यासाठी शेतकऱ्यांना मार्गदर्शन करणे.

(५) इतर खोऱ्यातील पाणी पूर्णा खोऱ्यात उपलब्ध होण्याच्या दृष्टीने पर्यायी व्यवस्थापनाचा अभ्यास करुन अशा उपाययोजनांचा पाठपुरावा करणे.

### पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाविषयी थोडी माहिती

**४७.** पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाविषयी व मंडळाच्या कामाविषयी माहिती करुन घेतांना आपल्या पदरचे काही न सांगता मंडळाने प्रकाशित केलेल्या पुस्तिकांमध्ये "पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाविषयी थोडेसे " या मथळ्याखाली देण्यात आलेली माहिती जशीच्या तशी देत आहे. ती पुढील प्रमाणे :-

"पुर्णा खो-यातील खारपाण पट्टयातील समस्येची सर्वांनाच जाणीव आहे. या परिसरात जन्म घेऊन मोठे झालेल्यांना, आताही त्या परिसरात राहणाऱ्या नागरिकांना या प्रश्नांची झळ सतत पोहचत आहे याची जाणीव असते. काही मंडळी नोकरी व इतर कारणाने खारपाण पट्ट्याच्या बाहेर राहात असली तरी खारपाण पट्ट्यातील समस्यांवर उपाययोजना शोधण्याची धडपड त्यांच्या मनात सतत चालू असते. बाहेरचीही काही मंडळी, ज्यांना ह्या प्रश्नांची तीव्रता जाणवली, ते सामाजिक बांधीलकीच्या, मानवतेच्या दृष्टिकोनातून हे प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करीत असतात. अशा व्यक्तीमध्ये आंतरराष्ट्रीय कितीचे जलतज्ञ, स्टॉकहोम जलपुरस्कार प्राप्त करणारे, भारत सरकारच्या जलसंसाधन मंत्रालयात सचिव पदावर कामे केलेले, महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचे अध्यक्ष राहीलेले आणि सध्या जागतिक जलसहकारीता अंतर्गत दक्षिण आशिया तांत्रिक सल्लागार समितीचे अध्यक्ष आदरणीय डॉ.माधवराव चितळे यांच्या प्रेरणेतून आणि मार्गदर्शनाव्दारा श्री.ही.ब.उलेमाले, माजी कुलगुरु डॉ.पंजाबराव कृषि विद्यापीठ अकोला, श्री.अ.का.शेणोलीकर, मुख्य अभियंता (निवृत्त) पाटबंधारे विभाग, डॉ.एस.एम.धबडगांवकर माजी प्राध्यापक व्ही.आर.सी.ई., डॉ.पी.जी.अड्याळकर, भुगर्भ शास्त्रज्ञ, श्री.एम.बी.देशमुख अधिक्षक अभियंता (निवृत्त) पाटबंधारे विभाग, श्री.भैय्यासाहेब कुटासकर अकोला, अशोक जाधव, अधीक्षक अभियंता, जलसंधारण विभाग, नागपूर, मधु घारड, वनराई अमरावती यांनी एकत्र येऊन पुर्णा खोरे विकास मित्र मंडळाची स्थापना करुन खा-या पाण्याचा प्रश्न सोडविण्याचा प्रयत्न करण्याचा संकल्प केला. डॉ.चितळे यांनी स्वतः अनेकदा या भागाचा दौरा करुन, लोकांशी चर्चा करुन प्रश्न जाणून घेतले. श्री.उलेमाले हे अमरावतीचेच राहणारे. त्यामुळे त्यांना हे प्रश्न सुरुवातीपासून माहित होते. श्री.शेणोलीकर हे पाटबंधारे खात्यात कार्यरत असतांना खारपाण पट्ट्यातील प्रश्नांची त्यांना माहिती मिळाली. डॉ.धबडगांवकर यांचा जन्मच खोलापूर, जि. अमरावती येथील असल्यामुळे त्यांना सतत या प्रश्नांची चिंता असायची. या भूमिकेतून पूर्णा खो-यातील नागरिकांच्या सर्वांगीण विकासाचे स्वप्न घेऊन पूर्णा खोरे विकास मित्र मंडळ रितसर १९९७ साली पंजिबध्द झाले."

> ***क्षारयुक्त मातीतून सचैल स्थितीत पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षारविरहीत होऊ शकते असेही प्रयोगामधे दिसून आले आहे. पावसाचे क्षाररहीत पाणी जमिनीत जास्त झिरपून त्याच प्रमाणात खा-या पाण्याचा उपसा पावसाळयात करुन नैसर्गिक नाल्यात सोडल्यास क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होऊ शकेल."***
>
> *परिच्छेद ५९ पहा*

**भुगर्भातील जलसामुग्रीची प्रत दुरुस्त करावयाची असेल तर त्यासाठी गोड पाण्याचे पुनर्भरण हे आवश्यक आहे.** परिच्छेद ५५ पहा

### पूर्णा खोरे मित्रमंडळाच्या कामाचे स्वरुप व कार्यपद्धती

**४८.** पूर्णा खोरे मित्रमंडळाचे सभासद होण्यासाठी जे विनंती पत्रक या मंडळाने पाठविले त्यामध्ये मित्रमंडळाच्या कामाचे स्वरुप व कार्यपद्धती याविषयी थोडक्यात पण काटेकोरपणे माहिती दिलेली आहे. ती पुढील शब्दात :-

"पाण्याशी निगडीत असलेल्या प्रकल्पांचा आराखडा करणे, कार्यान्वयन करणे व पुढे पाण्याचा वापर करणे. यात लोकसहभाग असणे अत्यंत आवश्यक आहे. किंबहुना लोकसहभागाशिवाय असे प्रकल्प फारसे उपयोगी ठरणार नाही. अशी भूमिका डॉ.चितळे हे नेहमी घेत आले आहे. तसेच पाण्याचे नियोजन खोरेनिहाय होणे आवश्यक आहे असेही ते वारंवार सांगत असतात आणि हे प्रत्यक्ष घडवून आणण्यासाठी त्यांनी पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाच्या स्थापनेचे क्रांतीकारी पाऊल उचलले. मित्र मंडळाने पुर्णा खोऱ्याच्या सर्वांगीण विकासाचा प्रयत्न करण्याचा १५ वर्षाचा कार्यक्रम आखला आहे. मित्रमंडळाने प्रत्येक गावात सक्रीय सभासद तयार करण्याचे ठरविले आहे. हे सक्रिय सभासद योजना राबविण्यात, तिची देखभाल दुरुस्ती करण्यात व साधनसंपत्तीचा सुयोग्य वापर करण्यात लोकसहभाग ठेवण्याचा प्रयत्न करतील. मित्र मंडळ शासन, प्रशासक, लोकप्रतिनिधी, तंत्रज्ञ, तांत्रिक संस्था, संशोधन करणा-या संस्था यांना एकत्र आणून विकासाच्या कामाची गती वाढविण्यासाठी समन्वयासाठी समन्वयकाची भुमिका पार पाडेल. **मित्र मंडळ कोणतीही योजना, प्रकल्प स्वतः राबविणार नाही.** मित्र मंडळातर्फे भविष्यातही अशा कार्यशाळा, सम्मेलने, प्रशिक्षण वर्ग, प्रात्यक्षिके, सहल, इतर परिसरास भेटी इत्यादी उपक्रम राबविण्यात येतील. मित्र मंडळाच्या या भूमिकेशी आपण सहमत असल्यास आपण मंडळाचे आजीवन सदस्य होवून सक्रीय सभासद या नात्याने पूर्णा खो-यातील सर्वांगीण विकासाचे स्वप्न साकार करण्याच्या या यात्रेत सहभागी व्हावे. एवढीच नम्र विनंती."

### खारपाणपट्ट्यातील पिण्याच्या पाण्याची विश्वासार्ह स्थायी व्यवस्था उभी करणे व शेतीला ओलिताची सोय निर्माण करणे

**४९.** वनराईचे काम करणारे ज्येष्ठ नेते श्री. मधुकरराव घारड यांनी पूर्णा खोरे विकास मित्रमंडळाचे सरचिटणीस या नात्याने सदस्य व्हावे म्हणून विनंती करण्यासाठी काढलेल्या एका पत्रकामध्ये देण्यात आलेल्या माहितीमध्ये "खारपाणपट्ट्यातील पिण्याच्या पाण्याची विश्वासार्ह स्थायी व्यवस्था उभी करणे व शेतीला ओलिताची सोय निर्माण करणे" हे संस्थेचे प्रमुख कार्य असल्याचे नमूद केले आहे. सदस्य होण्यासाठी केलेली ही विनंती थोडक्यात असली तरी माहितीपूर्ण व तळमळयुक्त असल्याने पुढे जशीच्या तशी देत आहे. :-

"पूर्णा खोरे विकास मित्र मंडळ हे सार्वजनिक विश्वस्थ संस्था म्हणून पंजिबध्द असून त्याचा पंजियन क्र. एफ ५१९५ आहे. **पूर्णा खोऱ्यातील पाण्याची उपलब्धता विविध उपयोगासाठी सुयोग्य उपायांनी वाढविणे, विशेषतः खारपाणपट्ट्यातील पिण्याच्या पाण्याची विश्वासार्ह स्थायी व्यवस्था उभी करणे व शेतीला ओलिताची सोय निर्माण करणे.** यासाठी खोऱ्यामधे विविध प्रकारचे कार्यक्रम हाती घ्यावे लागणार आहेत व शासकीय प्रयत्नाशी त्यांचा समन्वय साधावा लागणार आहे. **विहीर खोदली की खारे पाणी लागते, ते पिण्याकरिता वा ओलितासाठी वापरणे शक्य नाही किंवा जनावरांनाही देता येत नाही, अशा स्थितीत पर्यायी व्यवस्था सामुहीक प्रयत्नातून उभी करणे आवश्यक आहे.** आणि त्यासाठी सर्वांनी पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाचे सक्रीय सदस्य होऊन पूर्णा खोऱ्याच्या विकासात सहभागी होणे आवश्यक आहे. हे सर्व घडवून आणण्यासाठी खोऱ्यांच्या विविध भागातील गावागावात जाणकार सक्रीय कार्यकर्त्यांची फळी उभी होणे आवश्यक आहे. यासाठी सर्व जाणकार, उत्साही व कार्यक्षम जनास सक्रीय सहाय्यासाठी आवाहन करीत आहोत. ज्यांना या कार्यात काम करण्याची मनापासून तळमळ आहे त्यांनी खालील पत्त्यावर यासोबत जोडलेला अर्ज भरुन सोबत आजीवन सदस्यत्वाकरीता रु.१,००० चा किंवा वार्षिक सदस्यत्वाकरीता रु.२५१/- चा पूर्णा खोरे विकास मित्र मंडळाच्या नावाचा नागपूर येथे वटणारा डिमांड ड्राफ्ट किंवा रोख रक्कम पाठवावी." याच पत्रकात "श्री.मधु घारड, सरचिटणीस, पूर्णा खोरे विकास मित्र मंडळ, वनराई मार्ग, प्रशांत नगर, अमरावती" यांनी मार्गदर्शक व पदाधिकाऱ्यांची सुध्दा माहिती नमूद केली आहे. ती पुढील प्रमाणे :-

"**मार्गदर्शक** : डॉ.माधवराव चितळे, अध्यक्ष, दक्षिण आशिया तांत्रिक सल्लागार समिती, जागतिक जल सहयोगीता औरंगाबाद, **अध्यक्ष** : श्री.अ.का.शेणीलीकर, **सचिव** : श्री.अशोक जाधव, **उपाध्यक्ष** : डॉ.सुधाकर घबडगांवकर, **कोषाध्यक्ष** : डॉ.पी.जी.अड्याळकर, **सरचिटणीस** : श्री.मधू घारड, **सदस्य** : श्री.माधवराव देशमुख, **सचिव** : श्री.भैयासाहेब कुटासकर,"

### विचारपूर्वक बनविलेले मत निर्धारपूर्वक मांडण्याचे धैर्य

**५०.** जिवनाची अनेक वर्षे खर्च करुन आपल्याला प्रिय असलेल्या उद्दिष्टासाठी मनुष्य जेव्हा तळमळीने काम करतो तेव्हा त्याला कामाची एक दृष्टी मिळत जाते. समस्यांचे चिंतन, मनन, अध्ययन, अभ्यास, व्यासंग, समविचारींचा सत्संग, यांच्या आधारावर तयार झालेल्या विचारांच्या सृष्टीला शास्त्रीय सिद्धांताची बळकटी मिळाली की मनुष्य निर्भयपणे आपले विचार मांडतो. निम्न पेढी धरणाला विरोध करण्याचा मोठा कोलाहल चालू असतांना वनराईच्या मार्फत खारपाणपट्ट्यात अनेक वनतळी, गावतळी बांधल्याच्या कामाची माहीती देणाऱ्या एका लेखामध्ये श्री. मधुकरराव घारड यांनी जाहिरपणे **धरणाला विरोध करणे हिताचे नाही** अशी भूमिका ठामपणे मांडली, याचे रहस्य त्यांच्या वैचारिक अधिष्ठानामध्ये आहे. धरण ५ वर्षात पूर्ण होईल किंवा ५० वर्षात पूर्ण होईल. तो भाग अलाहिदा. विचारपूर्वक बनविलेले मत निर्धारपूर्वक मांडण्याचे धैर्य हा खरा प्रश्न आहे.

### क्षारयुक्त पाणी मिसळून ते सिंचनासाठी वापरले जावू शकते

**५१.** सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डचे संचालक श्री.जी.के.देववर्मन या शास्त्रज्ञाने आपल्या "AQUIFER GEOMETRY AND POSSIBILITIES OF IMPROVING GROUND WATER QUALITY IN PURNA SALINE TRACT, MAHARASHTRA." या शोधनिबंधामध्ये असे स्पष्टपणे नमूद केले आहे की, कृत्रिमरित्या आपण भुगर्भाची भुमिती, भूसंच अथवा खडकांची रचना यात बदल करु शकत नाही, पण भुगर्भातील जलाशयाची प्रत बदलविण्याचे काम मानवी प्रयत्नाने सहज करता येण्यासारखे आहे. गोड पाण्याचे साठे खारपाणपट्ट्याच्या वरच्या उत्तर भागात योजीत केले तर उत्तम प्रतीच्या गोड पाण्याच्या पुनर्भरणाने भुगर्भातील खाऱ्या पाण्याची प्रत सुधारु शकते. प्रसंगी पुनर्भरणासाठी वापरल्या जाणाऱ्या गोड पाण्यात योग्य प्रमाणात भुगर्भातील क्षारयुक्त पाणी मिसळून ते सिंचनासाठी वापरले जावू शकते. त्याचा योग्य निचरा झाल्यास पावसाळयात क्षार धुवून निघण्यास सुध्दा मदत होवू शकते. त्यांच्याच शब्दात त्यांचे प्रतिपादन पुढीलप्रमाणे :-

"The aquifer material and geometry can not be modified by artificial means and only the movement of ground water can be hydraulically accelerated. In order to do so following suggestions are made:

(i) Hydraulic measure by way of pumping saline ground water along and immediately across the Purna river and disposing of the same during peak monsoon flow in its tributaries and the main river so that blending takes place and the blended water also is finally transported to sea. This will not cause any adverse effect on environment especially towards the downstream side. By doing so the ground water movement in the saline tract will be accelerated due to induced head difference.

(ii) A pilot project may be taken up from the periphery of saline tract for pumping of saline water and its safe disposal after proper blending.

(iii) Water conservation structures in the recharge area may be implemented in the northern part and also on the periphery of the saline tract to augment the recharge of good quality water. **If required saline water can also be pumped in these structures, in proper proportion and**

**गावातील बहुसंख्य विहिरी खाऱ्या पाण्याच्या असतांना खाऱ्या पाण्याचा सतत उपसा व पावसाळ्यामुळे व पेढी नदीमुळे होणारे गोड पाण्याचे पूनर्भरण यामुळे मुळातले खारे पाणी उत्तम प्रतीच्या पेयजलामध्ये रुपांतरीत झाले याचा ही विहिर हा एक जिवंत पुरावा आहे.** परिच्छेद ६५ पहा

***पूर्णेचे उपखोरे महाराष्ट्रातील सहाव्या क्रमांकाचे अतितुटीचे उपखोरे असूनसुद्धा ३४००० कोटी रुपयापैकी एक रुपयासुद्धा या उपखोऱ्याला मिळणार नाही. कारण याच पूर्णेच्या खोऱ्यातील पेढीच्या पाणलोट क्षेत्रातील २ टीएमसी तुमचे पाणी तुम्हाला बांधून काढता आले नाही. कशाला या खोऱ्यातील पाणी त्या खोऱ्यात नेण्याच्या बाता मारता? असे कुणी म्हटले तर आपल्याला लाजेने मान खाली घालावी लागेल.***

*परिच्छेद १०६ पहा*

**the mixed water may be used directly for irrigation in the fields with proper drainage so that salt concentration is leached/washed away during rainy season."** (संदर्भ १, पृष्ठ ५०)

### विरघळणाऱ्या क्षारयुक्तमातीसह प्रवाह आल्याने त्याचे क्षारत्व कमी होत जाते

**७२.** ग्राऊंड वॉटर सर्वे अँड डेव्हलपमेंट एजन्सीचे संचालक श्री. एम.एम. सारभुकम यांनी आपल्या "DESALINATION OF THE GROUNDWATER FROM DEEPER AQUIFER IN PURNA BASIN BY SIMULTANEOUS DEWATERING AND FRESH WATER INJECTION TECHNIQUE" या शोध निबंधामध्ये नदीच्या आजुबाजूला खाऱ्यापाण्याचा मोठा प्रमाणावर कुपनलिकांद्वारे उपसा केला तर असे आढळून आले की, या उपस्यामुळे नदी पासून तर कुपनलिके पर्यंतच्या भुगर्भात जलप्रवाहात जो आंतर दबाव तयार होतो, **त्यामुळे कुपनलिकेतून मोठ्या प्रमाणावर नदीत खारे पाणी फेकले जात असतांना नदीतळातील गोड पाण्याचा प्रवाह वेगाने कुपनलिकेच्या दिशेने येतो. येतांना तो प्रवाह विरघळणाऱ्या क्षारयुक्तमातीसह आल्याने त्याचे क्षारत्व कमी होत जाते व काही दिवसांनी कुपनलिका सुध्दा गोड पाणी देवू लागते.** त्यांचे विचार त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे :-

"During the course of development work carried out by G.S.D.A. in this area, there were often reports about the sporadic occurrence of sweet water pocket level from the river bed and the pumping water level from the tube well was also estimated and this has given further information that the influent nature of river has covered fast washing of sand zone. It was then revealed that due to continuous pumping the area of influence of the cone of depression extended till the bank of river and then reversible inflow started towords the pumping well and during this process the salt slowly washed away thereby started contributory sweet water from the formation around the pumping well." **(संदर्भ १, पृष्ठ ५३)**

### आम्हाला तुमचे काही ऐकून घ्यायचे नाही

**७३.** पेढी धरण विरोधी संघर्ष समितीच्या नेत्यांशी चर्चा करण्याची संधी मला दिनांक १२ मार्च २००७ रोजी पालकमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमूळे मिळाली. चर्चा करण्यासाठी आलेल्या शिष्टमंडळाबरोबर काही आंदोलनकर्ते सुध्दा त्यावेळी उपस्थित होते. चर्चेमध्ये खारपाणपट्ट्याच्या दृष्टीने या प्रकल्पाचे किती महत्व आहे, हे मी सांगत असतांना मागच्या बाकावर बसलेला एक तरुण आंदोलनकर्ता उभा राहीला व त्यांने जोरात पुढीलप्रमाणे प्रतिपादन केले "भर पावसाळ्यामध्ये नदीत झीरा खोदला तर भरा भर खारे पाणी हातात येते. तेव्हा बी.टी. साहेब! तुम्ही आम्हाला काही सांगु नका, आम्हाला तुमचे काही ऐकून घ्यायचे नाही". आम्हाला तुमचे काही ऐकून घ्यायचे नाही हे ऐकल्याबरोबर मी असे म्हणालो की, "त्यावेळच्या तुमच्या संघर्ष समितीच्या अध्यक्षांशी चर्चा करुन त्यांच्या पूर्ण सहमतीने रासायनिक संकुलाच्या दाढेतून हा प्रकल्प सुटल्यामुळे व संपूर्ण जलसाठा पिण्याच्या पाण्यासाठी व जलसिंचनासाठी उपलब्ध झाल्यामुळे मी गेली अनेक वर्षे सभागृहामध्ये या प्रश्नाचा पाठपुरावा करीत आहे. तुम्हाला ऐकूनच घ्यायचे नसेल तर मी माझे दप्तर गुंडाळतो, बाहेर ऐकून घेणारे पुष्कळ लोक आहेत त्यांना मी माझे विचार समजावून सांगेन". मी ठामपणे वरील शब्दांचा उच्चार केल्याबरोबर भाई श्री.रामदास पाटील, श्री.वेरुळकर गुरुजी व प्रा. कमल करवा या तिघांनी त्या आंदोलनकर्त्याला एकदम खाली बसण्याची जोरात विनंती केली व ते मला म्हणाले "बी.टी. साहेब! आम्हाला तुमचे पूर्ण म्हणणे ऐकून घ्यायचे आहे. तुम्ही सांगा". मी पुन्हा गुंडाळलेले दप्तर उघडून माझे प्रतिपादन सुरु केले. एखादा विचार आपल्याला पसंत पडेल किंवा पडणार नाही, मान्य होईल किंवा होणार नाही पण तो विचार ऐकून न घेणे ही गोष्ट अत्यंत अयोग्य असते, याचे भान प्रत्येकाने ठेवले पाहीजे. उपरोक्त तीन नेत्यांनी हे जे भान त्यादिवशी ठेवले त्याबद्दल मी त्यांचा मनापासून आभारी आहे.

### आंदोलनकर्त्या तरुणाने बेमालूमपणे शास्त्रीय सिद्धान्त मांडला

**७४.** खरी गोष्ट अशी आहे की, चर्चेत एकदम हस्तक्षेप करणाऱ्या त्या आंदोलनकर्त्याला माझा जन्मसुद्धा खारपाण पट्ट्यातलाच आहे व त्याच पेढी नदीवर भर पावसाळ्यात तसाच झिरा मी माझ्या जीवनात अनेकदा पाहिला आहे याची माहिती नव्हती. त्याने "आम्हाला तुमचे काही ऐकून घ्यायचे नाही" हे वापरलेले वाक्य सोडून द्या, पण त्यांने एका वाक्यात मांडलेला मुख्य विचार म्हणजे "भर पावसाळ्यात नदीत झिरा खोदला तर भर भर खारे पाणी हातात येते." हा होय. हे प्रतिपादन ऐकल्यावर मला तो युवक डॉ.सुधाकरराव धबडगांवकराचा पट्टशिष्य वाटला. हे नमूद करतांना मला खरोखरच मनापासून आनंद वाटतो. डॉ. धबडगांवकर तरी वेगळे काय सांगत आहेत? शास्त्रज्ञ विषय शास्त्रीय भाषेत मांडतात. पण या युवकाने तो सोप्या भाषेत एका वाक्यात मांडला होता. त्याच्या या सहज, सोप्या व साध्या एका वाक्यातून दोन शास्त्रीय सिध्दांत समोर येत होते, **एक म्हणजे** ही "एकूणच विरघळणारी क्षारयुक्त माती" (TDS) आहे व **दुसरे म्हणजे** विरघळणाऱ्या या क्षारयुक्त मातीतून विरघळलेले क्षार वाहून गेलेत तर स्वाभाविकपणे खारेपणा कमी होणार, हे दोन शास्त्रीय विचार त्याच्या या एका वाक्यातून बेमालूमपणे बाहेर आले होते. अर्थात हे क्षार विरघळण्यासाठी नदीच्या काठाच्या वरच्या बाजुला असलेल्या क्षारयुक्त मातीच्या थरावर गोड पाण्याच्या पुनर्भरणाचा विचार आम्हाला पिढयानुपिढया सुचला नाही याबद्दल त्या युवकाला दोष देता येणार नाही. काही वर्षापूर्वी ही माती इतकी क्षारयुक्त होती की, त्यापासून मीठ तयार होवू शकत होते असे जूने लोक सांगतात. दरवर्षी निसर्गाच्या पावसामूळे क्षाराचे प्रमाण कमी होवून आज मीठ कोठेही तयार होत नाही हे लक्षात घेतले तर गोड पाण्याचे पुनर्भरण या विषयाचे महत्व लक्षात आल्याशिवाय राहत नाही.

### भूगर्भातील जलसामुग्रीची प्रत दुरुस्त करावयाची असेल तर त्यासाठी गोड पाण्याचे पुनर्भरण हे आवश्यक आहे

**७५.** त्यावेळी अधीक्षक अभियंता म्हणून काम करीत असलेले श्री.माधवराव देशमुख (आज सेवानिवृत्त) यांनी आपल्या "ROLE OF VILLAGE TANKS IN SALINE TRACT OF PURNA BASIN" या शोधनिबंधामध्ये अशा अर्थाचे विचार मांडलेले आहेत की, खारपाणपट्ट्यात सर्वात कठीण समस्या जर कोणती असेल तर ती गोड पाण्याच्या उपलब्धतेची होय. भुपृष्ठावरील जलशयामध्ये समाधानकारक विकास करण्यासाठी मोठे, मध्यम किंवा लघु प्रकल्प या खोऱ्यामध्ये पुरेशा प्रमाणात घेण्यात आलेले नाहीत. कदाचित योग्य प्रकल्पस्थळ उपलब्ध न होणे हे सुध्दा त्यासाठी कारण असु शकेल. हा भाग अविकसित राहण्याचे ते एक मुख्य कारण आहे आणि **भुगर्भातील जलसामुग्रीची प्रत दुरुस्त करावयाची असेल तर त्यासाठी गोड पाण्याचे पुनर्भरण हे आवश्यक आहे.** त्यांचे शब्द जसेच्या तसे पुढीलप्रमाणे :-

"In the saline tract of Purna river valley, the most difficult problem is to get fresh sweet water. This has resulted in poor social economic development of the Vidarbha region, even though the lands are highly fertile. The major affected sectors are drinking water supply, agriculture and industry. Surface water development programmes including major,

***आपण प्रकल्प होऊच देणार नसू तर मग या १६३४५ कोटी रुपयातील आमचा न्याय्य वाटा आम्हाला द्या अशी मागणी करण्याचे काहीच कारण नाही.***

*परिच्छेद १४५ पहा*

**महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या ७६००० कोटी रुपयांच्या वाटपात विदर्भाला समन्याय मिळाला पाहिजे अशी मागणी आपल्याला करता येईल. पण केंव्हा? खूप मोठा अनुशेष असूनसुद्धा १० हजार हेक्टरची सिंचनक्षमता असलेला निम्न पेढी प्रकल्पसुद्धा ज्यांना बांधून काढता आला नाही त्यांना वैनगंगेतून नदीजोड प्रकल्पाद्वारे १ लाख हेक्टरची सिंचनक्षमता पेढी-पूर्णेच्या खोऱ्यात आणून द्या अशी मागणी कोणत्या तोंडाने करता येईल?** परिच्छेद ९७ पहा

medium and minor irrigation works have not been undertaken in the saline tract of Purna river valley, perhaps because of non-availability of suitable foundation conditions and of suitable materials of construction. Anticipated water-logging problems and aggravation of soil salinity are the other factors attributed for non-development of this tract. There is a great need for development of ground water resources in this tract," (संदर्भ १, पृष्ठ ६६)

### गोड पाण्याला भुगर्भात प्रवेश देणे अत्यंत आवश्यक आहे.

**७६.** पाटबंधारे विभागाचे मुख्य अभियंता श्री. एस.एस.उदगीरकर व अधिक्षक अभियंता श्री.एन.एम.जोशी यांनी आपल्या "SURFACE WATER DEVELOPMENT IN PURNA RIVER BASIN" या शोधनिबंधामध्ये भुगर्भाच्या पाण्यातील खारेपणा कमी करायचा असेल तर **जलसिंचनासाठी वापरावयाचे पाणी व पावसाचे पाणी यांना भुगर्भात प्रवेश देणे अत्यंत आवश्यक आहे. तसे झाल्यास खारपाणपट्ट्यातील भुगर्भ जलाशयातील खारेपणा मोठया प्रमाणात कमी होवू शकेल असे मत व्यक्त केले आहे. त्यांचे विचार त्यांच्याच शब्दात पुढीलप्रमाणे :-**

"The vertical permeability of the soil in the saline tract appears very poor and therefore in order to reduce the salinity with the help of irrigation/rain water we may have to resort to some methods by which Irrigation Water/rain Water can find access to sub soil in the saline tract. it is expected that this would reduce the salinity of the ground water in saline tract." (संदर्भ १, पृष्ठ ७७)

### भुगर्भातील पाण्याचा खारेपणा कमी करण्यासाठी भुपृष्ठावरील जलाशयाचा कसा वापर करता येवू शकतो

**७७.** अकोला पाटबंधारे विभागातील अधीक्षक अभियंता श्री.एच.आर.नवांगुळ यांनी त्यांच्या "SURFACE WATER DEVELOPMENT IN SALINE TRACT OF PURNA RIVER BASIN " या शोधनिबंधात भुगर्भातील पाण्याचा खारेपणा कमी करण्यासाठी भुपृष्ठावरील जलाशयाचा कसा वापर करता होवू शकतो, याबाबतचे विचार पुढील शब्दात मांडलेले आहेत. :-

"2.01The other development activity under consideration is to be minimise the salinity of ground water from the saline tract. For this purpose, the sweet water available from irrigation projects is to be charged after pumping out the saline water from selected wells/bore holes. This continued process may reduce the salinity to the desired standard and the water can be used for drinking as well as for irrigation.

2.02 Experiments as mentioned above were conducted at few plaes like Dapura, Hingna, Tamaswadi, Vallabhnagar and the salinity was reduced to the permissible limit for drinking purpose. Suitable sites for the pilot project in this respect is being investigated near the tail end of the commands of Katepurna and Wan Project where fresh and sweet water will be available for carrying out these experiments." (संदर्भ १, पृष्ठ ८१)

### हे पाणी पिण्यायोग्य आहे हे चाचणी अंती सिध्द झाले

**७८.** पूर्णा खोरे विकास मित्रमंडळाचे त्यावेळचे सचिव अभियंता श्री. अशोक जाधव यांनी "पुर्णा खोरे खारपाणपट्टयाच्या समस्या आणि त्याच्या निर्वाणार्थ लोकसहभाग" या आपल्या शोध निबंधामध्ये असे नमूद केले आहे की :-

**"भुजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणे (जी.एस.डी.ए.) मार्फत गेल्या ४-५ वर्षात अनेक गावांत टयुबवेलव्दारे खारे पाणी उपसण्याचा प्रयोग केला. ५-६ महिने खारे पाणी या टयुबवेलव्दारा उपसल्यानंतर या टयुबवेलला गोडे पाणी लागले आहे आणि हे पाणी पिण्यायोग्य आहे हे चाचणी अंती सिध्द झाले."** (संदर्भ २, पृष्ठ १२५)

### जमीन खारपाण पट्ट्यातून बाहेर पडणार

**७८.१** अंबानाल्याचे पश्चिम अमरावती कडील पाणलोट क्षेत्र पूर्वी खारपट्ट्याचे गणल्या जात होते. आता या पाणलोट क्षेत्रात उर्ध्व वर्धा प्रकल्पातून सुमारे ३६ द.ल.घ.मी. पाणी दरवर्षी येत असून त्यातील ८० टक्के पुनःउद्भवाच्या माध्यमातून अंबानाल्याद्वारे पेढी नदीत वाहून जात आहे. या गोड पाण्यावर पूर्वीच्या खारक्षेत्रातच बारमाही सिंचन करुन भाजीपाल्याचे उत्पादन घेण्यात येते. परंतु इतक्या दीर्घ कालावधीत या जमिनी नापिक व टणक झाल्या नाहीत. तसेच ह्या पाण्यावर सुमारे ४५० हे. क्षेत्रात बारमाही पिके कित्येक वर्षापासून घेतल्या जावून सुद्धा जमिन टणक किंवा नापीक झाली नाही. **अंबानाल्याच्या पुढचे ४५० हेक्टरचे क्षेत्र खारपाण पट्ट्यातून पूर्णपणे बाहेर पडले आहे, असे ठाम विधान शास्त्रीय निकषांच्या आधारावर करता येते. निम्न पेढी प्रकल्पामुळे खारपाण पट्ट्यातील एकएक भाग त्या पट्ट्यातून बाहेर पडण्याच्या वेगवान प्रक्रियेला सुरुवात होत आहे ही या प्रकल्पाची असामान्य गुणवत्ता म्हटली पाहिजे.**

### क्षार संपुष्टीकरण जल व सिंचन आयोगाचा अहवाल

**७९.** महाराष्ट्र शासनाने नेमलेल्या महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाचा जून १९९९ मध्ये सादर केलेला अहवाल निरनिराळया पाच खंडामध्ये उपलब्ध असून तज्ञांनी या विषयावर मांडलेले हे अंतिम मत समजले गेले आहे. या अहवालाच्या खंड २ मध्ये परिच्छेद १२.९ पुढीलप्रमाणे आहे :-

"**१२.९ खा-या पाण्याच्या पट्ट्याच्या विकासाबाबत :** पूर्णा नदीच्या उपखोऱ्यात भूजल खारे असण्याची मूळ कारणे भूस्तरीय असोत वा जलवैज्ञानिक असोत, क्षारतेची तिव्रता हळू हळू कमी करुन संपू शकते. त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत कमी करण्यासाठी पाण्याचा दीर्घ उपसा (पंपिंग) व भूजल पुनर्भरण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा एकत्रित उपयोग केल्यास परिस्थिती सुधारणे शक्य आहे, असे दापूरा, काटी, जिल्हा अकोला या गावात झालेल्या प्रयोगावरुन निदर्शनास आले आहे. शिवाय **क्षारयुक्त मातीतून सचैल स्थितीत पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षारविरहीत होऊ शकते असेही प्रयोगामधे दिसून आले आहे. पावसाचे क्षाररहित पाणी जमिनीत जास्त झिरपून त्याच प्रमाणात खा-या पाण्याचा उपसा पावसाळयात करुन नैसर्गिक नाल्यात सोडल्यास क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कमी होऊ शकेल."** (संदर्भ ३, पृष्ठ २३२)

### पाणी अडवा व भूगर्भात सोडा

**६०.** खारे पाणी उपसणे व गोड पाण्याचे पुनर्भरण याबाबत महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाच्या या अहवालामध्ये पुढील शब्दात मार्गदर्शन केलेले आहे. :-

"२. **पूर्णा नदीवर योग्य जागा निवडून त्या ठिकाणी ४ ते ५ मीटर पाणी थोपवून धरु शकतील असे सव्दार बंधारे बांधून पावसाळयातील प्रवाह पावसाळ्याच्या उत्तरकाळात (सप्टेंबरमध्ये) अडवून धरणे व ते पाणी पंपाने वरील कूपनलिकेमध्ये सोडणे....** वरील १ प्रमाणे उपसल्या जाणा-या पाण्याचे नियमन करुन पाण्याची प्रत तपासत रहाणे, व जसजशी प्रत सुधारत जाईल त्या प्रमाणात त्याचा वापर जनतेसाठी खुला करणे." पिण्याच्या पाण्याच्या समस्येने त्रस्त झालेल्या गावांसाठी "वरील समस्याग्रस्त गावांचा पिण्याच्या पाण्याचा प्रश्न सोडविण्याच्या दृष्टिने निःक्षारीकरण प्रकल्पांचा आढावा व तांत्रिक मार्गदर्शनासाठी शासनाने श्री.एच.बी.उलेमाले यांचे अध्यक्षतेखाली समितीची स्थापना केली आहे. दुर्देवाने

**आजच्या १६३४५ कोटी रुपयातील सहभागाचा व समभागाचा उजेड पडत नसेल तर उद्याच्या ३४००० कोटी रुपयांचा व परवाच्या ७६००० कोटी रुपयांचा विचार तरी कशासाठी करायचा?** परिच्छेद १४५ पहा

***तापी खोऱ्यातील पूर्णा उपखोरे हे मेरिटप्रमाणे सहाव्या क्रमांकावरील अतितुटीचे/तुटीचे उपखोरे असून अशा वाळवंटीकरणापासून आपला बचाव व्हावा याचा या खोऱ्याने विचारसुध्दा न करणे आत्मघातकीपणाचे ठरेल. अतितुटीचे/तुटीचे उपखोरे असल्यामुळे दुसऱ्या उपखोऱ्यातून परिवहनाच्या मार्गाने पाणी मागण्याचा अधिकार असला तरी आपलेच पाणी जे उपखोरे वापरु शकत नाही त्या उपखोऱ्याने बाहेरुन पाणी मागण्याची कृती नि:संदिग्धपणे हास्यास्पद व पोरकटपणाची ठरेल.*** *परिच्छेद १०२ पहा*

त्यानंतर श्री.उलेमाले यांचा दिनांक १३.४.९९ ला देहांत झाला आहे." असा श्री. उलेमाले यांच्याविषयी मोठा गौरवपूर्ण उल्लेख या अहवालामध्ये आहे. (संदर्भ ३, पृष्ठ २३२)

### उच्चाधिकार समितीचा निष्कर्ष

**६१.** विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील खारेपाणीपट्टा समस्या निवारणार्थ शासनाने तत्कालिन राज्यमंत्री श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नेमलेल्या उच्चाधिकार समितीमध्ये अनेक तज्ञ व्यक्तींच्या बरोबरच लोकप्रतिनिधींचा सुध्दा सहभाग होता. या समितीच्या अहवालामध्ये पृष्ठ २१ वरील पुढील निरिक्षण महत्वपूर्ण आहे :-

"भूजल सर्वेक्षण आणि विकास यंत्रणेद्वारे खारेपाणी पट्ट्यातील गांवात निःक्षारीकरण प्रकल्प संशोधन व विकास अंतर्गत प्रायोगिक तत्वावर राबविण्यात येत आहे. **सदर प्रकल्पांतर्गत क्षाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विद्युतपंपाद्वारे एकसारखा उपसा करणे तसेच पाण्याचे पृथःकरण वेळोवेळी करणे अत्यंत आवश्यक आहे. कूपनलिकेतून सातत्याने उपसा केल्याने खारे पाण्याच्या रासायनिक गुणवत्तेत सुधारणा होऊन पाणी पिण्यायोग्य होते" (संदर्भ ४, पृष्ठ २१)**

### त्यां आईच्या डोळयातील भाव

**६२.** खारपाणपट्ट्यामध्ये पिण्याच्या पाण्यासाठी लोकांना अतोनात हाल सहन करावे लागतात. २-२, ३-३ किलो मीटरवरुन स्त्रियांना पिण्याचे पाणी डोक्यावर वाहून आणावे लागत असे. पिण्याच्या पाण्या व्यतिरिक्त उपयोगासाठी घरच्या विहिरीचे खारे पाणी हाताने खिराडीवरुन ओढून वापरावे लागत असे. अनेक ठिकाणी 'उत्तम शेती' असली तरी खारपाणपट्टयाच्या गावात मुली द्यायला लोक तयार नसत. एखादा विवाह संबंध जूळून आला तर ते गाव खारपाणपट्ट्यातले आहे एवढया एका कारणावरुन संबंध तुटल्याची विपूल उदाहरणे त्या काळी मिळत. हा प्रभाव मनावर असल्यामूळे डॉ.सुधाकरराव धबडगांवकर यांनी त्यांच्या प्रबंधात हा विषय पुढील शब्दात मांडला आहे. :-

"ह्या प्रदेशातील मुख्यत्वे खाऱ्या पाण्याच्या समस्येमुळे जनता त्रस्त आहे. पिण्याचे पाणी गेल्या दशकापर्यंत दुर्मिळ होते. त्यासाठी नदी लगतच्या गावी ४ ते ५ कि.मी. एवढ्या अंतरावरुन विशेषतः स्त्रियांना डोक्यावर नदीतून पिण्याचे पाणी वाहून आणावे लागे. त्यासाठी फार कष्ट व वेळ लागत असे. पिण्याच्या पाण्याशिवाय इतर उपयोगासाठी सर्रास खाऱ्या पाण्याचा वापर करावा लागे. त्यासाठी खाऱ्या पाण्याच्या विहिरी आजही त्या भागात आहेत. महाराष्ट्र सरकारने नळाद्वारे खेडोपाडी पाणी पुरवठा योजना राबविल्यामुळे तूर्त पिण्याच्या पाण्याची समस्या थोडी कमी झाली आहे." या सिध्दातांचा पाठपुरावा त्यांनी सुरु केलेला असतांना आपल्या जन्मगावी गेल्यानंतर एक दिवस आपल्या आईला ते म्हणाले "अगं आई! आपल्या घरातल्या या खा-या पाण्याच्या विहिरीला गोड पाणी लागले तर तुला काय वाटेल". "माझे हे वाक्य ऐकल्यावर माझ्या आईच्या डोळयातले जे भाव मी पाहिलेत ते मी कधीही विसरु शकत नाही," असे उद्‌गार त्यांनी एकदा माझ्याशी झालेल्या अनौपचारिक चर्चेत काढलेत.

### गोड पाण्याचा 'नासोडा' करु नका

**६३.** प्रस्तुत लेखकाचा अनुभव सुध्दा असाच आहे. बेलोरा, ता.चांदुर बाजार या माझ्या जन्मगावी, गावातील बहुतेक विहिरी ह्या खाऱ्या पाण्याच्या आहेत. हे गांव सुध्दा खारपाणपट्ट्यातले आहे. पेढी नदीच्या काठावर असलेल्या एका विहीरीतून साऱ्या गावातील लोक पिण्याच्या पाण्याची गरज भागवतात. ती विहिर शे दोनशे वर्षे तरी जुनी असावी. गावातील चार मोठ्या घरी बंडीवर ड्रम बांधून गोड पाणी बैलजोडीवरुन जात असे. इतर सर्व घरी बाया वा माणसे त्या विहिरीवरुन पिण्याचे पाणी डोक्यावरुन वाहून नेत असत. सकाळी रस्त्याने माणसांची नुसती रांग लागलेली असे. आमच्या घरी शेतीची ड्युटी वडीलांकडे असल्यामुळे गोड पाण्याची ड्युटी ही मोठ्या चुलत्यांकडे असे. त्यांच्या मागोमाग घरातील पोरासोरांना झेपेल त्या प्रमाणात ह्या ड्युटीवर जावे लागत असे. रोजच्या या प्रकाराने आम्हा मुलांचा जीव कासावीस होत असे. मुलाचे वय पाहून 'पितळेचा लहान गुंड' किंवा 'तांब्याचे मोठे भरणे' हे त्यांच्यासाठी स्पेशल काढून ठेवलेले असे. डोक्याला फार त्रास होवू नये म्हणून डोक्यावर 'चुंबळ' ठेवून त्यावर विराजमान झालेले तांब्याचे भरणे शिरावर घेऊन त्याचा व आपला तोल जावू न देता केलेला पेढीच्या काठावरील त्या विहिरीपासून घरापर्यंतचा तो गोड पाण्याचा प्रवास नुसता मनासमोर कल्पना म्हणून उभा केला तरी आजही यातनादायक वाटतो. एवढ्या सन्मानाने घरपोच आलेले हे गोड पाणी घरात मोठ्या अदबीने विराजमान होत असे व पुढच्या चोविस तासात त्याचा मोठ्या काटकसरीने वापर केला जात असे. एखाद्या पोराच्या हातून थोडा जरी गोड पाण्याचा 'नासोडा' झाला, तर जणू काही त्याच्या हातून 'देशद्रोह' घडला आहे अशा भावनेने घरातील लहानथोर त्याच्याकडे मारक्या म्हशीच्या नजरेने पहात असत, प्रसंगी 'नासोड्या'चे स्वरुप मोठे असल्यास मुलांना वळण लावण्याच्या हेतूने नजरेतील हा मारकेपणा प्रत्यक्ष कृतित उतरत असे.

### "तुम्हाला गोड पाण्याची कदर नाही"

**६४.** घरगुती वापरासाठी घरच्या विहिरीचे खारे पाणी वापरले जात असे! खिराडीने विहिरीतून ते पाणी उपसण्याची जबाबदारी घरातील स्त्रियांची असे. आमच्या घरी मुख्यत्वे ती जबाबदारी आईला पार पाडावी लागत असे. वेळप्रसंगी लहान मुलांची मदत या कामी घेतली जात असे. पोरवयातील आम्हा मुलांना एकूणच तो वैतागाचा भाग वाटत असे. खाऱ्या पाण्याच्या प्रभावामुळे भिंतीला चोपडलेला शेणाचा गिलावा सुद्धा भिंत सोडून देत असे. चांगल्या पांढऱ्या मातीने घर सारवले तरी त्या सारवणाच्या भिंतीला 'लोणा' धरत असे. सडा सारवणाच्या लायकिचे नसलेले ते पाणी स्नानासाठी व कपडे धुण्यासाठी वापरावे लागत असे. १९७० ते ८० च्या दशकात मी आजच्या माझ्या अमरावती येथील विद्यमान निवासस्थानी रहायला आलो. महानगरपालिका झालेली नव्हती. हा भाग नवसारी ग्रामपंचायतमध्ये होता. जवळजवळ अर्धा एकर जागा होती. एच फोर संकरित बियाण्याच्या पैदाशीचा मोठा कार्यक्रम त्यावेळी या जागेत घेतला जात होता. चांगली ८० फुट खोल विहीर होती. उत्तम गोड पाणी होते. ५ हॉर्स पॉवरचा पंप होता. शेतीला पाणी देत असतांना घराच्या छतावर टाकी बसवून घरात सर्वत्र नळाने पाण्याच्या घरगुती वापरासाठी व्यवस्था केलेली होती. गावावरून काही दिवसासाठी आई ज्यावेळी अमरावतीला रहात असे तेव्हा तिला या गोड पाण्याचे मोठेच अप्रुप वाटत असे. शिवाय आपल्या घरचा हा गोड पाण्याचा नळ चोविस तास सुरु असतो याचाही तिला मोठा आनंद वाटत असे. गोड पाण्याचा 'नासोडा' तिच्या डोळ्याला व मनाला खुपत असे. **"किती गोड पाणी उबडता?" "गोड पाण्याचा असा नासोडा करु नये" "गोड पाण्याची अशी 'धुयधानी' बरी नाही" "तुम्हाला गोड पाण्याची कदर नाही."** हे शब्द दिवशी दोन चार वेळा तरी तिच्या तोंडून बाहेर पडत असत. "गोड पाण्याचा हा तुमचा असा वापर पाहिला म्हणजे मला हे स्वप्नच वाटते." हे तिचे उद्‌गार मनाला घर करुन जात असत. त्यामागे या गोड पाण्याच्या कौतुकापेक्षा त्या खाऱ्या पाण्याच्या दहशतीचाच भाग मोठा होता, असेच म्हणावे लागेल. अमरावतीवरून ती गावला जायला निघाली की तिला गावाला गेल्यावर ती खाऱ्या पाण्याची विहिर, ती खिराडी, ते पाणी ओढणे

***खारपाणपट्ट्यातील ज्या गावामध्ये नळाने पाणीपुरवठ्याची योजना अजूनही जावून पोचलेली नाही व पिण्यासाठी आयाभगिनींना दुरुन कुठून तरी डोक्यावर वाहून पेयजल आणावे लागते त्या गावात जावून त्या मायमाऊलीला जरा विचारा की, तुझ्या घरापर्यंत नळाने गोड पाणी मिळाले तर तुला काय वाटेल? प्रकल्प पाहिजे का नको याचे खरे उत्तर त्या माऊलीच्या उत्तरात आहे.*** *परिच्छेद ६५ पहा*

***"पाण्यात जितके अधिक क्षार मिसळले असतील तितक्या प्रमाणात त्याची दाढर्यता (डेंसिटी) अधिक असते. कमी क्षार असलेले पाणी अलगद जास्त क्षाराच्या पाण्यावर सोडल्यास ते तसेच वरचा स्तर राखते.*** परिच्छेद ४१ पहा

यामुळे मोठे गलबलून गेल्यासारखे होत असे. "आपल्या गावात लोकाईच्या घरी गोड पाण्याचे असे नळ बसू नाही शकणार काय?" हा तिचा स्वाभाविक प्रश्न रहात असे. व्यवसायाने त्यावेळी शिक्षक म्हणून काम करणारा मी या प्रश्नाला काय उत्तर देणार? गेल्या काही वर्षापासून पाणी पुरवठा मंडळाची योजना ४-५ हजार लोकसंख्येच्या त्या गावात उत्तम रितीने कार्यरत आहे. त्या गावात एकही स्टँडपोस्ट नाही. प्रत्येक घरात नळ असलेले हे जिल्ह्यातील कदाचित एकमेव गाव असेल.

### खारे पाणी उत्तम प्रतीच्या पेयजलात रुपांतरित झाल्याचा जीवंत पुरावा

**६५.** तर विषय असा की बेलोरा ता. चांदूरबाजार या पेढी नदीच्या काठावरील खारपाण पट्ट्यातील गावामध्ये पिण्याच्या पाण्याच्या त्या विहिरीवर सुरुवातीला १२ खिराडया बसवून पिण्याच्या पाण्यासाठी जो काही उपसा होईल तो उपसा होत असे. पुढे मोट बसवून उपसा केला जावू लागला. त्यानंतर 'डिझेलची डंकीन' बसली, आता गावचा सबंध पाणी पुरवठा त्या विहिरीवरच अवलंबून आहे. ५-१० हॉर्स पॉवरचे २-३ पंप तिच्यावर बसविले आहेत. मोठ्या प्रमाणात उपसा चालू आहे. गोड पाण्याचे पुनर्भरण मात्र शे पाचशे मीटरवरुन वाहणाऱ्या पेढी नदीमुळे निसर्गतः जे काही होत असेल ते वर्षानुवर्ष होत राहिले आहे/होत आहे. आज त्या विहिरीचे पाणी हे उत्तम प्रतीचे पेयजल असून **आजही गावातील बहुसंख्य विहिरी खाऱ्या पाण्याच्या असतांना खाऱ्या पाण्याचा सतत उपसा व पावसाळ्यामुळे व पेढी नदीमुळे होणारे गोड पाण्याचे पुनर्भरण यामुळे मुळातले खारे पाणी उत्तम प्रतीच्या पेयजलामध्ये रुपांतरित झाले याचा ही विहिर हा एक जिवंत पुरावा आहे.** बारमाहि पूनर्भरणासाठी गोडपाण्याचा जलसाठा भूपृष्ठावर उपलब्ध झाला तर भूगर्भातील जलसाठ्यांचे रुपांतर उत्तम प्रतिच्या पेयजलामध्ये होण्याच्या प्रक्रियेला केवढा प्रचंड वेग येईल, हे लक्षात आले तर निम्न पेढी प्रकल्प म्हणजे एका पिढीचे काम नसून खारपाण पट्ट्यातील पिढ्यान पिढ्यांचे जनजीवन सुसह्य करण्याचा केवढा वेगवान मंत्र आहे या नुसत्या कल्पनेने सुद्धा मन आनंदून जाते. **खारपाणपट्ट्यातील ज्या गावामध्ये नळाने पाणी पुरवठ्याची योजना अजूनही जावून पोचलेली नाही व पिण्यासाठी आयाभगिनींना दुरुन कुठून तरी डोक्यावर वाहून पेयजल आणावे लागते त्या गावात जावून त्या मायमाऊलीला जरा विचारा की, तुझ्या घरापर्यंत नळाने गोड पाणी मिळाले तर तुला काय वाटेल? प्रकल्प पाहिजे का नको याचे खरे उत्तर त्या माऊलीच्या उत्तरात आहे.**

### प्रकल्पाचा नवा उपयोग व विश्वकोषामध्ये दुरुस्ती

**६६.** मराठी विश्वकोशाच्या खंड ८ मध्ये पृष्ठ २ वर असे नमूद केलेले आहे की, "धरणाचे मुख्य कार्य दुहेरी स्वरुपाचे असते. एक म्हणजे पाण्याचा साठा किंवा जलाशय निर्माण करणे व दुसरे म्हणजे पाण्याची पातळी उंचावणे." पाण्याची पातळी उंचावणे या उद्देशाच्या बाबतीत पुढे अशी माहिती दिली आहे की, "प्रवाहाला अडथळा होताच प्रवाहातील पाण्याची पातळी वाढणे अपरिहार्यच असते, त्यामुळे धरणाच्या उंचीच्या मानाने पाण्याची पातळीही वाढते. वाढलेल्या पातळीमुळे पाण्याची उर्जा वाढते व या उर्जेचा उपयोग कालव्यातील गुरुत्वाकर्षी प्रवाहाकरीता होतो किंवा विद्युत निर्मितीसाठी होतो." या कसोटीवर विचार करुन जाता निम्न पेढी प्रकल्पाची प्रकल्पस्थळी नदीची पातळी समुद्र सपाटीपासून २९२ मी. उंचीवर आहे. प्रकल्प पूर्ण झाल्यावर तेथील पाण्याची पातळी जवळजवळ ३०८ मी. उंचीवर जाईल. पाण्याची उंची वाढल्यामुळे निर्माण होणाऱ्या दबावामुळे पाणी भूगर्भात झिरपण्याचे प्रमाणसुद्धा वाढेल.

विश्वकोषामध्ये पाण्याच्या साठयाचे जे विविध उपयोग सांगितले आहेत त्यात (१) गावांना व शहरांना पाणी पुरवठा (२) शेतजमिनीचे सिंचन (३) पुरनियंत्रण हे प्रमुख उपयोग म्हणून सांगितले आहेत. या ३ कामी हा प्रकल्प उत्तम उपयोगी येईल, याचे विवेचन या लेखात तपशिलाने आलेले आहेत.

जलविद्युत केंद्र, क्रिडा तलाव व जलमार्ग असे धरणाचे इतर उपयोगसुद्धा विश्वकोशामध्ये नमूद आहेत. विश्वकोशामध्ये कणाकणाने ज्ञान भरून ठेवणाऱ्या अनेक शास्त्रज्ञांच्या चमुच्या लक्षातसुद्धा आला नाही असा या प्रकल्पाचा एक असामान्य उपयोग आहे व तो गुण फक्त निम्न पेढी प्रकल्पामध्येच आहे. भूगर्भातील जलसंपदेचा टाकावू दर्जा दुरुस्त करुन त्याचे उत्तम पेयजलामध्ये रुपांतर करण्याचे सामर्थ्यसुद्धा धरणाचे एक मुख्य कार्य असू शकते. आज ही गोष्ट विश्वकोशाच्या लक्षात आली नाही याबद्दल विश्वकोशकर्त्यांना दोष देता येत नाही, याचे एक कारण म्हणजे समुद्राजवळ खाजण जमिनी अनेक ठिकाणी असतील पण भारतासारख्या खंडप्राय देशामध्ये अशा प्रकारचा खारपाणपट्टा हा फक्त पूर्णेच्याच खोऱ्यात आहे, हे एक व दुसरे व त्याहूनही महत्वाचे कारण असे की, "खाऱ्या पाण्याचा मोठ्या प्रमाणात उपसा व भुपृष्ठावरील गोड पाण्याचे भूगर्भात पुनर्भरण या पद्धतीच्या वापराने भूगर्भातील खारे पाणी उत्तम प्रतिच्या गोड पेयजलामध्ये रुपांतरीत होऊ शकते." हा अनुभव नजरआणेवारीने गेली अनेक वर्षे आम्ही अनुभवत असलो तरी या अनुभवाला शास्त्रीय दर्जा प्राप्त होण्यासाठी ज्या कसोट्यातून जावे लागते त्या पार पाडून त्याला सिद्धांताचे स्वरुप प्राप्त झाले ही घटना १९९० नंतरच्या १०-१५ वर्षातील आहे.

१९७९ मध्ये प्रकाशित झालेल्या आठव्या खंडामध्ये हा उपयोग नमूद नसल्याबद्दल कोशकर्त्यांना दोष कसा देता येईल. असा बदल विश्वकोशाच्या पुढील आवृत्तीमध्ये विश्वकोशाच्या कर्त्यांना निश्चितपणे करावा लागेल.

### पुनर्भरण व पुनर्प्रभारण

**६७.** भुगर्भातील खाऱ्या पाण्याचे पंपींग करणे, यातील पंपींग या इंग्रजी शब्दासाठी मराठीमध्ये चटकन समजण्यासारखा उपसा हा शब्द वापरता येतो. मात्र इंग्रजीतील रिचार्ज या शब्दासाठी सर्वसाधारण लोक बोलतांना पुनर्भरण असा शब्द वापरतात. अनेक लेखकांनी तो तसा वापरला आहे. डॉ.सुधाकरराव धबडगांवकर यांनी मात्र त्यांच्या संबंध लिखाणामध्ये यासाठी पुनर्प्रभारण असा शब्द वापरलेला आहे. एकटदुकट होणारा रिचार्ज असेल तर तेथे त्यासाठी पुनर्भरण असा शब्द वापरणे ठिक असले तरी पुनर्भरणाची एक विशेष प्रक्रिया प्रतिपादन करित असतांना केल्या जाणा-या रिचार्जसाठी पुनर्प्रभारण असा शब्द वापरणे, हे भाषा शास्त्राच्या दृष्टीने जास्त उचित आहे असे मला अनेकांनी सांगितले. तथापी सहजपणे वाचकाला चटकन समजण्यासाठी माझ्या विवेचनामध्ये पुनर्भरण असा शब्द वापरण्याचा मोह मला टाळता आला नाही. पुनर्प्रभारण या शास्त्रीय संज्ञेला समानार्थी म्हणूनच मी तो वापरलेला आहे हे मी मुद्दाम नमूद करीत आहे.

# (३)
# सिंचनासाठी प्रकल्पाचा उपयोग

### सिंचनासाठी प्रकल्पाचा उपयोग

**६८. ज्या गोड पाण्याच्या तुषार सिंचनाने जुन, जुलै, ऑगस्ट मध्ये आमच्या जमिनी, गेल्या शेकडो वर्षात खराब झालेल्या नाहीत त्याच जमिनी त्याच गोड पाण्याच्या तुषार सिंचनाने ऑक्टोंबर, नोव्हेंबर, डिसेंबर मध्ये कशा काय खराब होतात?** खरी गोष्ट अशी आहे की तुषार सिंचनाची ही व्यवस्था निसर्गाने गेली शेकडो वर्षे फक्त पावसाळयात आम्हाला उपलब्ध करुन दिलेली आहे. पावसाळा ओलांडल्यानंतर अशाप्रकारची व्यवस्था पुढच्या वर्षभरात आम्हाला आजपर्यंत

***दापूरा येथील प्रयोगाबाबत असे नमुद करता येईल की २ ऑगस्ट १९९३ रोजी या प्रयोगाला सुरुवात करण्यात आली. दर आठवड्याला पाण्याच्या रासायनिक गुणधर्माची तपासणी होत होती व त्यांच्या उत्तम नोंदी ठेवण्यात आल्या आहेत. कुपनलिकेत पाणी भूपृष्ठापासून १२ मिटर इतके खोल होते. सतत ६७०० तास उपसा केल्यानंतर असे आढळून आले की, विरघळणाऱ्या क्षारयुक्त मातीचे प्रमाण सुरवातीला ३२०० ppm होते ते १०८८ वर आले. क्षारांचे प्रमाण (Chloride) 1800 mgl होते ते 402 mgl वर आले.*** परिच्छेद ४२ पहा

***"पूर्णा खोऱ्यातील क्षारयुक्त सुपीक शेतीसाठी स्प्रिन्कलरव्दारा गोडे पाण्याचे तुषार सिंचन अतिशय उपयुक्त योग्य व फायदेशीर सिंचन योजना आहे. परंतु सलाईन ट्रॅक प्रदेशात सिंचनासाठी गोडे पाणी उपलब्ध नाही."*** *परिच्छेद ७० पहा*

पेढीच्या खारपाणपट्ट्यात कधीहि उपलब्ध झाली नाही. **निम्न पेढी प्रकल्पामूळे त्याच गोड पाण्याच्या तुषार सिंचनाची मानवनिर्मित बारमाही व्यवस्था आम्हाला उपलब्ध होत आहे ही या प्रकल्पाची मोठी असामान्य गुणवत्ता होय.**

### खारपाणपट्ट्यातील समस्या

**६९.** खारपाणपट्टयामध्ये तुषार सिंचन हे अत्यंत उपयुक्त आहे अशाप्रकारचे निष्कर्ष एका मागून एक अनेक शास्त्रज्ञांनी व अनुभवी शेतकऱ्यांनी नोंदविलेले आहेत. पूर्णा खोरे विकास मित्रमंडळाची स्थापना झाल्यापासून कार्यरत असलेले एक ज्येष्ठ पदाधिकारी श्री.भय्यासाहेब कुटासकर हे खारपाणपट्टयातील समस्यांचे व त्यावरील उपाययोजनांचे एक जाणते अभ्यासक आहेत. त्यांनी **"पूर्णा खोऱ्यातील सुपीक खार जमीन व सेंद्रीय खताची समस्या"** या मथळयाखाली लिहिलेल्या लेखामध्ये खारपाणपट्टयातील नागरिकांच्या ज्या समस्या आहेत त्या त्यांनी नेमकेपणाने मांडलेल्या आहेत. समस्यांचे दिग्दर्शन करणारा त्यांच्या लेखातील एक महत्वाचा परिच्छेद पुढीलप्रमाणे :-

"पूर्णा खोरे प्रदेशात पहाड, पर्वत, डोंगर, झाडी, जंगल, पडीत माळरान अजिबात नाही. या भागात गवताची शासकिय अथवा खाजगी कुरणे नाहीत. तात्पर्य पूर्णा खोरे विभागात गुरांना (पशुधन) चरण्यासाठी रान अथवा इतर सोय नाही. **दरवर्षी पावसाळा व हिवाळयाचे दिवसात सुध्दा पूर्णा खोरे प्रदेशात बैल व इतर गुरांना खाण्यासाठी हिरवे गवत किंवा इतर हिरवा चारा फार कमी प्रमाणात उपलब्ध असतो.** शेतीतील पिकात निंदण करुन आणलेले हिरवे हलक्या प्रतीचे गवत या भागातील शेतमजूर महिला, गावातील गवत साथीत चांगल्या किंमतीला विकतात असे निदर्शनात येते. पडीत राखीव जमीन नसल्यामुळे राखून ठेवलेले वाळलेले गवत सुध्दा या भागातील शेतकरी वर्गाजवळ नसते. ज्वारी पिकापासून मिळणारा कडबा, तुरीचे कुटार व गहू पिकापासून मिळणारे गव्हाचे निःसत्व कुटार याशिवाय अन्य चारा पूर्णा खोरे प्रदेशात नाही." (संदर्भ २, पृष्ठ ६९ व ७०)

### स्प्रिन्कलरव्दारा गोडे पाण्याचे तुषार सिंचन अतिउपयुक्त

**७०.** शेतीसाठी स्प्रिंकलर द्वारा गोड पाण्याचे तुषार सिंचन अतिशय उपयुक्त, योग्य व फायदेशीर आहे असे मत याच लेखात त्यांनी नोंदविले आहे ते पुढील शब्दात :-

"पूर्णा खो-यातील खारपाणपट्टा विभागात भूगर्भातील पाणी अर्थात विहिरी व कुपनलिकांचे (टयुबवेल्स) पाणी क्षारयुक्त, अतिशय खारे, दुषित असल्यामुळे शेतीत सिंचन करण्यासाठी अजिबात उपयोगाचे नाही. **पूर्णा खोऱ्यातील क्षारयुक्त सुपीक शेतीसाठी स्प्रिन्कलरव्दारा गोडे पाण्याचे तुषार सिंचन अतिशय उपयुक्त योग्य व फायदेशीर सिंचन योजना आहे. परंतु सलाईन ट्रॅक प्रदेशात सिंचनासाठी गोडे पाणी उपलब्ध नाही."** (संदर्भ २, पृष्ठ ६९)

### तलाव, धरणे, बंधारे यांची निर्मिती करण्यात आलेली नाही

**७१.** समस्या सोडविण्यासाठी काय काम केले पाहीजे या विषयीचे मार्गदर्शन सुध्दा त्यांनी याच लेखात केलेले असून त्यात मुख्यत्वे तलाव, धरणे व बंधारे यांची निर्मिती आमच्या भागामध्ये करण्यात आली नाही असे प्रतिपादन त्यांनी पुढील शब्दात केले आहे. :-

"विदर्भ विभागातील पूर्णा खो-यात असलेल्या खारपाणपट्टा प्रदेशात भुगर्भातील पाणी क्षारयुक्त अतिशय खारे, दुषित व आरोग्यदृष्टया अपायकारक आहे. या भागातील विहिरी व कुपनलिकांचे (टयुबवेल्स) पाणी पिण्यासाठी, स्नान करण्याकरिता, कपडे व भांडी धुण्यासाठी, शेतीत सिंचन करण्याकरीता, इमारतीचे बांधकाम करण्यासाठी, शेतीतील पीकांवर किटकनाशकांची फवारणी करण्याकरिता इत्यादि कोणत्याच कामी अजिबात उपयोगाचे नाही. पूर्णा खोरे प्रदेशात बारमाही वाहणाऱ्या नद्या किंवा नाले नाहीत. सदर टंचाईग्रस्त विभागात पावसाळयातील वाहणारे पाणी साठविण्यासाठी **शासनाकडून तलाव, धरणे बंधारे यांची निर्मिती करण्यात आलेली नाही.** " (संदर्भ २, पृष्ठ ७०)

### नवीन तलाव तथा विविध प्रकारचे बंधारे बांधा

**७२.** तलाव, धरणे व बंधारे निर्माण करण्याची मागणी करुन नवीन तलाव, धरणे व बंधारे बांधून तुषार सिंचन करण्यात यावे, असे प्रतिपादन करणारा त्याच लेखातील महत्वपूर्ण परिच्छेद पुढीलप्रमाणे :- "या भागातील शेतीचा व्यवसाय सुरळीत सुरु राहावा यासाठी व या भागातील ग्रामीण जनतेची मुलभूत प्राथमिक जीवनावश्यक पिण्याच्या पाण्याची अर्थात गोडे पाण्याची तीव्र गरज लक्षात घेऊन शासनाने पूर्णा खोरे प्रदेशात रोजगार हमी योजना, दुष्काळी कामे, जलसंवर्धन योजना अथवा पूर्णा खोऱ्यासाठी खास स्वतंत्र अलग योजना तयार करुन या भागातील बहुउपयोगी जुन्या तलावांचे अत्याधुनिक प्रगत बांधकामाचे तंत्रज्ञान वापरुन नुतनीकरण करण्याची, **नवीन तलाव तथा विविध प्रकारचे बंधारे बांधण्याची किंवा स्प्रिन्कलरव्दारा तुषार सिंचनाची योजना तयार करुन या भागात योग्य प्रकारे राबविण्याची नितांत आवश्यकता आहे.**" (संदर्भ २, पृष्ठ ७३)

### ठिंबक आणि तुषार सिंचनाने शेतीचे उत्पन्न वाढविता येते

**७३.** ज्येष्ठ अभियंते व पूर्णा खोरे विकास मित्रमंडळाचे पदाधिकारी श्री. अशोकराव जाधव, तसेच ज्येष्ठ शास्त्रज्ञ डॉ. सुधाकर धबडगावकर यांनी आपल्या **"पूर्णा खोरे खारपाणपट्टयाच्या समस्या आणि त्यांचे निवारणार्थ लोकसहभाग"** या शोधनिबंधामध्ये अगदी सुरुवातीलाच समस्येचे स्वरुप मांडले असून पुढे तुषार सिंचनामुळे, ठिबक सिंचनामूळे शेतीचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे असे ठाम प्रतिपादन केले आहे. ते पुढीलप्रमाणे :-

**"खारपाणपट्ट्यात ठिंबक आणि तुषार सिंचन पध्दतीनेच सिंचन केल्यास सिंचनाचा लाभ घेऊन शेतीचे उत्पन्न वाढविता येणे शक्य आहे.** जमिनीला नेहमीच्या पध्दतीने पाणी दिल्यास जमिनितील क्षार वर येवुन जमिन खराब होवू शकते. त्यामुळे आधुनिक सिंचन पध्दतीचा वापरणे आवश्यक आहे. (संदर्भ २, पृष्ठ १२७)

### खा-या पाण्याचे टापुतील ग्रामिण जनतेचे जीवन

**७४.** "विदर्भात खाऱ्या पाण्याच्या टापूतील ग्रामीण जनतेच्या समस्या व उपाययोजना" या मथळ्याखाली श्री. भय्यासाहेब कुटासकर यांनी १९९६ मध्ये लिहिलेल्या लेखात ह्या समस्या पुढील शब्दात मांडलेल्या आहेत. :-

"सलाईन ट्रॅक प्रदेशात डोंगर, जंगल किंवा झाडी नाही काही भागात २५ एकर शेतीत एखादे साधे झाड किंवा लहानसे झुडूप सुध्दा आढळत नाही. या भागात लाकडी सरपण, शेतीची अवजारे व इतर सामान तयार करण्यासाठी लाकुड तसेच इमारतीकरीता लागणा-या लाकडाची अतिशय दुर्मिळता आहे. या भागात एखादा गरीब हिंदु इसम परलोकवासी झाल्यास त्याचे प्रेत लाकडाचे अभावी जाळण्याऐवजी जमिनीत पुरण्याची प्रथा पडली आहे. खाऱ्या पाण्याचे टापुत डोंगर, जंगल, झाडी किंवा पडीत माळरान नसल्यामुळे गुरांचे चा-याची या भागात सतत टंचाई असते. चारा टंचाईमुळे या भागात गुरांची संख्या (पशुधन) अतिशय कमी आहे. दुध व दुग्धजन्य पदार्थाची खा-या पाण्याचे टापुतील ग्रामीण भागात नेहमी टंचाई असते." "विदर्भात सलाईन ट्रॅक प्रदेशात केवळ कोरडवाहू शेती होते. कापूस,ज्वारी, मुंग, बाजरी, तुर, ही प्रमुख खरीप पिके व गहू, हरबरा, जवस, करडी, हिवाळी तुर, ही रब्बी (हिवाळी) पिके या भागातील शेतकरी घेतात. केवळ निसर्गाचे भरवशावर या भागातील शेतकरी व शेतमजुरांचे जीवन अवलंबुन आहे. लहरी हवामान व पर्जन्यमान, तसेच शेतीबाबत व दैनदिंन जीवनातील विविध समस्या यामुळे या भागातील शेतीतून अपेक्षित कृषी उत्पादन प्राप्त होत नाही. शेतीशिवाय शेती व्यवसायाला पूरक अथवा इतर उद्योग धंदे ह्या भागात नाही. ह्या कारणास्तव ह्या भागातील शेतकरी व शेतमजुरांची मिळकत अतिशय कमी असुन खा-या पाण्याचे टापूतील ग्रामीण जनता खडतर व हलाखीचे जीवन जगत आहे." (संदर्भ १ पृष्ठ १३४)

### खास ओलित योजना व तुषार सिंचन

**७५.** आपल्या या प्रतिपादनामध्ये त्यांनी तुषार सिंचनाचे मोठे जोरदार समर्थन केले असून खारपाणपट्टयातील कोरडवाहू शेतकऱ्याचे उत्पादन चौपटीने वाढेल अशी खात्री व्यक्त केली आहे. ती पुढील शब्दात :-

"सलाईन ट्रॅक प्रदेशातील क्षारयुक्त शेतीसाठी तुषार सिंचन अतिशय उपयुक्त व फायदेशिर ओलीत योजना आहे. तुषार सिंचन खा-या पाण्याचे टापुसाठी वरदान ठरू शकते. तुषार सिंचनामुळे विदर्भातील खा-या पाण्याचे टापूचा पूर्णपणे कायापालट शक्य आहे. आवश्यकता आहे या **भागातील शेतीला गोड पाणी उपलब्ध करून देण्याची, तुषार सिंचनाने या भागातील कृषी उत्पादनाची चौपटीने वाढ होईल.** पाण्याचा मोजका व कमी वापर, कमी मेहनत व कमी उत्पादन खर्चात या भागात असलेल्या काळ्या, भारी व सुपीक शेतीतुन भरपूर प्रमाणात कृषी उत्पादन प्राप्त होऊ शकेल. विदर्भातील काटेपूर्णा, वान, शहानूर, आदी धरणाचे पाणी या भागातील शेतकरीवर्गास शासनाने तुषार सिंचनासाठी पुरवावे, अथवा अन्य **खास ओलीत योजना तयार करून या योजनेचे पाणी खा-या पाण्याचे टापूतील शेतीला तुषार सिंचनाकरीता उपलब्ध करून देण्यात यावे.**" (संदर्भ १, पृष्ठ १३५)

### तुषार तथा ठिंबक सिंचन

**७६.** याच लेखामध्ये त्यांनी पुढे मोठे तलाव, गावतलाव, कोल्हापूरी बंधारे, भूमिगत बंधारे इत्यादीची मोठया प्रमाणात निर्मिती करण्याची गरज आज आहे

***तुषार सिंचनामुळे उत्पादनात कोरडवाहू पिकाच्या तुलनेत जवळपास दुप्पट ते तिप्पट वाढ होते.***

*परिच्छेद ८४ पहा*

असे प्रतिपादन केले असून सिंचनासाठी तुषार सिंचन व ठिबक सिंचन लाभदायक असल्याचे प्रतिपादन पुढील शब्दात केले आहे. :-

"पूर्णा खोरे खारपट्टा प्रदेशात मुलभुत समस्या जिवनावश्यक पिण्याचे पाण्याची, अर्थात गोड पाण्याची आहे. या भागातील जुन्या ग्रामीण नळ योजना अद्ययावत करण्यात याव्या. या प्रदेशातील ग्रामीण नळ योजनांना विशेष प्राधान्य देण्यात यावे. सदर खारपट्टा प्रदेशातील ग्रामीण जनतेला शासनाने पिण्याचे पाणी विनामूल्य पुरविण्याची आवश्यकता आहे. जलसवंर्धन व पाणी अडवा पाणी जिरवा योजनेअंतर्गत पूर्णा खोरे खारपट्टा प्रदेशात लहान मोठे तलाव, गाव तलाव, कोल्हापुरी बंधारे, भूमिगत बंधारे इत्यादी मोठया प्रमाणात निर्माण करण्याची विशेष गरज आहे. खाऱ्या पाण्याचे टापुत जमीन सखोल काळी व भारी आहे. बांधकामाचे साहित्य दुरवरून या भागात आणावे लागते. या कारणास्तव या भागात शासनाने ठरवून दिलेल्या नियमापेक्षा अर्थात निकषापेक्षा खर्च वाजवीपेक्षा जास्त येतो. या भागातील गोड पाण्याची तीव्र टंचाई व ग्रामीण जनतेची मूलभुत आवश्यक गरज विचारात घेऊन बांधकामाबाबत असलेले शासकीय नियम अर्थात निकष पुर्णा खोरे खारपट्टा प्रदेशासाठी शिथिल करण्याची अथवा बदलण्याची सक्त आवश्यकता आहे. **या भागात होणारा गोड पाण्याचा साठा पिण्यासाठी, दैनंदिन जीवनात विविध कामी वापराकरीता, तुषार तथा ठिंबक सिंचनासाठी, मत्स्य पालन इत्यादी कामी उपयोगात येऊ शकेल.**" (संदर्भ १ पृष्ठ १३६)

## तुषार सिंचन व महाराष्ट्र जल व सिंचन आयोग

**७७.** महाराष्ट्र जल व सिंचन आयोगाने आपल्या अहवालामध्ये खारपाणपट्टयात तुषार सिंचन हे अधिक लाभदायक ठरेल असे निःसंदिग्ध प्रतिपादन पुढील शब्दात केलेले आहे. :-

"उपखो-यात काळ्या मातीचे प्रमाण अधिक असल्याने हया मातीच्या वैशिष्टयामुळे उन्हाळयात मोठया भेगा पडतात. **अशा भागात प्रवाही सिंचनाऐवजी उपसा सिंचनाव्दारे ठिबक व तुषार सिंचन अधिक लाभदायक ठरेल.** त्यासाठी खाजगी उपसा सिंचन योजनांना प्राधान्य व आर्थिक सहाय्य द्यावे." (संदर्भ ३, पृष्ठ २३४)

## ठिबक सिंचनावर फलोत्पादनाचा प्रकल्प यशस्वी झाला

**७८.** याच आयोगाने आपल्या अहवालामध्ये खारपाणपट्टयात फलोत्पादन व वनिकरणाचे कार्यक्रम हाती घेण्याचे समर्थन केले असून ठिबक सिंचनावर फलोत्पादनाचा प्रकल्प यशस्वी झाल्याचे ठाम प्रतिपादन पुढील शब्दात केले :-

"मुख्यतः हे क्षेत्र फलोत्पादन कार्यक्रम व वनिकरण कार्यक्रमाखाली आणावे लागेल. **ठिबक सिंचनावर फलोत्पादनाचा प्रकल्प यशस्वी झाला असून तो मोठया प्रमाणावर राबविण्याच्या दृष्टिने पाऊले टाकावी लागतील.**"(संदर्भ ३, पृष्ठ २३५)

## उच्चाधिकार समितीचे अभिप्राय

**७९.** विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील खारपाणपट्टा समस्या निवारणार्थ श्रीमती वसुधाताई देशमुख यांच्या अध्यक्षतेखाली नेमण्यात आलेल्या उच्चाधिकार समितीच्या अहवालामध्ये जिथे जिथे सिंचन सुविधा उपलब्ध आहेत तिथे तिथे तुषार सिंचन राबवून अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे समर्थन केले असून तुषार सिंचन संच पुरविण्यासाठी शासनाने आर्थिक मदत करण्याची सुध्दा शिफारस केलेली आहे ती पुढील शब्दात :- "**ज्या ठिकाणी काही प्रमाणात सिंचन सुविधा उपलब्ध आहे अशा भागात सिंचनाचा वापर होण्यासाठी तुषार सिंचनाची योजना राबवून अधिक क्षेत्र सिंचनाखाली आणण्याचे दृष्टीने ७५ टक्के शासकीय अनुदानावर या भागातील शेतकऱ्यांना तुषार संच पुरविण्याची रु. १३२९.३० लाख खर्चाची योजना प्रस्तावित केली आहे.** यात लाभार्थीचा २५ टक्के वाटा रु. ४४३.१० लाख राहणार असून एकूण खर्च रु. १७७२.४० लाख गृहित धरण्यात आलेला आहे." (संदर्भ ४, पृष्ठ ५९ व ६०)

## धरणे बांधण्याची शिफारस

**८०.** याच उच्चाधिकार समितीने खारपाणपट्ट्यात कोल्हापूरी बंधारे, तलाव, लहानमोठी धरणे बांधण्याचे आपल्या अहवालांत जोरदार समर्थन केले आहे. ते पुढील शब्दात :-

"या जमिनीची क्षार निचरा करण्याची क्षमता फार कमी आहे. यावर उपाययोजना म्हणून नदी/नाल्यावर कोल्हापूरी पद्धतीचे बंधारे, लहान **मोठे तलाव/धरणे बांधल्यास, सिंचनाद्वारे जमिनीची क्षार निचरा करण्याची क्षमता वाढेल व सोबतच सिंचनाचा फायदासुद्धा होईल. तसेच पिण्याच्या पाण्याचा प्रश्नसुद्धा सुटेल.**" (संदर्भ ४, पृष्ठ ९८)

## डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाचा अहवाल

**८१.** निम्न पेढी प्रकल्पामूळे जवळजवळ १०,००० हेक्टरमध्ये सिंचन क्षमता उपलब्ध होणार असून हा भाग खारपाणपट्टयाचा असल्यामुळे या जमिनीमध्ये सिंचन अजिबात होत नाही, अशाप्रकारचा मोठा गाजावाजा करण्यात आलेला आहे. गेल्या १०-१५ वर्षामध्ये लक्षावधी रुपये खर्च करुन याबाबतचे शास्त्रीय अहवाल उपलब्ध झालेले आहेत. त्या कसोटीवर उपरोक्त युक्तिवाद कितपत टिकतो याचा विचार करणे आवश्यक आहे. "डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठाने याबाबत एक अहवाल तयार केला असून त्यानुसार खारपाणपट्ट्यात ओलित होत नाही असा प्रकल्प विरोधकांचा दावा आहे. आता खरे कुणाचे मानावे? हा प्रश्न आहे." अशी पृच्छा ज्येष्ठ पत्रकार श्री. मोहन अटाळकर यांनी त्यांच्या ३० जुलै २००७ च्या लोकसत्तातील वार्तापत्रात केलेली आहे. कुणाचे खरे मानावे याविषयी वाद निर्माण झाल्यास पुराव्यानिशी कृषी तज्ञांनी जे मांडलेले असते तेच खरे मानले पाहिजे हे निर्विवाद होय. कृषी विद्यापीठातील तज्ञांचे खरे मानायचे नसेल तर निदान प्रत्यक्ष त्या अहवालात काय म्हटले आहे ते खरे सांगायचे बंधन तरी प्रत्येकाने पाळले पाहिजे. ज्या तळमळीने श्री. मोहन अटाळकर यांनी ते लिहिले आहे त्यामुळे त्या अहवालाची मी तपशिलाने माहिती देण्याचे ठरविले आहे.

## "विदर्भातील पूर्णेच्या खोऱ्यातील क्षारयुक्त जमिनी "पुस्तिका

**८२.** याबाबतचा एक महत्वपूर्ण अभ्यास डॉ.पंजाबराव देशमुख, कृषी विद्यापीठाच्या कृषी रसायनशास्त्र व मृदविज्ञान विभागाने १ डिसेंबर १९९५ ते ३० नोव्हेंबर २००० या ५ वर्षाच्या काळामध्ये केला असून "विदर्भातील पूर्णा नदीच्या खोऱ्यातील क्षारयुक्त चोपण जमिनीची सुधारणा" असे त्या प्रकल्पाचे नाव होते. केंद्राच्या अखिल भारतीय कृषि अनुसंधान परिषदेने या प्रकल्पासाठी अर्थसहाय्य केले होते. डॉ. बा.ना.सगरे, डॉ.श.कृ.ठाकरे व भ.आ.सोनुने या तीन संशोधकांनी या प्रकल्पातील संशोधनाचे निष्कर्ष तसेच या जमिनीसाठी योग्य अशा अन्य व्यवस्थापन पध्दतीचे संकलन करुन "**विदर्भातील पूर्णेच्या खोऱ्यातील क्षारयुक्त जमिनी** " या मथळयाची एक पुस्तिका सन २००० मध्ये प्रसिध्द केलेली आहे. (संदर्भ ५)

## अभ्यासासाठी आधारभूत साधनसामुग्री

**८३.** या पुस्तिकेमध्ये पृष्ठ ५० वर ओलित व्यवस्थापनाचे तपशिल दिलेले आहेत. कृषी विद्यापीठातर्फे हा जो अभ्यास करण्यात आलेला आहे तो कोणत्या स्थितीत व कोणत्या आधारभूत घटकांच्या व साधनसामुग्रीच्या आधारावर झाला हे प्रथम समजून घेणे आवश्यक आहे.

(१) ह्या अभ्यासामध्ये बाजूला धरण असून धरणाचे गोड पाणी सिंचनासाठी उपलब्ध आहे हे गृहीत धरलेले नाही. अभ्यासासाठी सुध्दा तसे पाणी उपलब्ध नसल्यामूळे त्यावर आधारित निष्कर्ष काढणे सुध्दा शक्य नव्हते.

(२) मोठया प्रमाणात खाऱ्या पाण्याचा उपसा करुन व त्यात भूपृष्ठावरील गोड पाण्याचे पुनर्भरण करुन दोन, चार किंवा पाच वर्षांनी उत्तम प्रतीचे रुपांतरीत पेयजल सिंचनासाठी उपलब्ध झालेले आहे अशीही स्थिती याठिकाणी नव्हती. या प्रकारचे पाणी सुद्धा सिंचनासाठी उपलब्ध नव्हते. त्यामुळे त्यावर प्रयोग करण्याचा प्रश्नच या अभ्यासात अंतर्भूत नव्हता हे लक्षात ठेवले पाहिजे.

(३) कृषि विद्यापीठाने हा जो अभ्यास सादर केला आहे हा संपूर्णपणे पूर्णेच्या खोऱ्यातील भुगर्भातील उपलब्ध असलेले खारे पाणी वापरुन त्या पाण्याच्या सिंचनावर आधारित हे निष्कर्ष आहेत हे लक्षात ठेवले पाहिजे.

## सिंचनासाठी ५ वर्षेपर्यंत पाण्याचा प्रत्यक्ष वापर केल्यानंतर या अभ्यासात हाती आलेले निष्कर्ष

**८४.** "पूर्णेच्या खोऱ्यातील भुगर्भातील पाणी हे विम्ल स्वरुपाचे आढळून येते" असे अगदी सुरवातीलाच नमूद केले असून त्या पाण्याचा सिंचनासाठी ५ वर्षेपर्यंत प्रत्यक्ष वापर केल्यानंतर या अभ्यासात हाती आलेले निष्कर्ष पुढील प्रमाणे सांगितले आहेत.

(१) पूर्णा खोऱ्यातील भुगर्भातील पाणी हे विम्ल स्वरुपाचे आढळून येते. या पाण्याचा कुठल्याही भुसुधार द्रव्याचा वापर न करता ओलीतासाठी वापर केल्यास या खोऱ्यातील चोपण जमिनी अधिकच चोपण होतात.

(२) **त्याच खाऱ्या पाण्याच्या तुषार सिंचनामुळे उत्पादनात कोरडवाहू पिकाच्या तुलनेत जवळपास दुप्पट ते तिप्पट वाढ होते.**

(३) तुषार सिंचनाखाली घेण्यात आलेल्या कपाशीच्या उत्पादनात जिप्सम, शेणखत व साखर कारखान्यातील मळी यांच्या एकत्रित वापरामुळे पिकोत्पादनात लक्षणीय वाढ होऊन जमिनीचे भौतिक व रासायनिक गुणधर्म सुधारण्यास मदत होते.

(४) यावरुन भुसुधार द्रव्याच्या सान्निध्यात ह्या खोऱ्यातील विम्लयुक्त

***आज फक्त ४५ गावांना पिण्यासाठी पाणी मिळत आहे, उद्या ३४५ गावांची मागणी येईल. आज फक्त १० हजार हेक्टरचे ओलीत होत आहे, उद्या ४५ हजार हेक्टरच्या मागण्या येतील. मागण्या व प्रतिमागण्या, दावे व प्रतिदावे, आंदोलने व प्रतिआंदोलने यांचा महापूर येईल. वाडवडिलांनी अर्जित केलेल्या संपदेचे महत्व ज्यांच्या मुलाबाळांना कळत नाही त्यांच्यामध्ये जसे कलह निर्माण होतात तसाच काहीसा प्रकार जलसंपदेच्या बाबतीतसुद्धा आहे.***

*परिच्छेद १४१ पहा*

पाण्याने जमिनीत कुठलाही बिघाड न होता संरक्षक ओलित करता येवु शकते.

(५) इतकेच नव्हे तर जिप्सम, शेणखत आणि साखर कारखान्यातील मळी ही भुसूधारक द्रव्ये सोडीयम कॉर्बोनेटस्, बायोकॉर्बोनेट व सल्फेट निचऱ्याच्या पाण्यामूळे जमिनीतून निघून जाण्यासाठी अधिक परिणामकारक आढळून येतात.

(६) तुषार सिंचन ओलीताखाली भूसुधार द्रव्याच्या मदतीने कपाशीचे उत्पन्न व जमिनीचे गुणधर्म यावर होणारा परिणाम यांची ९६-९७ ते ९८-९९ या काळातील तपशिलवार आकडेवारी नमूद असलेला तक्ता २० या अभ्यासामध्ये सोबत त्या पुस्तिकेत देण्यात आलेला आहे. हा तक्ता पाहिला तर असे दिसून येते की, भूसुधार द्रव्यासह या खाऱ्या पाण्याने तुषार सिंचन केले असता कापसाच्या उत्पन्नामध्ये हेक्टरी ४६ टक्के वाढ होऊ शकते. त्याचबरोबर जमिनीचे गुणधर्म सुध्दा सुधारले जातात. (संदर्भ ५, पृष्ठ ५१)

### खारे पाणी मिसळून ओलितासाठीसुद्धा वापरता येते

**८५.** भूगर्भातील हे खारे पाणी जसे गोड पाण्यात मिसळून पिण्यासाठी वापरता येते तसे ओलितासाठीसुद्धा वापरले जावू शकते असा निष्कर्ष सेंट्रल ग्राउंड वॉटर बोर्डाचे संचालक श्री.जी.के.देवबर्मन या शास्त्रज्ञाने आपल्या "AQUIFER GEOMETRY AND POSSIBILITIES OF IMPROVING GROUND WATER QUALITY IN PURNA SALINE TRACT, MAHARASHTRA." या शोधनिबंधामध्ये असे प्रतिपादन केले आहे की, गोड पाण्याचे भूपृष्ठावर साठे निर्माण करुन त्यातून भुगर्भात पूनर्भरण करावे. गरज पडल्यास भूगर्भातुन बाहेर पडणारे खारे पाणी योग्य प्रमाणात गोड पाण्यात मिसळून ते मिश्रित पाणी ओलीतासाठी वापरता येईल, निचऱ्याची योग्य व्यवस्था असल्यास जमिनीतील खारेपणा पावसाळ्यात धूवून निघण्यास त्याची मदत होईल असाही विचार त्यांनी मांडला आहे. त्यांच्याच शब्दात जसाच्या तसा पुढील प्रमाणे :-

"Water conservation structures in the recharge area may be implemented in the northern part and also on the periphery of the saline tract to augment the recharge of good quality water. **If required saline water can also be pumped in these structures, in proper proportion and the mixed water may be used directly for irrigation in the fields with proper drainage so that salt concentration is leached/washed away during rainy season."** (संदर्भ १, पृष्ठ ५०)

### उपलब्ध पाणी स्त्रोत वापरायोग्य कक्षेमध्ये आणणे

**८६.** देशामध्ये उपलब्ध असलेले पाण्याचे उद्‌भव शोधून काढून ते अधिकाअधिक प्रमाणात वापरण्या योग्य कक्षेमध्ये आणण्यांत यावे अशाप्रकारचे उत्तम मार्गदर्शन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये पुढील शब्दात केलेले आहे. :-'Water resources available to the country should be brought within the category of utilisable resources to the maximum possible extent." (संदर्भ ७, परिच्छेद ३.१) **राष्ट्रीय जलधोरणानुसार अधिकाधिक जलस्त्रोत वापरण्यायोग्य कक्षेमध्ये आणण्याची गोष्ट देशाच्या पातळीवर ठरली असतांना आम्ही पेढी नदीच्या पात्रात उपलब्ध झालेला पहिला आणि एकमेव उद्‌भव गमावून बसण्यासाठी संघर्ष करीत आहोत.**

# (४)

# राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्प

### राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्प

**८७.** केंद्र सरकारने एप्रिल २००२ मध्ये नवे राष्ट्रीय जलधोरण जाहिर केले आहे. या नवीन राष्ट्रीय धोरणानुसार २ वर्षाच्या आत तुटीच्या खोऱ्यातील पाण्याची तूट भरून काढण्यासाठी राज्यांनी भविष्यवेधी योजना तयार कराव्यात व त्यांच्या पाठपुराव्यासाठी एक समयबद्ध कृति कार्यक्रमही तयार करावा असे कलम २७ मध्ये नमूद केले आहे. त्या दृष्टीने राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाची एक योजना समोर ठेवण्यात आलेली आहे. मा.सर्वोच्च न्यायालयाने सुध्दा केंद्र शासनाला असे निदेश दिलेले आहेत की, अशाप्रकारे राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाचा एक सर्वसाधारण आराखडा तयार करण्यात यावा. केंद्र शासनाने या संदर्भात एका कार्यबल (Task Force) गटाची नियुक्ती केली असून त्या गटाने आपले काम सुरु केले आहे. केंद्र शासनाच्या पातळीवर तयार करण्यात आलेल्या या राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पामध्ये महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळत नाही अशी तक्रार असून महाराष्ट्र शासनाने केंद्राला ही बाब लक्षात घ्यावी अशी विनंती केलेली आहे. "राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पातून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळण्याबाबत" या विषयावर शासनाच्या वतीने महाराष्ट्र विधानमंडळाच्या उभय सभागृहात एक ठराव मांडण्यात आला होता.

### पाटबंधारे मंत्र्यांचा ठराव

**८७.१** दिनांक ४ जून २००४ रोजीच्या महाराष्ट्र विधानपरिषदेच्या "दिवसाच्या कामकाजाच्या क्रमा"मध्ये हा पूर्ण ठराव प्रसृत करण्यात आला होता. दिनांक ४ जून ची दिवसाच्या कामकाजाची पत्रिका आम्हाला अगोदरच्या दिवशी टपालखणाद्वारे प्राप्त झाली. विषयपत्रिकेवर विषय क्रमांक सातवर मा. पाटबंधारे मंत्र्यांचा शासकीय ठराव पुढील प्रमाणे होता :-

**मा. पाटबंधारे मंत्र्यांचा ठराव**

"ज्याअर्थी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्यातील २६६० पाटबंधारे प्रकल्प स्वबळावर बांधूनही राज्यात असलेल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ २२ टक्के सिंचनक्षमता निर्माण होऊ शकली आहे, परंतु देशाचे पातळीवर याच कालावधीत ५१ टक्के सिंचनक्षमता निर्माण झाली आहे,

आणि ज्याअर्थी, ४२ **टक्के भूभाग अवर्षणप्रवण असलेल्या महाराष्ट्र राज्यास प्रस्तावित राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाद्वारे नगण्य लाभ होत आहे,**

आणि ज्याअर्थी, देशातील सर्व राज्यांमध्ये उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करुन **पाण्याद्वारे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या समान संधी सर्व राज्यांना प्राप्त करुन देणे आवश्यक आहे,**

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात देशाच्या लोकसंख्येच्या १० टक्के लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्र आहे,

त्याअर्थी, आता, केंद्र शासनाने प्रस्तावित केलेल्या रु. ५,६०,००० कोटी खर्चाच्या राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळावा या दृष्टीने सध्याच्या नद्याजोड प्रकल्पात आवश्यक ते तांत्रिक बदल करुन उत्तरेतील नद्यांचे पाणी महाराष्ट्रात येण्यासाठी व राज्यातील पाण्याची गरज आणि सिंचनक्षमतेचा विकास करण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद केंद्र शासनाने उपलब्ध करावी असा ठराव महाराष्ट्राची विधानपरिषद एकमताने मंजूर करीत आहे. पाणी वाटपात झालेल्या अन्यायाबाबत या सभागृहाच्या सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या समस्येवर निश्चित स्वरुपाचे आश्वासन केंद्र शासनाने त्वरित द्यावे, अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे."

### प्रा.बी.टी.देशमुख यांची ठरावाला सुधारणा

**८८.** अशा ठरावाला नियमाप्रमाणे सदस्य सुधारणा सूचवू शकतात. दुसऱ्या दिवशी म्हणजे ४ जून २००४ रोजी आम्ही नियमांनी ठरवून दिलेल्या वेळेच्या आत या ठरावाला सुधारणा सूचविली होती. ती पुढील प्रमाणे

**प्रा.बी.टी.देशमुख यांची ठरावाला सुधारणा**

"अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे .." या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा. :-

"अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे. नद्या जोड प्रकल्पात आवश्यक ते तांत्रिक बदल करतांना, तांत्रिकदृष्ट्या शक्य होईल त्या मर्यादेपर्यंत अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालानुसार अनुशेषात असलेल्या महाराष्ट्रातील जिल्ह्यांना वरचे प्राथम्य देण्यात यावे अशीही या ठरावाद्वारे विनंती करण्यात येत आहे. सिंचन क्षमतेचा विकास करण्यासाठी उपरोक्त विनंतीनुसार केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारी तरतूद घटनेच्या कलम ३७१ (२) अंतर्गत माननीय राष्ट्रपतींनी दिनांक ९ मार्च १९९४ रोजी काढलेल्या आदेशानुसार व

***खारपाणपट्‌ट्यातील संपूर्ण जलसाठा हा रासायनिक संकुलासाठी राखून ठेवणे हे जेवढे त्याज्य समजल्या गेले पाहिजे त्याच्या उलट टोकाला सिंचनासाठी हे पाणी नकोच असेल तर ते संपूर्ण पाणी पेयजल म्हणून राखून ठेवणे स्वागतार्ह समजले गेले पाहिजे.***

*परिच्छेद १४० पहा*

महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर २००१ रोजी प्रख्यापित केलेल्या निदेशानुसारच वापरण्यात येईल असा ठाम निर्धार हे सभागृह व्यक्त करीत आहे ”

### मुळ ठराव बाजूला, सुधारणा नामंजूर, नवा ठराव मंजूर

**८९.** दिनांक ४ जून २००४ रोजी दुपारी ४ वाजून ५ मिनिटांनी हा ठराव सभागृहासमोर मा. राज्यमंत्र्यांनी मांडला. एकदोन दिवस अगोदर कामकाज सल्लागार समितीमध्ये याबाबत अशी चर्चा झाली होती की सर्व संबंधीतांनी एकत्र बसून या ठरावाचा मसुदा तयार करावा व मग नंतर तो सभागृहाने एकमताने सम्मत करावा. पण त्याप्रमाणे तशी बैठक झाली नाही त्यामुळे शासनाने विदर्भ, मराठवाडा व कोकणचा विचार न करता ठराव आणला. आम्ही त्याला सुधारणा दिली. मा. सभापतींचे म्हणणे असे की, एकमताने करायचे ठरले होते, त्याचे काय झाले? या चर्चेत एक तास निघून गेला.

शेवटी ५ वाजता मा. सभापतींनी बैठक अर्ध्या तासासाठी तहकूब केली. ५.३० वाजता पुन्हा १५ मिनिटासाठी विधानपरिषदेची बैठक दुसऱ्यांदा तहकूब करण्यात आली. ५.४५ वाजता पुन्हा अर्ध्या तासासाठी बैठक तिसऱ्यांदा तहकूब करण्यात आली. मा. सभापतींच्या दालनामध्ये तोडगा काढण्यासाठी चर्चा सुरु होती. अनुशेषग्रस्त भागाला न्याय देणारी सुधारणा होती, त्यामुळे आम्ही सुधारणा मांडणारच असा आग्रह आम्ही त्यावेळी धरला. ६.१५ वाजता पुन्हा सभागृह सुरु झाले. कामकाज पत्रिकेवर शासनाने मांडलेल्या ठरावाला आम्ही आमची सुधारणा मांडली. सुधारणा बहुमताने नामंजूर झाली. कामकाज पत्रिकेवरचा मांडलेला ठराव तसाच राहीला व विधानसभेने केलेल्या काही दुरुस्त्यांसह ऐनवेळी मा. राज्यमंत्र्यांनी मांडलेला नवा ठराव सभागृहात १८.५५ वाजता सम्मत झाला. ही सर्व चर्चा सोबत **सहपत्र : दोन** म्हणून दिलेली आहे.

### ठराव नामंजूर झाला पण हालचाली सुरु झाल्या

**९०.** आम्ही मांडलेली सुधारणा सभागृहामध्ये संमत झाली नाही ही गोष्ट खरी असली तरी सभागृहामध्ये याबाबत झालेल्या घणाघाती चर्चेमुळे या प्रश्नाला चांगलेच तोंड फुटले. विदर्भावर याबाबतीत अन्याय होता कामा नये अशाप्रकारची भावना नोंदविण्यात आली. आज तारखेला महाराष्ट्र शासनाचे म्हणणे केंद्र शासनाने मान्य केले नाही व विदर्भाचे म्हणणे राज्य शासनाने मान्य केले किंवा नाही याची माहिती नाही पण देशाच्या पातळीवर राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पात महाराष्ट्राचा समावेश असला पाहीजे, व त्याच बरोबर महाराष्ट्राच्या नद्याजोड प्रकल्पात विदर्भाचा समावेश असला पाहीजे. या दृष्टीने सर्व स्तरावर जोरदार हालचाली सुरु झाल्या. विदर्भ व मराठवाड्यातील काही अभियंते, सेवानिवृत्त अभियंते व लोकप्रतिनिधी, सामाजिक कार्यकर्ते यांच्यातील अनौपचारीक चर्चा व विचार विनियमातून काही औपचारिक व काही अनौपचारिक प्रस्ताव तयार झाले आहेत, काही तयार होत आहेत. त्या सर्वांचा आढावा येथे घेणे शक्य नाही. मात्र ९ व १० सप्टेंबर २००६ रोजी नागपूर येथे एका अखिल भारतीय स्तरावरील राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाबाबत झालेल्या चर्चासत्रामध्ये (All India Seminar on Interlinking of Rivers in India : 2006, 9-10 September 2006 Nagpur, Organised by The Institution of Engineers (India) Nagpur Local Centre and Indian Water Resources Society Nagpur Centre) सादर झालेल्या दोन शोधनिबंधाचा उल्लेख करणे मला आवश्यक वाटते. (संदर्भ ६)

### वैनगंगा-पूर्णा (तापी) नदी जोड प्रकल्प

**९१.** कार्यकारी अभियंता श्री. के.ई.वरांभे, सर्वश्री. आर.डी.झरेकर, एस.डी.चितळे व एम.आर. वंजारी या चार अभियंत्यांनी संयुक्तरित्या या चर्चासत्रामध्ये सादर केलेल्या “Interlinking of Rivers, Wainganga Purna (Tapi Basin) Link” या शोधनिबंधामध्ये अतितुटीच्या व बहुअनुशेषात असलेल्या विदर्भातील जलसिंचनविषयक मुख्य तीन समस्या पुढील प्रमाणे नमूद केलेल्या आहेत :-

“To resolve problems of water scarcity & water backlog areas in Vidarbha region which is a part of Maharashtra, the implementation of river interconnecting project is highly indispensable. Broadly speaking there are following three major problems related to water shortages in river basins of Vidarbha region.

A) Ground water levels in the famous orange gardens region of Katol, Narkhed & Warud which are tahsils in Nagpur & Amravati district of Maharashtra is getting deeper & deeper day by day. hence refilling of ground water level is very much essential to attain prosperity & wealth of this region. This can only be achieved through basin interconnection scheme.

B) **Large region in Purna river basin is a salt belt land which occupied Amravati & Akola districts of Vidarbha. As per the view mentioned in** जलसिंचन आयोग, **this region can be made salt free through dilution by fresh water.** This also can be achieved through river interconnecting scheme.

C) **Washim district is** one of the district in Vidarbha having the highest Water backlog. To minimize this backlog there is no other way rather than interconnecting river basins." (संदर्भ ६, पृष्ठ १०१)

### धापेवाडा ते डोमक (ता.मोर्शी)

**९२.** गोंदिया जिल्ह्यातील तिरोडा तालुक्यात कावळेवाडा गावाजवळ वैनगंगा नदीवर धापेवाडा बंधाऱ्यातून वैनगंगेचे न वापरलेले पाणी वळवून वर्धा खोऱ्यातून प्रवास करीत २२२ किलोमिटरचे अंतर कापून निरनिराळे १४ टप्पे पार करुन हे पाणी पूर्णा खोऱ्याच्या माथ्यावर मोर्शी तालुक्यातील डोमक गावापर्यंत पोचविल्या जावू शकते याची तपशिलवार माहिती या शोधनिबंधामध्ये या अभियंत्यांनी सादर केली आहे. (संदर्भ ६, पृष्ठ १०३)

### वर्धेच्या उपखोऱ्याला फायदा

**९३.** वर्धेच्या उपखोऱ्यामध्ये अप्पर वर्धा धरणाच्या उजव्या कालव्यातून कालव्याच्या खालच्या भागाला पाणी मिळत असले तरी कालव्याच्या वरच्या भागातील कितीतरी जमिन सिंचनापासून वंचित राहीलेली आहे. चारगडच्या कालव्याबाबत सुद्धा हीच परिस्थिती आहे. मुळ ठाणाठुणीचे प्रकल्पस्थळ कायम राहीले असते तर हा उजवा कालवा कितीतरी मिटर उंचिवरुन गेला असता. आज आता लाभक्षेत्रातील जमिनीला फायदा मिळू लागला की वंचित क्षेत्रामध्ये तिव्रतेने त्याची जाणीव व्हायला लागते. त्यामुळे असंतोष निर्माण होतो. स्वाभाविकपणे नव्या मागण्या पुढे येतात. पूर्ण पाण्याचे नियोजन झालेले असल्यामुळे पाणी उपलब्धतेचे प्रश्न निर्माण होतात. धापेवाड्यापासून डोमकपर्यंतचा या नदीजोड प्रकल्पाच्या कालव्याचा प्रवास होत असतांना अनेक ठिकाणी लिफ्टचा वापर होत असल्याने पाहिजे त्या उंचिवर पाणी घेऊन अप्पर वर्धा व निम्न चारगड प्रकल्पातील वंचित क्षेत्रांना खूप मोठा लाभ सहजपणे होऊ शकतो. ही माहिती नमुद असलेला या शोध निबंधातील भाग पुढील प्रमाणे :-

“Again the strong demand for new irrigation projects in the area of Narkhed tahsil is growing up. This demand can only be fulfilled through diversion of wainganga river via. Dhapewada/Gosikhurd project. Similarly the water can be fed to various tanks in Wardha valley such as Upper wardha, Lower Chargad, Upper Wena, Lower Wena, etc. The diverted water can be used to irrigate lands lying upstream of Kolar, Umri, Chandrabhaga, Mordham, etc. Thus the diversion will be helpful in irrgating 60000 ha of land in the dry regions of Kanhan and Wardha valley besides helping in the recharge of ground water table in the dark water shade.” (संदर्भ ६, पृष्ठ १०३)

### खारपाण पट्ट्यात नदी जोड प्रकल्प

**९४.** वैनगंगा-पूर्णा नदी जोड प्रकल्पाचे हे पाणी पूर्णेच्या माथ्यावर एकदा तलांक ४०० पर्यंत पोचविले म्हणजे पुढे ते पूर्णा नदीच्या दोनही बाजूने समांतरपणे त्या खोऱ्याच्या खारपाणपट्‌ट्यात शिरल्यानंतर गोड पाण्याच्या या मोठ्या प्रमाणावरील पूनर्भरणामुळे त्या भागातील ‘सलाईनिटी’ कमी होण्यासाठी त्याचा फार मोठा

***ज्यावेळेला अमरावती शहराला नव्या उद्भवाची गरज पडेल त्यावेळेला १० टक्के पेक्षा जास्त पाणी हे अप्पर वर्धा धरणातून मिळणार नाही, अशा जलदानाला तीव्र विरोध होईल. तुमच्या दारात असलेले पाणी अरबी समुद्राला जावून मिळत आहे. तुम्ही आमचे शेती सिंचनाचे पाणी का म्हणून नेत आहात? असा जर प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर आम्ही काय देणार आहोत.***

*परिच्छेद १३७ पहा*

उपयोग होईल असा विचार या चार अभियंत्यांनी आपल्या शोधनिबंधात मांडला आहे तो पुढील शब्दात :-

"The water once taken to RL 400 m on Purna ridge, can futher be diverted in two directions; one towards Wan river parallel to Purna river (north of Purna river) along the contour of 400m, and another towards Man river again parallel to Purna river (South of Purna river) along the contour between 400-360 m. **This arrangement will envelope the saline belt of Purna river. The salinity of this belt can be reduced by supplementation of Non-saline fresh water along with irrigation to thousands of ha area.**" (संदर्भ ६, पृष्ठ १०३)

### पूर्णेच्या खोऱ्यात १ लाख हेक्टरची सिंचन क्षमता

**९५.** वैनगंगा-पूर्णा (तापी) नदी जोड प्रकल्पाचा हा जो आराखडा या चार अभियंत्यांनी आपल्या शोधनिबंधामध्ये सादर केलेला आहे त्याप्रमाणे पूर्णेच्या खोऱ्यात जवळजवळ १ लाख हेक्टर जमिनीचे सिंचन होवू शकेल, तो मजकूर पुढीलप्रमाणे :-

"**Irrigation in Purna valley : Purna valley covers mainly the districts of Amravati, Akola and Buldana, all these districts are having huge irrigation backlog.** This proposal indicates the possibility of transporting surplus waters of Wainganga basin to the water deficit Purna basin. **The transported water can be fed to numerous projects like Pedhi, Sindi (b), Karajgaon, Bordi, Malkapur all on north side of Purna river and Uma Barrage, Katepurna barrage on southern side of Purna river.** The transporting canals will irrigate about 100000 ha. of land in course of travel."(संदर्भ ६, पृष्ठ १०३)

### तपशीलवार सर्वेक्षणाची गरज

**९६.** तुलनेने लिफ्टचा खर्च या प्रस्तावात कमी येणार असून अमरावती अकोला जिल्ह्याच्या खारपाण पट्ट्याच्या जमिनीतील सलाईनिटी लक्षात घेता, या जिल्ह्यांचा अनुशेष लक्षात घेता व नरखेड, काटोल, वरुड या तालुक्यामध्ये भूगर्भातील पाण्याची खाली गेलेली पातळी लक्षात घेता आम्ही सादर केलेल्या वैनगंगा - पूर्णा नदी जोड प्रकल्पाचा तपशीलवार अभ्यास व सर्वेक्षण तातडीने हाती घेण्याची गरज आहे असे प्रतिपादन या अभियंत्यांनी त्याच्या शोधनिबंधाच्या शेवटी पुढील शब्दात केलेले आहे. :-

"**Conclusion** : The scheme of Interlinking Wainganga river with Purna river in Tapi basin needs to be undertaken for detail survey and studies since it involves comparatively less amount of lifting and it proposes to supply water to (1) dry region of Wardha valley like Narkhed, Katol and Warud tahsils where the water table has fallen alarmingly (2) saline belt of Purna river in Amravati and Akola districts which are having huge irrigation backlog." (संदर्भ ६, पृष्ठ १०३)

### कन्हान- वर्धा - नदीजोड प्रकल्प

**९६.१** सन २००६ मध्ये ९ व १० सप्टेंबर रोजी नागपूर येथे झालेल्या अखिल भारतीय चर्चासत्रामध्ये सेवानिवृत्त मुख्य अभियंता श्री. डी.डी.रेवतकर यांनी सादर केलेल्या "Interlinking of River Kanhan-Wardha Link" या शोध निबंधामध्ये कन्हान-वर्धा नदीजोड प्रकल्पाचा तपशीलाने उहापोह केलेला आहे. मध्यप्रदेशातील महादेवाच्या डोंगरात उगम पावणारी कन्हान नदी छिंदवाडा जिल्हा पार करुन विदर्भात शिरल्यानंतर प्रकल्प स्थळांच्या अभावी ते पाणी बांधून काढण्यात आलेले नाही. ते पाणी महाराष्ट्राच्या सिमेपर्यंत कसे आणता येईल हा विचार त्यांनी पुढील शब्दात मांडला आहे. :-

"The kanhan Hydro Electric Project, popularly known as "Jamghat" is approximately 60 km away from Maharashtra - Madhya Pradesh State boundary. There are no storage sites in between to regulate the water once released from the Jamghat storage. The saledhana barrage in Madhya Pradesh, 25 kms downstream of jamghat, though having very less capacity (11 $Mm^3$ gross) is now being considered for the diversion of water by gravity to Maharashtra. the releases from jamghat will be diverted from saledhana barrage through its Right Bank Canal upto the state border." कन्हान हाईड्रोईलेक्ट्रीक प्रोजेक्टपासून निघालेले हे पाणी ८० ते ९० किलोमिटरचा प्रवास करुन एकदा कन्हान व वर्धा नदीच्या मधल्या माथ्यावर (ridge) आणले तर नागपूर व वर्धा जिल्ह्यात काही हजार हेक्टरची सिंचनक्षमता मिळू शकते असे त्यांनी प्रतिपादन केले आहे.

### राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पात विदर्भाचे स्थान

**९७.** मुळात राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाचा प्रस्ताव केंद्र शासनाने तयार केलेला आहे. मा. सर्वोच्च न्यायालयाने त्याबाबतीत निदेश दिलेले आहेत. राष्ट्राच्या वाटपात **महाराष्ट्राच्या वाट्याला आलेल्या ५६००० कोटी रुपयांच्या वाटपात विदर्भाला समन्याय मिळाला पाहिजे अशी मागणी आपल्याला करता येईल. पण केंव्हा? खूप मोठा अनुशेष असूनसुद्धा १० हजार हेक्टरची सिंचनक्षमता असलेला निम्न पेढी प्रकल्पसुद्धा ज्यांना बांधून काढता आला नाही त्यांना वैनगंगेतून नदीजोड प्रकल्पाद्वारे १ लाख हेक्टरची सिंचनक्षमता पेढी-पूर्णेच्या खोऱ्यात आणून द्या अशी मागणी कोणत्या तोंडाने करता येईल?**

## (५)
## विपूल व अतिविपूल जल उपलब्धतेच्या खोऱ्यातील पाणी अतितुटीच्या खोऱ्यात वळविणे.

**९८.** महाराष्ट्रातील सर्व पाणी हे महाराष्ट्रातच वापरल्या गेले पाहिजे, यासाठी तळमळीने काम करणारे विधानमंडळ सदस्य, जननेते, सेवानिवृत्त व कार्यरत अभियंते, या प्रश्नाविषयी तळमळ असणारे सामाजिक कार्यकर्ते यांनी **महाराष्ट्र पाणीपरिषद** स्थापन केली असून महाराष्ट्राच्या निरनिराळ्या भागामध्ये फिरुन, बैठका घेवून "महाराष्ट : तुटीच्या खोऱ्यात अधिक पाणी उपलब्ध करुन देण्यासाठीचे नियोजन" या नावाचा एक प्रस्ताव पाणीपरिषदेने तयार केलेला आहे. तो एका पुस्तिकेच्या रुपाने प्रकाशित करण्यात आला आहे. श्री. गणपतराव देशमुख यांच्यासारखे ज्येष्ठ विधानमंडळ सदस्य या पाणीपरिषदेचे अध्यक्ष असून श्री. बाळासाहेब विखे पाटील हे कार्याध्यक्ष आहेत. अनेक ज्येष्ठ सेवानिवृत्त व विद्यमान अभियंत्यांचा या कामामध्ये सहभाग आहे.

### महाराष्ट्रातील ५ खोऱ्यांची विभागणी एकूण ३४ उपखोऱ्यांमध्ये

**९९.** सिंचन आयोगाच्या अधिकृत आकडेवारीवरुन महाराष्ट्रातील खोरेनिहाय उपलब्ध पाणी, प्रस्तावित पाणी वापर, याची महत्वपूर्ण आकडेवारी या पुस्तिकेमध्ये नमूद केलेली आहे. गोदावरी, कृष्णा, तापी, नर्मदा व कोकण या महाराष्ट्रातील ५ खोऱ्यांची विभागणी एकूण ३४ उपखोऱ्यांमध्ये करण्यात आलेली आहे व त्यांचे वर्गीकरण (१) अतितुटीचे उपखोरे (२) तुटीचे उपखोरे (३) सर्वसाधारण उपखोरे (४) विपुल व (५) अतिविपुल उपखोरे अशा ५ वर्गामध्ये करण्यांत आलेली आहे. या ३४ मध्ये विपुल व अतिविपुल पाणी असलेल्या उपखोऱ्यांची संख्या १४ असून तुटीच्या व अतितुटीच्या उपखोऱ्यांची संख्या २० आहे.

### अतितुटीची सहा व अतिविपूल पाणी असलेली सहा उपखोरी

**१००.** मुख्य पाच खोऱ्यातील ३४ उपखोऱ्यांमध्ये सर्वात कमी पाणी उपलब्धता असलेल्या तुटीच्या / अतितुटीच्या ६ खोऱ्यांची व विपूल व अतिविपूल पाणी उपलब्ध असलेल्या सहा खोऱ्यांची माहिती पुढील प्रमाणे :-

***पुरनियंत्रणामध्ये सिंचन प्रकल्प किती महत्वाची कामगिरी बजावू शकतात या विषयीचे मार्गदर्शन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये करण्यात आलेले आहे त्याचा सुध्दा आम्ही विचार करणार नसु तर ती अत्यंत दुर्देवाची गोष्ट होय.***

*परिच्छेद १०७ पहा*

महाराष्ट्रातील सर्वात जास्त म्हणजे अतितुटीची असलेली सहा उपखोरी 'गुणानुक्रमे' पुढील प्रमाणे

| अ.क्र. | खोरे तपशील | प्रति हेक्टर पाणी उपलब्धि घ.मी. |
|---|---|---|
| १. | येरळा | ४०६ |
| २. | उजनी खाली (माणसह) | ५१३ |
| ३. | अग्रणी | ७९१ |
| ४. | सीना | ९५७ |
| ५. | बोरी -बेनीतुरा | १४१७ |
| ६. | पूर्णा (तापी) | १,८११ |

अतिविपूल पाण्याची उपलब्धता असलेली 'गुणानुक्रमे' पहिली सहा उपखोरी पुढीलप्रमाणे :-

| अ.क्र. | खोरे तपशील | प्रति हेक्टर पाणी उपलब्धि घ.मी. |
|---|---|---|
| १. | मध्य कोकण | ४८,७६१ |
| २. | इंचमपल्ली परिसर | ४२,००० |
| ३. | तेरेखोल/तिल्लारी | ४१,८७० |
| ४. | उत्तर कोकण | ४०,२४३ |
| ५. | वशिष्ठी | ३५,६८८ |
| ६. | दक्षिण कोकण (रत्नागिरी) | ३४,४४८ |

## महाराष्ट्र पाणीपरिषदेचे निष्कर्ष

**१०१.** सिंचन आयोगाच्या अधिकृत आकडेवारीचा वापर करुन या ३४ उपखोऱ्याबाबत महाराष्ट्र पाणीपरिषदेने पुढील प्रमाणे निष्कर्ष काढलेले आहेत. :-

(१) यावरुन असे दिसते की, विपुलतेच्या (१४) उपखोऱ्यात तुटीच्या (२०) उपखोऱ्यांपेक्षा दर हेक्टरी (८) पट जादा पाणी उपलब्ध आहे.

(२) विपुलतेच्या (१४) उपखोऱ्यातून स्थानिक गरजा पूर्ण करुन उरलेल्या पाण्यातून आवश्यक तेवढे पाणी तुटीच्या (२०) उपखोऱ्यात वळविणे गरजेचे आहे. या संदर्भात महाराष्ट्र पाणीपरिषदेने संपूर्ण राज्यासाठी आंतरखोरे पाणी परिवहनाचे प्रस्ताव तयार केले आहेत.

(३) अशा प्रकारे आंतरखोरे पाणी परिवहन न केल्यास राज्यातील सिंचन विकास व पर्यायाने राज्याचा आर्थिक विकास खुंटेल. **सध्याचे सिंचन प्रकल्प उद्याचे केवळ पिण्याच्या पाण्याचे प्रकल्प होणार आहेत. म्हणून अशा आंतरखोरे पाणी परिवहन योजना हाती घेऊन येत्या २० वर्षात त्या पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा पाण्याच्या तुटीच्या खोऱ्याचे वाळवंटीकरण होईल.**

## आंतरखोरे पाणी परिवहनाचे एकूण १३ प्रस्ताव

**१०२.** महाराष्ट्र पाणीपरिषदेने संपूर्ण राज्यासाठी आंतरखोरे पाणी परिवहनाचे एकूण १३ प्रस्ताव तयार केलेले आहेत. आपल्या शिफारशींमध्ये महाराष्ट्र पाणीपरिषदेने असेही नमूद केले आहे की, ही योजना येत्या २० वर्षात पूर्ण करण्याची नितांत आवश्यकता आहे. अन्यथा पाण्याच्या तुटीच्या खोऱ्याचे वाळवंट होईल. वर नमूद केल्याप्रमाणे **तापी खोऱ्यातील पूर्णा उपखोरे हे मेरीटप्रमाणे सहाव्या क्रमांकावरील अतितुटीचे/तुटीचे उपखोरे असून अशा वाळवंटीकरणापासून आपला बचाव व्हावा याचा या खोऱ्याने विचारसुध्दा न करणे आत्मघातकीपणाचे ठरेल. अतितुटीचे/तुटीचे उपखोरे असल्यामुळे दुसऱ्या उपखोऱ्यातून परिवहनाच्या मार्गाने पाणी मागण्याचा अधिकार असला तरी आपलेच पाणी जे उपखोरे वापरु शकत नाही त्या उपखोऱ्याने बाहेरुन पाणी मागण्याची कृती निःसंदिग्धपणे हास्यास्पद व पोरकटपणाची ठरेल.**

## आंतरखोरे पाणी परिवहनाचे १३ प्रस्ताव शासनाला सादर केले

**१०३.** "महाराष्ट्र राज्य मंत्रीमंडळाने ३१ जानेवारी २००० रोजी औरंगाबाद येथे झालेल्या बैठकीत दमणगंगा/नार/पार या कोंकणातील खोऱ्यातून पाणी वळवून गोदावरी खोऱ्यात पाणी उपलब्धी वाढविण्यासाठी अभ्यास करावा असा निर्णय घेतलेला आहे. परंतु त्यावर अजून तरी कार्यवाही झालेली दिसत नाही अशाप्रकारची दिरंगाई राज्याला हानीकारक आहे" असे मत महाराष्ट्र पाणीपरिषदेने नमूद केले आहे. या परिषदेने आंतरखोरे पाणी परिवहनाचे १३ प्रस्ताव तयार करुन शासनाला सादर केले आहेत ते पुढीलप्रमाणे :-

१) सह्याद्री घाट माथ्यावरील नाल्याचे १० अब्ज घनफुट पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे.

२) उर्ध्व वैतरणा धरणातील पावसाळी ५ अब्ज घनफुट पाणी मुकणे धरणात वळविणे.

३) उत्तर कोंकणातील दमणगंगा, शाई, काळू, पिंजाळ नद्यातील १० अब्ज घनफुट पाणी दारणा व प्रवरा खोऱ्यात आणणे.

४) नार/ पार/ औरंगा खोऱ्यातून २० अब्ज घनफुट पाणी गिरणा खोऱ्यात वळविणे.

५) उर्ध्व तापी ते सातपुडा पायथा चोपडयापर्यंत १० अब्ज घनफुट पाणी वळविणे.

६) तापी खोऱ्यातील जिगांव पासून १५ अब्ज घनफुट पाणी अजिंठा परिसरात वळविणे.

७) वैनगंगा खोऱ्यातील ८० अब्ज घनफुट पाणी गोदावरी खोऱ्यात वळविणे.

८) वैनगंगा खोऱ्याचे पाणी मांजरा खोऱ्यात वळविणे.

९) सहयाद्री घाट माथ्यावरील पश्चिम वाहिनी स्थानिक नदी नाल्यातील १५ अब्ज घनफुट पाणी पूर्वेकडे भीमा कृष्णा खोऱ्यात वळविणे.

१०) कोयना खोऱ्यातील २५ अब्ज घनफुट पाणी विर धरण ते उजणी निरा खोऱ्यात वळविणे.

११) मुळशी आदी टाटा वीज प्रकल्पाचे २५ अब्ज घनफुट पाणी पूर्वेकडे भीमा खोऱ्यात वळविणे.

१२) सावित्री खोऱ्याचे ४० अब्ज घनफुट पाणी भाटघर व उजणी धरणात निरा भीमा खोऱ्यात वळविणे.

१३) कोल्हापूर जिल्हयातील नद्यांचे २५ अब्ज घनफुट पाणी बॅरेजस बांधून ताकारी, म्हैसाळ, टेंभू प्रकल्पाकडे वळविणे.

## ३४,००० कोटी रुपयांचा खर्च

**१०४.** या सर्व योजना दोन टप्प्यात पुढील २० वर्षात पूर्ण कराव्यात अशाप्रकारचा प्रस्ताव करण्यात आलेला असून पहिला टप्पा - २००३ ते २०१३ व दुसरा टप्पा - २०१३ ते २०२३ असा असावा असे प्रस्तावित केलेले आहे. एकुण ३७० अब्ज घनफुट या खोऱ्यातुन त्या खोऱ्यात पाणी वळविण्याचे प्रस्तावित आहे. त्यासाठी प्रवाही पध्दतीने पाणी देण्यासाठी काही हजार कि.मी. कालवे बांधावे लागतील व काहीशे मीटर उंचावर ठिकठिकाणी पाणी पंपाने पंपींग करुन उचलावे लागेल. या कामासाठी आजच्या किंमतीला एकुण अंदाजे ३४,००० कोटी रुपये खर्च येईल असा अंदाज करण्यात आलेला आहे. फार मोठया प्रमाणावर उपसा करण्यासाठी लागणारी वीज निर्माण करण्यासाठी २१ मेगावॅट जलविद्युत निर्मितीचे प्रकल्प उभे करण्यासाठी १३,६५० कोटी रुपयाचा खर्च अंदाजित केला असून परिवहनासाठी निर्माण करावे लागणारे साठे उभे करणे व उपसा परिवहन खर्च यासाठी २०,१४५ कोटी रुपयांचा खर्च यामध्ये गृहीत धरलेला आहे.

## विदर्भ व मराठवाडयासाठी शिफारस

**१०५.** आपल्या उपखोऱ्यातच उपलब्ध असलेल्या पाण्याचा वापर करण्याची बोंबाबोंब असल्यामूळे महाराष्ट्र पाणीपरिषदेने विदर्भ व मराठवाडयासाठी पुढीलप्रमाणे शिफारस केलेली आहे. :-

"विदर्भ आणि मराठवाडयामध्ये खरीप पिके एकूण लागवडी योग्य क्षेत्राच्या ६० ते ७० टक्के घेतली जातात. परंतु सिंचन प्रकल्पात त्यासाठी पुरेसे पाणी साठविण्याची तरतूद केलेली नाही, त्यामुळे खरीप पिकांना कॅरी-ओव्हर नसल्यामुळे पाणी मिळत नाही व बरेचशे पाणी पावसाळयात वाहून जाते. **याशिवाय हे दोन्ही विभाग राज्याच्या सिमेवर असल्यामूळे या संपूर्ण भागात सिमांत साठे (Terminal Storage) निर्माण करणे आवश्यक आहे. या सर्व बाबीं लक्षात घेऊन या भागात पाण्याच्या उपलब्धतेचा विचार करुन ज्यादा पाणी साठे निर्माण करण्याची आवश्यकता आहे.**"

## लाजेने मान खाली घालावी लागेल

**१०६.** अतिविपूल पाणी उपलब्धता असलेल्या उपखोऱ्यातील ३७० अब्ज घनफुट पाणी अतितुटीच्या खोऱ्यात वळविण्याचा प्रस्ताव केंव्हातरी योग्य वेळी कार्यान्वित होईल. **त्यावेळी पूर्णेचे उपखोरे महाराष्ट्रातील सहाव्या क्रमांकाचे अतितुटीचे उपखोरे असूनसुध्दा ३४००० कोटी रुपयांपैकी एक रुपयासुध्दा या उपखोऱ्याला मिळणार नाही. कारण याच पूर्णेच्या खोऱ्यातील पेढीच्या पाणलोट क्षेत्रातील २ टीएमसी तुमचे पाणी तुम्हाला बांधून काढता आले नाही. कशाला या खोऱ्यातील पाणी त्या खोऱ्यात नेण्याच्या बाता मारता? असे कुणी म्हटले तर आपल्याला लाजेने मान खाली घालावी लागेल.**

***निम्न पेढी प्रकल्पाच्या बाबतीत एक एकर सुध्दा वनजमीन बाधीत होत नाही व त्यामूळे अशा वनजमिनीच्या हस्तांतरणाच्या मान्यतेसाठी वर्षानुवर्षे खटपट करण्याच्या व्याधीने हा प्रकल्प बाधीत झाला नाही ही त्या प्रकल्पाची एक मोठी गुणवत्ता होय.***

*परिच्छेद १३० पहा*

# (६) धरणांचा पुरनियंत्रणासाठी उपयोग

### सन २००२ ची राष्ट्रीय जलनिती व पूरनियंत्रण

**१०७.** भुपृष्ठावर उपलब्ध असलेल्या जलसाठ्यांचे नियमन व संचालन करतांना पुरनियंत्रणाच्या मुद्याला महत्व द्यावे. जेथे शक्य आहे तेथे उत्तम पूर व्यवस्थापन करण्याकरीता धरणामधे पूर साठविण्यासाठी पूरेशी जागा असावी. अतिपूरग्रस्त भागाकरिता जलाशय नियंत्रणाला प्राधान्य द्यावे. एखादेवेळी हयामधे सिंचन व वीज प्रकल्पाचे फायदेही सोडण्याची तयारी असावी. असे जोरदार समर्थन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये पुरनियंत्रणाच्या बाबतीत पुढील प्रमाणे करण्यात आलेले आहे. :-

"Adequate flood-cushion should be provided in water storage projects, wherever feasible, to facilitate better flood management. In highly flood prone areas, flood control should be given overriding consideration in reservoir regulation policy even at the cost of sacrificing some irrigation or power benefits." (संदर्भ ७)

पेढी नदी ही आज बारमाही वाहणारी नदी राहिलेली नाही ही गोष्ट खरी असली तरी पावसाळ्यामध्ये या नदीला मोठ मोठे पुर येतात व फार मोठया प्रमाणात जिवीत व वित्त हानी होते. या **पुरनियंत्रणामध्ये सिंचन प्रकल्प किती महत्वाची कामगिरी बजावू शकतात या विषयीचे मार्गदर्शन सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये करण्यात आलेले आहे त्याचा सुध्दा आम्ही विचार करणार नसु तर ही अत्यंत दुर्देवाची गोष्ट होय.**

### धरणांचा पुरनियंत्रणासाठी उपयोग

**१०८.** धरणाचे जे वेगवेगळे उपयोग सांगण्यात आलेले आहेत, त्यामध्ये धरणाचा एक अतिशय महत्वाचा उपयोग म्हणजे पुरनियंत्रण हा होय. असे विश्वकोषामध्ये नमूद आहे. साऱ्या जगातील माहीती कणाकणाने गोळा करुन ती विश्वकोषामध्ये भरण्याचे काम कोषाच्या कर्त्यांनी केलेले आहे. आपला याबाबतीत प्रत्यक्ष अनुभव काय आहे? याची सुद्धा या निमित्ताने आठवण होणे किंवा त्याची उजळणी करणे आवश्यक आहे असे मला वाटते.

### पूरनियंत्रणामधील धरणांची भूमिका

**१०९.** १९९४ च्या अतिवृष्टिमुळे वर्धा नदी व तिच्या उपनद्यांच्या काठावरील अमरावती व नागपूर या दोनही जिल्ह्यातील मोवाड, वरूड, आमनेर, पोरगव्हाण, गणेशपूर, वंडली, वघाड, सावंगी, देऊतवाडा, वेढापूर, जलालखेडा, खैरगाव, थडीपवनी, मदना, अंबाडा, मिझांपूर, पेठ इस्लामपूर, लिंगा, चांदस, वाठोडा, मालखेड, सुरळी, उदापूर, घोराड, खानापूर, चिंचगव्हाण, गाडेगांव, हातुर्णा या गावातून झालेली मनुष्य हानी व प्रचंड प्रमाणावरील शेतीची हानी ही अप्पर वर्धा प्रकल्पाच्या भिंती पर्यंतच झाली. **वर्धेच्या पात्रामध्ये सिंभोरा गावाजवळ उभ्या असलेल्या ८० फुट उंचीच्या दगड व कॉंक्रीटच्या या भिंतीच्या नंतर असलेल्या वर्धेच्या काठावरील एकाही गावात अशा स्वरूपाची भीषण मनुष्य हानी व वित्त हानी झाली नाही याचे मर्म समजावून घेणे गरजेचे आहे.**

### उर्ध्व वर्धा धरणाच्या पूर नियंत्रणाच्या कामगिरीचा पहिला शास्त्रीय अहवाल

**११०.** उर्ध्व वर्धा धरणाच्या निर्मितीनंतर पूरनियंत्रणातील या धरणाच्या कामगिरीचा पहिला शास्त्रीय अभ्यास १९९४ च्या पावसाळ्यानंतर उपलब्ध झाला. "**पाटबंधारे विभाग : उर्ध्व वर्धा प्रकल्प : १९९४ मधील पर्जन्य काळात धरणातून करण्यात आलेले पूर नियमन (Flood moderation) सबंधी टिप्पणी**" असा या अहवालाचा मथळा असून अधिक्षक अभियंता उर्ध्व वर्धा प्रकल्प व कार्यकारी अभियंता उर्ध्व वर्धा धरण विभाग या उभय अधिकाऱ्यांनी हा अहवाल स्वाक्षरीत केलेला आहे. या अहवालाच्या अगदी सुरुवातीलाच असे नमूद करण्यात आलेले आहे की, :-

"विदर्भातील वर्धा नदीवर अमरावती जिल्ह्यात मोर्शी तालुक्यात सिंभोरा येथे हे धरण पूर्ण करण्यात आले आहे. १९९४ ह्या वर्षीच्या पावसाळ्यांत वर्धा नदीच्या खोऱ्यात अतिवृष्टी होऊन सर्व नद्यांना महापूर आला, त्यामुळे अपरिमित हानी झाली. ह्या महापुराच्या काळात उर्ध्व वर्धा धरणाने पुराच्या नियोजनाची कामगिरी बजावली. त्याबाबतचा अहवाल खालील परिच्छेदात नमूद करण्यांत आलेला आहे."

### सतत ३२ तास प्रतिसेकंद ८००० हजार घनमिटर या वेगाचा पूरप्रवाह धरणाने अडवून धरला

**१११.** १९९४ च्या जुलै महिन्याच्या ११ व १२ तारखेला वर्धा नदीच्या जलग्रहण क्षेत्रामध्ये अतिवृष्टी झाली. सतत ३२ तास ८ हजार घनमिटर प्रतिसेकंद या वेगाने धरणाच्या "शेपटी"त घुसत असलेला पाण्याचा लोंढा धरणात साचवून ठेवला जात असतांना सर्व वक्रद्वारे बंद ठेवल्याने "शून्य" प्रवाह (विसर्ग) धरणातून बाहेर पडत होता. याबाबतची शास्त्रीय माहिती या अहवालात पुढील शब्दांमध्ये देण्यात आलेली आहे. :-

"दिनांक ११ व १२ जुलै १९९४ च्या काळात वर्धा नदीच्या खोऱ्यात सर्वत्र अतिवृष्टी झाली. या दोन दिवसांच्या काळात (७३ मी.ली मीटर पर्यंत पर्जन्यवृष्टी झाली) ह्या अतिवृष्टीमुळे धरणातील पाण्याची पातळी झपाट्याने वर गेली व ३२८.५० ते ३३४.३० मीटर तलांका पर्यंत पाणी वाढले. हे सर्व पाणी धरणामध्ये साठवून ठेवण्यांत आले व **ह्या काळात ८००० घन मीटर प्रति सेकंद हा महत्तम पूर पूर्णपणे धरणामध्ये अडविण्यांत आला.** ह्यावेळी सर्व वक्रद्वारे बंद होती. मात्र धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात तसेच खालच्या बाजुस झालेल्या पावसाने वर्धा नदीस प्रचंड पूर आला होता. **ह्या अतिवृष्टीमुळे धरणात साठविलेले पाणी (८००० घन मीटर प्रती सेकंद) धरणात अडविले गेले नसते तर धरणाच्या खालच्या बाजूस जास्त प्रमाणांत प्रचंड तडाखा बसून मोठी हानी झाली असती.**"

### अतिवृष्टीचा जोर ओसरल्यावर हळुहळू पाणी सोडून देण्यात आले

**११२.** ११ व १२ जुलै १९९४ चा अतिवृष्टीचा भर ओसल्यानंतर जुन्या अनुभवावरून पुढे येणाऱ्या संकटासाठीची तयारी म्हणून सरासरी ५०० घनमिटर प्रतिसेकंद (नदीची वहनक्षमता १० हजार घनमिटर प्रतिसेकंद) या अत्यंत अल्पदराने हे पाणी हळूहळू सोडून देण्यात आले. याबाबतचा या अहवालातील मजकूर पुढील प्रमाणे :-

"वर्धा नदीच्या खोऱ्यातील आतापर्यंतच्या अनुभवावरून व पर्जन्य व पूर अभ्यासावरून असे निदर्शनास आले आहे की, वर्धा नदीस ऑगस्ट व सप्टेंबर महिन्यामध्येही मोठा पूर येत असतो. **ह्यावरून या वर्षी सुद्धा पूर आला तर त्यासाठी धरणामध्ये पाणी साठवणूक क्षमता निर्माण करण्यांत आली होती.** जुलै मध्ये आलेला पूर व संपूर्ण साठा सांडव्याच्या पातळीपर्यंत हळूहळू सरासरी ५०० घन मीटर प्रती सेकंद ह्या अल्प दराने खाली सोडण्यात आला. ह्या ठिकाणी हा उल्लेख करावयास पाहिजे की, **नदीच्या पात्राची वहन क्षमता सुमारे १०,००० घन मीटर प्रति सेकंद एवढी आहे.** धरणातील पाण्याची पातळी कमी केल्याने संभाव्य पूर विसर्ग सामावून घेण्यासाठी पूर साठा क्षमता निर्माण करण्यास बहुमोल उपयोग झाला."

### प्रतिसेकंद ११ ते १२ हजार घनमिटर पाणी धरणात येत असतांना विसर्ग मात्र २५०० घनमिटर प्रतिसेकंद

**११३.** "ऑगस्ट महिन्यांत झालेल्या पावसामुळे धरणातील पाण्याची पातळी परत वाढत गेली व ती दिनांक १.९.९४ रोजी ३३९.६० मीटर पर्यंत गेली. त्यामुळे धरणाच्या खाली सुमारे २२५ घन मीटर प्रति सेकंद ह्या दराने पाणी पातळी कमी करण्याची कार्यवाही करण्यांत आली होती. दिनांक ४ व ५ सप्टेंबर १९९४ ह्या काळात धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणात पाण्याची पातळी ३३८.५० पेक्षा जास्त वाढू लागली. ह्या काळात उर्ध्व वर्धा धरणाच्या संपूर्ण जलग्रहण क्षेत्रात सरासरी १२ तासात १७५ मी.मी. पाऊस पडल्याच्या नोंदी आहेत. ह्या अतिवृष्टीमुळे ५ तारखेच्या सायंकाळी हवामान खात्यातर्फे पुढील ४८ तासात अतिवृष्टी होईल असा इशारा देण्यांत आला होता. **धरणामधील पाण्याची पातळी ३३८.५० पेक्षा जास्त गेल्याने त्यासंबंधी महसूल पोलीस व संबंधीत खात्यांना याबाबत सूचना देण्यात आल्या होत्या. धरणातून सोडण्यात येणारा विसर्ग ५०० घन मीटर प्रति सेकंद एवढा करण्यांत आला, त्यामुळे दिनांक ५.९.९४ रोजी धरणातील पाण्याची पातळी ३३८.५५ मीटर ठेवण्यास मदत झाली.**" अशी माहिती या अहवालामध्ये देण्यात आली असून १९९४ च्या सप्टेबर महिन्यातील ५ व ६ तारखेला ११ हजार ते १२ हजार घनमिटर प्रतिसेकंद या वेगाने पूर धरणात येत असतांना विसर्ग मात्र सुरुवातीला

**ठिबक सिंचनावर फलोत्पादनाचा प्रकल्प यशस्वी झाला असून तो मोठ्या प्रमाणावर राबविण्याच्या दृष्टिने पाऊले टाकावी लागतील.**

परिच्छेद ७८ पहा

२५०० व नंतर ४२०० घनमिटर प्रतिसेकंद अशा मर्यादेवर काही वेळ ठेवण्यात आला याची माहिती याच अहवालात पुढील शब्दात देण्यात आली आहे. :-

"धरणाच्या जलग्रहण क्षेत्रात पावसामुळे ५ व ६ तारखेला झालेल्या अतिवृष्टीमुळे धरणातील येवा ७५० दशलक्ष घन मीटर इतका झाला ह्या पुराची तीव्रता सुमारे ११५०० घन मीटर प्रति सेकंद इतकी होती. धरणात पाण्याची पातळी अतिवृष्टीमुळे वाढत असल्याने **धरणाच्या सुरक्षिततेच्या दृष्टीने दिनांक ५.९.९४ ला १५.०० वाजता धरणातील विसर्ग ५०० वरून २५०० घन मीटर प्रति सेकंद एवढा करण्यांत आला व त्या संबंधी संबंधित खात्यांना पूर्व सूचना देण्यांत आल्या होत्या. नंतर त्याच दिवशी सायंकाळी १८.०० वाजता हा विसर्ग २५०० वरून ४२०० घन मीटर प्रति सेकंद एवढा करावा लागला.** कारण धरणात येणाऱ्या पुरामुळे येवा ११००० ते १२००० घन मीटर प्रति सेकंद एवढा होता. परिणामी पाण्याची पातळी सातत्याने वाढतच होती."

## निसर्गावर मात करण्याच्या मर्यादा

**११४.** निसर्गावर मात करण्याच्या मानवाच्या मर्यादा लक्षात आल्या म्हणजे आपण हतबल होतो हे तर खरेच पण त्याही स्थितीमध्ये रात्रीच्या गर्भात जो पूर किनाऱ्यावरील गावात १२ हजार घनमिटर प्रतिसेकंद या वेगाने घुसला असता त्या पुराला "**आज रात्रभर धरणातच मुक्काम करावा लागेल. उद्या सकाळी जा व थोडा वेग कमी करून जा**" असे सांगण्याची व "पाहुणा येत आहे" अशी खाली खबर देण्याची क्षमता या धरणामुळे आपल्यात आलेली आहे ही गोष्ट स्पष्ट करणारा या अहवालातील पुढील मजकूर पहा :-

"धरणात येणारा पूर लक्षात घेता ५.९.९४ रोजी संध्याकाळीच पूर विसर्ग ४२०० घन मीटर प्रती सेकंद पेक्षा जास्त वाढवावयास पाहिजे होता. पण याच वेळेस अतिवृष्टीमुळे धरणाच्या खालील बाजूस असणाऱ्या सर्व नद्या व नाले दुथडी वाहत होते. त्यामुळे वर्धा नदीच्या पुरात प्रचंड वाढ झाली. **हा पूर लक्षात घेता व खालच्या बाजूस असणाऱ्या सर्व संबंधित यंत्रणेची विनंती लक्षात घेता धरणातून विसर्ग या पुढे रात्री न वाढविता दिनांक ६.९.९४ च्या सकाळी पर्यंत वाट पाहण्याचे ठरविले, कारण नदीकाठच्या पूर बाधीतांना रात्री हलविणे व सुरक्षित जागी जाणे कठीण ठरले असते.** ..... धरणातून पाण्याचा विसर्ग येव्या पेक्षा कमी असल्यामुळे पाण्याची पातळी ३४०.७५ मीटर पर्यंत दिनांक ६.९.९४ ला पहाटे ४.०० वाजेपर्यंत पोहोचली. त्याच वेळेस हवामान खात्यातर्फे देण्यात आलेला पुढील ४८ तासासाठी अतिवृष्टीचाही इशारा लक्षात घेता धरणातील विसर्ग ६.९.९४ रोजी सकाळी टप्या टप्प्याने वाढवून ७५०० घन मीटर प्रती सेकंद इतका करण्यांत आला त्यासाठी नेहमीप्रमाणे सर्व संबंधित यंत्रणेस आगावू सूचित करण्यांत आले. **यावेळी धरणात येणारा येवा ११,००० ते १२,००० घन मीटर प्रती सेकंद इतका होता.**"

## पूरनियमन क्षमतेचे गणिती पद्धतीने मोजमाप

**११५.** प्रतिसेकंद धरणाच्या शेपटीमध्ये घुसणाऱ्या पुराच्या लोंढ्याची तीव्रता व दर सेकंदाला धरणातून सोडलेल्या पाण्याचे मोजमाप (विसर्ग) या दोन्हीचा शक्य त्या मर्यादेपर्यंत मेळ घालून पुराचे करण्यात आलेले नियमन याची गणिती पद्धतीने मांडणी शेवटी या अहवालामध्ये करण्यात आलेली आहे ती पुढील शब्दात :-

"वर विवेचन केल्याप्रमाणे येणाऱ्या पुराची तीव्रता व सोडलेल्या विसर्गाची व्याप्ती व पुराचे केलेले नियमन याची टक्केवारी दर्शविणारा तक्ता खाली दिला आहे.

| अ.नं. | दिनांक | वेळ | घनमिटर प्रतिसेकंद येणारा पूर | घनमिटर प्रतिसेकंद सोडलेला विसर्ग | नियमनाची टक्केवारी |
|---|---|---|---|---|---|
| १. | ११/ १२ जुलै | एकूण ३२ तास | ८,००० | ० | १०० टक्के |
| २. | ५.९.९४ | १५.०० वाजता | ७,००० | २,५०० | ६५ टक्के |
| | | २४.०० वाजता | ११,५०० | ४,२०० | ५२ टक्के |
| ३. | ६.९.९४ | ४.०० वाजता | ११,५०० | ७,५०० | ३३ टक्के |

वरील दोन्ही पुरांच्या वेळेस धरणात येणाऱ्या येव्यापेक्षा विसर्ग कमी ठेवून व प्रसंगी नियोजित पातळीपेक्षा जास्त साठा तात्पुरता करून धरणात पूर थोपविण्यांत आला व त्यामुळे पूरनियंत्रणाचे काम अतिशय परिणामकारकरित्या करण्यांत आले. अन्यथा सध्या झालेल्या पुराच्या उपसर्गापेक्षा प्रचंड उपसर्ग झाला असता व हानी मोठ्या प्रमाणावर झाली असती."

## अकोला शहरात महापुराने हाहाःकार

**११६. "महापुराने अकोला परिसरात हाहाःकार"** "कोट्यावधीची हानी : हजारो नागरिक बेघर" "५ हजार घरांची पडझड : २ हजार घरे उध्वस्त" "खोलेश्वर भागात नुकसान : रमाबाई आंबेडकर नगरात हाहाःकार" **"मोर्णा कोपली : पुरामुळे संपूर्ण अकोला शहरात हाहाःकार" "१० जण वाहून गेले : हजारो बेघर, कोट्यावधीची मालमत्ता पाण्यात"** "मोर्णेला अकस्मात महापूर, नदीकाठच्या गावांना जबर तडाखा" "शेकडो बेपत्ता : करोडो रुपयाचे नुकसान, हजारो बेघर : अनेकांना जलसमाधी" अशा प्रकारच्या किंवा यासारख्या मथळ्यांनी दिनांक १ सप्टेंबर १९९४ रोजीच्या सर्व वृत्तपत्रामध्ये अनेकस्तंभी / सर्वस्तंभी जागा व्यापली होती. रकानेच्या रकाने भरून अकोला शहरावर आलेल्या या दुर्दैवी संकटाचे वृत्त सर्व वृत्तपत्रांनी आपआपल्या वाचकांना सादर केले होते.

## हेच "शास्त्र" अकोल्याला कां लागू होणार नाही?

**११७.** अप्पर वर्धा धरणाच्या प्रथम पूरनियंत्रण अहवालाच्या वाचनानंतर अनेक प्रश्न मनासमोर 'आ' वासून उभे रहात होते. अप्पर वर्धा धरणाच्या ४३०२ चौरस किलोमीटरच्या पाणलोट क्षेत्रातील ७८६ द.ल.घ.मी.चा येवा जर त्या धरणामध्ये साठवून ठेवता येतो तर ६५३ चौरस किलोमीटरचे पाणलोट क्षेत्र असलेल्या **मोर्णा नदीचा ८५ द.ल.घ.मी येवा** (यातील ४१ द.ल.घ.मी. साठविण्यासाठी मोर्णा धरण अगोदरच तयार झालेले होते) **आपल्याला का साठवून ठेवता येवू नये?** जलसिंचन या विकास क्षेत्रामध्ये १९८२ च्या स्तरावर दांडेकर समितीने अकोला जिल्ह्याचा रुपयातील अनुशेष ९२ कोटी रुपये निश्चित केलेला होता. तो कमी न होता सतत वाढत जावून १९९० मध्ये ३६० कोटी रुपयाचा, १९९२ मध्ये ५९६ कोटी रुपयाचा व १९९४ मध्ये ९०५ कोटी रुपयाचा झाला असतांना **२२ जिवांचा जीव घेणाऱ्या या पुराला नियंत्रणांत आणण्यासाठी ४०-५० कोटी रुपये या लहान लहान प्रकल्पावर खर्च करण्यास शासनाने का टाळाटाळ करावी?** १९७८ च्या पुरानंतर तयार करण्यात आलेली योजना त्यावेळी का म्हणून कार्यान्वित करण्यात आलेली नसेल? असे प्रश्न स्वाभाविकपणे विधान मंडळ सदस्य या नात्याने आमच्या समोर उभे होते.

## अकोला शहराच्या वरच्या बाजूला चार पाटबंधारे प्रकल्प

**११८.** अकोला शहरातून वाहणाऱ्या मोर्णा नदीस दिनांक ३१ ऑगस्ट १९९४ रोजी जो महापूर आला तो नोंदबद्ध इतिहासात सर्वात मोठा पूर होता. फार मोठ्या प्रमाणावर जिवित व वित्त हानी झाली. यापूर्वीही या नदीला सन १९५९, १९७८ व १९८३ या वर्षी मोठे पूर आलेले होते. अकोला शहराचा अशा संकटापासून बचाव व्हावा यासाठी अकोला पूरनियंत्रण योजना तयार करण्यात आली. जवळ जवळ ४०-४१ कोटी रुपयाच्या या योजनेचे शासनाने ६ तुकडे केलेत. या प्रत्येक तुकड्याला प्रशासकीय मान्यता व निधी मिळविण्यासाठी विधानपरिषद सभागृहामध्ये जबरदस्त संघर्ष झाला. त्यानंतर या सहाही प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता मिळाली. अकोला पूरनियंत्रण योजनेचा भाग असलेल्या या सहा प्रकल्पांमध्ये चार प्रकल्प हे लघु पाटबंधारे प्रकल्प आहेत. त्या चार प्रकल्पांची नावे, प्रशासकीय मान्यतेचा दिनांक व किम्मत पुढील प्रमाणे :- (१) ७ ऑक्टोबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ७१.१६ लक्ष रुपये किमतीची "सुकांडा २ (ता.मालेगांव) लघुपाटबंधारे योजना" (२) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ७२.५३ लक्ष रुपये किमतीची "ब्राम्हणवाडा संग्राहक लघुपाटबंधारे तलाव योजना" (३) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त ४८४.८८ लक्ष रुपये किमतीची "उर्ध्व मोरणा (मेडशी) संग्राहक लघु पाटबंधारे प्रकल्प योजना" (४) १८ नोव्हेंबर १९९५ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता प्राप्त १८९७.३३ लक्ष रुपये किमतीची "दगडपारवा लघुपाटबंधारे प्रकल्प योजना"

## अकोला शहराला असलेला पुराचा धोका फार मोठ्या प्रमाणात कमी झाला.

**११९.** विदर्भातील अकोला हे जिल्ह्याचे ठिकाण मोर्णा नदीच्या काठावर असून गेले अनेक वर्ष त्या शहराला दरवर्षी पुराचा त्रास सहन करावा लागतो. विशेषतः १९७८, १९८१, १९९४ या ३ वर्षामध्ये पुर फार मोठ्या प्रमाणात आला व त्यामुळे मोठ्या प्रमाणात जीवीत व वित्त हानी झाली. १९९४ नंतरच्या अनुभवातून थोडासा धडा घेवून मोर्णा नदीच्या वरच्या भागात ४ लहान लहान प्रकल्प बांधलेत व त्यामुळे अकोला शहराला असलेला पुराचा धोका फार मोठ्या प्रमाणात कमी झाला. हे चारही प्रकल्प आता पूर्ण झाले असून सन २००७ च्या

***सदर प्रकल्पांतर्गत क्षाराचे प्रमाण कमी करण्यासाठी विद्युतपंपाद्वारे एकसारखा उपसा करणे तसेच पाण्याचे पृथःकरण वेळोवेळी करणे अत्यंत आवश्यक आहे. कूपनलिकेतून सातत्याने उपसा केल्याने खारे पाण्याच्या रासायनिक गुणवत्तेत सुधारणा होऊन पाणी पिण्यायोग्य होते.***

*परिच्छेद ६१ पहा*

पावसाळ्यामध्ये झालेल्या अतिवृष्टीमुळे विदर्भातील अनेक शहरांना व खेड्यांना महापुराचा तडाखा बसला असतांना यावर्षीच्या या तडाख्यात **अकोला शहराला मात्र अशा महापुराच्या आपत्तीला तोंड द्यावे लागले नाही.** हे अकोला शहरातील हजारो नागरीक एकमुखाने सांगतील. अर्थात या गोष्टीचे मुख्य श्रेय वर बांधण्यात आलेल्या ४ लहान लहान प्रकल्पांना असून त्यांनी बजावलेल्या या कामगीरीचा काही अहवाल पाटबंधारे विभागाच्या अधिकाऱ्यांनी तयार केला आहे किंवा नाही याची मला माहीती नाही, पण त्या शहरातील हजारो लोक या निष्कर्षाशी सहमत होतील.

### पावसाळ्यात पूरापासून बचाव व उन्हाळ्यात पेयजलाचा सुकाळ

**१२०.** अकोला शहराच्या कायमस्वरुपी पाणी पुरवठा योजनेचा उद्भव काटेपूर्णा धरणामध्ये योजिलेला आहे. सन २००४ च्या पावसाळ्यामध्ये या नदीच्या पाणलोट क्षेत्रामध्ये फारच कमी पाऊस झाल्यामुळे सन २००५ च्या उन्हाळ्यामध्ये अकोला शहराला अभूतपूर्व अशा पेयजल संकटाला तोंड द्यावे लागले. दगडपारवा धरणाचे प्रकल्पबाधीत लोक प्रकल्पाच्या बांधकामासाठी गेलेल्या अभियंत्यावर व कामगारावर दगडफेक करीत असत. सन २००५ नंतर त्यांनी अशी दगडफेक केली नाही व ते धरण पूर्ण झाले. दुर्दैवाने पुढे केंव्हातरी काटेपूर्णाच्या पाणलोट क्षेत्रात वृष्टी झाली नाही तर **अकोला शहरापर्यंत उताराने पाणी येवू शकेल असे चार प्रकल्प आता मोर्णेच्या वरच्या भागात तयार झालेले आहेत. "राजे हो! प्रकल्पाला विरोध करु नका. पावसाळ्यात पूरापासून बचाव होतो व उन्हाळ्यात उत्तम पेयजल उपलब्ध होते" हे अकोल्यातील काही लोकांनी पेढीच्या पाणलोट क्षेत्रात रहाणाऱ्या व न रहाणाऱ्या संघर्ष समितीच्या नेत्यांना समजावून सांगितले पाहिजे.**

# (७)

# सभागृहातील पाठपुरावा

**१२१.** मा.श्री.जवाहरलालजी दर्डा हे महाराष्ट्राचे उद्योगमंत्री असतांना विदर्भाचा औद्योगिक क्षेत्रातील फार मोठा मागसलेपणा लक्षात घेऊन नागपूर येथे बुटीबोरी व अमरावती जवळ नांदगांव पेठ या दोन ठिकाणी पंचतारांकीत औद्योगीक वसाहती निर्माण करण्याचा निर्णय त्यावेळी शासनाने घेतला. नांदगाव पेठच्या या औद्योगीक वसाहतीवर जवळ जवळ ३०० ते ४०० कोटी रुपयाचा खर्च करण्याचा निर्णय हा त्यावेळी घेण्यात आला होता :-

### मा. उद्योगमंत्री श्री. जवाहरलालजी दर्डा

**१२२.** नागपूर येथे विधानभवनाच्या पहिल्या माळ्यावरील एका मोठ्या खोलीमध्ये विधानपरिषदेची बैठक भरत असे पण डिसेंबर १९९३ च्या अधिवेशनात तळमजल्यावरील विधानसभेच्या जुन्या सभागृहाचे नूतनीकरण करून तेथे विधानपरिषदेच्या बैठकी सुरू झाल्या होत्या. शुक्रवार, दिनांक १७ डिसेंबर १९९३ रोजी विधानपरिषदेची बैठक ११ वाजता सुरू होणार. बैठक सुरू होण्याच्या अर्धातास अगोदर दिवसाच्या कामकाजाच्या कागदपत्रांचा अभ्यास करीत सभागृहात आम्ही काही सभासद बसलो असता, घाईघाईने उद्योगमंत्री श्री. जवाहरलालजी दर्डा हे सभागृहात स्थानापन्न झालेत. आल्याआल्याच उद्योग मंत्र्यांनी माझ्याकडे पाहून खुणेने माझ्याशी काही बोलायचे आहे असे मला सांगितले. सभागृह सुरू व्हायला ५ ते १० मिनिटे वेळ होता. मी उठून माझ्या स्थानावरून त्यांचेजवळ गेलो. मा. उद्योग मंत्री मला म्हणाले. "बी.टी. 'अमरावती येथे केमिकल झोनची निर्मिती' हा तुमचा प्रश्न १९ व्या क्रमांकावर आहे तो आज नॉर्मल कोर्समध्ये चर्चेला येणार नाही. विदर्भातील हा अतिशय महत्त्वाचा प्रश्न आहे. अधिवेशन विदर्भात आहे. तुम्ही मा. सभापतींना 'प्रायॉरिटी' मागा. हा प्रश्न चर्चेला घेतला तर मला त्याबाबत काही महत्त्वाची माहिती द्यावयाची आहे" मी त्यांना म्हणालो "बाबुजी! आमच्या भागामध्ये या रासायनिक संकुलाबाबत लोकांच्या मनामध्ये तीव्र नाराजी आहे"

"बी.टी. ! समजून घ्या, ही विदर्भातील सर्वात मोठी औद्योगिक वसाहत आहे. ती पळवायला अनेक लोक तयार आहेत. ती प्रथम पदरात पाडून घ्या. त्यात रासायनिक संकुलाचा जो लहानसा भाग आहे, त्याविषयीचे तुमचे विचार तुम्हाला पुढे केंव्हाही मांडता येतील". असे मा. उद्योग मंत्र्यांनी मला सांगितले.

### प्रश्नोत्तराचा तास संपण्यापूर्वी ५ मिनिटे अगोदर हा प्रश्न

**१२३.** सभागृह सुरू होण्यापूर्वी आमचे हे अनौपचारिक बोलणे सुरू असतांनाच सभागृह सुरू होण्याची ५ मिनिटाची बेल वाजायला सुरुवात झाली. मी घाईने माझ्या जागेवर परत स्थानापन्न झालो. बरोबर ११ वाजता सभागृहाची बैठक सुरू झाली. बैठक सुरू झाल्याबरोबर मी पुढील प्रमाणे मागणी केली :-

"अध्यक्ष महाराज, सध्या विदर्भामध्ये अधिवेशन सुरू आहे. आजच्या प्रश्नोत्तराच्या यादीतील तारांकित प्रश्न क्रमांक ३१०५७ हा १९ व्या क्रमांकावर आहे. तो प्रश्न विदर्भाच्या दृष्टीने अत्यंत महत्त्वाचा असल्यामुळे आजचा प्रश्नोत्तराचा तास संपण्यापूर्वी १० मिनिटे अगोदर हा प्रश्न घेण्यात यावा अशी माझी आपल्याला विनंती आहे." मा. सभापतीनी "मंत्रिमहोदयांची तयारी आहे काय?" असे विचारले. त्यावर मा. श्री. जवाहरलालजी दर्डा यांनी "अध्यक्ष महाराज, माझी काही हरकत नाही." असे सांगितले. "ठीक आहे. तारांकित प्रश्न क्रमांक ३१०५७ प्रश्नोत्तराचा तास संपण्यापूर्वी पाच मिनिटे अगोदर घेण्यात येईल." असा निर्णय मा. सभापतींनी दिला.

### नांदगावपेठ येथे मोठे औद्योगिक क्षेत्र

**१२४.** मा. सभापतींनी मान्य केल्याप्रमाणे हा प्रश्न शेवटच्या पाच मिनिटात सभागृहामध्ये चर्चेसाठी आला. पहिल्याच उपप्रश्नाला मा. उद्योग मंत्र्यांनी पुढील प्रमाणे उत्तर दिले होते. " अमरावती जिल्ह्यात नांदगावपेठ येथे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळामार्फत मोठे औद्योगिक क्षेत्र स्थापन करण्यात येणार आहे. त्यात काही भाग रासायनिक उद्योग क्षेत्रासाठी राखून ठेवण्यात येणार आहे. यासंबंधीचा प्रस्ताव महामंडळाकडून प्राप्त झाला असून तो विचाराधीन आहे."

अनुपुरक चर्चेमध्ये मा. उद्योगमंत्र्यांनी अनेक आश्वासने दिली त्यातील प्रमुख आश्वासने पुढील प्रमाणे :-

(१) "अध्यक्ष महाराज, दिनांक १६ सप्टेंबर १९९३ ला प्रस्ताव सादर करण्यात आला आहे. फायनान्स विभागाकडून यासंबंधात दोन तीन दिवसापूर्वी संमती मिळालेली आहे आणि आता साधारणतः १०-१५ दिवसांमध्ये याचे फायनल नोटीफीकेशन होईल."

(२) "अध्यक्ष महाराज, याबाबतीत एकूण २८०७ हेक्टर जमीन प्राप्त करण्यासंबंधीचा प्रस्ताव आहे."

(३) "अध्यक्ष महाराज, मी मघाशी सांगितले की, साधारणतः दहा-पंधरा दिवसांमध्ये फायनल नोटीफीकेशन होईल आणि त्यानंतर तावडतोब कायदेशीर कारवाई करण्याचे काम सुरू होईल."

(४) "अध्यक्ष महाराज, आता या ठिकाणी बुटीबोरीपेक्षा प्रचंड औद्योगिक वसाहत होत आहे. बुटीबोरी येथे २४०० हेक्टर जमीन प्राप्त केलेली आहे आणि येथे त्याच्यापेक्षाही जास्त जमीन आपण प्राप्त करून घेणार आहोत आणि या विकासाच्या कामाला जास्तीत जास्त गती देऊन त्या ठिकाणी इन्फ्रास्ट्रक्चर उभे करण्याचे काम करणार आहोत."

(५) "अध्यक्ष महाराज, या कामासाठी महामंडळातर्फे पैसा बिलकुल कमी पडणार नाही. तीन वर्षासाठी एम. आय. डी. सी ने ४०० कोटी रुपयांचा प्लॅन तयार केलेला आहे."

### उद्योग मंत्री विदर्भातील असल्यामुळे एवढा मोठा प्रकल्प

**१२५.** सभागृहामध्ये झालेली चर्चा काळजीपूर्वक वाचली तर असे लक्षात येते की उद्योग मंत्री विदर्भातील असल्यामुळे एवढी मोठी औद्योगिक वसाहत विदर्भाच्या या अविकसित भागामध्ये व्हावी या जिव्हाळ्याच्या पोटी त्यांनी हा प्रस्ताव मंत्रिमंडळाकडून मान्य करवून घेतला होता.

### औद्योगिक वसाहत हातून जाता कामा नये

**१२६.** दिनांक १७ डिसेंबर १९९३ च्या या चर्चेनंतर "**औद्योगिक वसाहत हातून जाता कामा नये व ती जाणार नाही अशी स्थिती निर्माण झाल्यावरच रासायनिक संकुलाबाबतची भूमिका मांडावी** " असे आमचे ठाम मत झाले व त्याप्रमाणे पुढच्या जवळजवळ प्रत्येक अधिवेशनातून आम्ही या प्रश्नाचा पाठपुरावा केला. अगदी सुरुवातीच्या काळात रासायनिक संकूल हे किती राहिल हे जसे स्पष्ट नव्हते तसे या धरणाचे स्वरुप निश्चित काय राहील ही बाब सुद्धा सुरुवातीला स्पष्ट नव्हती. सभागृहात पुढच्या पुढच्या काळात जसजशी या विषयावर प्रश्नोत्तरे होत गेली तसतशी ती बाब स्पष्ट होत गेली. या धरणाच्या सर्वेक्षणाचा व बांधकामाचा संपूर्ण खर्च महाराष्ट्र औद्योगीक विकास महामंडळ करणार अशाप्रकारची ही एकंदर योजना होती. त्यामूळे एका बाजुला नांदगाव पेठ येथील औद्योगीक वसाहतीच्या मुलभूत सोयी सुविधांवर खर्च होणारा निधी

***उत्तम गोड पेयजलाचा पुरवठा भुपृष्ठावरील जलाशयातून खारपाणपट्ट्याच्या सर्व गावांना व्हावा, मात्र ही जलाशये खारपाणपट्ट्यात असु नयेत असा आग्रह मान्य होण्यासारखा नाही. उत्तम गोड पाण्याच्या जलाशयाचे बांधकाम करण्यासाठी खारपाणपट्टयामध्ये प्रकल्प स्थळ उपलब्ध होत नाही असे असतांना एखादे प्रकल्प स्थळ सफल ठरल्यानंतर ते जलाशय आम्ही होवू देणार नाही. सालाबादाप्रमाणे आमचे ते पाणी अरबी समुद्राला जावून मिळू द्या, मात्र आम्हाला पिण्यासाठी गोड पाणी बाहेरुन कुठूनतरी आणून द्या. हा आग्रहसुद्धा मान्य होण्यासारखा नाही. ज्यांना आपल्याला उपलब्ध झालेल्या/होणाऱ्या पेयजलांची किम्मत कळत नाही, त्यांचे कौतुक करीत बसण्याचा कालखंड सुद्धा केंव्हाच निघून गेलेला आहे.***

*परिच्छेद १३९ पहा*

परत तर जाता कामा नये याची काळजी घेत असतांनाच रासायनिक संकुलाचा भाग त्या वसाहतीतून वगळण्यात आला पाहिजे यासाठी सुध्दा प्रयत्न करणे असे दुहेरी आवाहन लोक व लोकप्रतिनिधींच्या समोर त्या औद्योगीक वसाहतीच्या बाबतीत होते.

### संपूर्ण धरण रासायनिक संकुलासाठी

**१२७.** तिच गोष्ट होऊ घातलेल्या निम्न पेढी प्रकल्पाबावत सुध्दा होती. एका बाजुला शासनाच्या कोणत्याही विभागाकडून का होईना सर्वेक्षण अथवा बांधकामासाठी निधी मिळत असेल तर मिळू शकणारा निधी परत जाता कामा नये. मात्र ते धरण रासायनिक संकुलाच्या दाढेतून काढण्यासाठी सर्व शक्तीनुसार प्रयत्न करणे हे त्यावेळचे लोक आणि लोकप्रतिनिधींच्या समोर एक महत्वपूर्ण आवाहन या धरणाच्या बाबतीतसुद्धा होते. त्यातही पिण्यासाठी किंवा सिंचनासाठी एक लिटर सुध्दा पाणी मिळणार नसून सर्व पाणी रासायनिक संकुलासाठीच ठेवले जाणार आहे ही गोष्ट पुढे जेंव्हा स्पष्ट झाली व रासायनिक संकुलाचा आकारसुद्धा पुढे पुढे वाढत गेला तेव्हा हे आवाहन आणखीनच तीव्र झाले. साधारणपणे प्रकल्पबाधीत व्यक्तींचा धरणाला विरोध असणे ही गोष्ट महाराष्ट्रामध्ये प्रत्येक धरणाच्या बांधकामाच्या सुरुवातीच्या काळात कमी जास्त प्रमाणात आढळून येते, तसा तो या प्रकल्पाच्या बाबतीतसुद्धा होता.

### पिण्यासाठी व सिंचनासाठी पाणी नाही

**१२८.** खाऱ्या पाण्याचा उपसा व गोड पाण्याचे पुनर्भरण हा खारपाणपट्टयासाठी अमृततुल्य असलेला मंत्र अंमलात आणण्यासाठी या प्रकल्पातून एक थेंबभर पाणी सुध्दा मिळणार नाही, यामुळे या क्षेत्रात काम करणाऱ्या शास्त्रज्ञांच्या मनामध्ये सुध्दा तीव्र नाराजीची भावना उमटली होती. इतर ठिकाणी धरणाचा जो काही उपयोग असतो त्यापेक्षा जास्तीचा अगदी वेगळा असा उपयोग या धरणापासून अपेक्षित होता. जुनाट व लागट अशी खारपाणपट्टयाची विकृति दूर करण्यासाठी भूगर्भात गोड पाण्याचे पूनर्भरण व्हावे म्हणून एक लिटरसुद्धा पाणी मिळणार नाही व त्याऐवजी रासायनिक संकुलातुन येणारे पाणी भूगर्भातील पाण्यात गेल्याने वर्षानुवर्षाची भूगर्भातील खाऱ्या पाण्याची चव कोणत्या चवीकडे वळेल याच्या नुसत्या विचाराने सुद्धा चक्रावून जाण्याची स्थिती समोर होती. अशा या स्थितीत लोकप्रतिनिधी या नात्याने निश्चितपणे काही भुमिका घेतली पाहीजे अशी भावना आमच्या मनामध्ये निर्माण झाली. अनेकदा अशा बाबतीत भूमिका न घेता लोकप्रतिनिधींनी स्तब्ध रहाणे परवडणारे नसते. पूर्ण विचाराअंती धरणाच्या सर्वेक्षणावर, बांधकामावर मिळत असलेला, मिळू शकणारा निधी तर वाया जावू देता कामा नये, पण रासायनिक संकुलाच्या दाढेतून हे धरण संपूर्णपणे बाहेर काढता आले तर त्यासाठी संपूर्ण शक्तीनिशी प्रयत्न करावा. अशी भुमिका आम्ही निश्चित केली व त्या भूमिकेचा सभागृहात व सभागृहाबाहेर तडाखेबंद पाठपुरावा केला.

### सभागृहात झालेल्या चर्चा

**१२९.** त्यावेळीच्या संघर्ष समितीच्या पदाधिका-यांशी चर्चा करुन त्या काळामध्ये जानेवारी १९९९ रोजी कुंड येथे झालेल्या जाहीर सत्कार सभेमध्ये मी ही भूमिका मांडली. पुढे सभागृहातील तडाखेबंद पाठपुराव्यात रासायनिक संकुल पूर्णपणे वगळण्यात आले. ही फक्त आम्हा लोकप्रतिनिधींचीच 'बहादुरी' होती अशातला भाग नाही तर त्यासाठी अनेक घटक कारणीभूत होते. बदललेले मंत्री, बदललेले शासन, त्यांची बदललेली धोरणे हा सुद्धा या बदलासाठी कारणीभूत ठरलेला एक महत्वपूर्ण घटक होता. पुढे उद्योग खात्याने आम्हाला हे धरण नको अशाप्रकारची भूमीका घेतली. औद्योगीक विकास महामंडळाचे लक्षावधी रुपये खर्च होऊन या प्रकल्पाचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. औद्योगीक विकास महामंडळाने आम्हाला हे धरण नको अशी भूमिका घेतल्यामूळे हे सर्व पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी उपलब्ध होणार ही अतिशय आनंदाची गोष्ट होती व आम्ही त्याचा सभागृहामध्ये तडाखेबंद पाठपुरावा सुरु केला. २३ जुलै १९९७ ते २ ऑगस्ट २००७ ह्या १०-११ वर्षाच्या काळात हा प्रश्न सभागृहामध्ये निरनिराळ्या २३ वेळेला चर्चेसाठी वा उत्तरासाठी आला. त्या चर्चेची प्रतिवेदने **सहपत्र : तीन** म्हणून सोबत दिलेली आहेत.

### वनजमीन

**१३०.** कोणत्याही पाटबंधारे प्रकल्पाच्या बाधीत क्षेत्रामध्ये येणा-या वनजमिनीच्या हस्तांतरणाला केंद्र शासनाच्या वन व पर्यावरण विभागाची मान्यता मिळविणे ही फार कठीण गोष्ट होवून बसलेली आहे. त्या प्रकल्पाचा सभागृहात पाठपुरावा करणाऱ्या सभासदाला तर ती एक मोठीच डोकेदुखी वाटते. सभागृहामध्ये प्रश्न काढला की केंद्रावर जबाबदारी ढकलून राज्यशासन मोकळे होते. प्रकल्प रेंगाळत राहतो. अप्पर वर्धा प्रकल्पाला केंद्राच्या वन विभागाची मान्यता मिळण्याचा प्रकार तर ऐतिहासिक कौतुकाचा विषय म्हणून सांगता येईल.

अप्परवर्धा प्रकल्पाचे संपूर्ण लाभक्षेत्र एका जिल्ह्यात नाही. ते वर्धा व अमरावती या दोन जिल्ह्यात आहे. मात्र **१०० टक्के लाभक्षेत्र लोकसभेच्या एका मतदार संघात व शंभर टक्के जलसाठा लोकसभेच्या दुसऱ्या मतदारसंघात व या दोनही मतदार संघाचे लोकसभेत निवडून गेलेले प्रतिनिधी केंद्र शासनांत सतत १० वर्षे एकाच वेळी कॅबिनेटमंत्री होते. (त्यातीत एक तर पुढे भारताचे पंतप्रधानसुद्धा झालेत.) असे असले तरी त्या १९८० ते १९९० या काळांत बुडीत क्षेत्रातील वनजमिनीच्या निर्वनीकरणासाठी केंद्र शासनाची परवानगी मात्र या प्रकल्पाला मिळाली नाही.** अमरावती शहराच्या पाणी पुरवठा योजनेचे काम पूर्ण होत आलेले, धरणाची भिंत बांधल्या गेलेली, पाणी साठविले जाणार, वनजमिन बुडीत क्षेत्रात जाणार, तेव्हा निदान पर्यायी वनीकरणासाठीचे ९ कोटी रुपये तरी ताब्यात घ्यावे या हेतूने पुढे खुप उशिरा केंद्राने निर्वनिकरणास परवानगी दिली व पाटबंधारे खात्याकडून एकरकमी ९ कोटी रुपये वनविभागाकडे जमा करून घेतले. पूर्णा प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता मिळाल्यानंतर सभागृहामध्ये खूप पाठपूरावा करुनसुद्धा केंद्राच्या वनविभागाची मान्यता मिळण्यास १०-१५ वर्षाचा काळ लागला होता. विदर्भातील कितीतरी प्रकल्प वन जमिनीच्या हस्तांतरणासाठी केंद्राची मान्यता न मिळाल्यामूळे आजही पडून आहेत. अप्पर वर्धा व पूर्णा इत्यादी प्रकल्पाच्या बाबतीत केंद्राच्या वन विभागाची मान्यता मिळण्या न मिळण्याच्या यातना लोकप्रतिनिधीच्या ज्या पिढीने भोगल्या त्यांना निम्न पेढी प्रकल्प वन बाधीत नाही यामुळे आनंद होणे स्वाभाविक आहे. **निम्न पेढी प्रकल्पाच्या बाबतीत एक एकर सुध्दा वनजमीन बाधीत होत नाही व त्यामूळे अशा वनजमिनीच्या हस्तांतरणाच्या मान्यतेसाठी वर्षानुवर्षे खटपट करण्याच्या व्याधीने हा प्रकल्प बाधीत झाला नाही ही त्या प्रकल्पाची एक मोठी गुणवत्ता होय.**

### जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान

**१३१.** केंद्र शासनाने नेमलेल्या एका समितीने संबंध देशामध्ये आत्महत्याग्रस्त असलेल्या ३१ जिल्ह्यांची यादी तयार केली असून महाराष्ट्रात असे ६ जिल्हे आहेत व ते विदर्भातीलच आहेत. या सहा जिल्ह्यासाठीच पंतप्रधान पॅकेज देण्यात आलेले आहे. महाराष्ट्रातल्या या फक्त ६ जिल्हयातील शेतक-यांच्या कर्जावरील व्याज क्षमापित करण्यात आले असून कर्ज माफीच्या बाबतीत सुध्दा एका समितीकडे त्याबाबतचा विचार सोपविण्यात आला असून ती कर्ज माफी सुध्दा निश्चितपणे करावी लागेल असे ठाम तर्कशास्त्र यामागे उभे आहे. या सहा जिल्ह्यांमध्ये शेतकऱ्यांच्या ज्या मोठया प्रमाणावर आत्महत्या होत आहेत त्यामागे अनेक कारणे असलीत तरी मुख्य कारण हे जलसिंचन सुविधांचा अभाव हे आहे. जलसिंचन अनुशेषाने ग्रस्त झालेले हे ६ जिल्हे असून हा असमतोल मानव निर्मीत आहे, मुख्यत्वे तो राज्यकर्त्यांनी निर्माण केलेला आहे. ही ऐतिहासिक वस्तुस्थिती आहे. त्यामूळेच व्याज माफी सारख्या उपाययोजना या ६ जिल्ह्यांतील शेतक-यांना लागु कराव्या लागल्या आहेत व कर्ज माफी सारख्या उपाययोजना लागू कराव्या लागणार आहेत. हेल्पलाईनच्या नेतृत्वाखाली अमरावती येथे झालेल्या बैठकीमध्ये सिंचन सुविधांच्या अभावाने ग्रस्त असलेल्या या ६ जिल्ह्यातील शेतक-यांना **जलसिंचन असुविधेप्रती सानुग्रह अनुदान** देण्यांत यावे अशी मागणी करण्यात आली असून ती अत्यंत रास्त मागणी होय. जलसिंचन सुविधांचा असमतोल ज्या दिवशी दुर होईल त्या दिवशी हे सानुग्रह अनुदान बंद करण्यात यावे असेही हेल्पलाईनच्या त्या निर्णयामध्ये नमूद आहे. **एका बाजुला जलसिंचन सुविधांचा अभाव आहे म्हणून व्याज माफ करुन मिळायचे व त्याचबरोबर कर्ज माफीची मागणी मान्य होण्याची शक्यता निर्माण झालेली असतांना जलसिंचन सुविधा निर्माण करण्यास विरोध करण्यामूळे सानुग्रह अनुदानाच्या मागणीचा**

***देशाच्या पातळीवर जलधोरण ठरवितांना ग्रामीण भागाचा जो विचार करण्यात आला तेवढा सुध्दा विचार करायला खुद्द ग्रामीण भागातले काही लोक तयार नाहीत याचा पुरावा म्हणून या धरणाला होत असलेला हा विरोध नमूद करता येईल.***

*परिच्छेद १३८ पहा*

**कणाच मोडून पडतो, हे प्रत्येकाने लक्षात ठेवले पाहीजे.**

# (८)

# लाभक्षेत्रातील ४५ गांवे

### लाभक्षेत्रातील लोकांना धरण नको आहे

**१३२.** निम्न पेढी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रामध्ये खारपाणपट्ट्यातील किंवा लगतची ४५ गावे येणार आहेत. ती पुढील प्रमाणे :- १.भातकुली, २. चाकुर, ३. कानफोडी, ४. गणोजा देवी, ५. दाढी, ६. बपोरी, ७. औरंगपूर, ८. देगुलखेड, ९. जसापूर, १०. सरमस्तपूर, ११. मानखेड, १२. अंतापूर, १३. खालखोनी, १४. दहातोंडा, १५. काकरखेड, १६. सेलू बाजार, १७. खतीजपूर, १८. येलधी, १९. पिंगळा, २०. रिणमोचन, २१. नांदेड (खु), २२. कवठा, २३. वडाला, २४. काटखेड, २५. वाघोडा, २६. हरताळा, २७. कासमपूर, २८. अडवी, २९. वासेवाडी, ३०. सायत, ३१. आसरा, ३२. खोलापूर, ३३. बोरखेडी (खु), ३४. निंभा, ३५. गौरखेडा, ३६. गणोरी, ३७. इब्राहिमपूर, ३८. बहादरपूर, ३९. बलारखेड, ४०. खरबी, ४१. पेढी, ४२. कवठा, ४३. शेरपूर, ४४. परलाम व ४५. कालीचखेड. या गावांना पिण्याचे गोड पाणी उपलब्ध होणार हा पहिला महत्वाचा लाभ असून भुगर्भातील पूनर्भरणासाठी उत्तम गोड पाणी उपलब्ध झाल्याने भूगर्भातील जलसाठे क्रमशः हळूहळू उत्तम पेयजलामध्ये रुपांतरीत होणार हा दुसरा महत्वाचा लाभ होय. धरणाचे इतर जे काही लाभ असतात ते तर या गावांना मिळणारच पण त्याबरोबर ४५ गावातील जवळ जवळ १०,००० हेक्टर जमीन ओलीताखाली येणार आहे. या ४५ गावातील लोक समोर येवून कोणतीच भूमिका आज मांडत नसल्याचे पाहून संघर्ष समितीचे नेते मात्र लाभक्षेत्रातील लोकांना धरण नको आहे, अशी भूमिका जाहीरपणे मांडत आहेत. खरे म्हणजे धरण पूर्ण झाले तरी लाभक्षेत्रातील सर्वांनी ओलीत केलेच पाहीजे असे काही बंधन लाभक्षेत्रातील शेतक-यावर नसते, पण तरीही प्रचार चालूच आहे. याचा एक वाईट परिणाम समोर दिसतो तो असा की, खारपाणपट्ट्यात नसलेली काही गावे ते पाणी आम्हाला द्या म्हणून पुढे येवू लागलेली आहेत. आज ते दबक्या आवाजात बोलत असले तरी त्यामागे एक तर्कशास्त्र आहे. महाराष्ट्रामध्ये हजारो किलोमिटरचे कालवे बांधून पाणी दोनदोनशे किलोमिटरवर सिंचनासाठी नेण्यात आलेले आहे. खुद्द अमरावती जिल्हयामध्ये असलेला अप्पर वर्धा धरणाचा उजवा कालवा हा ९० कि.मी.च्या जवळपास आहे. शेकडो मिटर उंचीवर पाणी नेणाऱ्या उपसा सिंचन योजना काही शे किलोमिटरचे अंतर पार करुन ओलीतासाठी पाणी पोचवित आहेत. निम्न पेढी प्रकल्पाचा कालवा १५-२० किलोमिटर पुढे नेला तर तो खारपाणपट्टयाच्या बाहेर जातो व खालच्या भागात १५-२० हजार हेक्टर खारपाणपट्टयाच्या बाहेरील दोन तालुक्यांतील जमिन लाभक्षेत्रात मोडू शकते. दुसऱ्या बाजूला १० ते २० मिटरची लिफ्ट केली तर धरणाच्या मागच्या बाजूला १५ ते २० हजार हेक्टर खारपाणपट्ट्यात नसलेली जमिन ओलीताच्या टप्प्यात येवू शकते. ४५ गावातील लोकांनी “दे रे हरी पलगांवरी” अशी भूमिका सोडली नाही तर त्याचे खुपच विपरीत परिणाम होवू शकतात.

### असा प्रकार यापूर्वी चारगड नदी प्रकल्पाच्या बाबतीत घडलेला आहे

**१३३.** असा प्रकार यापूर्वी चारगड नदी प्रकल्पाच्या बाबतीत घडलेला आहे. “चारगड नदी प्रकल्प हा मध्यम प्रकल्प असून त्याला २६६ लक्ष रुपये किमतीला १६ जून १९८२ च्या शासननिर्णयाने प्रशासकीय मान्यता दिली असून या वर्षात १० लक्ष रुपयाची तरतुद केली आहे. या प्रकल्पामुळे २७७५ हेक्टर जमिन ओलीताखाली येणार आहे” अशी माहिती पाटबंधारे सचिवांनी दिनांक ४ नोव्हेंबर १९८७ रोजी विधानपरिषद आश्वासन समितीला साक्षीच्या वेळी दिली होती. प्रशासकीय मान्यतेनंतर पुढे १२ वर्षांनी काटछाट करुन या मध्यम प्रकल्पाला ६ एप्रिल १९९४ च्या शासननिर्णयान्वये लघुप्रकल्प म्हणून ५ कोटी ६० लक्ष रुपयाला प्रशासकीय मान्यता देण्यात आली. त्यामुळे सिंचन क्षेत्र कमी होऊन ते २७७५ हेक्टरऐवजी १५९५ हेक्टर इतके झाले. पुढे मध्यम प्रकल्पाचा हा लघु प्रकल्प करण्यात आला व ६ गावे लाभक्षेत्रातून वगळून टाकण्यात आली. मी त्या प्रकल्पाचा सातत्याने पाठपुरावा करीत असल्याने संपर्कात आलेल्या लोकांना मी त्यावेळी असे सांगितले होते की तुम्ही, तुमचे आमदार, खासदार व लोकप्रतिनिधी यांना भेटून या गोष्टीला विरोध करा परंतु काही कारणाने तसा विरोध त्यावेळी झाला नाही. पुढे चारगड नदी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील लाभधारकांना फायदे मिळू लागल्यावर वंचित झालेल्या खेड्यांमध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला पण यामध्ये जवळ जवळ २० वर्षाचा काळ निघुन गेलेला होता. लाभक्षेत्रामध्ये १-२ वर्षे याचे चांगले लाभ दिसून आल्यानंतर वंचित क्षेत्रामध्ये असंतोष आणखी मोठ्या प्रमाणात प्रकट व्हायला लागला. एका जबरदस्त आंदोलनानंतर उरलेले पाणी बांधून काढण्याचा निर्णय शासनाला घ्यावा लागला व त्यातून निम्न चारगड प्रकल्पाला मान्यता मिळाली. ह्या निम्न चारगड प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण होवून वंचित गावांना पाणी मिळू शकेल. पण जवळ जवळ २५ वर्षाचा काळ हातून निघून गेलेला असेल.

### लाभक्षेत्रातील ४५ गावांच्या लोकांनी संघटीत झाले पाहीजे

**१३४.** निम्न पेढी प्रकल्पाच्या लाभक्षेत्रातील ४५ गावाच्या लोकांनी एकत्र आले पाहीजे, संघटीत झाले पाहीजे, सर्व स्तरावरील आपल्या लोकप्रतिनिधींची भेट घेतली पाहीजे व आपले ठाम मत सांगितले पाहीजे. पाणी पाहीजे की नको? याचा निर्णय केला पाहीजे, पाहीजे असेल तर त्यासाठी संघटीतपणे प्रयत्न न केल्याचे परिणाम लक्षात घेऊन तशा कृतिला खुप विलंब झाल्यास त्याचे परिणामसुद्धा लक्षात घ्यायला पाहिजेत.

### “रायपेअरिअन राईट सिस्टिम”

**१३५.** १९८७ व त्यानंतर २००२ च्या राष्ट्रीय जल धोरणामध्ये पिण्याच्या पाण्याला प्राथम्य क्रमांक १ दिलेले आहे हे मी यापूर्वीच सांगितलेले आहे. लाभक्षेत्रातील गावांना खरोखरच पाणी नको असेल तर हे संपूर्ण धरण पाणी पुरवठ्यासाठी राखीव होण्याची शक्यता नाकारता येत नाही, याची कारणे लक्षात घेतली पाहिजेत. नदी म्हणून विचार केला तर अमरावती शहर हे पेढी नदीच्या पाणलोटातील शहर आहे. या शहराच्या पिण्याच्या पाण्याच्या गरजेसाठी प्रथम धावून आलेली नदी म्हणजे पेढी होय, हा बदलता न येणारा इतिहास झालेला आहे. १९८७ च्या राष्ट्रीय जलनितीमध्ये “रायपेअरिअन राईट सिस्टिम” बद्दल परिच्छेद १८:२:१ मध्ये मोठा मार्मिक उल्लेख आलेला आहे तो पुढील प्रमाणे :-

“18.2.1 Riparian Rights System : The riparian rights belong only and equally to those who possess access to water through ownership of land abutting on a stream. A person having riparian right can initiate use of water at any time and insist that his right be accommodated with other user, or that a share of the water be allotted to him. Riparian right is a form a real property, and is a part of land law. Thus this right is appurtenant to the land, in the sense that a person who purchases or inherits riparian land automatically acquires the water right, although it may not be specifically mentioned. The riparian does not own the water, but owns only the right to use it on his riparian land, and to have it flow to his land so that it may be used."

### पाण्याचा वापर कुणीच करू नये हे म्हणणे बरोबर नाही

**१३६.** “आमच्या भूभागावर पडणारे पाणी आमच्या हक्काचे, ही जी व्यवस्था” (Riparian Rights System) आहे, त्यात “नैसर्गिक प्रवाह सिध्दान्ता”नुसार पाण्याचा वापर (Natural Flow Doctrine) अगदी सुरुवातीच्या काळात होत असे. पण पाण्याच्या बहुविध व विविधांगी वापरामुळे तो सिद्धान्त मागे पडून “विवेकाधारित यथायोग्य वापर सिद्धांत” (Reasonable use doctrine) पुढे आला. या दोन सिद्धान्तामध्ये संघर्ष निर्माण झाल्यास “विवेकाधारित यथायोग्य वापर सिद्धान्त” हाच मान्य करावा लागतो. घरगुती वापरासाठीच्या पाण्याला विवेकाधारित यथायोग्य वापर सिद्धान्तामध्ये वरचे प्राथम्य दिले असून घरगुती वापरामध्ये पिण्याचे पाणी, धुण्याचे पाणी, स्वयंपाक व स्वच्छतेसाठी लागणारे पाणी, यांचा मुख्यत्वे समावेश होतो. अनेक न्यायालयीन निर्णयांनी या वापराचे प्राथम्य मान्य केले आहे. निम्न पेढी प्रकल्पाच्या बाबतीत या दोन सिद्धांतामध्ये अजिबात संघर्ष नाही ही केवढी आनंदाची गोष्ट म्हटली पाहिजे. **१६१ कोटी रुपये खर्च करुन बांधण्यात येत असलेल्या निम्न पेढी प्रकल्पाच्या साठवण जलाशयातून उपलब्ध होणारे पाणी ‘नैसर्गिक प्रवाह सिद्धांता’नुसार,** (Natural Flow Doctrine) **ज्यांना मिळत आहे, किंवा मिळणार आहे, त्या लोकांना ते पिण्यासाठी नको आहे व सिंचनासाठीसुद्धा नको आहे, हे जर खरे असेल तर ‘विवेकाधारित यथायोग्य वापर सिद्धांता’नुसार** (Reasonable use doctrine) **नदीच्या खालच्या व वरच्या भागातील ज्या**

***अकोला शहरापर्यंत उताराने पाणी येवू शकेल असे चार प्रकल्प आता मोर्णेच्या वरच्या भागात तयार झालेले आहेत. "राजे हो! प्रकल्पाला विरोध करु नका. पावसाळ्यात पूरापासून बचाव होतो व उन्हाळ्यात उत्तम पेयजल उपलब्ध होते" हे अकोल्यातील काही लोकांनी पेढीच्या पाणलोट क्षेत्रात रहाणाऱ्या व न रहाणाऱ्या संघर्ष समितीच्या नेत्यांना समजावून सांगितले पाहिजे.***

*परिच्छेद १२० पहा*

**हजारो लोकांना ते पाहिजे आहे व उपलब्ध होणार आहे त्यांच्याकडून जसा आम्ही त्या पाण्याचा वापर करीत नाही किंवा करणार नाही, तसा तुम्ही सुद्धा त्याचा वापर करू नये व नदीच्या काठावर बसून हे पाणी अरबी समुद्राला जावून मिळतांना कसे दिसते? हे डोळे भरून पहावे, अशी अपेक्षा करणे हा पराकोटीचा भाबडेपणा आहे.**

### गोदावरी खोऱ्यातील पाणी पंपींगने तापीच्या खो-यात

**१३७.** आज आपण अमरावती शहरामध्ये गोदावरी खोऱ्यातील पाणी पंपींगने तापीच्या खो-यात आणून आपली तहान भागवित आहोत. अप्पर वर्धा धरणाचा प्रकल्प अहवाल ज्यावेळी तयार झाला त्यावेळी १० टक्के पाणी हे पिण्यासाठी राखुन ठेवले पाहीजे असा नियम होता व त्याप्रमाणे ती १० टक्केची अट पूर्ण करण्यासाठी अमरावती, बडनेरा, मोर्शी व जलाशयाच्या पुच्छ भागातून वरुड या नगरपालिका व नेरपिंगळाई या गावांच्या पिण्याच्या पाण्याचा समावेश प्रकल्प अहवालामध्ये करण्यात आलेला होता. त्यामूळे अमरावतीला हे पाणी हक्काचा भाग म्हणून मिळू शकले. तहान लागल्यावर विहिर खोदण्याच्या जुन्या परिपाठातून आम्ही बाहेर पडलो व निदान ५-२५ वर्षे पेयजलासाठी नव्याने उदभव शोधण्याची गरज राहीली नाही हे खरे असले तरी पुढे **ज्यावेळेला अमरावती शहराला नव्या उद्‌भवाची गरज पडेल त्यावेळेला १० टक्के पेक्षा जास्त पाणी हे अप्पर वर्धा धरणातून मिळणार नाही, अशा जलदानाला तीव्र विरोध होईल. तुमच्या दारात असलेले पाणी अरबी समुद्राला जावून मिळत आहे. तुम्ही आमचे शेती सिंचनाचे पाणी का म्हणून नेत आहात? असा जर प्रश्न कोणी विचारला तर त्याचे उत्तर आम्ही काय देणार आहोत.**

### ग्रामीण विभागात ज्यादा पाणी उपलब्धतेची गरज

**१३८.** मनुष्य व प्राणीमात्रांच्या पिण्याच्या पाण्याची गरज महत्वाची आहे. घरगुती व औद्योगीक पाणी वापराची गरज मोठया शहरामध्ये किंवा त्या शहरा लगतच्या भागात मोठया प्रमाणात एकवटली आहे, तथापी विकास कामाद्वारे ज्या प्रमाणात ग्रामीण भागातील आर्थिक परिस्थितीमध्ये सुधारणा होईल त्या प्रमाणात तेथेही पाण्याची गरज वाढण्याची शक्यता आहे असे सन २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणामध्ये स्पष्टपणे नमुद करण्यात आलेले आहे ते पुढील शब्दात. :- "Domestic and industrial water needs have largely been concentrated in or near major cities. However, the demand in rural areas is expected to increase sharply as the development programmes improve economic conditions of the rural masses. Demand for water for hydro and thermal power generation and for other industrial uses is also increasing substantially. As a result, water, which is already a scarce resource, will become even scarcer in future. This underscores the need for the utmost efficiency in water utilisation and a public awareness of the importance of its conservation." (संदर्भ ७, परिच्छेद १.८) **देशाच्या पातळीवर जलधोरण ठरवितांना ग्रामीण भागाचा जेवढा विचार करण्यात आला तेवढा सुध्दा विचार करायला खुद्द ग्रामीण भागातले काही लोक तयार नाहीत याचा पुरावा म्हणून या धरणाला होत असलेला हा विरोध नमूद करता येईल.**

### ग्रामीण भागातील लोकांना अतिउत्तम गोड पेयजल का म्हणून उपलब्ध होवू नये?

**१३९.** पुढे आणखी एक मोठा प्रश्न समोर येत आहे, येणार आहे, ५-१० वर्षाचा विलंब करुन ज्याचे होकारार्थी उत्तर द्यावेच लागेल त्याचा आज विचार सुध्दा न करणे हे चुकीचे आहे. धरणाचे अतिउत्तम गोड पाणी हे फक्त शहरातील लोकांनीच प्यावे व ग्रामीण भागातील लोकांना अतिउत्तम गोड पेयजल का म्हणून उपलब्ध होवू नये? असे त्या प्रश्नाचे स्वरुप आहे. निंभी आणि त्यासारख्या गावातून यापूर्वीच तो प्रश्न पुढे आलेला आहे. महाराष्ट्रातील जलसिंचनाची समृध्दी असलेल्या जिल्ह्यांमध्ये ग्रामीण भागातील खेड्यांना सुध्दा भुपृष्ठावरील जलाशयातून उत्तम प्रतीच्या पेयजलाचा पुरवठा होतो. तो विदर्भातील ग्रामीण भागाला का होवू नये? या प्रश्नाला उत्तर हे द्यावेच लागेल. तसा तो पुरवठा दिला पाहीजे हेच त्याचे उत्तर आहे. अप्पर वर्धा जलाशयातून अनेक ग्रामीण भागांना व अनेक खेडयांना पेयजल देण्याच्या योजना कार्यान्वित होत आहेत व झाल्या आहेत. शहाणूर प्रकल्पातून जवळ जवळ दीडशे खेडयांना पाणी पुरवठा करण्याची योजना प्रत्यक्ष कार्यान्वित झालेली आहे. त्या दिडशेपैकी बहुतेक खेडी ही खारपाणपट्ट्यातील आहे. आता प्रश्न असा निर्माण होतो की, **उत्तम गोड पेयजलाचा पुरवठा भुपृष्ठावरील जलाशयातून खारपाणपट्ट्याच्या सर्व गावांना व्हावा, मात्र ही जलाशये खारपाणपट्ट्यात असु नयेत असा आग्रह मान्य होण्यासारखा नाही. उत्तम गोड पाण्याच्या जलाशयाचे बांधकाम करण्यासाठी खारपाणपट्टयामध्ये प्रकल्प स्थळ उपलब्ध होत नाही असे असतांना एखादे प्रकल्प स्थळ सफल ठरल्यानंतर ते जलाशय आम्ही होवू देणार नाही. सालाबादाप्रमाणे आमचे ते पाणी अरबी समुद्राला जावून मिळू द्या, मात्र आम्हाला पिण्यासाठी गोड पाणी बाहेरून कुठूनतरी आणून द्या. हा आग्रहसुद्धा मान्य होण्यासारखा नाही. ज्यांना आपल्याला उपलब्ध झालेल्या/होणाऱ्या पेयजलांची किम्मत कळत नाही, त्यांचे कौतूक करीत बसण्याचा कालखंड सुद्धा केंव्हाच निघून गेलेला आहे.**

### पिण्याच्या पाण्यासाठीचा जलसाठा

**१४०.** खारपाणपट्टयामध्ये एकूण ८९४ गावे आहेत व त्यातल्या बहुतेक गावांना उत्तम पेयजलाचा अभाव या समस्येने ग्रासलेले आहे. सिंचनासाठी तुम्हाला धरण नको असेल तर उताराने आमच्या गावांना पाणी सहजपणे पोहचू शकते, आम्ही त्याचा पेयजलासाठी वापर करु अशी मागणी खारपाणपट्टयाच्या ग्रामीण भागातून आली तर ती गैरवाजवी आहे असे कोण म्हणेल? **खारपाणपट्ट्यातील संपूर्ण जलसाठा हा रासायनिक संकुलासाठी राखून ठेवणे हे जेवढे त्याज्य समजल्या गेले पाहिजे त्याच्या उलट टोकाला सिंचनासाठी हे पाणी नकोच असेल तर ते संपूर्ण पाणी पेयजल म्हणून राखून ठेवणे स्वागतार्ह समजले गेले पाहिजे.** निम्न पेढी प्रकल्पाच्या बरोबरीचा चापडोह प्रकल्प हा यवतमाळ शहर व आजुबाजूच्या काही ग्रामीण भागासाठी संपूर्णपणे राखून ठेवलेला जलसाठा आहे, याची संघर्ष समितीला माहिती नाही असे कसे म्हणता येईल? पिण्याच्या पाण्यासाठीचा जलसाठा म्हणून तो प्रकल्प राखीव झाल्यामूळे आता त्यातून एका हेक्टरचे सुध्दा सिंचन करता येत नाही, केले जावू शकत नाही हे लक्षात ठेवले पाहीजे.

### मागण्या व प्रतिमागण्या, दावे व प्रतिदावे, आंदोलने व प्रतिआंदोलने यांचा महापूर येईल

**१४१.** पेढी नदीचे धरणापुढचे पाणी तुम्ही उचला, धरणापर्यंतचे पाणी आम्ही आमच्या पिण्यासाठी व सिंचनासाठी वापरु शकतो. या "रायपेअरिअन राईट सिस्टिम"मुळे हे पाणी ज्यांना पेयजल म्हणून व सिंचनासाठी आज मिळत आहे, त्यांना ते पिण्यासाठी व सिंचनासाठी ठामपणे नको असेल तर **आज फक्त ४५ गावांना पिण्यासाठी पाणी मिळत आहे, उद्या ३४५ गावांची मागणी येईल. आज फक्त १० हजार हेक्टरचे ओलीत होत आहे, उद्या ४५ हजार हेक्टरच्या मागण्या येतील. मागण्या व प्रतिमागण्या, दावे व प्रतिदावे, आंदोलने व प्रतिआंदोलने यांचा महापूर येईल. वाडवडीलांनी अर्जित केलेल्या संपदेचे महत्व ज्यांच्या मुलाबाळांना कळत नाही त्यांच्यामध्ये जसे कलह निर्माण होतात तसाच काहीसा प्रकार जलसंपदेच्या बाबतीतसुद्धा आहे. ७० किलोमिटरच्या या प्रवासात उत्तम व एकमेव प्रकल्पस्थळ आपल्याजवळ उपलब्ध झाले, यामुळे ज्यांना आनंद होत नसेल व निसर्गाने दिलेल्या या जलसंपदेचे महत्व ओळखण्याइतकेहि बुद्धिवैभव ज्यांच्याजवळ उपलब्ध नाही, अशा लोकांनी या बुद्धिवैभवाचा सर्वत्र अभाव गृहित धरु नये.** शेवटी काय? हा प्रकल्प होणार हे निश्चित आहे. दावे व प्रतिदावे, दाव्यांच्या व प्रतिदाव्यांच्या नव्यानव्या आवृत्या, प्रतिदाव्याने उजेड पडल्यामुळे पुन्हा नव्या स्वरुपात मुळ दावे, यांची आवर्तने अन् प्रत्यावर्तने व त्यात जाणारा वेळ लक्षात घेता हा प्रकल्प आनंदाने ५ वर्षात पूर्ण होऊ द्यायचा की हा खेळ ५० वर्षे चालवावयाचा एवढाच निर्णय संघर्ष समितीला करावयाचा आहे. विलंब जास्त झाल्यामुळे सर्वात जास्त हानी कोणाची होत असेल तर ती प्रकल्पबाधितांची होते हेही त्यांनी विसरु नये.

### मा.सभापतींच्या दालनातील बैठक

**१४२.** विधानपरिषदेतील ज्येष्ठ सदस्य श्री. दिवाकरराव रावते यांनी अधिवेशन चालु असतांना मला एक दिवस असे सांगितले की, "बी.टी.भाऊ! मी निम्न पेढी प्रकल्पाच्या विरोधात जे आंदोलन चालु आहे, त्याबाबत नियम ९३ ची सूचना दिली आहे." त्यावर मी त्यांना म्हणालो "ही चांगली गोष्ट आहे. खरे म्हणजे या प्रश्नावर सभागृहात सर्वस्पर्शी चर्चा झाली पाहिजे. सर्व बाजू लोकांच्या समोर आल्या पाहिजेत. या प्रश्नावर चर्चा घ्यावी अशी आपण मा. सभापतींना

***७० किलोमिटरच्या या प्रवासात उत्तम व एकमेव प्रकल्पस्थळ आपल्याजवळ उपलब्ध झाले, यामुळे ज्यांना आनंद होत नसेल व निसर्गाने दिलेल्या या जलसंपदेचे महत्व ओळखण्याइतकेहि बुद्धिवैभव ज्यांच्याजवळ उपलब्ध नाही, अशा लोकांनी या बुद्धिवैभवाचा सर्वत्र अभाव गृहित धरु नये.*** *परिच्छेद १४१ पहा*

विनंती करु" श्री. दिवाकरराव रावते यांचे म्हणणे असे की, "प्रकल्पाला विरोध करणे बरोबर नाही असे माझे ठाम मत आहे. आयाभगिनी उपोषणाला बसल्या आहेत त्यांचे म्हणणे आपण ऐकून घेतले पाहिजे." श्री. दिवाकरराव रावते यांच्या सोबत मी स्वतः, पालकमंत्री डॉ.सुनिल देशमुख, पाटबंधारे मंत्री श्री. अजितदादा पवार मा. सभापतींकडे गेलो. त्यांना विनंती केली. मा. सभापतींनी विनंती मान्य केली. आंदोलन कर्त्यांचे म्हणणे ऐकून घ्यायचे तर सभागृहात चर्चा उपयोगाची नाही. म्हणून मा. सभापतींच्या दालनात चर्चा घ्यावी असा निर्णय मा. सभापतींनी दिला. त्याप्रमाणे ३१ जुलै २००७ रोजी ही बैठक झाली.

१. या चर्चेच्या वेळी प्रकल्प रद्द करण्याची मागणी मा. जलसंपदा मंत्री श्री. अजितदादा पवार व राज्यमंत्री डॉ.सुनिल देशमुख यांनी ठामपणे फेटाळून लावली. चर्चेच्या सुरुवातीलाच मा. जलसंपदा मंत्री श्री.अजितदादा पवार यांनी संघर्ष समितीच्या नेत्यांना सरळ सरळ असा प्रश्न विचारला कि, तुमची नक्की मागणी काय आहे ? तुम्हाला धरणच नको आहे की पुनर्वसनाच्या जागेबाबत, किंमतीबाबत किंवा इतर काही बाबतीत तुमच्यावर अन्याय झालेला आहे. त्यावर आंदोलनाच्या नेत्यांनी असे उत्तर दिले की, आम्हाला धरणच नको आहे. त्यावर श्री.अजितदादा पवारांनी स्पष्टपणे असे सांगितले की, "मग ही तुमची मागणी आम्ही मान्य करु शकत नाही. त्या भागात फार मोठा अनुशेष आहे. अहो ! हे २ टीएमसी चे लहानसे धरण आहे. आमच्याकडे ३०-३०, ४०-४० टीएमसीची धरणे आहेत, पण कुणी धरणाला विरोध करीत नाहीत." त्यावर आमच्या नेत्याने 'येथे खारपाणपट्टा आहे' असे उद्‌गार काढले. त्यावर मा. जलसंपदा मंत्र्यांनी असे सांगितले की, "अहो ! आमच्याकडे सुध्दा खाजण जमीनी आहेत तेथे लोक मुद्दाम प्रकल्प मागून घेतात. कारण त्यामुळे त्यांना जमीनीतील क्षार धुवून काढण्यास मदत होते."

२. डॉ.माधवराव चितळे यांची एक सदस्य समिती नेमण्याचा निर्णय झाल्यावर संघर्ष समितीच्या थोर नेत्याने एक मोठी गंमतीदार मागणी केली. ते म्हणाले "मग तोपर्यंत खरेद्या बंद ठेवा." ही अतिशय संतापजनक मागणी होती. सरळ सरळ "जुलुम जबरदस्ती करण्याचा आमचा अधिकार मान्य करा" असेच संघर्ष समितीचे मागणे होते. त्यावर माझ्याकडून रहावले नाही. मी म्हणालो "गेल्या दोन वर्षापासून खरेदी विक्रीचे व्यवहार बंद आहेत. शासन त्यांना जमीन विकू देणार नाही व ते सरळ खरेदी द्यायला तयार आहेत तर तीही करणार नाही? हा तर जुलुम होईल. ६ शेतकऱ्यांनी सरळ खरेदी पद्धतीने खरेद्या करुन दिलेल्या आहेत. इतर ३०० कास्तकारांनी जिल्हाधिकाऱ्यांकडे सरळ खरेदी करुन घ्या म्हणून अर्ज दिले आहेत" त्यावर मा. सभापतींनी सभेला उपस्थित असलेल्या जिल्हाधिकाऱ्यांना "काय परिस्थिती आहे?" अशी विचारणा केली. त्यावर जिल्हाधिकाऱ्यांनी ठामपणे सांगितले. "सहा खरेद्या झाल्या आहेत. ३०७ लोकांनी सरळ खरेदी देण्यासाठी अर्ज दिलेले आहेत." त्यावर या थोर नेत्यांने काय म्हणावे? ते म्हणाले "त्यातील १६ लोकांनी अर्ज मागे घेणारा अर्ज दिला आहे." त्यावर दिवाकरराव रावते म्हणाले "लोकांचा खरोखरच धरणाला विरोध आहे तर लोक खरेदी देणार नाहीत पण देणार असतील तर त्यांच्या खरेद्या बंद कशा पाडायच्या?" संघर्ष समितीची ती मागणी त्यामुळे मान्य होवू शकली नाही.

३. चर्चेच्या दरम्यान एकदा श्री.माधवराव चितळे यांच्या विषयी व पाटबंधारे सचिवांविषयी संघर्ष समितीच्या नेत्याने जे उद्‌गार काढले. त्यावर श्री. दिवाकरराव रावते चांगलेच संतापले. विधानसभा सदस्य श्री. संजयभाऊ बंड यांच्याकडे पाहून ते म्हणाले "अहो संजय भाऊ! कोणत्या माणसाला आपण येथे घेऊन आलो आहोत ! ज्या माणसाला माधवराव चितळे काय आहेत. हे माहीत नाही, ज्या माणसाला सचिव व सदस्य सचिव यातला फरक कळत नाही, त्यांच्याशी काय चर्चा करायची?" आया भगिनी उपोषणाला बसलेल्या आहेत म्हणून अतिशय तळमळीने श्री. दिवाकरराव रावते यांनी गेले ८-१० दिवस या चर्चेसाठी प्रयत्न केले होते व त्यामुळे संघर्ष समितीच्या या नेत्याच्या वर्तनाने त्यांना वाटणारा उद्वेग स्वाभाविकच होता.

४. त्यादिवशी निम्न पेढी प्रकल्पाच्या संदर्भात पुढील निर्णय घेण्यासाठी श्री.माधवराव चितळे यांची एकसदस्यीय समिती नेमण्याचा निर्णय सुध्दा उभयपक्षी एकमताने झाला होता, पण दुस-या दिवशी अमरावती येथे आल्यानंतर ती समिती मान्य नसल्याचे संघर्ष समितीने अमरावती येथून जिल्हाधिकारी यांच्या मार्फत मा.सभापतींना कळविले. एका दृष्टीने ही गोष्ट अत्यंत वाईट होती, कारण ज्यावेळेला अगोदरच्या दिवशीच्या बैठकीत नेते एक गोष्ट मुंबईत मान्य करतात व दुस-या दिवशी अमरावती येथे आल्यावर ती अमान्य असल्याचे सांगतात तेव्हा त्या नेत्यांच्या विश्वासार्हतेचे व नेतृत्व गुणाचे फार मोठे अवमूल्यन होते. डॉ.माधवराव चितळे यांची एकसदस्यीय समिती आम्हाला मान्य नसल्याचा जो निर्णय संघर्ष समितीने कळविला तो एका दृष्टीने वाईट असला तरी त्याची एक दुसरी चांगली व आनंदाची बाजु सुध्दा लक्षात घेतली पाहीजे. खुद्द संघर्ष समितीनेच एकसदस्यीय समिती फेटाळून लावल्यामुळे या कामी होणारा विलंब टळेल, त्या प्रमाणात प्रकल्पबाधीतांना होणारा त्रास वाचेल ही त्यातली एक आनंदाची बाजू म्हटली पाहीजे.

५. त्या बैठकीत काय चर्चा झाली व काय निर्णय झाले? याविषयीच्या ज्या 'कथा' अमरावतीमध्ये आल्यानंतर या नेत्यांनी सांगितल्या त्यावरुन मा.सभापतींच्या दालनात होणारी प्रत्येक चर्चा शब्दशः 'रेकॉर्ड' होत असते, याची त्यांना कल्पना नाही हे स्पष्ट दिसून येते.

### जलसिंचन अनुशेषाची आजची स्थिती

**१४३.** उपरोक्त लेखामध्ये मांडलेले विचार हे फक्त निम्न पेढी प्रकल्पासाठी मांडलेले विचार नाहीत. एक १०,००० हेक्टरची सिंचन क्षमता असलेला प्रकल्प व्हावा म्हणून इतका मजकूर लिहिण्याची तशी आवश्यकता नाही. संघटनेतर्फे सन १९९२ मध्ये "जलसिंचन अनुशेष बुलेटीन" प्रकाशित करण्यात आले होते. सन १९९८ मध्ये "महाराष्ट्रातील जलसिंचन अनुशेष - क्ष किरण परीक्षा" हे पुस्तक प्रकाशित करण्यात आले होते. त्या त्या वेळची जलसिंचन अनुशेषाची स्थिती त्या प्रकाशनामध्ये नमूद करण्यात आली होती. आज २००७ मध्ये निम्न पेढी प्रकल्पाचे निमित्त आहे, पण जलसिंचन अनुशेषाची महाराष्ट्रातील व विदर्भातील आजची स्थिती, अनुशेष निर्मूलनाची स्थिती व त्याबरोबरच वेगवेगळ्या प्रकल्पाबाबत घडत असलेले अपप्रकार याबद्दलचे एकुणच चित्र समोर मांडावे या हेतूने हे लिखाण केलेले आहे. जलसिंचन अनुशेष निर्मूलनाच्या या युद्धामध्ये आम्ही कोठे उभे आहोत? हे दर्शविणे हा या बुलेटीन प्रकाशनाचा मुख्य हेतू आहे. शिवाय पूर्णा खोऱ्यामध्ये खारपाणपट्ट्याचे एकूण क्षेत्रफळ ४.६९ लक्ष हेक्टर असून अमरावती, अकोला व बुलढाणा या तीन जिल्ह्यातील ८९४ गावे त्यामध्ये बाधित आहेत. या मोठ्या भूभागातील भूजलसंपदेच्या मूल्यांकनामध्ये आमूलाग्र बदलाची सुरुवात निम्न पेढी प्रकल्पामुळे होत असल्याने, "भूगर्भातील खाऱ्या पाण्याचा उपसा व तेथे गोड पाण्याचे पुनर्भरण" या सिद्धान्ताबाबतची उपलब्ध शास्त्रीय माहिती जास्त तपशीलवारपणे मांडली आहे. **स्वयंसेवी संस्था, भूगर्भशास्त्रज्ञ, कृषीशास्त्रज्ञ, अभियंते व समाजसेवक यांनी अनेक वर्षे मेहनत करुन "भूगर्भातील खाऱ्या पाण्याचा उपसा व तेथे गोड पाण्याचे पुनर्भरण" या प्रमेयाची मांडणी केली, त्या प्रमेयाला केन्द्रीय भूजल मंडळ, महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण यंत्रणा, महाराष्ट्र शासन, उच्चाधिकार समिती यांची मान्यता मिळाली व सर्वात शेवटी व सर्वात महत्त्वाचे म्हणजे २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने त्यावर शिक्कामोर्तब केल्यामुळे त्या प्रमेयाला सिद्धान्ताचे स्वरूप प्राप्त झाले.** हे त्यांना आलेले यश लोकांसमोर तपशीलवारपणे मांडणे हाही एक हेतू या लिखाणामागे आहे.

१. मा.राष्ट्रपतींनी काढलेले ९ मार्च १९९४ चे आदेश व त्यानंतर महाराष्ट्राच्या मा.राज्यपालांनी निर्गमित केलेले २००१ चे निदेश यांचे अनेक वर्ष पालनच केल्या गेले नाही. आता कुठे जेमतेम त्याचे पालन व्हायला नुकतीच सुरुवात झालेली आहे. त्यामुळे प्रकल्प पुर्तीमध्ये नेहमी येणारी निधीची अडचण अनुशेषग्रस्त जिल्ह्यातील प्रकल्पांच्या बाबतीत येईल असे वाटत नाही.

२. विदर्भातील प्रकल्पबाधीत व्यक्तींना उपलब्ध होणारे सर्व लाभ विदर्भातील सर्व प्रकल्पबाधीतांना विनाविलंब मिळावे. प्रथम पुनर्वसन झाल्यानंतरच धरणामध्ये पाणी साठवले जाईल असे धोरण असावे. या विपरीत होणाऱ्या कोणत्याही कृतीला सर्व शक्तीनिशी विरोध केला जाईल असा सामुहीक निर्धार व्यक्त होण्याची आज गरज आहे.

३. त्याबरोबर निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या कामासाठी जलसंपदा व भूसंपादन खात्याचे अधिकारी आणि कर्मचारी यवतमाळ जिल्हयातील खंबाळा येथे गेले असता काही लोकांनी झुंडशाहीच्या वर्तनाचे नुकतेच जे प्रदर्शन केले त्याचा तीव्र निषेध सामुहीकपणे झाला पाहीजे.

४. अभियंत्यांचे मनोधर्य खच्ची करण्याचा हा प्रयत्न अत्यंत निंद असल्याचे मानले गेले पाहीजे. शासनाच्या आदेशावरुन आपले कर्तव्य बजावण्यासाठी गेलेल्या कार्यकारी अभियंत्याला अर्धनग्न करुन ज्यावेळेला त्यांची मिरवणूक काढली जाते त्यावेळेला ह्या झुंडशाहीने त्या कार्यकारी अभियंत्याला अर्धनग्न केलेले आहे असे आपणाला वाटत असले, तरी खऱ्या अर्थाने सुसंस्कृत समाजाचे नेतृत्व करणाऱ्या संघटीत शासनालाच या झुंडशाहीने पूर्ण नग्न केलेले असते याची प्रत्येक संवेदनशील शासनाला जाणीव असते. आमच्या शासनाला ती

***स्वयंसेवी संस्था, भूगर्भशास्त्रज्ञ, कृषीशास्त्रज्ञ, अभियंते व समाजसेवक यांनी अनेक वर्षे मेहनत करुन "भूगर्भातील खाऱ्या पाण्याचा उपसा व तेथे गोड पाण्याचे पुनर्भरण" या प्रमेयाची मांडणी केली, त्या प्रमेयाला केन्द्रीय भूजल मंडळ, महाराष्ट्र जल व सिंचन आयोग, महाराष्ट्र भूजल सर्वेक्षण यंत्रणा, महाराष्ट्र शासन, उच्चाधिकार समिती यांची मान्यता मिळाली व सर्वात शेवटी व सर्वात महत्त्वाचे म्हणजे २००२ च्या राष्ट्रीय जलधोरणाने त्यावर शिक्कामोर्तब केल्यामुळे त्या प्रमेयाला सिद्धान्ताचे स्वरुप प्राप्त झाले.***

*परिच्छेद १४३ पहा*

जाणिव आहे की नाही, याची खात्री करुन घेण्याचा अधिकार विदर्भातील लोकांनाही आहे याची जाणीव करुन देण्याची आवश्यकता आहे.

५. एका बाजूला अशी झुंडशाही चालू असतांना स्वाभाविकपणे व्यक्ती म्हणून मनामध्ये येणारा वैयक्तिक विचार बाजूला ठेवून व्यापक सार्वजनिक हितबुध्दीची जाणीव ठेवून निम्न पेढी प्रकल्पातील ज्या प्रकल्पबाधीत शेतकऱ्यांनी आपल्या जमिनी सरळ खरेदी पध्दतीने खरेदी करुन जिल्हाधिकारी यांच्या ताब्यात दिल्या त्या ६ शेतक-यांचा सन्मान केला पाहीजे व आजही ३०० च्या वर शेतकऱ्यांनी सरळ पध्दतीने जमीनी खरेदी करुन देण्याचा निर्धार जिल्हाधिकारी यांना कळविलेला आहे त्यांना धन्यवाद दिले पाहीजेत.

६. मोठया प्रमाणावर विदर्भामध्ये होत असलेल्या शेतकऱ्यांच्या आत्महत्याबाबतचा उल्लेख मंगळवार, दिनांक १५ ऑगस्ट २००७ रोजी दिल्लीच्या लाल किल्ल्यावरुन देशाला उद्देशून केलेल्या भाषणामध्ये खुद्द देशाच्या मा.पंतप्रधानांनी केला आणि त्या भाषणात त्यांनी असा उल्लेख फक्त विदर्भाच्याच बाबतीत केला. कारणे पुष्कळ असतील पण भिकार सिंचन व्यवस्था (Poor irrigation) हे प्रमुख कारण असल्याचे ठाम मत मा. पंतप्रधानांनी व्यक्त केले. इतके मागासलेले महाराष्ट्रात हे फक्त सहाच जिल्हे आहेत ही वस्तुस्थिती निदान या ६ जिल्ह्यातील लोकांनी समजावून घेण्याची आवश्यकता आहे.

### जलसिंचन अनुशेषाच्या निर्मुलनाची सद्यस्थिती

**१४४.** विदर्भातील पंतप्रधान पॅकेजमधील अति अनुशेषग्रस्त असे जे ६ जिल्हे आहेत त्या ६ जिल्हयातील जलसिंचन अनुशेषाच्या निर्मुलनाची सद्यस्थिती काय आहे याची माहिती या निमित्ताने करुन घेणे आवश्यक आहे. :-

(१) **वर्धा जिल्हा :-** निम्न वर्धा प्रकल्प हा मोठा प्रकल्प असून त्याचे बांधकाम वर्षा दोन वर्षात पूर्ण झाल्यास वर्धा जिल्हा हा राज्य सरासरी पर्यंत पोहचू शकण्याचा मार्ग बराच मोकळा होवू शकतो.

(२) व (३) **बुलडाणा व यवतमाळ जिल्हा :-** बुलडाणा जिल्ह्यातील जिगांव प्रकल्प व यवतमाळ जिल्ह्यातील निम्न पैनगंगा प्रकल्पाच्या बाबतीत खुद्द राज्याच्या मा.राज्यपालांनी देशाच्या मा.पंतप्रधानाना पत्र लिहिले व केंद्राच्या वनविभागाची मान्यता मिळवून देण्याविषयी विनंती केली होती. त्यात यश आले. राज्य सरासरीवर येणे म्हणजेच अनुशेष दूर होणे. हया दोन जिल्ह्यातील हे दोन मोठे प्रकल्प सुरु झाल्यास हया दोन जिल्ह्यांचे राज्य सरासरीवर येण्याचे अंतर खुपच कमी होऊ शकते हे नमूद करणे आवश्यक आहे.

(४) **वाशिम जिल्हा :-** वाशिम जिल्हा हा पठारावरील जिल्हा असल्यामूळे मोठया व मध्यम प्रकल्पासाठी प्रकल्पस्थळांचे दुर्भिक्ष ही एक फार मोठी समस्या त्या जिल्ह्यामध्ये आहे. लघु पाटबंधाऱ्याची संख्या मर्यादित आहे. समजा ती थोडीफार वाढली तरी त्या भरवशावर त्या जिल्ह्याला राज्य सरासरी गाठता येईल अशी स्थिती दिसत नाही. त्या जिल्ह्याला राज्य सरासरीवर आणण्यासाठी छोट्या मोठ्या उपाययोजनांच्या मागे धावण्यापेक्षा वैनगंगा-पूर्णा (तापी) नदी जोड प्रकल्प हा एकमेव उपाय समोर दिसतो. चार जेष्ठ अभियंत्यांनी वाशिम जिल्ह्याच्या अनुशेष निर्मूलनाबाबत आपल्या शोध निबंधामध्ये पुढीलप्रमाणे मत व्यक्त केले आहे. :- "**Washim district is** one of the district in Vidarbha having the highest Water backlog. To minimize this backlog there is no other way rather than interconnecting river basins." (संदर्भ ६, पृष्ठ १०१) राष्ट्रीय नद्या जोड प्रकल्पाची वाट न पाहता किंवा विपूल व अतिविपूल जल उपलब्धतेच्या खोऱ्यातील पाणी अतितुटीच्या खोऱ्यात वळविण्याच्या प्रस्तावाची वाट न पाहता थेट राज्यस्तरीय प्रकल्प म्हणून हया प्रकल्पाचे बांधकाम हाती घेणे व त्यातून सर्वप्रथम वाशिम जिल्ह्याला पाणी देणे, आज तरी हा एवढा एकच उपाय हया संदर्भात उपलब्ध असलेला दिसून येतो.

(५) व (६) **अमरावती व अकोला :-** गेल्या अनेक वर्षापासून अमरावती व अकोला हे दोन जिल्हे अनुशेषग्रस्त जिल्हे या नात्याने पहिल्या व दुसऱ्या नंबरवर आहेत. जलसिंचन अनुशेषाच्या प्रत्येक मोजमापामध्ये गुणवत्ता यादीतील आपला पहिला व दुसरा क्रमांक हया दोन जिल्ह्यानी कायम ठेवलेला आहे. हा अनुशेष एवढा मोठा आहे कि, ८-१० हजार हेक्टरचे दोन चार लहान किंवा मध्यम प्रकल्प हाती घेवून हे मागासलेपण दुर करणे शक्य नाही. तापी वळण योजनेच्या बाबतीत राज्य शासनाच्या वतीने सभागृहामध्ये जी आश्वासने देण्यात आलेली आहे त्यांचे पालन झाल्यास अकोला व अमरावती ह्या दोन जिल्ह्यामध्ये बरीच सिंचन क्षमता निर्माण होऊ शकते. सर्वात महत्वाची व आनंदाची गोष्ट म्हणजे त्या प्रकल्पामुळे मेळघाट मधील आदिवासी भागांना १० ते १५ हजार हेक्टरची सिंचन क्षमता मिळू शकते. अनुशेष निर्मूलनाचा या दोन जिल्ह्यांचा बराच प्रवास तरीही शिल्लक रहातो.

### आजचे १६ हजार कोटी रुपये, उद्याचे ३४ हजार कोटी रुपये व परवाचे ५६ हजार कोटी रुपये

**१४५.** १६३४५ कोटी रुपये जलसिंचनासाठी अतिरिक्त तरतुद उपलब्ध करुन देण्याचा एक प्रस्ताव राज्यपालांसमोर असून अनुशेषग्रस्त जिल्ह्यांवर या वाटपात अन्याय होवू नये म्हणून हेल्पलाईनच्या वतीने मा. राज्यपालांना दिनांक १६ जूलै २००७ (जिल्हाधिकारी अमरावती यांच्यामार्फत) रोजी एक निवेदन देण्यात आले होते. मा. राज्यपालांनी तावडतोबीने त्याबाबतीत कारवाई केली असून अनेक बाबतीत चुका दुरुस्त करण्याचे शासनाला आदेशीत केले आहे. दिनांक ५ सप्टेंबर २००७ रोजी एक पत्र (No. GS/DS/DB/IRG-DIR-23/2007/32) पाठवून हेल्पलाईनला मा. राज्यपालांनी हे कळविले आहे. सन २००६-२००७ या वर्षासाठी पॅकेजमधील अनुशेषग्रस्त जिल्ह्यांना उपलब्ध करुन देण्यात आलेला निधी तेथे खर्च होऊ शकला नाही व त्यातील कोट्यावधी रुपये त्या जिल्ह्यावाहेर वळविण्यात आले. **आपण प्रकल्प होऊच देणार नसू तर मग या १६३४५ कोटी रुपयातील आमचा न्याय्य वाटा आम्हाला द्या अशी मागणी करण्याचे काहीच कारण नाही. आजच्या १६३४५ कोटी रुपयातील सहभागाचा व समभागाचा उजेड पडत नसेल तर उद्याच्या ३४००० कोटी रुपयांचा व परवाच्या ५६००० कोटी रुपयांचा विचार तरी कशासाठी करायचा?**

*****

# संदर्भ


**संदर्भ क्रमांक १.** : "Symposium on, Integrated Approach to Management of Water & Soil of Purna River Basin with Special Reference to Salinity characteristics , February 2 - 4, 1996, Organized by VRCE Nagpur with Vidarbha Statutory Development Board Nagpur as the Principal Sponsor."

**संदर्भ क्रमांक २.** : "पूर्णा खोरे खारपाणपट्ट्यातील समस्यांचा अभ्यास व त्यांचे निराकरण या विषयावर कार्यशाळा दि. २० व २१ ऑक्टोबर २००१ स्थळ :- आकोट, जि. अकोला. आयोजक :- पूर्णा खोरे विकास मित्रमंडळ, अकोला"

**संदर्भ क्रमांक ३.** : "महाराष्ट्र शासन : महाराष्ट्र जल व सिंचन आयोग अहवाल खण्ड-२ उपखोरे निहाय नियोजन व व्यवस्थापन.- जून १९९९"

**संदर्भ क्रमांक ४.** : "विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील खारे पाणी पट्टा समस्या निवारणार्थ उच्चाधिकार समितीचा अहवाल, एप्रिल २००० - मे २००१"

**संदर्भ क्रमांक ५.** : "विदर्भातील पूर्णा खोऱ्यातील क्षारयुक्त जमिनी" विस्तार पुस्तिका २०००(८४) डॉ. पंजाबराव देशमुख कृषि विद्यापीठ, अकोला कृषि रसायनशास्त्र व मृदविज्ञान विभाग"

**संदर्भ क्रमांक ६.** : "All India Seminar on Interlinking of Rivers in India : 2006, 9-10 September 2006 Nagpur, Organised by The Institution of Engineers (India) Nagpur Local Centre and Indian Water Resources Society Nagpur Centre"

**संदर्भ क्रमांक ७.** : "Government of India : Ministry of Water Resources : National Water Policy : New Delhi April, 2002"

- इतर संदर्भ ग्रंथांची नोंद विवेचनामध्ये तिथल्या तिथे तपशीलाने केलेली असल्यामुळे येथे वेगळी नमुद केलेली नाही.

*सहपत्र : एक :* *: परिच्छेद ३४ पहा*

# पूर्णा नदीच्या खोऱ्यातील भूजल-क्षेत्राचा पुनर्प्रभारण व उपसा याद्वारे गोड भूजल-क्षेत्रात रुपांतरण व विकास

**१) प्रा. सुधाकर धबडगांवकर**, पर्यावरण अभियांत्रिकी **२) प्रा. रमेश इंगळे**, स्थापत्य अभियांत्रिकी
विश्वेश्वरय्या प्रादेशिक अभियांत्रिकी महाविद्यालय, नागपूर-४४० ०११.

*(Paper Presented at Workshop on Groundwater Recharge organized by Indian Water Resources society at Amravati, during February 1993.)*

**१) प्रस्तावना :-**

महाराष्ट्रातील अमरावती, अकोला व बुलढाणा जिल्ह्यात पूर्णा नदीच्या खोऱ्यातील जवळ जवळ २,५०० चौ. कि.मी. क्षेत्र खाऱ्या भूजलाने व्यापले आहे. खाऱ्या भूजलाचा प्रदेश साधारणतः अमरावती नजिकच्या वलगाव येथून सुरू होऊन पुढे पूर्णा नदीच्या दिशेने जवळ जवळ १२० कि.मी.पर्यंत लांब पसरला आहे. तसेच या पट्ट्याची रुंदी पूर्णा नदीच्या दोन्ही बाजूला एकत्रितपणे सरासरी २० ते २२ कि.मी. आहे. या पट्ट्याच्या भूजलातील क्लोराईडचे प्रमाण ५०० मि.ग्रॅ./लि. पासून २००० मि.ग्रॅ./लि. किंवा त्याहूनही अधिक आढळते. जसजसे पूर्णा नदीच्या पात्राकडे आपण येऊ तसतसे हे प्रमाण वाढत जाते.

१.२) ह्या प्रदेशातील मुख्यत्वे खाऱ्या पाण्याच्या समस्येमुळे जनता त्रस्त आहे. पिण्याचे पाणी गेल्या दशकापर्यंत दुर्मिळ होते. त्यासाठी नदी लगतच्या गावी ४ ते ५ कि.मी. एवढ्या अंतरावरुन विशेषतः स्त्रियांना डोक्यावर नदीतून पिण्याचे पाणी वाहून आणावे लागे. त्यासाठी फार कष्ट व वेळ लागत असे. पिण्याच्या पाण्याशिवाय इतर उपयोगासाठी सर्रास खाऱ्या पाण्याचा वापर करावा लागे. त्यासाठी खाऱ्या पाण्याच्या विहिरी आजही त्या भागात आहेत. महाराष्ट्र सरकारने नळाद्वारे खेडोपाडी पाणी पुरवठा योजना राबविल्यामुळे तूर्त पिण्याच्या पाण्याची समस्या थोडी कमी झाली आहे.

१.३) केंद्र सरकारचे सुद्धा आपल्या "पेयजल अभियान" योजनेद्वारा खाऱ्या पाण्याचे गोड पाण्यात रुपांतर करणाऱ्या सयंत्राचे पथदर्शक प्रयोग अमरावती तालुक्यात वायगाव येथे सुरू आहेत. परंतु त्याचा उत्पादन व देखभालीचा खर्च अवाढव्य आहे. ( ५ रुपये प्रति घन मिटर पेक्षाही जास्त) शिवाय त्यात शुद्ध पाण्याबरोबरच अधिक क्षारयुक्त निर्माण होणाऱ्या पाण्याच्या विल्हेवाटीचा प्रश्न समाधानकारक सुटत नाही.

१.४) एकंदरीत अजूनही पाहिजे तिथे मुबलक गोड पाणी उपलब्ध नाही, आणि म्हणूनच या भागात जमीन अत्यंत सुपीक असूनही फक्त खरीप (कोरडवाहू) शेतीच करतात. पाणी नाही म्हणून उद्योगधंदेही या भागात उभारता आले नाहीत. या सर्व बाबींमुळे या प्रदेशाचा विकास इतर भागाच्या तुलनेने झाला नाही.

१.५) **लेखक अमरावती जिल्ह्यातील मूळ रहिवासी असून या सर्व समस्यांशी परिचित आहेत. या भागातील खाऱ्या पाण्याची समस्या दूर केल्यास इथलाही सर्वंकष विकास ठामपणे साधता येईल असा विश्वास आहे. खाऱ्या पाण्याऐवजी या प्रदेशात गोड पाणी नेहमीकरता रुजविण्यासाठी एक असाधारण परंतु प्रत्यक्षात येण्यालायक योजना या प्रबंधात लेखकांनी मांडली आहे.** त्यासाठी लागणारा वेळ व पैसा सध्या जरी जास्त वाटत असला तरी समस्या कायमची दूर होत असल्याने व राष्ट्रीय दृष्टिकोनातून त्याकडे पाहिल्यास, तोच सर्वात उचित मार्ग आहे असे लेखकांनी या सम्मेलनात उपस्थित असलेले **जनतेचे प्रतिनिधी त्याचप्रमाणे इतर सर्व संबंधित संस्था, उच्चपदस्थ अधिकारी व तंत्रज्ञ यांना सांगण्याचा प्रयत्न केला आहे. त्यांनी या योजनेचा सरकारकडे योग्य पाठपुरावा करावा अशी अपेक्षा आहे.**

**पर्यावरणीय पार्श्वभूमी :-**

प्रस्तुत योजना मार्डण्याआधी या प्रदेशातील पर्यावरणीय पार्श्वभूमी थोडक्यात सांगणे आवश्यक आहे.

**२.१) खगोलीय :-**

पूर्णा नदीच्या खोऱ्याची लांबी जवळ जवळ १७० कि.मी. असून त्याची जास्तीत जास्त उंची सुमारे ३९५ मी. तर कमीत कमी अंदाजे २७५ मीटर आहे. या प्रदेशात पूर्णा नदी साहजिकच सर्वात खालच्या पातळीवरून वाहते. नदीच्या प्रवाहाच्या उजव्या बाजूने जमिनीचा उतार १:५० या प्रमाणात तर डाव्या बाजूने तो १:१०० या प्रमाणात आहे. नदीचा प्रवाह खोल असून जवळपास सर्व ठिकाणी नदीचे पात्र निरुंद आहे.

**२.२) भूशास्त्रीय :-**

पूर्णा नदी सातपुडा पर्वतापासून उगम पावते व ती पुढे तापी नदीला मिळून अंतीमतः अरबी समुद्रास मिळते. पूर्णा नदीच्या खोऱ्याचे तळ पूर्णतः बसाल्ट खडकाने व्यापले असून ते संपूर्णपणे नदीच्या गाळाने (जलौढ निक्षेपाने) भरले आहे. खोऱ्याच्या उत्तरेस गाळाची खोली सर्वात जास्त म्हणजे ४५० मी. एवढी तर दक्षिणेस ती फक्त ५० मी. आढळते असे नमूद केले आहे. या गाळात माती, साद (सिल्ट), वाळू, ग्रावा (ग्रॅव्हेल) व क्वचित टोळ (बोर्ल्डस) आढळतात.

**२.३) पर्जन्यवृष्टी व वाह :-**

पूर्णा नदीच्या खोऱ्यात साधारणपणे जुलै ते ऑक्टोबर दरम्यान पाऊस पडतो. खोऱ्याच्या पूर्व टोकाला पावसाची वार्षिक सरासरी सर्वात जास्त म्हणजे ८७५ मि. मि. एवढी आढळते तर पश्चिम टोकाला ती ६०० मि.मि. आहे. म्हणजे पावसाचे प्रमाण १ मि.मि. प्रति किलोमीटर या दराने पश्चिम दिशेने कमी कमी होत जाते. वार्षिक सरासरी पर्जन्यवृष्टीपैकी किमान ५० प्रतिशत वाह अपेक्षित आहे. त्यानुसार दरवर्षी कमीतकमी पर्जन्यवृष्टी व वाह ८७५ दशलक्ष घनमिटर पाणी पूर्णा नदीतून वाहून समुद्रास मिळते.

**२.४) भूजल :-**

भूजलाची खोली १.३ मी. ते २३.१ मी. पर्यंत आढळते. गाविलगड डोंगराजवळ भूजलाची खोली कमीत कमी तर पूर्णेच्या पात्राच्या दिशेने ती हळू हळू वाढत जाते. पूर्णा नदीच्या पात्राच्या आजुबाजूला मिळून २० ते २२ कि. मी. रुंद पट्ट्यातील भूजल खारे आहे. सोबत दिलेल्या आकृती क्र. १ मध्ये समान क्लोराईडचे प्रमाण दाखविणाऱ्या भूजल रेखा दाखविल्या आहेत. त्याच प्रमाणे आकृती क्र. २ मध्ये पूर्णा नदीचा आडवा छेद नमुन्यादाखल दिलेला आहे.

सदर प्रदेशात भूजल खारे कां असावे? या बद्दल भिन्न मते आहेत. त्यापैकी एका विचाराप्रमाणे, पूर्णा नदीचे खोरे व त्यानंतरचे तापी नदीचे खोरेही हा एकेकाळी अरबी समुद्राचाच भाग होता असे म्हटले आहे. परंतु कालांतराने ज्वालामुखीच्या उद्रेकामुळे व इतर तत्सम भूशास्त्रिय बदलांमुळे त्याचा अरबी समुद्राशी संबंध तुटला आणि त्या ठिकाणी सर्व गाळ साचला गेला. त्यामुळे समुद्राचे खारे पाणी पूर्णेच्या व तापीच्याही खोलगट भागात खाऱ्या पाण्याच्या सरोवराच्या रुपाने बंदिस्त राहिले.

दुसऱ्या मत प्रवाहानुसार क्षार या गावात सर्व दूर मिसळल्या गेले असून त्यामुळे भूजल खारे आहे असे मानले जाते.

आणखी काहीच्या मते या पट्ट्यात असलेल्या माती व साद यामुळे भूजल प्रवाह बंद होऊन पाणी जास्त काळ तिचे संपर्कात राहिल्यामुळे क्षारयुक्त बनते.

**संकल्पना :-**

पूर्णा नदीच्या खाऱ्या भूजल प्रदेशाचा तिथे गोड पाणी रुजवून कायापालट करण्याच्या संकल्पनेत पाण्याच्या मुख्यतः दोन गुणधर्माचा उपयोग करुन घेतला आहे.

**३.१) पाण्याचा क्षार विरघळविण्याचा गुणधर्म :-**

बाष्पीभवनानंतर द्रविभूत झालेल्या पाण्यात क्षाराचे प्रमाण नगण्य असते. हे पाणी क्षाराच्या संपर्कात येताच त्यात क्षार सहज विरघळतात. पावसाचे पाणीही जमिनीवर पडेपर्यंत जवळ जवळ शुद्धच असते. जमिनीवर वाहतांना किंवा त्यातून झिरपतांना मातीतील क्षार पाण्यात विरघळून ते क्षारयुक्त बनते. जमिनीत क्षाराचे प्रमाण जास्त असल्यास भूजल पिण्यायोग्य किंवा शेती योग्य राहत नाही.

**३.२) पाण्याचा त्याच्या क्षाराच्या प्रमाणानुसार स्तर राखण्याचा गुणधर्म :-**

पाण्यात जितके अधिक क्षार मिसळले असतील तितक्या प्रमाणात त्याची दार्ढ्यता (डेंसीटी) अधिक असते. कमी क्षार असलेले पाणी अलगद जास्त क्षाराच्या पाण्यावर सोडल्यास ते तसेच वरचा स्तर राखते.

समुद्राच्या पाण्यात साधारणपणे ४०,००० मि.ग्रॅ./लि. एवढे क्षार आढळतात व त्याची दार्ढ्यता १.०४ एवढी असते. त्यामुळेच समुद्र किनाऱ्या लगतच्या भूभागात गोड पाणी खाऱ्या पाण्यावर वरच्या स्तरात आढळते. त्याठिकाणी जर जमिनीतून गोड पाणी उपसण्यावर योग्य निर्बंध ठेवला तर खारे पाणी वर येऊ शकत नाही. म्हणून समुद्र किनारी खोलवर जरी खारे पाणी असले तरी वरचे भूजल गोड असते. याला प्रमुख कारण म्हणजे पाण्याची त्याच्या दार्ढ्यतेनुसार स्तर राखण्याची प्रवृत्ती.

**३.३) खाऱ्या पाण्याच्या जागी गोड पाणी रुजविण्याचे मार्ग :-**

पूर्णा नदीच्या खोऱ्यात भूजल खारे मिळण्याची कारणे काहीही असली तरी त्याची तीव्रता हळूहळू कमी करुन सरतेशेवटी त्यातील क्षाराचे प्रमाण उपयोगालायक मर्यादेपर्यंत राखण्यासाठी खाऱ्या पाण्याचा उपसा (पंपींग) व भूजल पुनर्प्रभारण (ग्राऊंड वॉटर रिचार्ज) यांचा समन्वय साधल्यास हे सहज शक्य आहे हे कोणासही पटेल. त्यामुळे क्षारयुक्त मातीतून पाण्यावाटे क्षार निघून जातील व कालांतराने ती क्षार विरहित बनेल.

**३.३.१) खाऱ्या पाण्याचा उपसा :-**

निसर्गतः सुद्धा काही प्रमाणात खाऱ्या भूजलाच्या भागात पावसाचे पाणी

सहपत्र : दोन :

: परिच्छेद ८९ पहा

# राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळण्याबाबत

**पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) मंत्र्यांचा ठराव**

*दुसरे अधिवेशन २००४ : शुक्रवार, दिनांक ४ जून २००४ : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३५, क्रमांक १०, पृष्ठ ८९ ते ११३*

**श्री. अजित घोरपडे** ( पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण महामंडळे) मंत्री ) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०६ अन्वये पुढील ठराव मांडतो :-

"ज्याअर्थी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्यातील २६६० पाटबंधारे प्रकल्प स्वबळावर बांधूनही राज्यात असलेल्या विशिष्ट भौगोलिक **परिस्थितीमुळे केवळ २२ टक्के सिंचनक्षमता निर्माण होऊ शकली आहे, परंतु देशाचे पातळीवर याच कालावधीत ५१ टक्के सिंचनक्षमता निर्माण झाली आहे,**

**आणि ज्याअर्थी, ४२ टक्के भूभाग अवर्षणप्रवण असलेल्या महाराष्ट्र राज्यास प्रस्तावित राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाद्वारे नगण्य लाभ होत आहे,**

**आणि ज्याअर्थी, देशातील सर्व राज्यांमध्ये उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करुन पाण्याद्वारे होणा-या सामाजिक व आर्थिक विकासाच्या समान संधी सर्व राज्यांना प्राप्त करुन देणे आवश्यक आहे,**

**आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात देशाच्या लोकसंख्येच्या १० टक्के लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्र आहे,**

त्याअर्थी, आता, केंद्र शासनाने प्रस्तावित केलेल्या रु. ५,६०,००० कोटी खर्चाच्या राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळावा या दृष्टीने सध्याच्या नद्याजोड प्रकल्पात आवश्यक ते तांत्रिक बदल करुन उत्तरेतील नद्यांचे पाणी महाराष्ट्रात येण्यासाठी व राज्यातील पाण्याची गरज आणि सिंचनक्षमतेचा विकास करण्यासाठी योग्य ती आर्थिक तरतूद केंद्र शासनाने उपलब्ध करावी असा ठराव महाराष्ट्राची विधानपरिषद एकमताने मंजूर करीत आहे. पाणी वाटपात झालेल्या अन्यायाबाबत या सभागृहाच्या सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या समस्येवर निश्चित स्वरुपाचे आश्वासन केंद्र शासनाने त्वरित द्यावे, **अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे."**

**श्री.गुरुनाथ कुलकर्णी** : सभापती महोदय, नदी जोडण्याच्या प्रकल्पा संबंधी शासनाच्या वतीने या ठिकाणी एक ठराव मांडलेला आहे.........

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, माझा औचित्याचा मुद्दा आहे. अतिशय महत्वाच्या विषयाच्या संदर्भात माननीय मंत्रिमहोदयांनी या ठिकाणी प्रस्ताव मांडलेला आहे.तो ठराव एकमताने केला पाहिजे या भावनेशी मी सहमत आहे.परंतु त्या ठरावातील विषयाचे गांभीर्य लक्षात घेऊन माननीय मंत्रिमहोदयांनी थोडक्यात माहिती सांगावयास पाहिजे होती. परंतु त्यांनी फक्त ठराव वाचून दाखवला आहे .............

**सभापती** : या ठरावाच्या समर्थनार्थ माननीय मंत्रिमहोदयांनी भाषण करावे.

---

झिरपतेच. परंतु दार्ढ्यतेनुसार स्तर राखण्याचा त्याच्या गुणधर्मामुळे ते वरच्यावर नदीकडे वाहून नेल्या जाते. खाऱ्या पाण्याचा काहीच उपसा नसल्यामुळे मातीतील क्षार विरघळवून वाहून नेण्याच्या पावसाच्या पाण्याच्या क्षमतेचा काही उपयोग करुन घेतला जात नाही. म्हणूनच पावसाचे पाणी जमिनीत जितके झिरपते त्याच प्रमाणात खाऱ्या पाण्याचा उपसा करुन ते पावसाळ्यात नैसर्गिक नाल्यात सोडल्यास आपल्याला पाहिजे तसा परिणाम साधता येईल. पावसाचे पाणी मुरून त्याचा उचित पुरवठा झाल्यास भूजलातील क्षाराचे प्रमाण दिवसेंदिवस कसे कमी होते याचा पडताळा आपल्याला खालील उदाहरणातून मिळतो.

**अमरावती तालुक्यातील चेंडकापूर येथे पूर्णा नदीच्या काठावर महाराष्ट्र पाणी पुरवठा व जल निःसारण मंडळाच्या कूपनलिका (ट्यूब वेल्स) गेल्या किमान ५ वर्षापासून कार्यरत आहेत. त्यातील कूपनलिका क्र. १३ ही ताशी ४५,००० लिटर्स या दराने पाणी उपसत आहे. सुरुवातीला म्हणजे १६.३.८८ रोजी त्यातील उपसलेल्या पाण्यात क्लोराईडचे प्रमाण ५००० मि. ग्रॅ./लि. एवढे होते. इतर काही पर्याय नसल्याने हे पाणी काही दिवस नदीत सोडून व त्यानंतर इतर पाण्याबरोबर मिसळून वापरले गेले. त्यानंतर जवळ जवळ ३ वर्षांनी दिनांक ३.११.९० रोजी तपासलेल्या पाण्यात फक्त ७०० मि. ग्रॅ./लि. एवढे कमी क्लोराईडस नोंदले गेले. हा झालेला बदल वर दिलेल्या संकल्पनेस पृष्ठी देतो. केंद्रीय भूजल मंडळाचाही असाच निष्कर्ष आहे.**

**३.३.२) कृत्रिम भूजल पुनर्प्रभारण :-**

खाऱ्या भूजल क्षेत्रातून निदान वरच्या ४-५ मी. थरातुन खाऱ्या पाण्याऐवजी त्या जागी गोड पाणी रुजविणे तसेच रुजविण्याचा वेग कृत्रिम भूजल पुनर्प्रभारणद्वारे अनेक पटीने व अधिक फायदेशीर रित्या वाढविता येणे शक्य आहे.

पूर्णा नदीचे काठ चांगलेच उंच असून नदीच्या पात्रातच योग्य ठिकाणी सद्वार बंधारे (बॅरेजेस) बांधल्यास त्यामुळे कृत्रिम भूजल पूनर्प्रभारणास मदत तर होईलच पण त्याच बरोबर, नदीजवळच्या क्षेत्रात गोडे पाणी देखील उपलब्ध होईल. नियोजित सद्वार बंधारे योग्य ठिकाणी बांधावे लागतील. त्याचप्रमाणे त्याची रचना परिस्थितीनुरुप वेगवेगळी राहील. तरीही त्यात खालील गोष्टी प्रामुख्याने राहतील.

(अ) पात्राच्या रुंदीनुसार सळईयुक्त सिमेंट कॉंक्रीटचा ५ ते ६ मी. उंचीचा सद्वार बंधारा

(ब) सद्वार बंधाऱ्याच्या प्रतिवाही (अपस्ट्रीम) व अनुप्रवाही (डाउनस्ट्रीम) बाजूने योग्य आपत्रे (ॲप्रान्स) व आधार भिंती (रिटेनिंग वॉल्स)

(क) सद्वार बंधाऱ्याच्या प्रतिवाही दिशेने योग्य रीतीने बांधलेली रोधीभींत (कटऑफ)

या क्षेत्रात सुमारे १०-१२ ठिकाणी असे सद्वार बंधारे घालावे लागतील. तांत्रिक दृष्टया हे छोटे छोटे साठे नदीच्या पात्रात करणे सहज शक्य आहे याचा सखोल विचार लेखकांनी केला आहे व त्या संबंधी कुणाशीही चर्चा करण्याची त्यांची तयारी आहे एवढेच येथे नमूद करावेसे वाटते.

**४) उपाययोजना :-**

या सबंधाने ज्या उपाय योजना कराव्या लागतील त्याचा आढावा थोडक्यात खाली दिला आहे.

(अ) खाऱ्या भूजल प्रदेशात सर्वेक्षण करुन खारे पाणी उपसण्यासाठी योग्य जागा निवडून त्या ठिकाणी कूपनलिका बांधणे.

(ब) साधारणपणे जुलै ते ऑक्टोबर या काळात वरील कूपनलिकाद्वारे पाणी उपसून ते पूर्णेला मिळणाऱ्या नैसर्गिक वाहिन्यांनमध्ये सोडणे.

(क) पूर्णा नदीवर योग्य जागा निवडून त्या ठिकाणी ४-५ मीटर पाणी थोपवून घरु शकतील असे सद्वार बंधारे बांधून पावसाळ्यातील वाह योग्य वेळी अडवून धरणे.

(ड) वेळोवेळी उपसल्या जाणाऱ्या पाण्याचे नियमन करुन पाण्याची प्रत तपासणे

(ई) जसजशी पाण्याची प्रत सुधारत जाईल त्याप्रमाणे त्याचा वापर जनतेसाठी खुला करणे.

**५) आर्थिक व सामाजिक मूल्यमापन :-**

५.१) आर्थिक -

हा कार्यक्रम राबविण्यास सुरुवातीला सुमारे २०० - २५० कोटी एवढा खर्च लागेल. परंतु केवळ ५-६ वर्षातच त्याचे फायदे दिसतील. आमच्या ढोबळ अंदाजानुसार १ घनमिटर गोड पाणी फक्त १.५० ते २.०० रुपयात मिळू शकेल. यामुळे ही योजना राष्ट्रीय दृष्टिकोनातून विचार केल्यास राबविण्यालायक आहे हे कोणासही पटेल.

५.२) सामाजिक -

**"समृद्धी : सलिला S धीना"**! समृद्धी पाण्याच्या आधीन असते. पाणी असेल तर शेती व इतर उद्योग धंद्यांना वाव मिळेल व त्यामुळे या क्षेत्राचा विकास होईल याबद्दल कुणाचेही दुमत असणार नाही असे वाटते.

**६) सारांश :-**

शास्त्रीय, आर्थिक व सामाजिक दृष्टिकोनातून या समस्येचा विचार केल्यास ही एक लोकोपयोगी योजना असून तिचा पाठपुरावा या भागाशी निगडित जनता, त्यांचे पुढारी, स्थानिक स्वराज्य संस्था तसेच स्वयंसेवी संघटनांनी व सरकारने केला पाहिजे असे आम्हाला वाटते. या प्रयत्नातून योग्य जलसंपत्ती अभावी उपेक्षित असलेल्या या भूभागाचा निश्चित विकास होईल असे लेखकांना कळकळीने सांगायचे आहे.

सुरुवातीला खाऱ्या भूजल क्षेत्राच्या प्रतिवाही टोकाला एक छोटा पथ दर्शक कार्यक्रम हाती घेतल्यास त्यासाठी आम्ही व आमची संस्था सर्वतोपरी सहकार्य करायला तयार आहोत.

******

.

**श्री.अजित घोरपडे :** सभापती महोदय, देशातील निरनिराळया विभागातील पाणी टंचाई लक्षात घेता या टंचाईवर मात करण्याच्या दृष्टीने केन्द्र सरकारने आंतर नदी जोड योजनेचा कार्यक्रम तयार केला आणि सदरहू कार्यक्रम हा दोन घटकात तयार करण्यात आला आहे. या कार्यक्रमाच्या माध्यमातून पाण्याची तूट ज्या राज्यात जास्त आहे त्या राज्यात पाणी पोहोचविणे हा केन्द्र सरकारचा हेतू या मागे दिसून येत आहे.सभापती महोदय, या कार्यक्रमाचे सकृतदर्शनी दोन घटक आहेत त्यातील एक घटक हा हिमालयीन आहे आणि दुसरा घटक हा पेन्नसुअलीन घटक आहे.....

**श्री.दिवाकर रावते :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे.नदी जोड प्रकल्पासंबंधीचा ठराव खालच्या सभागृहात आणि वरच्या सभागृहात एकमताने मंजूर करण्यासाठी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांच्यात निर्णय झाला आणि त्याप्रमाणे नदी जोड प्रकल्प कशासाठी करण्यात येत आहे या बाबतीत सिंचन विभागातर्फे एक पुस्तिका प्रकाशीत करण्यात आलेली आहे व ती काही सदस्यांना वितरित करण्यात आलेली आहे ही पुस्तिका अजून आम्हाला मिळालेली नाही.ती पुस्तिका आम्हाला मिळाली पाहिजे. सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांच्याकडे ती पुस्तिका आहे. ती पुस्तिका जोपर्यन्त आम्हाला मिळत नाही तोपर्यन्त आम्ही या ठरावासंबंधी कसे काय बोलणार ? ही पुस्तिका ताबडतोब उपलब्ध करुन देण्यात यावी.

**श्री.गुरुनाथ कुलकर्णी** (बसुन) : गट नेत्यांची एक बैठक बोलाविण्यात आली होती, तेथे ही पुस्तिका दिली गेली.

**श्री.मधुकर सरपोतदार :** सन्माननीय सदस्य श्री.गुरुनाथ कुलकर्णी यांनी सांगितले आहे की गट नेत्यांची एक बैठक बोलाविण्यात आली होती. गट नेत्यांना बोलाविण्यात आले होते, ही वस्तुस्थिती आहे. त्या बाबतीत मी आपल्याला सांगतो की गट नेत्यांची एक बैठक एक वाजता बोलाविण्यात आली होती.सभागृहाचे कामकाज सोडून आम्ही एक वाजता त्या बैठकीसाठी गेलो होतो आणि १.४५ पर्यन्त आम्ही वाट पाहिली परंतु ज्यांनी ही बैठक बोलावली होती ते मंत्री तेथे उपस्थित नव्हते.माननीय मंत्री श्री.अजित पवार त्या ठिकाणी उपस्थित होते. परतु माननीय उप मुख्यमंत्री उपस्थित नव्हते.माननीय उपमुख्यमंत्र्यांच्या दालनात ही बैठक बोलाविण्यात आली होती. परंतु पुष्कळ वेळ वाट पाहून सुध्दा ते न आल्यामुळे आम्ही पुन्हा सभागृहात आलो.त्यानंतर ही बैठक कधी झाली हे मला माहीत नाही. तत्पूर्वी आपल्या दालनात ही बैठक झाली होती आणि त्यावेळी असे ठरविण्यात आले होते की, सर्व गट नेत्यांना विश्वासात घेऊन आवश्यकता वाटली तर या विषयावर एकत्र बसून चर्चा करुन सर्वाचा एकमुखी प्रस्ताव यावा अशा सूचना करण्यात आल्या होत्या. परंतु असा कोणताही प्रयास वा प्रयत्न या शासनाने केलेला नाही. शासनाने स्वतंत्रपणे हा ठराव तयार केलेला आहे.दोन दिवसापूर्वी त्या ठरावाची प्रत माझ्याकडे आली होती. माझ्या एकटयाकडे हा प्रस्ताव आणि माहिती पाठवली होती. मी एकटा सर्व सन्माननीय सदस्यांना ही माहिती वाटू शकत नाही किंवा अनेक सन्माननीय सदस्य एकत्रितपणे बसून तो वाचू शकत नाही. आज अकस्मात या संबंधी चर्चेचा विषय कामकाजपत्रिकेत ठेवल्यामुळे तो चर्चेला आला. सन्माननीय सदस्यांना हा विषय वाचून नीट समजल्याशिवाय त्यावर चर्चा घेणे उचित होणार नाही. तेव्हा आता आपण सुरूवात केलेलीच आहे तर कमीत कमी माननीय राज्यमंत्र्यांनी सदनाला माहिती द्यावी की, हा प्रस्ताव नेमका काय आहे?

**श्री. अजित घोरपडे :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांचे म्हणणे योग्य आहे. तेव्हा या प्रस्तावाच्या प्रती सन्माननीय सदस्यांना ताबडतोब उपलब्ध करून देण्यात येतील तसेच यासंबंधात जी पुस्तिका काढण्यात आलेली आहे तिच्या प्रती देखील सन्माननीय सदस्यांना उपलब्ध करून देण्यात येतील. ..

**सभापती :** या ठरावाच्या प्रती .. जवळपास १०-१२ ओळींचा हा ठराव आहे तेव्हा त्याच्या प्रती आणि हा ठराव आपण का करीत आहोत त्याबाबतची माहितीवजा टिपण्णी सदस्यांना खरे तर अगोदर मिळावयास पाहिजे होती. या ठरावावर येथे चर्चा होणार आहे तेव्हा या ठरावाचे नेमके महत्त्व काय आहे, आपल्या राज्याच्या दृष्टीने त्यामध्ये काय आवश्यक आहे वगैरे माहिती सदस्यांना मिळाली तर चर्चेत भाग घेताना त्यांना सोयीचे होईल यात शंका नाही...

**श्री. पांडुरंग फुंडकर :** अध्यक्ष महाराज, किमान महाराष्ट्र सरकारला या संबंधात काय म्हणावयाचे आहे हे समजण्यासाठी तरी हा प्रस्ताव आणि त्यासोबत आपण म्हणता तशी माहिती संक्षिप्त स्वरूपात असली तरी चालेल, ती आली तर आम्हाला ती वाचता येईल आणि त्या आधारे आम्हाला येथे चर्चा करता येऊ शकेल.

**श्री. नितीन गडकरी :** अध्यक्ष महाराज, माननीय मंत्री महोदयांवर अन्याय होऊ नये म्हणून या बैठकीसाठी मी आणि सन्माननीय सदस्य श्री. सरपोतदार त्या चेंबरमध्ये गेलो होतो, काही कारणास्तव तेथे सन्माननीय डॉ. पद्मसिंह पाटील हेही आले होते. मात्र माननीय उपमुख्यमंत्री काही तेथे आले नव्हते. त्यानंतर मी तेथे या विषयावर करण्यात आलेले प्रेझेंटेशन समजावून घेतले. तेथे सन्माननीय श्री.गणपतराव देशमुख हे देखील आले होते आणि त्यांनीही हा विषय थोडा फार समजून घेतला. त्या दिवशी आपल्या सभागृहामध्ये थोडी गडबड झाली होती. पण तरीही मी तेंव्हा त्या प्रेझेंटेशनद्वारे जवळपास ७०-८० टक्के विषय समजून घेतला. तेथे त्यावेळेस लॅपटॉपवर प्रेझेंटेशन करण्यात आले होते. त्यामध्ये भारताचा नकाशा, हिमालयाचा भाग, नद्या जोडणी प्रकल्पामध्ये कोणकोणत्या नद्या जोडल्या जाणार आहेत, कशा प्रकारे त्या जोडल्या जाणार आहेत वगैरे दाखवून समजावून देण्यात येत होते. अध्यक्ष महाराज, या निमित्ताने मी आपल्याला सांगू इच्छितो की, अनेक देशांच्या पार्लमेंटमध्ये जाण्याची संधी मला मिळाली आहे. त्यावेळी देखील मला काही पहावयास मिळाले, अनुभवास आले त्यावरून मी मध्यंतरी सन्माननीय श्री.गोविंदराव आदिक आणि डॉ.पतंगराव कदम यांच्याशी देखील याबाबत बोलताना सांगितले की, असे काही विषय समोर येतात तेव्हा ते विषय सर्व सदस्यांना समजून घेण्याच्या दृष्टीने अशा काही सोयी आपल्याकडे असण्याची, करून घेण्याची गरज आहे. म्हणजे अशा विषयावर प्रस्ताव असेल तेव्हा सभागृहात देखील त्याबाबतचे प्रेझेंटेशन करण्याची, त्याबाबतची फिल्म, फोटोग्राफ्स वगैरे दाखवून सोप्या भाषेत सांगण्याची सोय असली पाहिजे जी बहुतेक सर्व ठिकाणी असते. आज चांगल्या प्रकारे टेक्नॉलॉजी उपलब्ध आहे तेव्हा २-४ लाखामध्ये ही सोय आपणास सहज करून घेता येऊ शकेल. अध्यक्ष महाराज, दिल्लीत पार्लमेंटच्या एका हॉलमध्ये अशी सोय उपलब्ध आहे. तेव्हा आज हे येथे शक्य नाही, पण उद्या, पुढे मागे असे विषय जेव्हा येथे येतील त्यावेळेस किंवा त्यापूर्वी सदस्यांच्या दृष्टीने प्रेझेंटेशन करण्यासाठी काही सोय आपण करून घेतली पाहिजे याही गोष्टीचा माननीय सभापती महोदय आपण विचार करावा. आता पुरते मी एवढेच सांगेन की, आता हा विषय सुरू झालेलाच आहे तेव्हा आपल्या प्रस्तावाची प्रत आणि माहितीची पुस्तिका काढून आम्हा सर्वांना ती नंतर वितरित करावी.

**श्री. अजित घोरपडे :** अध्यक्ष महाराज, माननीय विरोधी पक्षनेत्यांच्या सूचनेप्रमाणे माहिती पुस्तिका वितरित करण्याची मी व्यवस्था करतो.

**सभापती :** सन्माननीय विरोधी पक्षनेत्यांनी जी सूचना केली आहे त्याबाबत मी एवढेच सांगेन की, अशा प्रकारची अनुमती कोणी मागितली तर आम्ही ताबडतोब ती देऊ. शिक्षण-प्रशिक्षणाचा, माहिती करून घेण्याचा प्रश्न असेल तर त्याला कोणीही 'नाही' म्हणणार नाही.

**श्री. दिवाकर रावते :** अध्यक्ष महाराज, या संदर्भात सन्माननीय सदस्य श्री.सरपोतदार यांनी सांगितले ते बरोबर आहे. आपण गटनेत्यांची अशा विषया संबंधात बैठक घेतली हे बरोबर आहे आणि गटनेत्यांनी घेतलेल्या धोरणात्मक भूमिकेबद्दल आम्हीही त्यांचेशी सहमत असू. पक्ष म्हणून आमची त्याला बांधिलकी असते. परंतु एखादा असा विषय चर्चेला येतो तेव्हा तो गटनेत्यापुरता मर्यादित असू शकत नाही. तो सर्वांना समजला असला पाहिजे, कारण शेवटी त्याला त्यावर आपली मते मांडावयाची असतात. विविध भागातील प्रश्नांवर आपले मत सदस्याला मांडावयाचे असते, ते मांडण्यापूर्वी ते प्रश्न, तो विषय त्याने समजून घेतला पाहिजे. अन्यथा त्या विषयाची पुरेशी माहिती नसल्याचा, प्रश्न योग्य प्रकारे न मांडल्याचा दोष त्याचेवर येतो. आता हा नद्याजोडणी प्रकल्प आहे यामुळे महाराष्ट्रावर झालेला अन्याय आणि त्यासंबंधात नुकत्याच झालेल्या निवडणुकीमध्ये केले गेलेले राजकारण हे सारे फार मोठे होते. तेव्हा याबाबतची सर्व माहिती सदस्यांना उपलब्ध होणे उचित आहे, ते अगोदर आम्हाला मिळाले असते तर निश्चितच योग्य झाले असते, आम्हाला ते वाचून काढता आले असते.

**श्री. अजित घोरपडे :** अध्यक्ष महाराज, सन्माननीय सदस्यांच्या सूचनेप्रमाणे या संबंधात प्रेझेंटेशनची देखील व्यवस्था करण्यात येईल. एकंदरीत केंद्र शासनाने प्रस्तावित कार्यक्रमाचे दोन घटक केलेले आहेत. एक हिमालयीन घटक आणि दुसरा पिनसुल घटक. यामध्ये हिमालयीन घटकामध्ये महाराष्ट्राला कोणत्याही पध्दतीचा फायदा होऊ शकत नाही. पिनिनसुल घटकात तापी, नर्मदा, दमनगंगा इ. विभागातील पाण्यातील फक्त ६ टक्के लाभ महाराष्ट्रातील या भू-प्रदेशाला होत आहे. **महाराष्ट्राला कमी लाभ होत आहे, त्यामुळे महाराष्ट्राला जास्तीत जास्त पाणी मिळण्याच्या दृष्टीने केंद्र शासनाला या बाबत १० पत्रे पाठविलेली आहेत. महाराष्ट्राच्या भौगोलिक परिस्थितीमुळे जास्तीत जास्त लाभ महाराष्ट्राला मिळणे कठीण दिसून येत आहे.** त्यामुळे महाराष्ट्राने राज्यांतर्गत नद्या जोडणीचा कार्यक्रम तयार केला आहे. महाराष्ट्रात निरनिराळ्या भागात पाणी देण्याच्या योजना प्रलंबित आहेत, त्या योजना पूर्ण करण्याच्या दृष्टीने तसेच राज्यातील नद्या जोडण्याच्या दृष्टीने पैशाची आवश्यकता आहे. जी रक्कम केंद्र शासन त्यांच्या मूळ कार्यक्रमावर खर्च करीत आहे, त्यापैकी महाराष्ट्राचा भौगोलिक परसेंटजमधील वाटा तसेच लोकसंख्येचे जे परसेंटेज आहे, त्या प्रमाणे महाराष्ट्रातील इरिगेशन प्रकल्प पूर्ण करण्याच्या दृष्टीने १० टक्के वाटा महाराष्ट्राला मिळावा, अशी महाराष्ट्राची मागणी आहे. महाराष्ट्राने जे प्रकल्प प्रस्तावित केले आहेत, ते सर्वच भागातील आहेत. केंद्र शासनाने हा प्रकल्प तयार केला आहे, त्यामध्ये महाराष्ट्राने सुचविलेले प्रकल्प मी आपल्या माहितीकरिता वाचून दाखवित आहे. कृष्णा-भिमा जोड कालवा, नर्मदा-तापी जोड योजना , पैनगंगा वर्धा जोड योजना, कोयनेचे पाणी मुंबईपर्यन्त आणणे, खारियागुटी-नवासा जोड योजना, पोचंपाड धरणाच्या बॅकवॉटरवरुन गोदावरीच्या उपखो-यात म्हणजे मांजरा खो-यात पाणी आणणे. असे प्रकल्प यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहेत. राज्यातील सर्वच विभागांना न्याय देण्याच्या दृष्टीने हे सगळे प्रकल्प अंतर्भूत करण्यासाठी ५६ हजार कोटी शासनाने मागितले आहेत. वर्षे वाढत गेल्यामुळे आकडा ज्या पध्दतीने वाढत जाईल, त्याप्रमाणे टक्केवारीप्रमाणे तो आकडा वाढावा, असेही यामध्ये प्रस्तावित करण्यात आले आहे. सर्व भागातील जे अर्धवट प्रकल्प आहेत आणि इतर प्रकल्प आहेत, ते सगळे पूर्ण करण्यासाठी ही मागणी करण्यात आली आहे. सर्वच विभागातील १११७ प्रकल्प आहेत. यामध्ये कृष्णा खोऱ्यातील १२९, विदर्भ पाटबंधारे मंडळाकडील ९६ प्रकल्प, विदर्भातील १०२ प्रकल्प , तापी पाटबंधारे मंडळाकडील १४७ प्रकल्प, कोकण पाटबंधारे मंडळाकडील ३८ प्रकल्प आणि इतर

२१ प्रकल्प, गोदावरी पाटबंधारे मंडळाकडील २८४ प्रकल्प असे एकूण १११७ प्रकल्प पूर्ण करण्यासाठी या निधीचा उपयोग व्हावा, यासाठी ही मागणी यात करण्यात आली आहे. आणि त्याचबरोबर आणखी काही गोष्टींची निश्चितपणे दक्षता घेतली आहे. काही अनावश्यक अटी यापूर्वी लादल्या गेल्या आहेत. या महाराष्ट्राच्या भू-प्रदेशावरील उपलब्ध असलेल्या पाण्याचा मुक्तपणे वापर करण्याची मुभा महाराष्ट्राला असली पाहिजे. या पुढील काळात आणखी काही खोऱ्यातील उपलब्ध असलेले पाणी वळवून उपलब्ध केले जाईल ते पाणी सुद्धा त्या खोऱ्यामध्ये वापरण्याची परवानगी महाराष्ट्राला असली पाहिजे. अशा प्रकारची मागणी यानिमित्ताने शासनाने सादर केलेल्या प्रस्तावात करीत आहोत. त्याचबरोबर या पुढील काळात विशेषतः मराठवाडा, विदर्भातील जे प्रकल्प प्रलंबित आहेत ते प्रकल्प या माध्यमातून निश्चितपणे पूर्ण करता येतील. **आज केंद्र सरकारमध्ये शासन बदलल्यानंतर जे काही धोरण केंद्र सरकारपुढे आहे त्याबाबत सन्माननीय श्री. पवार साहेबांनी घेतलेल्या मिटींगमध्ये उल्लेख केला. आणि आपण जो दहा टक्के निधी मागत आहोत तो मागतांना केंद्र सरकारमार्फत तुमचे किती प्रकल्प तयार आहेत? तुमच्या किती योजना तयार आहेत? त्यांची विचारणा होणार. त्याकरिता या प्रस्तावाच्या माध्यमातून या योजना त्यांच्यापुढे सादर केल्या आहेत.** मराठवाडा आणि विदर्भातील प्रकल्प वाचून दाखविले आहेत आणि ते प्रत्यक्ष तयार आहेत. याठिकाणी उजनीच्या प्रकल्पाचा उल्लेख करण्यात आला. उजनीचे पाणी सोडण्यासाठी वेगळी योजना घेत आहोत. त्यामुळे योजनेचा फायदा होईल. वीज तयार केल्यानंतर कोयनेचे पाणी वशिष्ठी नदीमधून समुद्रात जाते. ते पाणी मुंबईपर्यंत आणण्यासाठी लागणारा ५ हजार कोटींचा खर्च यामधून करता यावा. आणि त्यामधून या संपूर्ण विभागाला पाणी मिळावे अशा प्रकारची ही योजना आहे. या माध्यमातून आपल्याला हे सर्वच प्रकल्प पूर्ण करता येणार आहेत. गोदावरीच्या उपखोऱ्यातून मांजराच्या खोऱ्यामध्ये पाणी आणणार आहोत. ते पाणी जालना, परभणी, नांदेड व हिंगोलीपर्यंत पुढे वापरण्याची परवानगी मिळावी, अशा प्रकारचा प्रस्ताव केंद्र सरकारकडे दिला आहे आणि म्हणून सभागृहाला विनंती करतो की, सभागृहापुढे असलेला हा ठराव एकमताने मंजूर करण्यात यावा.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मला या प्रस्तावाला सुधारणा सुचवावयाची आहे....

**सभापती :** माननीय सदस्यांनी या प्रस्तावाला सुधारणा दिली आहे.? मुळामध्ये ही सुधारणा आली कशी हा प्रश्न आहे? कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये असे ठरले होते की, सर्व गट नेत्यांची बैठक घ्यावी. दोन्ही सभागृहामध्ये मांडण्यात यावयाचा ठराव एकच असला पाहिजे हे ठरविण्याकरिता सर्व गटनेत्यांची बैठक घेण्याचे ठरविले. केंद्र सरकारकडे आपण करीत असलेली मागणी संपूर्ण राज्याच्या हिताच्या दृष्टीकोनातून आहे. ही मागणी करीत असतांना हा ठराव एकाच स्वरुपामध्ये एकमताने जाणे अत्यंत गरजेचे आहे. आपल्यासमोर जो ठराव आला आहे तो अशा चर्चेतून, अशा सहमतीने आला आहे असे मला वाटते.

**श्री.बी.टी.देशमुख :** अजिबात नाही. सभापती महोदय, आपण आता सांगितले, त्याप्रमाणे त्यादिवशी कामकाज सल्लागार समितीमध्ये चर्चा झाली होती. पण तेव्हा आमच्या समोर ठरावाचा मसुदा नव्हता. तो ठराव केव्हा ड्राफ्ट झाला आणि तो कोणी ड्राफ्ट केला आहे ते आम्हाला माहीत नाही आणि हे मला मुद्दाम क्लीअर केले पाहिजे. मी त्या वेळी झालेल्या कामकाज सल्लागार समितीमध्ये सदस्य म्हणून उपस्थित होतो आणि आपणही त्या कामकाज सल्लागार समितीच्या अध्यक्षस्थानी होता आणि त्यावेळी तेथे हा ठराव एकमताने द्यावा अशी चर्चा झाली होती. पण नंतर असेही ठरले होते की, सर्वांनी बसून तो ठरावाचा मसुदा तयार करावा. परंतू हा ठराव कसा झाला? कोणी केला? याची मला काहीही माहिती नाही.

**सभापती** : होय. सर्वांनी मिळून तो करावयाचा आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, त्यामुळे या सुधारणा सुध्दा एकमतानेच करु.

**सभापती** : मघाशी गटनेत्यांची बैठक वगैरे झाली , त्याचे काय ?

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, तो एक कौतुकाचा भाग आहे.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, त्या बैठकीला इरिगेशन विभागाचे दोन सचिव होते. ते आम्हाला सांगावयाचे. तेथे मंत्री आले, बसले आणि निघून गेले.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, आम्हाला तर कोणी बैठक बोलाविली? ती कोठे झाली हेही ठाऊक नाही. पण अशी बैठक घेतली नाही याचा राग नाही. पण आपण मघाशी जे सांगितले ते बरोबर आहे आणि त्यावेळी जे ठरले होते, त्या प्रमाणे झालेले नाही. त्यामुळे सुधारणा सुध्दा एकमतानेच होतील.

**सभापती** : आपल्याकडे एकमताने झाले, तरी सुध्दा विधानसभेमध्ये झालेला ठराव हा वेगळया स्वरुपाचा असणार ? हा ठराव तोच आहे का ?

**श्री.अजित घोरपडे** : सभापती महोदय, होय.

**सभापती** : आता या सभागृहासमोर जो ठराव आणलेला आहे, हा विधानसभेने पारीत केलेला ठराव आहे का ?

**श्री.अजित घोरपडे** : नाही. त्यात सुधारणा केलेली आहे.

**सभापती** : त्या सुधारणेसह हा ठराव आहे का ?

**श्री. अजित घोरपडे :** होय.

**सभापती** : सुधारणेसह ठराव पारित केलेला आहे का ? तो ठराव सुधारणेसह पारित केला म्हणजे तो एकमताने झालेला आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** आम्हीही एकमताने सुधारणेसह पारित करु.

**सभापती** : पण त्यामुळे काय होईल तर विधानसभेमध्ये झालेला ठराव आणि आपण जर याठिकाणी काही सुधारणा दिली आणि ती सुधारणा मान्य किंवा अमान्य झाली . . . .

**श्री.बी.टी.देशमुख :** ती सुधारणा तेही मान्य करतील. सुधारणा एकमताने मान्य करण्याची त्यांची तयारी आहे.

**सभापती** : कुठे ?

**श्री.बी.टी.देशमुख** : येथे सुध्दा.

**सभापती** : मग परत विधानसभेमध्ये ती सुधारणा जाईल.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, दोन स्वतंत्र सभागृह आहेत . . .

**सभापती** : दोन स्वतंत्र सभागृह आहेत हे मी गेल्या वेळेलाही मान्य केलेले आहे आणि मी मान्य करण्याचा प्रश्नच नाही. तशी ती आहेतच. पण हा जो विषय आहे, तो वेगळया प्रकारचा आहे. त्याकडे आपण वेगळया दृष्टीकोनातून पाहण्याची गरज आहे की, राज्य शासनाचे असे म्हणण्यापेक्षा राज्यातील जनतेचे, महाराष्ट्राचे . . . .

**श्री.बी.टी.देशमुख :** विदर्भ, मराठवाडा आणि कोकणासह.

**सभापती** : अर्थात. हे सगळे भाग, महाराष्ट्रातील जनतेचे प्रतिनिधीत्व करणाऱ्या दोन्ही सभागृहांना आज केंद्र शासनाकडे काही मागणी करावयाची आहे आणि जेव्हा केंद्र शासनाकडून आपल्याला काही मागावयाचे आहे, त्यावेळेला आपले मागणे हे एकाच स्वरुपामध्ये असले पाहिजे.

**श्री.बी.टी.देशमुख :** आणि यामध्ये सँक्टीटी असली पाहिजे. तो सर्व महाराष्ट्राचे मत व्यक्त करणारा ठराव असला पाहिजे.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, सर्वांनी मिळून केले पाहिजे आणि एकत्रित असले पाहिजे.

**सभापती** : अशा वेळी एका सभागृहाचा एक ठराव आणि दुस-या सभागृहाचा दुसरा ठराव असे होणार नाही याची आपण काळजी घेतली पाहिजे.

**श्री.बी.टी.देशमुख :** आपण याची काळजी घेऊ. आमची जी सुधारणा आहे ती ते मान्य करतील आणि जर केली नाही तर त्याचीही आम्ही काळजी घेऊ. पण आमचे ऐकून तर घेतले पाहिजे ना.

**सभापती** : ऐकून घेणे हा भाग वेगळा.

**श्री.बी.टी.देशमुख :** आमचे ऐकून घेतले पाहिजे आणि त्यांना ते मान्य झाले तर त्यांनी ते मान्यही केले पाहिजे.

**सभापती** : मग विधानसभेमध्ये जो ठराव पारित झाला आहे, त्याचे काय ?

**श्री.बी.टी.देशमुख** : त्यादिवशी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये जसे ठरले होते, तसे झाले नाही.

**सभापती** : तसे झाले नाही ही गोष्ट बरोबर नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** तसे झालेले नाही आणि ही दुर्दैवाची गोष्ट असली तरी झाले नाही.सर्वांना एकत्र बोलावून हा ठराव झालेला नाही. ठीक आहे, नाही झाला तर नाही झाला. आता माझे असे म्हणणे आहे की, हा सर्व महाराष्ट्राचा ठराव असला पाहिजे ना?

**सभापती** : अर्थात.

**श्री.बी.टी.देशमुख :** मग माझे म्हणणे असे आहे की, आमची सुधारणा आम्हाला मांडू द्यावी. आमचे म्हणणे ऐकून तर घ्यावे. म्हणजे बिईंग हर्डचेही भाग्य नसलेले या महाराष्ट्रात काही लोक आहेत असे होणार नाही.

**सभापती** : माझी आपल्याला विनंती आहे की, आपल्याला भाषण करताना जे काही मांडावयाचे आहे, ते मांडू शकता. ते स्वातंत्र्य आपल्याला आहे. परंतु आपण जी सुधारणा दिलेली आहे, ती सुधारणा स्विकृत केल्यानंतर, याठिकाणी ती मतदानासाठी मांडल्यानंतर जर ती मान्य झाली . . . .

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, अशी कशी मान्य होईल? किंवा होणार नाही जर मान्य झाली तर ती एकमतानेच मान्य होईल. विदर्भ, मराठवाडा व कोकणाला कोण विरोध करील? माझे म्हणणे असे आहे की, असे प्रिझ्युम करुन जर आमच्या . . . .

**सभापती :** प्रिझ्युम नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, काही भागांना त्यांचे मत मांडण्याची सुध्दा. . .

**सभापती :** आपल्याला भाषण करताना मत मांडण्याचा पूर्णपणे अधिकार आहे.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मत मांडण्याचा अधिकार आहे पण नुसते बोलून काही उपयोगाचे नाही. त्या बोलण्याला आधारभूत सुधारणा नको का? आमच्या पिढयानपिढया यामध्ये फसलेल्या आहेत.

**सभापती :** आपल्याला भाषण करताना आपले म्हणणे पूर्णपणे मांडण्याची परवानगी राहणार आहे. त्याला काही अडकाठी नाही.

**श्री.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ती सुधारणा मांडल्याशिवाय मत कसे मांडणार? नुसते बोलण्याला काय अर्थ आहे?

**सभापती :** असे काही नाही. या ठरावावर भाषण करतांना आपण त्यामध्ये म्हणू शकता की, या, या गोष्टी यामध्ये अभिप्रेत आहेत. आम्ही अभिप्रेत आहेत असे समजतो, मंत्री महोदयांनी आपल्या उत्तराच्या भाषणात 'होय', 'नाही', जे काही म्हणावयाचे आहे ते सांगावे.

**श्री.बी.टी.देशमुख : अमेंडमेंड मांडल्याशिवाय मला माझे म्हणणे मांडता येणार नाही. तसे मी मांडणार नाही.**

**सभापती** : असे काही नाही. हा ठराव मंत्री महोदयांनी मांडला, त्याच्यावर भाषण करतांना सन्माननीय सदस्य आपले म्हणणे मांडू शकतात.

**श्री.नितीन गडकरी :** यावर उपाय असा आहे की, आम्ही मांडलेल्या अमेंडमेंटमुळे केंद्र सरकारकडे तसा ठराव नेण्यामध्ये अडचण येणार असेल, तर सरकारने आमची अमेंडमेंट प्रिन्सिपली स्वीकारली म्हणून जाहीर करावे आणि केंद्र सरकारकडे पाठवावयाच्या प्रस्तावाचे ड्राफ्टींग जे आहे, ते विधानसभा आणि विधानपरिषदेने मिळून जो काही ठराव करायचा आहे, तो पाठवावा. त्यासोबत आमच्या अमेंडमेंड पाठवू नये. परंतु प्रिन्सिपली आम्ही मांडलेल्या अमेंडमेंट मान्य केल्या, एवढे तरी रेकॉर्डवर राहू द्यावें. सभापती महोदय, आपल्या मनात भीती आहे की, केंद्र सरकारकडे ठराव पाठवत असतांना, विधानसभा एक म्हणते आणि विधानपरिषद एक म्हणते, अशी कॉन्ट्रव्हर्सी होईल. परंतु असे होणार नाही. आम्ही अशाप्रकारची कोणतीही अडचणीची सूचना देणार नाही. आम्हालाही स्पिरीट कळते. आपण महाराष्ट्राच्या हिताकरिता सगळयांनी मिळून एक ठराव पाठविला पाहिजे, हे मान्य आहे. त्याचबरोबर या संदर्भामध्ये आमचे जे दुःख असेल ते मांडावे, ते सरकारसमोर आणावे आणि सरकारने ते प्रिन्सिपली मान्य करावे आणि त्याबाबत आम्हाला सांगावे की, ठराव पाठवत असतांना केंद्र सरकारकडे आपले मुद्दे नेण्यापेक्षा यातील वरचे प्रियंबल तेवढे नेतो. तुमचे म्हणणे प्रिन्सिपली मान्य करुन आम्ही ठेवतो, ते पुढे नेणार नाही, असे सांगावे. आम्ही त्यास मान्यता देऊ.

**सभापती** : यामुळे यामध्ये कॉंप्लिकेशन होतील.

**श्री.गुरुनाथ कुलकर्णी :** सन्माननीय विरोधी पक्ष नेते आणि सभागृहाचे ज्येष्ठ सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी आपले म्हणणे मांडले. हा ठराव मांडण्यामागचा उद्देश हा दोन्ही सभागृहाचा ठराव हा आयडेंटीकल असला पाहिजे,असा आहे.

**श्री.नितीन गडकरी :** खालच्या सभागृहाने ज्या काही दुरुस्त्या सुचविल्या त्या मान्य केलेल्या आहेत. मग आम्ही याला सुधारणा मांडायच्या नाहीत काय, आमचे म्हणणे ऐकून घ्यायचे नाही काय ? मंत्र्यांनी मांडलेल्या ठरावावर नुसतेच आम्ही 'होय' असे म्हणायचे काय ?

**श्री.गुरुनाथ कुलकर्णी :** या ठिकाणी मंत्री महोदयांनी जो ठराव मांडलेला आहे, तो खालच्या सभागृहाने ज्या दुरुस्त्या केल्या, त्या दुरुस्त्या मान्य करुन फायनल या ठिकाणी ठराव मांडलेला आहे, हे खरे आहे काय ?

**श्री.अजित घोरपडे** : तसा तो नाही.

**श्री.नितीन गडकरी :** एवढे जर होते तर मुख्यमंत्री किंवा सभागृहाच्या नेत्यांनी सर्व पक्षांच्या नेत्यांची बैठक बोलावून, आमच्याशी चर्चा करुन मसुदा तयार करावयाचा होता. माझी विनंती आहे की, जर अशाप्रकारची चिंता होती, तर दोन्ही सभागृहाचे विरोधी पक्षनेते, गट प्रमुख, मा.मुख्यमंत्री, उपमुख्यमंत्री आणि संबंधित मंत्री यांची एक बैठक बोलवावयाची होती आणि एक कॉमन ठरावाचा मसुदा तयार करुन त्याबाबतचा निर्णय घ्यावयाचा होता. सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांना निमंत्रक म्हणून त्यांनाही बोलाविता आले असते. परंतु त्याबाबत आम्हाला काही विचारले नाही, तशी बैठक घेऊन ठरावाचा मसुदा तयार केला नाही. मग कसे होणार ?

**सभापती** : मंत्रीमहोदय, आपण जो ठराव वाचला, त्या ठरावामध्ये खालच्या सभागृहातील सदस्यांनी भाषणे करुन काही सुधारणा सुचविल्या आणि त्या स्विकृत करुन तयार झालेला परिपूर्ण स्वरुपाचा हा ठराव आहे काय ?

**श्री.अजित घोरपडे :** तसे झालेले नाही. पहिल्यांदा ठराव सर्क्युलेट केला तोच खालच्या सभागृहामध्ये मांडला, त्यानंतर दोन सूचना आल्या, त्यानंतर परत अमेंडमेंट मान्य करुन ठराव मांडला आणि तो स्विकृत झाला. त्याचीही माझ्याकडे प्रत आहे.

....(अडथळा)....

**सभापती** : खालच्या सभागृहाने स्विकृत केलेल्या सुधारणेसह तो ठराव येथे आपण का मांडला नाही ?

**श्री.अजित घोरपडे :** मूळ ठराव सर्क्युलेट केला होता. त्यावर खालच्या सभागृहात चर्चा झाली. त्याप्रमाणे येथे सर्क्युलेट केलेला ठराव हा पहिल्यांदा मांडला पाहिजे, अशा पध्दतीची तरतूद असल्यामुळे तो मी पहिल्यांदा मांडला.

**सभापती** : या ठिकाणी ठराव मांडताना खालच्या सभागृहामध्ये सुधारणेसह मान्य झालेला ठराव येथे यायला पाहिजे.

**श्री.अजित घोरपडे :** सर्क्युलेट केलेला ठराव हा पहिल्यांदा मांडला गेला पाहिजे...

**सभापती** : सर्क्युलेट करणे वेगळे आणि प्रत्यक्ष मांडणे वेगळे. आपण जो ठराव वाचून दाखविला तो पहिला आहे की, दुसरा आहे.

**श्री.अजितराव घोरपडे :** सर्क्युलेट केलेला ठराव मांडला त्यानंतर खालच्या सभागृहामध्ये सुधारणा करुन मान्य झालेला ठराव मी मांडणार होतो.

**श्री.बी.टी.देशमुख : खालच्या सभागृहामध्ये सुधारणा सुचविता येतात? आणि त्या तेथे मान्य होतात. आता त्या आम्ही मान्य करायच्या? आम्हाला येथे सुधारणा का करता येणार नाहीत? असे कसे होईल? आमची सुधारणा आम्हाला मांडू द्या. या सभागृहाला ती मान्य होईल किंवा अमान्य होईल.**

**श्री. दिवाकर रावते :** सभापती महोदय, माझा हरकतीचा मुद्दा आहे. साधारणतः प्रस्तावामध्ये काही त्रुटी जाणवतात म्हणून उपसूचना दिली आणि ती उपसूचना वाचली सुध्दा नाही.या प्रस्तावात काय म्हटले हे सुध्दा सभागृहापुढे आले नाही.मग आम्ही तो स्विकारावयाचा की नाही? मूळात खालच्या सभागृहामध्ये जो ठराव मान्य झाला तो मान्य केला पाहिजे आणि आम्ही तो करणारही आहोत.परंतु खालच्या सभागृहामध्ये ज्या सूचना स्वीकारल्या त्या येथे आल्या पाहिजे परंतू त्या मांडल्याच नाहीत. मूळात शासनाला हा ठराव मांडण्याबाबत गांभीर्य नाही.या शासनाला कदाचित हा प्रस्ताव तसाच मान्य करावयाचा आहे.तेव्हा आमची जी उपसूचना आहे ती वाचू द्या आणि आम्हाला त्यावर बोलू द्या.

**सभापती** : त्या दिवशी कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये मी सांगितले होते आणि साधारणतः सर्वानी ते मान्य केले होते की,राज्याच्या वतीने आपण केंद्राकडे ज्यावेळेला एखादी मागणी करतो ती एकमुखी असली पाहिजे. आपण राज्याच्या जनतेच्या वतीने जेव्हा केंद्राकडे काही मागतो आणि त्यांसबंधीचा आपला ठराव किंवा मागणी आहे ती एकमुखी असली पाहिजे. यासाठी दोन्ही सभागृहाच्या गट नेत्यांची एकत्र बैठक घ्यावी असे मी सांगितले होते. यासंबंधी केंद्र सरकारकडे पाठवावयाचा जो ठराव आहे तो दोन्ही सभागृहाचा एकच ठराव असला पाहिजे आणि तो काय असावा यासंबंधीचा ड्राफ्ट जो आहे तो आपण एकत्र बसून चर्चा करुन ठरवावा म्हणजे तो सभागृहात आल्यानंतर त्यावरील चर्चेत काही मतभेद होण्याचा प्रश्न येणार नाही.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय, आपण म्हणता त्याप्रमाणे कॉमन ठरावाच्या प्रस्तावाचा विषय आला नाही आणि चर्चा झाली नाही. पाटबंधारे खात्याचे फक्त दोन सचिव होते आणि ते मात्र दिवसभर बसले होते.सरकारचा कोणीही मंत्री नव्हता.आपण असा असा ठराव करु,त्यातील हे हे शब्द आपल्याला चालेल काय असे काहीही आम्हाला विचारले नाही. आम्ही फक्त त्या सचिवांकडूनच समजून घेतले.

**सभापती** : याचा अर्थ विधानपरिषदेच्या कामकाज सल्लागार समितीमध्ये जे ठरले **त्याची अंमलबजावणी झाली नाही आणि त्यामुळे अशाप्रकारचा प्रसंग निर्माण झाला आहे. तेव्हा पहिल्यांदा हा जो गुंता यामध्ये निर्माण झाला आहे तो आपल्याला सोडविला पाहिजे.त्याशिवाय याठिकाणी या विषयावर चर्चा सुरु करण्यामध्ये काही अर्थ आहे असे मला वाटत नाही.**

**श्री.गुरुनाथ कुलकर्णी :** या संदर्भातील ठरावाचे वाचन मा.मंत्रिमहोदयांनी केलेले आहे आणि दुसरा जो खालच्या सभागृहामध्ये दुरुस्त्यांसहीत ठराव संमत झाला आहे तो या सभागृहामध्ये त्यांनी ठेवावा म्हणजे त्या अनुषंगाने जी चर्चा होईल ती आयडेन्टीटीकल चर्चा होऊ शकेल.

**श्री.अजित घोरपडे :** सभापती महोदय, मी दुरुस्त केलेला ठरावच मांडत आहे.

**सभापती** : दुरुस्त्या मांडण्याचा प्रश्न येत नाही.दुरुस्तीसह खालच्या सभागृहामध्ये जो ठराव झाला तो ठराव मांडला पाहिजे.

**श्री.अजित घोरपडे** मी तोच मांडतो आहे.

**सभापती** : तुम्ही तर तो सर्क्युलेट केलेला आहे म्हणता.

**श्री.अजित घोरपडे** : सर्क्युलेट केलेला आहे. मी हा ठराव वाचला नसता तर त्याला ऑबजेक्शन्स आले असते.

**श्री.नितीन गडकरी :** सभापती महोदय,यामध्ये ४५मिनिटे गेलीत. विधान सभेमध्ये जो ठराव मांडला त्याच्या दुरुस्त्या जोडून तो अंतिम ठराव सभागृहासमोर सादर व्हायला पाहिजे.आता जुने वर्ष संपले आहे. विधान सभेमध्ये दुरुस्त्यांसह मंजूर झालेला ठराव येथे मांडायला पाहिजे.आतापर्यन्त यामध्येच ४५ मिनिटांचा वेळ गेलेला आहे.पुन्हा तुम्ही चुकीचे समर्थन करता. यामध्ये आता पर्यंत ४५ मिनिटे वेळ गेलेला आहे.

**श्री. विक्रमसिंह पाटणकर :** सभापती महोदय, मला आपल्या निदर्शनास आणून द्यावयाचे आहे की, जो मूळ ठराव होता तो प्रथेप्रमाणे वाचणे गरजेचे आहे अशी समजूत असल्यामुळे..

**श्री. नितीन गडकरी :** असे तुम्हाला कोणी सांगितले?

**श्री. विक्रमसिंह पाटणकर :** असे नियमात असल्यामुळे .....

**श्री. नितीन गडकरी :** असे कोणत्या नियमात आहे. मूळ प्रस्ताव वाचा असे माननीय सभापतींनी तुम्हाला सांगितले काय?

**श्री. विक्रमसिंह पाटणकर :** प्रथेप्रमाणे मूळ ठराव वाचणे गरजेचे आहे अशी समजूत असल्यामुळे मंत्रिमहोदयांनी तो मूळ ठराव वाचून दाखविला. परंतू खालच्या सभागृहात त्याच्यामध्ये काही दुरुस्ती होऊन किंवा काही ॲडिशन होऊन प्रस्ताव आलेला आहे तो प्रस्ताव वाचून दाखविला की, प्रश्न मिटतो. मग आपल्याला पुढे चर्चा करायला काय हरकत आहे.

**सभापती** : खालच्या सभागृहाने मूळ प्रस्तावामध्ये काही दुरुस्ती केलेलीच आहे.

**श्री. विक्रमसिंह पाटणकर :** खालच्या सभागृहाने काही दुरुस्ती केलेली असेल तर मंत्रिमहोदय, तो प्रस्ताव पुन्हा येथे वाचून दाखवतील. तो वाचण्यास आपल्याला काय हरकत आहे. सभापती महोदय, कोणत्या प्रस्तावावर चर्चा करायची यासंबंधीचा निर्णय आपण द्यायचा आहे.

**प्रा. बी. टी. देशमुख :** त्यामुळे आणखी प्रश्न निर्माण होतात. सभापती महोदय, आपण म्हणालात तसे काही झालेले नाही. तेथे उपस्थित असणाऱ्यांना अधिकाऱ्याने आमच्यापैकी कोणाला बोलावले, बोलावले नाही हा काही आता जाहीर बोलण्याचा भाग नाही. पण तो विषय निघाला म्हणून मी सांगतो. माझे

म्हणणे असे आहे की, अजेंड्यावर जे सर्क्युलेट झाले. त्याला आम्ही अमेंडमेंट दिली. आता मध्येच अचानक काही नवे वाचले तर त्याला आम्ही कशी काय अमेंडमेंट द्यायची?म्हणजे आमच्यावर दुहेरी अन्याय होतो. बिईंग हर्ड एवढा तर अधिकार ठेवा. आमची सुधारणा मांडून आमचे म्हणणे सभागृहाने ऐकून घेणे एवढाही अधिकार आम्हाला नाही काय? दिवसाच्या कामकाज पत्रिकेत जो ठराव वितरित झाला त्याला १० वाजण्याच्या आत आम्ही सुधारणा दिली. आय वॉज शॉक्ड् ॲन्ड सरप्राईज्ड. आमची अपेक्षा होती की, त्या दिवशी ठरल्याप्रमाणे रेझोल्यूशन ज्या वेळेला होईल त्या वेळेला some of us would be consulted सभापती महोदय, एकदा कन्सल्ट झाल्यावर, मी सहभागी झाल्यानंतर माझे चुकले तर तसे मीजाहिर पणे म्हणणारा माणूस आहे. येथे तसे झालेले नाही. जो ठराव आजच्या दिवसाच्या कामकाज पत्रिकेत सर्क्युलेट झाला त्याला आम्ही १० वाजण्याच्या आधी सुधारणा दिली. आता वेळेवर तुम्ही दुसराच काही ठराव घेऊन याल तर त्यात आमच्या सुधारणेचे फिटींग कसे काय होणार आहे? हे योग्य नाही. सभापती महोदय, माझे म्हणणे असे आहे की, मा. मंत्रिमहोदयांनी ठराव मांडलेला आहे. त्याला माझी सुधारणा मला मांडू द्यावी. नंतर ते काय करतील ते पुढे पाहू.

**श्री. मधुकर सरपोतदार** : सभापती महोदय, जो प्रस्ताव या ठिकाणी सर्क्युलेट केलेला आहे, त्या प्रस्तावाला सुधारणा देण्यात आली. ती सुधारणा आपण स्विकारणार की स्विकारणार नाही हा प्रश्न महत्वाचा आहे. ती सुधारणा स्विकारण्यात येणार असेल तर ती मांडण्यास हरकत नाही. पण ती सुधारणा जर स्वीकारण्यात येणार नसेल तर ती कोणत्या कारणामुळे स्विकारण्यात येणार नाही याबाबतीत सदनाला कळले तर हा विषय संपेल. मूळ प्रस्तावाला नवीन सुधारणा दिल्यामुळे कुठे धक्का बसतो काय, त्यामुळे काही नुकसान होते काय हे सभागृहाला कळेल. नाही तर हा विषय असाच सुरु राहणार आहे.

**प्रा. बी. टी. देशमुख** : माननीय अध्यक्ष महोदय, मा. सरपोतदार साहेबांनी जी सूचना मांडलेली आहे ती बरोबर आहे. जी सुधारणा दिलेली आहे ती ऑर्डरमध्ये आहे की नाही हे आपण सांगावे. आम्ही पाच-सहा सदस्यांनी ती सुधारणा ऑर्डरमध्ये मांडलेली आहे. आपण सांगितले मांडलेली नाही, ती अस्विकृत झाली तर मी आपल्याकडे परवानगी मागेन की, भाषणाचा एक भाग म्हणून आम्हाला ती सुधारणा वाचून दाखवू द्या. **ती सुधारणा या ठिकाणी वाचून दाखवून निषेध करुन आम्ही सभागृहातून निघून जावू. दिलेल्या सुधारणेच्या बाबतीत फॉर्मॅलिटी कम्प्लीट झाली पाहिजे. सरपोतदार साहेब म्हणतात त्या प्रमाणे सभागृहाचे कामकाज पुढे चालले पाहिजे. सभागृहाचे कामकाज जेथल्या तेथे थांबले आहे. असे कसे चालेल?**

**सभापती** :याबाबतीत सुरुवातीला जे सांगितले होते आणि जे ठरलेले होते त्याप्रमाणे कां घडले नाही हे पाहिले पाहिजे.

**श्री. नितीन गडकरी** : सभापती महोदय, आपण सांगत आहात ते अत्यंत योग्य आहे. आपल्या विचाराशी मी १०१ टक्के सहमत आहे. सभापती महोदय, जितक्या जबाबदारीने आपण देश हिताची चिंता करता, विचार करता, तितक्या जबाबदारीने या सरकारमधील कोणी विचार करीत नाही. कोणी भेटत नाही, कोणी ड्राफ्टींग दाखवत नाही. कोणी मिटींग करीत नाही. कोणाला त्याची चिंता नाही. काय होत आहे ते होऊ द्या. आला रे आला, गेला रे गेला असे चालू आहे. सभापती महोदय, आपण यांची किती चिंता वाहणार.

**सभापती** : निदान केंद्र सरकारकडे राज्याच्या जनतेच्या वतीने, जनतेचे प्रतिनिधी या नात्याने या दोन्ही सभागृहांचे म्हणणे एकमुखाने, एका शब्दामध्ये जाणे आवश्यक आहे. येथील कायदे करीत असतांना आपले होणारे वेगवेळया प्रकारचे मतभेद, त्याला येणा-या दुरुस्त्या, सुधारणा हे सगळे मी समजू शकतो. परंतू केंद्र सरकारकडे राज्यातील जनतेच्या वतीने जेव्हा आपण ठराव रुपाने एखादी मागणी करीत आहोत त्यावेळेला तो ठराव एकमुखाने झाला पाहिजे.

**श्री. बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, आपण जी भावना व्यक्त केली त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. आमच्या त्या सुधारणेचे काहीही होवो पण आपण ठराव एकमुखाने पाठवू. कितीही अन्याय झाला तरी महाराष्ट्राच्या हिताचा ठराव जाताना माझ्या दृष्टीने मला जर विचारले तर तो एकमुखाने जावा असेच मी म्हणेन. **तो ठराव सुधारणेसह जाईल किंवा सुधारणेशिवाय जाईल, परंतु सुधारणा मांडण्याचा सुद्धा आम्हाला अधिकार नसेल तर मग तो मौत का कुआच आहे.**

**श्री. शिवाजीराव देशमुख** : सभापती महोदय, या ठरावाच्या निमित्ताने जी चर्चा चालू आहे त्यामध्ये कामकाज सल्लागार समितीच्या बैठकीमध्ये जे काही ठरले त्या अनुषंगाने गटनेत्यांची बैठक एकत्रित, व्यवस्थित होऊन या ठरावाचे ड्राफ्टींग झाले असते तर ही शंकाच या सभागृहामध्ये उपस्थित झाली नसती. खालच्या सभागृहामध्ये जो ठराव मांडला गेला त्याला एकदोन सुधारणा स्वीकारल्या आणि त्या ठिकाणी याबाबतीत तो ठराव तयार झालेला आहे. त्या ठरावाच्या माध्यमातून संपूर्ण महाराष्ट्राचे हित डोळयासमोर ठेऊन केंद्र सरकारकडे राज्याच्या दोन्ही सदनाची, संपूर्ण महाराष्ट्राची भूमिका मांडावयाची आहे. यापूर्वी असे अनेक प्रसंग आले त्यावेळी विरोधी पक्ष आणि सत्ताधारी पक्ष यांनी राज्याचे हित डोळयासमोर ठेऊन त्या पध्दतीने एकमताचे ठराव केले. माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख, सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते आणि अन्य विरोधी पक्षाचे सहकारी आहेत **त्या सर्व सहकाऱ्यांना माझी विनंती आहे की, ही तांत्रिक चूक झाली म्हणा, गफलत झाली म्हणा, त्या पध्दतीने पूर्वी ते व्हावयास पाहिजे होते परंतु दुर्दैवाने ते झालेले नाही** पण तरीही महाराष्ट्राचे हित डोळयासमोर ठेऊन आणि संपूर्ण महाराष्ट्रामध्ये या पध्दतीचे विचार जाण्याची शक्यता आहे ते टाळण्याच्या दृष्टीने सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख किंवा माननीय विरोधी पक्ष नेते यांचे विचार मानून मी त्यांना आपल्यामार्फत विनंती करीन. की, खाली जी सुधारणा झाली त्या सुधारणेसह जो ठराव आहे तो एकमताने मंजूर करणे हेच खऱ्या अर्थाने महाराष्ट्राचे हित असेल असे मला वाटते. म्हणून माझी माननीय विरोधी पक्ष नेते किंवा सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख आणि अन्य सहकाऱ्यांना विनंती आहे की, विधानसभेमध्ये सुधारणेसह ठराव झालेला आहे तो ठराव या ठिकाणी आपण मंजूर करु या.

**सभापती** : एकमताने करु. परंतू प्रश्न असा आहे की, त्याला सुधारणा आहेत. पहिल्यांदा त्या स्वरुपात मंत्रिमहोदयांनी तो ठराव मांडला पाहिजे. विधानसभेमध्ये अंतिमतः जो ठराव मंजूर झाला त्या स्वरुपामध्ये सभागृहामध्ये ठराव मांडला गेला पाहिजे.

**श्री. बी.टी.देशमुख : पहिला जो शासनाचा ठराव दिवसाच्या कामकाजपत्रिकेमध्ये मांडला आहे त्याचे आधी काही तरी करावे लागेल. पुढचा ठराव तर आम्ही अजून पाहिला सुद्धा नाही.**

**सभापती** : मग मंत्र्यांना असे म्हणता येईल की, मी आधी जो ठराव वाचून दाखविला तो मुळात विधानसभेसमोर मांडलेला ठराव होता परंतु विधानसभेत यासंबंधी काही चर्चा झाली आणि चर्चेअंती अंतिमतः जो ठराव त्या ठिकाणी झाला तो मी आता आपल्यापुढे वाचून दाखवित आहे आणि तो सभागृहासमोर ठेवत आहे असे त्यांनी म्हणावे.

**श्री. बी.टी.देशमुख** : पहिल्यांदा जो ठराव कामकाजपत्रिकेत आला तो मागे घेतला पाहिजे. दुसऱ्या ठरावामध्ये आमची सुधारणा फीट झाली नाही तर काय करणार ? आमची सुधारणा ही वितरित केलेल्या ठरावावर आहे. आमची जी सुधारणा आहे ती सर्क्युलेट केलेल्या मोशनवर आहे. सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव देशमुख जे म्हणतात त्याच्याशी मी पूर्णपणे सहमत आहे. मी आपल्यालाही सांगितले आहे. **सुधारणा मांडण्याचा अधिकार नाकारु नका. आपण एकमताने करु. सुधारणेसह किंवा सुधारणेशिवाय एकमताने करु. महाराष्ट्र त्या ठिकाणी जात असताना, तुम्ही महाराष्ट्रातील इतर भागांना कसेही वागविले तरी महाराष्ट्रातील सर्व भागांना महाराष्ट्राविषयी प्रेम आहे. म्हणून सुधारणा मांडण्याचा अधिकार काढून घेऊ नका. आमचे ऐकून घ्या आणि त्यानंतर ते म्हणतील तो ठराव असा किंवा तसा हे नंतर करा.** जो प्रस्ताव मांडला आहे त्याला माझी अमेंडमेंड आहे ती आपण मांडू द्यावी अशी माझी आपल्याला विनंती आहे. नंतर त्याबाबत मा.सदस्य म्हणतात त्याप्रमाणे करता येईल.

**श्री.नितीन गडकरी** : सभापती महोदय, आणखी एक मी सुचवू इच्छितो. मा.मंत्रिमहोदयांनी मूळ ठराव मांडल्यानंतर मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी आपली अमेंडमेंड मांडली आहे. त्यानंतर पुन्हा मा.मंत्रिमहोदयांनी खालच्या सभागृहामध्ये केलेल्या दोन दुरुस्त्या या सभागृहासमोर मांडाव्या आणि मग एकत्रितपणे या ठरावाला सर्वांनी कंसिडर करावे.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, या सभागृहामध्ये आमची सुधारणा ऐकून तरी घ्यावी.

**सभापती** : ऐकून घेण्याबद्दल दुमत नाही. परंतु मा.मंत्रिमहोदयांनी याठिकाणी जो ठराव मांडला आहे तो विधानसभेमध्ये एकमताने पास झाला आहे. तो ठराव मा.मंत्रिमहोदयांनी याठिकाणी मांडला आहे काय?

**श्री.बी.टी.देशमुख** : काय मांडावयाचे आहे ते त्यांनीच मांडावयाचे आहे.

**सभापती** : मला असे वाटते की, यातून मार्ग निघत नाही.

**श्री.मधुकर सरपोतदार** : सभापती महोदय, माझी एक सूचना आहे. ज्या परिस्थितीमध्ये कामकाज सल्लागार समितीची बैठक झाली. त्या बैठकीला मा.मुख्यमंत्री उपस्थित होते, मा.उपमुख्यमंत्री आणि मा.संसदीय कार्यमंत्रीही उपस्थित होते. त्या सर्वांच्या उपस्थितीमध्ये जे ठरले त्याचा मान राखण्याची जबाबदारी सर्वांची आहे. आज हा प्रस्ताव मांडताना मा.मुख्यमंत्री उपस्थित नाहीत, मा.उपमुख्यमंत्री उपस्थित नाहीत, मा.संसदीय कार्यमंत्रीही उपस्थित नाहीत आणि आपण नुसती चर्चा करीत बसलो आहोत. इतकेच नव्हे तर सभागृहाचे नेतेही नाहीत.

**सभापती** : ते मला पत्र देऊन गेले आहेत.

**श्री.मधुकर सरपोतदार** : सभापती महोदय, या प्रस्तावाच्या संदर्भातील जी जबाबदार मंडळी आहेत त्यांनी याठिकाणी उपस्थित असण्याची आवश्यकता आहे. अमेंडमेंड बाबत बोलावयाचे तर खालच्या सभागृहामध्ये अमेंडमेंड दिली ती स्वीकारली किंवा नाकारली असेल त्याप्रमाणे या सभागृहामध्ये मूळ प्रस्तावाला जर अमेंडमेंड दिली गेली तर ती स्वीकारणे किंवा नाकारणे हे आपल्या हातामध्ये आहे. आपण त्याप्रमाणे करु शकता. आमचा त्याला विरोध असण्याचे कारण नाही.

**श्री.उल्हास पवार** : एका महत्वाच्या प्रश्नावर गंभीरपणे चर्चा उपस्थित करण्यात आली आहे. महाराष्ट्राच्या प्रश्नासंबंधी केंद्राकडे जाताना जे स्पिरीट आहे त्याबद्दलचे मत मा.सदस्यांनी व्यक्त केलेले आहे. मा.सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांनी अगदी जोरदारपणे सांगितले की, अन्याय झाला तरीही एकमताने ठराव पाठवू. हा जो मूळ प्रस्ताव मांडला आहे हा सभापतींच्या माध्यमातून मागे घ्यावा आणि त्या दोन अमेंडमेंडसहित विधानसभेत ठराव पास झाला आहे तो त्यांनी येथे मांडावा. त्यानंतरही आपल्याला विनंती आहे की त्याच्यावरही मा.सदस्यांना

बोलण्याचा अधिकार आहे. आपली मते व्यक्त करण्याचा अधिकार आहे.

**श्री.बी.टी.देशमुख : मला फक्त बोलण्याचा अधिकार नको. सुधारणा मांडण्याचा मला अधिकार आहे. तो मी वापरणार आहे.**

**श्री.उल्हास पवार** : त्या अमेंडमेंडसहित तो प्रस्ताव मांडल्यानंतरही आपण आपले मत प्रभावीपणे मांडले आणि त्या दोन अमेंडमेंडसहित समाधान झाले नाही तरी आपण ते मांडावे. त्यानंतर मंत्रिमहोदय ते मागे घेण्यासंबंधी आपल्याला विनंती करतील. कारण एकमताने केंद्र सरकारकडे हा प्रस्ताव पाठवावयाचा आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : मा.सदस्य श्री.उल्हास पवार यांनी म्हटल्याप्रमाणे मा. मंत्रिमहोदयांना ते मांडू द्यावे, नंतर माझी अमेंडमेंट मांडू द्यावी आणि नंतर त्यांनी ते मांडावे याला आमची ना नाही. **मी जी अमेंडमेंट दिली आहे ती मांडताना त्यावरील मत सभागृहासमोर मांडणे हे पवित्र कार्य आहे असे मी मानतो. जखमा कितीही खोल असल्यातरी हा ठराव एकमताने पाठवावा. अंतिम ठराव एकमतानेच होईल. परंतु तो अमेंडमेंटसह होईल किंवा अमेंडमेंटशिवाय होईल पण सुधारणा मांडण्याची संधी नाकारणे बरोबर नाही.**

**सभापती** : पुन्हा तेच होत आहे. येथे या सभागृहाने जर अमेंडमेंट केली तर ती पुन्हा खालच्या सभागृहामध्ये जावी लागेल. एकमुखाचा ठराव दिल्लीला पाठवावयाचा किंवा नाही ? का येथे आपले असे मत आहे की, काही नाही, आमचे जे काही वेगवेगळे ठराव आहेत ते आम्ही केले आहेत ते आम्ही दिलेले आहेत ते पाठवितो. मला वाटते की, हे काही बरोबर होणार नाही. ज्यावेळी केंद्र सरकारकडून मागणे आणि अतिशय महत्वाच्या विषयातील मागणे मागावयाचे आहे त्यावेळी महाराष्ट्राच्या जनतेचे प्रतिनिधित्व करणाऱ्या या दोन्ही सभागृहातून एकमताने, कानामात्र्याचा कोणताही फरक होणार नाही इतक्या एकमताने, एका शब्दामध्ये, एका सुरामध्ये आपला ठराव जायला पाहिजे.

**श्री. बी.टी.देशमुख** : सबंध महाराष्ट्राचा ठराव... विदर्भ, मराठवाडा, कोकणसह ....

**सभापती** : होय. सबंध महाराष्ट्राचा ठराव सर्वांनी एकमताने मंजूर केला पाहिजे. याबाबतीत काही मतभेद असतील, कोणते शब्द समाविष्ट करावयास पाहिजेत, कोणते शब्द काढून टाकावयास पाहिजेत हे बैठक घेऊन ठरविले असते आणि असा सर्वानुमते ठराव झाला असता आणि **तसा तो विधानसभेमध्ये मांडला असता तर तिथेही तो तासाभरात संमत झाला असता आणि येथे देखील तो अर्ध्या तासात किंवा तासाभरात संमत झाला असता. परंतु असे झाले नाही आणि त्यामुळे अशा प्रकारचा प्रसंग निर्माण झालेला आहे. त्यामुळे या अशाप्रकारच्या परिस्थितीत सभागृहाचे कामकाज सुरु ठेवणे मला शक्य वाटत नाही. मी एक असा प्रयत्न करुन पाहतो की, आता मी काही वेळासाठी सभागृहाची बैठक तहकूब करतो आणि या सभागृहाचे गट नेते, पक्ष नेते, मंत्रिमहोदय आणि त्यांचे सहकारी तसेच आणखीही कोणाला बरोबर घेऊन यावयाचे असेल तर त्यांनाही बरोबर घेऊन त्यांचे काही म्हणणे असेल तर तेही ऐकून घेऊ.** येथे एका विशिष्ट पार्श्वभूमीवर आपण बसलेलो आहोत. म्हणून आपण माझ्या दालनामध्ये बसू आणि मार्ग निघतो का ते पाहू. तेव्हा आता अर्ध्या तासासाठी मी सभागृहाची बैठक स्थगित करीत आहे. ५.३० वाजता सभागृहाची बैठक पुनः भरेल.

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी मा.तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी))**

**तालिका सभापती** : सभागृहाचे कामकाज आणखी १५ मिनिटांकरिता स्थगित करण्यात येत आहे.

(सभागृहाची बैठक सायं. ५.३० ते ५.४५ वाजेपर्यन्त स्थगित झाली.)

**(स्थगितीनंतर)**

**( सभापतीस्थानी मा.तालिका सभापती (श्रीमती सुधा जोशी))**

**तालिका सभापती** : मी सभागृहाची बैठक अर्ध्या तासासाठी स्थगित करीत आहे.

**( सभागृहाची बैठक सायंकाळी ५.४५ पासून ६.१५ वाजेपर्यन्त स्थगित झाली. )**

**(स्थगितीनंतर)**

**( सभापती स्थानी : माननीय सभापती )**

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी ठराव मांडावा .

**( सभागृहाची बैठक सायंकाळी ५.४५ पासून ६.१५ वाजेपर्यन्त स्थगित झाली. )**

**( सभापतीस्थानी : माननीय सभापती )**

**राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळण्याबाबत पाटबंधारे (कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) मंत्र्यांचा ठराव (चर्चा पुढे सुरु)**

**सभापती** : माननीय मंत्रिमहोदयांनी ठराव मांडावा .

**श्री.अजित घोरपडे** : (पाटबंधारे ( कृष्णा खोरे व कोकण पाटबंधारे महामंडळे) राज्यमंत्री) : सभापती महोदय, मी आपल्या अनुमतीने नियम १०६ अन्वये पुढील ठराव मांडतो :-

"ज्याअर्थी, स्वातंत्र्यप्राप्तीनंतर महाराष्ट्र राज्यातील २६६० पाटबंधारे प्रकल्प स्वबळावर बांधूनही राज्यात असलेल्या विशिष्ट भौगोलिक परिस्थितीमुळे केवळ २२ टक्के सिंचन क्षमता निर्माण होऊ शकली आहे, परंतु देशाचे पातळीवर याच कालावधीत ५१ टक्के सिंचन क्षमता निर्माण झाली आहे;

आणि ज्याअर्थी, ४२ टक्के भूभाग अवर्षणप्रवण असलेल्या महाराष्ट्र राज्यास प्रस्तावित राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाद्वारे नगण्य लाभ होत आहे;

आणि ज्याअर्थी, देशातील सर्व राज्यांमध्ये उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करुन पाण्याद्वारे होणा-या सामाजिक व आर्थिक विकासाच्या समान संधी सर्व राज्यांना प्राप्त करुन देणे आवश्यक आहे;

आणि ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात देशाच्या लोकसंख्येच्या १० टक्के लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्र आहे;

त्याअर्थी, आता केन्द्र शासनाने प्रस्तावित केलेल्या राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळावा या दृष्टीने सध्याच्या नद्याजोड प्रकल्पात आवश्यक ते तांत्रिक बदल करुन उत्तरेतील नद्यांचे पाणी महाराष्ट्रात येण्यासाठी विंध्य पर्वतामध्ये बोगदे खोदून अगर पाणी उचलून गोदावरी, भीमा, कृष्णा व तापी या तुटीच्या खोऱ्यात आणण्यात यावे व या प्रकल्पातून राज्यातील पाण्याची गरज आणि सिंचन क्षमतेचा विकास करण्यासाठी या राष्ट्रीय प्रकल्पासाठी एकूण होणारा ५,६०,००० कोटी रुपये खर्चापैकी १० टक्के रकमेची (५६,००० कोटी) किंवा भविष्यात वाढीव खर्चाच्या १० टक्के रकमेची तरतूद केन्द्र शासनाने उपलब्ध करावी असा ठराव महाराष्ट्र विधान परिषद एकमताने मंजूर करीत आहे. पाणी वाटपात झालेल्या अन्यायाबाबत या सभागृहाच्या सदस्यांच्या तीव्र भावना लक्षात घेऊन या समस्येवर निश्चित स्वरुपाचे आश्वासन केन्द्र शासनाने त्वरित द्यावे अशी शिफारस या ठरावाद्वारे ही विधान परिषद केन्द्र शासनास करीत आहे."

ठराव प्रस्तुत झाला.

**श्री. बी.टी.देशमुख** (अमरावती विभाग पदवीधर) : माननीय सभापती महोदय, माननीय राज्यमंत्र्यांनी आजच्या दिवसाच्या कामकाजपत्रिकेमध्ये जो प्रस्ताव येथे मांडला आहे त्याला मी आपल्या परवानगीने पुढीलप्रमाणे सुधारणा सुचवितो. :-

"अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे .." या मजकुराऐवजी पुढील मजकूर दाखल करण्यात यावा. :-

"अशी आग्रहाची विनंती या ठरावाद्वारे करण्यात येत आहे. नद्याजोड प्रकल्पात आवश्यक ते तांत्रिक बदल करताना, तांत्रिकदृष्ट्या शक्य होईल त्या मर्यादेपर्यंत अनुशेष व निर्देशांक समितीच्या अहवालानुसार अनुशेषात असलेल्या महाराष्ट्रातील जिल्ह्यांना वरचे प्राथम्य देण्यात यावे अशीही या ठरावाद्वारे विनंती करण्यात येत आहे. सिंचन क्षमतेचा विकास करण्यासाठी उपरोक्त विनंतीनुसार केंद्र शासनाकडून उपलब्ध होणारी तरतूद घटनेच्या कलम ३७१ (२) अंतर्गत माननीय राष्ट्रपतींनी दिनांक ९ मार्च १९९४ रोजी काढलेल्या आदेशानुसार व महाराष्ट्राच्या माननीय राज्यपालांनी दिनांक १५ डिसेंबर २००१ रोजी प्रख्यापित केलेल्या निदेशानुसारच वापरण्यात येईल असा ठाम निर्धार हे सभागृह व्यक्त करीत आहे "

सुधारणा प्रस्तुत झाली.

**सभापती** : आता मूळ ठराव आणि प्रस्तुत झालेली सुधारणा यावर एकत्रित चर्चा होईल.

**श्री. बी.टी.देशमुख** : अध्यक्ष महाराज, मी दिलेल्या मूळ ठरावावरील या सुधारणेसंबंधात माझे विचार मी दोन तीन मिनिटांत मांडू इच्छितो. अध्यक्ष महाराज, हा शासकीय प्रस्ताव म्हणजे महाराष्ट्राच्या वतीने केंद्र सरकारला करावयाची ही विनंती आहे. त्याचे प्रिॲम्बल आणि मोशन म्हणजेच प्रस्तावना आणि प्रस्ताव असे दोन भाग आहेत. त्यामध्ये काही गोष्टी या यावयास पाहिजे होत्या त्या आलेल्या नाहीत. अध्यक्ष महाराज, या ठरावामध्ये असे म्हटलेले आहे की, **"ज्याअर्थी ४२ टक्के भूभाग अवर्षणप्रवण असलेल्या महाराष्ट्र राज्यास प्रस्तावित राष्ट्रीय नद्याजोड प्रकल्पाद्वारे नगण्य लाभ होत आहे.."** खरे तर प्रस्तावनेतच याला जोडून आपण आणखी एक वाक्य टाकावयास पाहिजे होते. यामध्ये **"...महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त जिल्हयांना नगण्य लाभ होत आहे"** असे वाक्य शासनाच्या ठरावात आले असते तर साऱ्या महाराष्ट्राच्या नेमक्या भावना त्यातून प्रकट झाल्या असत्या. अध्यक्ष महाराज, या ठरावाला केवळ सुधारणा द्यायची आहे म्हणून काही मी ही सुधारणा दिलेली नाही. **देशात महाराष्ट्राला समन्यायी वाटप झाले नाही असे म्हणताना महाराष्ट्रातील प्रादेशिक असमतोलाचे काय?** आपण आपल्या या प्रिॲम्बल मध्ये म्हटले आहे की, ".... देशातील सर्व राज्यांमध्ये उपलब्ध पाण्याचे समन्यायी वाटप करून पाण्याद्वारे होणाऱ्या सामाजिक व आर्थिक विकासाच्या समान संधी सर्व राज्यांना प्राप्त करून देणे आवश्यक आहे .. " अध्यक्ष महाराज, अगोदरच पाटबंधारे विकासाची समान संधी मिळण्यात आपसातील वादामुळे महाराष्ट्रातील निरनिराळ्या विभागांना अपयश आले आहे. त्यात आता महाराष्ट्राची केंद्र सरकारकडे चाललेली ही विनंती आहे.. तरीही मी या प्रिॲम्बलमध्ये सुधारणा दिलेली नव्हती. अध्यक्ष महाराज, या ठरावामध्ये दोन सायटेशन्स आहेत, पहिले सायटेशन असे की, **"हा जो नद्याजोड प्रकल्प होत आहे त्यामध्ये तांत्रिक बदल करून महाराष्ट्राला हे पाणी मिळू शकेल अशा प्रकारचा बदल केंद्र सरकारने या नद्याजोड प्रकल्पात करावा"** अशी विनंती केलेली आहे आणि ती योग्य अशीच विनंती आहे. हा तांत्रिक बदल ज्या मर्यादेपर्यंत शक्य आहे त्या मर्यादेपर्यंत करून महाराष्ट्रातील अनुशेषग्रस्त जिल्ह्यांनासुध्दा त्याचा फायदा मिळाला पाहिजे, त्याबाबत वरचे प्राथम्य मिळाले पाहिजे अशा प्रकारची शब्दरचना या ठरावामध्ये नाही म्हणून या गोष्टींना पाठिंबा देत असताना सुधारणेत असे म्हटले आहे की, **"तांत्रिकदृष्ट्या शक्य होईल त्या मर्यादेपर्यंत अनुशेषग्रस्त भागालासुध्दा त्याचा लाभ मिळाला पाहिजे."** ..... या प्रस्तावामध्ये दोन प्रकारची विनंती आहे. एकतर यामध्ये तांत्रिक बदल करुन त्याचा लाभ

मिळावा. दुसरी बाब अशी की, तसा लाभ जर मिळत नसेल तर ५६ हजार कोटी रुपये हे महाराष्ट्राला देण्यात यावेत, अशी या ठरावाद्वारे मागणी करण्यात आली आहे. आता ही सर्व बाब केंद्र शासनाच्या अखत्यारीतील आहे. आता या निधीचे वाटप कसे होणार आहे ? सर्व महाराष्ट्राला याचा फायदा व्हावयाचा असेल तर या सुधारणेमध्ये मी जे म्हटले आहे, त्याप्रमाणे होणे आवश्यक आहे. १९६० सालापासून आज २००४ पर्यन्त जलसिंचनाच्या विकासासंबंधी विदर्भ आणि मराठवाड्यावर अन्याय झाला आहे. म्हणूनच मी ही सुधारणा दिली आहे. केंद्र शासनाकडे या निधीबाबत पाठपुरावा करीत असताना अनुशेषग्रस्त भागाचा समावेश होण्याच्या दृष्टीने मी या ठिकाणी या दुस-या बाबींचा उल्लेख केला आहे. **दुस-या दुरुस्तीच्या बाबतीत मी एक गोष्ट स्पष्ट करु इच्छितो की, देशाच्या पातळीवर ५१ टक्के सिंचन क्षेत्र निर्माण झाले आहे. महाराष्ट्रात २२ टक्क्यापेक्षा खाली ज्या ठिकाणी सिंचनक्षमता आहे, त्यांना तर दुःखाच्या खाईतच लोटले गेले आहे. आता सुध्दा कोणतीही तरतूद न केल्यामुळे ते सारे अनुशेषग्रस्त जिल्हे तसेच लटकलेले आहेत.** त्यांचा थोडासा उल्लेख या ठरावात झाला असता तरी त्या जिल्ह्यांना बरे वाटले असते. त्यावेळी असे वाटले असते की, ५० टक्क्याच्या वर ज्या ठिकाणी सिंचन झाले आहे, त्या जिल्ह्यांनी ज्या जिल्ह्यात साडेपाच टक्के सिंचन झाले आहे, त्यांचा विचार केला आहे. त्यांची आठवण या निमित्ताने केली आहे. परंतु तसे काही झाले नाही. या ठरावात तसा उल्लेख असता तर त्याबद्दल आनंद झाला असता. आज देशपातळीवरुन सुध्दा महाराष्ट्रावर अन्याय होत आहे. त्यामुळेच ठरावात असे वाक्य आले आहे की, **"राष्ट्रीय नद्याजोड योजनेतून महाराष्ट्राला न्याय्य वाटा मिळावा, या दृष्टीने..." त्याचप्रमाणे विदर्भ आणि मराठवाडा तसेच कोकणाला यातील न्याय्य वाटा मिळावा, अशी वाक्यरचना येण्याची आवश्यकता होती.** सभापती महोदय, दुस-या महायुध्दाच्या वेळी ब्रिटीश राज्यकर्त्यांनी आणि अमेरिकेने लोकशाही रक्षणासाठी सर्व राष्ट्रांनी आमच्या पाठीमागे उभे राहिले पाहिजे, असे म्हंटले होते. अशा वेळी त्यांना भारतातील लोकशाही दिसली नाही. भारतातील राष्ट्रीय चळवळीच्या नेत्यांनी त्यांना असा प्रश्न विचारला होता की, भारतातील लोकशाही आपणाला दिसत नाही काय ? त्याचप्रमाणे आता राज्याची परिस्थिती आहे. **महाराष्ट्राचा अंतर्गत प्रादेशिक असमतोल दूर होण्याच्या दृष्टीने या ठरावात उल्लेख असण्याची आवश्यकता आहे. परंतु तसा उल्लेख नसल्यामुळे मी ही सुधारणा मांडली आहे.** महाराष्ट्र शासनाने केंद्राला दिनांक २४ डिसेंबर २००३ ला पत्र पाठविले आहे त्यात सभापती महोदय, ५६ हजार कोटी रुपयांपैकी कोकणाला ९४५ कोटी रुपये, गोदावरीला ३४३७ कोटी रुपये, विदर्भाला ५७०० अधिक ५०० कोटी रुपये दिले आहेत. आणि एकट्या कृष्णा खोरेला ११ हजार कोटी रुपये दिले आहे. तसेच कृष्णा खो-याला नद्या जोडणीच्या कामाला २७३४७ कोटी रुपये वेगळे नमुद केले आहेत. सभापती महोदय, ठरावाची सुरुवात चांगली आहे, परंतू शेवट मात्र वाईट आहे. महाराष्ट्राच्या सामाजिक, सांस्कृतिक जीवनावर त्याचे वाईट ओरखडे उमटतील तसे ते उमटू नये म्हणून मी सुधारणा मांडली आहे. **प्रादेशिक असमतोल वाढविण्यासाठी या ठरावाचा वापर केला जाणार नाही, त्याचे समन्यायी वाटप केले जाईल असा ठाम निर्धार व्यक्त करा तो माझ्या सुधारणेच्या निमित्ताने तुमच्या ठरावात येईल त्यासाठी सुधारणा आहे यापेक्षा मी जास्त भाषण करीत नाही.** मी या सभागृहाचे आभार मानतो. सभापती महोदय सुधारणा मान्य करावी अशी मी सभागृहाला विनंती करतो. आपण मला ही सुधारणा मांडण्याची व त्यानंतर बोलण्याची संधी दिली त्याबद्दल मी आपले आभार मानून माझे भाषण संपवितो.

**श्री. नितीन गडकरी** (नागपूर विभाग पदवीधर) : सभापती महोदय, सन्माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख साहेबांनी या ठरावाला जी दुरुस्ती सुचविली आहे तिला अनुमोदन देण्यासाठी मी एक मिनिट बोलणार आहे. **माननीय श्री. बी. टी. देशमुख साहेबांनी या ठरावाच्या बाबतीत जे विचार व्यक्त केले ते सत्ताधारी पक्षाचे नेते, माननीय मुख्यमंत्री हे ऐकून घेतील आणि विचार करतील आणि आमच्या भावना समजतील अशी अपेक्षा आहे.** जेव्हा केंद्र सरकारकडे जात आहात तेव्हा आपण असे म्हणतो की, केंद्र सरकारच्या या प्रकल्पांमुळे आमच्यावर अन्याय होणार आहे. आणि म्हणून महाराष्ट्रावर होणाऱ्या अन्यायाची दाद मागण्यासाठी केंद्र सरकारकडे जात आहात. या नद्या जोड प्रकल्पामध्ये जे प्रेझेंटेशन झाले त्यामध्ये कर्नाटक, आंध्र प्रदेश आणि तामिळनाडू या दक्षिणेकडच्या ३ राज्यांना फार मोठया प्रमाणात प्रकल्पाचा फायदा होत आहे. त्या तुलनेत महाराष्ट्राला पाणी मिळत नाही ही व्यथा आपण केंद्र सरकारकडे मांडीत आहोत. ती सर्वांनी मिळून मांडली पाहिजे, सर्वांनी मिळून तिचे समर्थन केले पाहिजे ही गोष्ट योग्य आहे. ही व्यथा मांडतांना आणि आपले समर्थन करीत असतांना जसे भारतामध्ये २२ टक्के इरिगेशनने महाराष्ट्र मागे असता कामा नये. तसे महाराष्ट्रामध्ये मराठवाडा, विदर्भ, कोकण आणि उत्तर महाराष्ट्रही मागे असता कामा नये. आणि म्हणून माननीय सदस्य श्री. बी. टी.देशमुख यांनी प्रस्तावाला सुधारणा सुचविली आहे त्यामध्ये 'If possible' असे म्हटले आहे. म्हणजे तुम्हाला जेवढे शक्य असेल त्याचा तांत्रिकदृष्टया अभ्यास केला आणि त्यामध्ये जास्तीत जास्त प्राधान्य मागासलेल्या भागाला द्या अशी भावना व्यक्त केली. मी **यानिमित्ताने महाभारताचे उदाहरण आपल्याला देतो. महाभारतामध्ये श्रीकृष्ण जेव्हा पांडवांच्या वतीने दुर्योधनाकडे शिष्टाई करण्यासाठी गेला त्यावेळी श्रीकृष्णाने दुर्योधनाकडे ४० गावांची मागणी केली असता, सुईच्या अग्रावर मावेल एवढी सुध्दा जमीन तुम्हाला देणार नाही असे सांगितले. तशाप्रकारची भूमिका या सभागृहामध्ये काही वेळेला स्वीकारली जाते. म्हणून माझी आग्रहाची विनंती आहे की, सत्तारुढ पक्षाने अशी भूमिका स्वीकारु नये.** आणि म्हणून माननीय सदस्य श्री. बी. टी. देशमुख यांनी या प्रस्तावाच्या माध्यमातून सुधारणा सुचविली आहे ती आपण स्वीकारावी अशी मी विनंती करतो. शासन निश्चितपणे ती स्वीकारेल असा मी विश्वास व्यक्त करतो.

**श्री. दिवाकर रावते** (विधानसभेने निवडलेले) : सभापती महोदय, आदरणीय श्री. बी. टी. देशमुख यांनी सुधारणा सुचविली आहे तिचे समर्थन करण्याकरिता मी उभा आहे. खरे म्हणजे 'जेवढे शक्य आहे तेवढे' हा शब्द सुध्दा त्यांच्या सुधारणेमध्ये असायला नको होता इतका अन्याय गेली चार वर्षे सत्ताधारी पक्ष सातत्याने करीत आहे. मराठवाडा, विदर्भ आणि कोकणाच्या अनुशेषाबाबत माननीय राज्यपालांनी निदेश दिल्यानंतर सुध्दा मा. श्री. बी. टी.देशमुख साहेबांच्या भाषेमध्ये 'सप्रेम नमस्कार, विनंती विशेष' च्या माध्यमातून हा निधी त्यांच्याकडून खेचून घेतला गेला. जमेल तेवढे तिकडचे काम करायचे आणि इकडच्या लोकांना झुलत ठेवायचे. या व्यासपीठाच्या माध्यमातून अर्थसंकल्प, विधेयके इत्यादी जी माध्यमे असतील त्यांचा वापर करुनसुध्दा कोडगेपणा या शब्दाला लाज वाटेल अशापध्दतीने सर्व विभागांवर सतत अन्याय करीत रहाणे चालू आहे. आणि मग 'आत्याबाईला मिशा असत्या तर, मिशांना तूप लावले असते' त्या निवडणुकीत चांगल्या दिसतील, तसा हा प्रकार आहे. आणि मग आपण केंद्र सरकारकडे जाणार आणि आम्हाला एवढे द्या असे सांगणार. कां द्या? हेही सांगणार. एवढा पैसा उपलब्ध झाल्यानंतर तो कुठे वापरायचा? मंत्रिमहोदयांबरोबर लॉबीत झालेल्या चर्चेच्या वेळी मी त्यांना सांगितले की, तुम्ही आमच्यावर अन्याय करणार आहात. ते म्हणाले तुम्ही असे कसे म्हणता? आतापर्यंतच्या अनुभवावरुन बोलतो असे मी म्हणालो. मी तुम्हाला प्रकल्प वाचून दाखवितो ना असे ते म्हणाले. तेव्हा मी म्हणालो, दुर्दैव मराठवाडा, विदर्भ आणि कोकणाचे आहे. तुमच्या ललाटी कायम शेंदूर लावलेला असतो हे तुमचे भाग्य. विविध सिंचन मंडळे निर्माण झाल्यानंतर सुध्दा फक्त कृष्णा खोऱ्याच्या प्रत्येक प्रकल्पाच्या मंजूरीचे अधिकार कृष्णा खोऱ्याला मिळाले. आम्ही येथे ओरडल्यानंतर हालचाल झाली. पण इतर महामंडळांच्या संबंधातील सर्व फायली मंत्रालयामध्ये पडून. माझ्या म्हणण्याशी सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख सहमत होतील. मग आम्ही या सभागृहामध्ये अव्याहत मागणी केल्यानंतर, तुमच्या मागे लागल्यानंतर आणि आमच्या भागांवर अन्याय होत आहे हे वारंवार सांगितल्यानंतर आता सहा महिन्यापूर्वी शासनाने ते अधिकार दिले. का दिले? तर निवडणुका तोंडावर आल्या असताना आम्ही तुमच्या भागातील प्रस्ताव तरी मंजूर केलेले आहेत हे त्या भागातील लोकांना सांगण्यासाठी सर्व काही केले आहे. नद्या जोडणीच्या प्रकल्पाबाबत तुम्ही आरोळी कधी ठोकली ? तर हा काल-परवाचा प्रकल्प आहे का ? तर तो जुना आहे. पण माननीय माजी पंतप्रधान श्री.अटलबिहारी वाजपेयी यांनी हा प्रकल्प पुनर्जिवित करण्याचा निर्णय घेतला. नद्या जोड प्रकल्पामधून, जे पाणी समुद्रामध्ये वाहून जाते, **नदीला महापूर आल्यानंतर उध्वस्त होणाऱ्या गावांचा प्रश्न वर्षानुवर्षापासूनचा आहे. तर हे जे अतिरिक्त पाणी आहे, ज्या भागामध्ये पाणी नाही त्या भागापर्यंत यावे, तेथील नुकसान कमी व्हावे आणि जल वाहतूक निर्माण व्हावी यादृष्टीने याचा अभ्यास करुन, त्यातून या बाबी** करण्याचा निर्णय घेतल्यानंतर आणि वाईट एवढेच वाटते की, ही महाराष्ट्राच्या हिताची बाब बोलत असताना निवडणुकीमध्ये त्याचा स्वार्थासाठी वापर करण्याचा जो प्रयोग झाला तो दुर्दैवी होता. तसेच पुढच्या विधानसभेच्या निवडणुका नद्याजोड प्रकल्पाच्या माध्यमातून होणा-या अन्यायाच्या विरोधात लढविल्या जातील अशा प्रकारची घोषणा केली. म्हणजे तुम्हाला निवडणुकीसाठी हा विषय हवा होता? निवडणुकीमध्ये लोकांना फसविण्यासाठी हा विषय हवा होता का ? मराठवाडा, विदर्भ आणि कोकण इ.भागामध्ये सांगावयाचे की, तुमच्या भागामध्ये पाणी नाही. ठीक आहे, मी पाणी आणतो,चिंता करु नका.पैसे आणतो, पाणी आणतो. पण या भागांमध्ये सर्वच बाबतीत अन्यायाची परिसीमा तुम्ही गाठलेली आहे. अगदी सिंचनाच्या बाबतीतही अन्यायाची परिसीमा झालेली आहे. काल-परवा या सभागृहामध्ये माननीय विरोधी पक्षनेत्यांनी सांगितले, त्या प्रमाणे आम्ही तुमच्यावर का विश्वास ठेवावयाचा ? ही सुधारणा मांडू नका, मागास भागासाठी न्याय मागू नका. पैसे येतील तेव्हा येतील. पण एकमताने प्रस्ताव गेला पाहिजे. कारण केंद्रातील लोकांना काय वाटेल ? परंतु तुम्हाला एवढी चिंता का लागलेली आहे ? यापूर्वी मागास भागाची चिंता का केली नाही? राज्यामध्ये दुष्काळाचे आक्रीत कोसळल्यानंतर येथील शेतकरी, गुरढोरे उपाशी मरत आहेत आणि आमच्या शासनाला त्यातही चैन दिसते. अशा वेळी तुमच्या बुध्दीमत्तेबाबत काय बोलावे हे मला कळत नाही. आता केंद्र शासन म्हणाले की, पैसे देतो, अमुक देतो. ते राजकारण सोडून द्या. हा नंतरचा भाग आहे. **दुष्काळासाठी रोख्याच्या माध्यमातून १५०० कोटी पाहिजेत अशी मागणी केली आहे. माननीय विरोधी पक्षनेत्यांनी असा मुद्दा मांडला की, सिंचन हा विषय दुष्काळात नसतो, तर पाणीपुरवठा हा विषय असतो. तर मग पाणीपुरवठयाच्या नावाखाली, लोकांना पाणी पुरवावयाचे आहे म्हणून कृष्णा खोऱ्यात पैसे आले पाहिजेत, त्यातून कृष्णा खो-यात पाणी आले पाहिजे.** तेथे पाणी आले की मग ते आमच्या विहिरीत येईल. मग आमच्या आडात आले पाहिजे, मग पोहऱ्यात येईल. अशा गमती-जमती करुन एक हजार कोटी रुपये एल.आय.सी.कडून जे उपलब्ध होणार आहेत आणि आपण ते फक्त कृष्णा खो-यासाठी वापरण्याचा निर्णय घेतला. या सर्व बाबी येथे आल्यानंतर १४००-१५०० कोटीतील ६० कोटी रुपये जल संधारणासाठी आणि उर्वरित सिंचनासाठी खर्च होणार आहेत. त्यातील २६५ कोटी रुपये परवा तुम्ही

ॲमेंड केले. माझ्याकडे आलेल्या विवरणपत्रामध्ये फक्त ६२ कोटी रुपये मराठवाडयासाठी दिलेले आहेत म्हणजे ११ जिल्हयामध्ये मराठवाडयातील जे पाच-सहा जिल्हे आहेत त्यासाठी हे पैसे दिले जाणार आहेत. नंतर नंदलाल समितीपुढे गेल्यानंतर २६३ कोटी रुपये दिले आणि बाकीचे सर्वच्यासर्व पैसे पश्चिम महाराष्ट्रात वापरले. 'सप्रेम नमस्कार विनंती विशेष.' हा सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख यांचा जो नेहमीचा आवडता शब्द आहे, **त्याप्रमाणे माननीय राज्यपालांना पत्र लिहून त्यांच्याकडून निदेश घेतले की, हा पैसा तेथे वापरल्यानंतर विदर्भ, मराठवाडयामध्ये आणि खास करुन विदर्भात अनुशेष निर्माण होईल, तो दोन वर्षांनी भरुन काढावा. या ज्या तुमच्या क्लुप्त्या, युक्त्या आहेत, त्या पाहिल्यानंतर आणि अनुशेष वाढविणा-या तुमच्या सर्व सामर्थ्याकडे पाहिल्यानंतर समजा उद्या चुकून आत्याबाईला मिशा फुटल्याच, केंद्र शासनाकडून पैसा आलाच तर तो पैसा हेच घेणार याची आम्हाला खात्री असल्यामुळे ही ॲमेंडमेंट आहे.** त्यातही आम्ही अत्यंत नम्रपणे ही भावना मांडलेली आहे की, Beggars have no choice. But, we are not beggars. अखंड महाराष्ट्रातील आम्ही हक्कदार आहोत. महाराष्ट्र अखंड आहे. महाराष्ट्रातील जनतेसाठी, महाराष्ट्रातील शेतक-यांसाठी, महाराष्ट्रातील ग्रामीण जीवनामध्ये पाणीपुरवठयाकरीता आणि सतत पडणा-या अवर्षणप्रवण भागाकरीता सुजलाम् सुफलामता निर्माण करण्याचे सामर्थ्य कोणाच्या इच्छेमध्ये असेल, कोणी भगिरथ होऊ इच्छित असेल तर त्यामध्ये आपणही असले पाहिजे, या भावनेतून आम्ही नम्रपणाने या उपसूचनेमध्ये एवढेच मांडले की, शक्य होईल तेवढे, तांत्रिकदृष्टया जमेल तेवढे, पण आम्हालाही त्यामधील वाटा मिळाला पाहिजे, तो आमचा हक्क आहे, असे म्हटलेले आहे. असे का निर्माण झाले याचा विचार केला पाहिजे. 'राष्ट्रीय जलनिती एप्रिल २००२' या पुस्तिकामधील परिच्छेद क्रमांक ३.५ मध्ये म्हटलेले आहे की, 'राष्ट्रीय दृष्टीकोनातून पहाता, जास्त पाणी उपलब्ध असलेले, नदी-खोऱ्यातील पाण्याची वास्तव गरज विचारात घेऊन उरलेले पाणी एका भागातून दुस-या भागाकडे नव्हे तर एका नदी खो-यातून दुसऱ्या नदी खो-यात वळविण्यात यावे.' प्रिन्सीपली आपण या मुद्यावरच भांडतो आहोत. पुढे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्रातील विदर्भ, मराठवाडयाकडील खास करुन विदर्भाकरिता अतिरिक्त कृष्णा खो-यातील पाणी टनेलने...." येथे सगळया प्रकल्पांची नावे दिलेली आहेत. कोठे टनेल काढायचे, कसे टनेल वळवायचे, कोठून पाणी आणायचे हे सांगितलेले आहे. एक-दोन टनेल काढून बुलढाण्यासारखा पाण्याच्याबाबतीत समस्या असलेला, मागास असलेला जिल्हा त्या जिल्हयाला पाणी मिळते म्हणून भांडणे लावण्यात आपले अधिकारी हुशार आहेत. खडकपूर्णा प्रकल्प उभारुन मराठवाडयामध्ये पाणी अडविले आणि विदर्भ मराठवाडयाच्या जनतेमध्ये भांडणे लावून दिली. आपण इकडे मजा पहात बसला. मागे या सभागृहामध्ये चर्चा झाली, त्यावेळेस मा.मंत्रीमहोदयांनी जे उत्तर दिले ते रेकॉर्डवर आहे. मराठवाड्याला कृष्णा खोऱ्यातील उपलब्ध असलेल्या पाण्यापैकी १० टक्के पाणी म्हणजे ६२ टीएमसी पाणी मिळाले पाहिजे, म्हणून प्रश्न उपस्थित केलेला होता. त्यावेळेस त्या प्रश्नाला उत्तर दिले होते की, अशा टक्केवारीचा प्रश्न येत नाही. मग निकष काय आहेत ? याबाबतीत काहीही निकष नाहीत. आपण कोणत्या पध्दतीने पाणी देणार ? याबाबतीत कोणतीही पध्दती नाही. हे सगळे रेकॉर्डवर आहे. आज हा प्रस्ताव सभागृहासमोर आला असता, आपण म्हटलेले आहे की, आपल्याला ५६ हजार कोटी रुपये का मिळाले पाहिजे, कोणत्या निकषावर मिळाले पाहिजेत, त्याबाबतीत आपण म्हटलेले आहे की, "ज्याअर्थी, महाराष्ट्र राज्यात देशाच्या लोकसंख्येच्या १० टक्के लोकसंख्या व भौगोलिक क्षेत्राच्या १० टक्के क्षेत्र आहे." मी मंत्री महोदयांना एवढेच म्हणालो की, कृष्णा खोऱ्यामध्ये मराठवाडयाचा १० टक्के भाग येतो. तेवढे १० टक्के पाणी आम्हाला द्यावे. त्यावेळेस मंत्री, श्री.अजितदादा पवार, मस्तवालपणाने म्हणाले. 'मस्तवाल' अशाप्रकारचे शब्द वापरतो, मला माफ करा. परंतू त्यांनी सांगितले की, तेवढे पाणी देणार नाही. मराठवाडयाला १८ टीएमसी पाणी दिले, आता आणखी २-४ टीएमसी पाणी घेऊन २१ टीएमसी पाणी तुम्हाला देऊ, असे सांगितले. दुर्दैवाने, मला हे चिडून बोलावे लागत आहे. आज आपण केंद्र सरकारकडे जात असतांना आपण सूत्र वापरत आहोत. मराठवाडयाच्या वाट्याला येणारे कृष्णेचे पाणी मागत असतांना, त्याच सूत्राप्रमाणे आम्ही मागणी केलेली होती. आकसबुध्दी कशी आहे, हे दाखविण्याकरिता आम्ही अमेंडमेंट आणलेली आहे. आपल्यावर कसा विश्वास ठेवायचा ? खूपच गोष्टी सांगता येतील. मराठवाडयाला १८ टीएमसी देखील पाणी मिळालेले नाही. मा.मुख्यमंत्र्यांच्या बंगल्यावरील बैठक उध्वस्त केली गेली, याची मला माहिती आहे. हे सर्व करत असतांना आम्ही आमच्या हक्कासाठी दुरुस्ती सुचविलेली आहे. राज्यपाल महोदयांनी देखील निर्देश दिलेले होते. ते आदेश घटनात्मक होते. घटनेच्या ३७१ (२) ही घटना केंद्राने मंजूर केलेली आहे. राष्ट्रपतींच्या अखत्यारीत राहून राज्यपाल महोदयांनी निर्देश दिलेले होते. त्यामध्ये लपविण्यासारखे काही नाही. शक्य होईल आणि तांत्रिकदृष्टया जमेल तेवढे, पैसे उपलब्ध झाले तर मात्र आम्हाला त्यामध्ये हक्क मिळावा,एवढयाकरिता ही उपसूचना मांडलेली आहे. **उध्वस्त कास्तकारांच्या आत्महत्या तेवढ्या याच भागात का होतात, याचा विचार आणि चिंतन केले तर महाराष्ट्र ५० वर्षामध्ये सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांनी सांगितल्याप्रमाणे ५५ टक्केवाले, २२ टक्क्याच्या खालच्या लोकांचा विचार करतात की नाही, हा प्रश्न आहे. म्हणूनच एवढी लहानशी भावना घेऊन, उपसूचना आणलेली आहे, त्याचे मी समर्थन करतो, शासनाने त्याचा योग्य तो आदर करावा. खास करुन विदर्भ, मराठवाडा,कोंकण आणि उर्वरित महाराष्ट्रातील कास्तकार यामुळे सन्मानीत होतील.दिल्लीकडे जाताना तुमच्याकडे आम्ही पाठ फिरविली नाही.** आपण ही उपसूचना स्विकारली तरी राज्यातील शेतक-यांना अधिक बरे वाटेल एवढे सांगतो आणि आपण संधी दिल्याबद्दल आपल्याला धन्यवाद देवून माझे भाषण संपवितो.

**श्री.शिवाजीराव देशमुख**(महाराष्ट्र विधानसभा सदस्यांद्वारा निर्वाचित): सभापती महोदय,सन्माननीय पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी जो शासकीय ठराव मांडला आहे त्याला पाठींबा देण्याकरिता आणि माझे ज्येष्ठ सहकारी सन्माननीय बी.टी.देशमुख यांनी जी सुधारणा सुचविली आहे त्या सुधारणेच्या अनुषंगाने माझे विचार मांडण्यासाठी मी उभा आहे. ठरावामध्ये जो आशय दिलेला आहे त्या अनुषंगाने राष्ट्रामध्ये संपूर्ण ठिकाणी ५ लाख ६०हजार कोटी रुपये खर्च येईल या पध्दतीने गंगा आणि ब्रम्हपुत्रा या नद्यांचे पाणी वळवून कावेरी नदीपर्यन्त घेवून जाण्याची एका राष्ट्रीय प्रकल्पाची कल्पना आहे आणि म्हणून या प्रकल्पाला अनन्यसाधारण महत्व आहे. या प्रकल्पाच्या अनुषंगाने ज्या बातम्या आल्या आहेत आणि चर्चा सुरु आहे त्यावरुन असे दिसते की, या अवाढव्य प्रकल्पामध्ये महाराष्ट्राच्या वाटयाला येणारे जे सिंचन आहे ते नगण्य आहे. संपूर्ण देशाच्या दृष्टीने विचार केला तर ५१ टक्के सिंचनाची परिस्थिती आहे आणि महाराष्ट्रामध्ये या ठिकाणी सांगितल्याप्रमाणे २२ टक्के या मर्यादित स्वरुपात सिंचन क्षमता आहे.अशा परिस्थितीत ५ लाख ६० हजार कोटीची अवाढव्य योजना राबविण्याच्या दृष्टीने महाराष्ट्राला नगण्य फायदा किंवा सिंचन मिळत असेल तर केंद्र सरकारकडे आपण हक्काने यासंबंधी सूचना केली पाहिजे,मागणी केली पाहिजे.महाराष्ट्रातील लोकसंख्या दहा कोटी आहे आणि भौगोलिक क्षेत्र देशाच्या तुलनेत जवळजवळ दहा टक्के आहे.या अनुषंगाने या प्रकल्पावरील खर्चाच्या एकूण रकमेपैकी महाराष्ट्राला ५६ हजार कोटी मिळायला पाहिजे अशा पध्दतीचा या ठरावाचा आशय आहे.देशाच्या तुलनेमध्ये महाराष्ट्रातील सिंचनाचा तुलनात्मक विचार केला तर आणि येथील सिंचन बघितले तर जवळजवळ निम्म्यापेक्षा कमी आहे.तेव्हा या प्रकल्पाच्या माध्यमातून या राज्यातील ही परिस्थिती सुधारली पाहिजे या दृष्टीने दोन्ही सदनामध्ये चर्चा करुन केंद्र सरकारला अग्रहक्काने आपण यासंबंधीची मागणी करत आहोत.येत्या दहा वर्षामध्ये, पंधरा वर्षामध्ये या योजनेच्या माध्यमातून अपूर्ण राहिलेल्या पाटबंधारे प्रकल्पासाठी असेल,नवीन पाटबंधारे प्रकल्पासाठी असेल या दोन्ही करिता दहा टक्के म्हणजे ५६ हजार कोटी रुपये मिळायला पाहिजे ही आग्रहाची भावना या ठरावाच्या निमित्ताने आहे. देशाच्या इतर राज्यांमध्ये विशेष करुन पंजाब आणि हरियाणा राज्यांचा विचार केला तर त्याठिकाणी जवळजवळ ८०ते ९०टक्के बागायती क्षेत्र आहे. तसेच हा नद्या जोडणीचा कार्यक्रम बघितला तर यामध्ये मध्य प्रदेश, कर्नाटक असेल, आंध्र प्रदेश असेल या विभागाला यामधील भरपूर पाणी मिळत आहे परंतु दुर्दैवाने महाराष्ट्राच्या वाटयाला यामधील अतिशय अल्प पाणी मिळत आहे.आंध्राला तर ७५०टीएमसी पाणी जास्त देणार आहे आणि कर्नाटकला सुध्दा ब-यापैकी पाणी मिळणार आहे.परंतु महाराष्ट्राला दुर्दैवाने यामध्ये जवळजवळ ६००टीएमसी पाणी कमी मिळेल अशी परिस्थिती आहे. म्हणून या सदनामध्ये या पध्दतीचा शासकीय ठराव आपण मांडला आहे.**सन्माननीय सदस्य श्री.बी.टी.देशमुख साहेबांनी या निमित्ताने दिलेली जी सुधारणा आहे त्या सुधारणेच्या पाठीमागे असणारी जी भावना आहे ती अशीच आहे की, जलसंपत्तीचे वाटप समतोल असले पाहिजे.** जलसंपत्तीचे वाटप समतोल करावयाचे असेल तर ज्या विभागामध्ये कमी प्रमाणात जलसिंचनाच्या सुविधा निर्माण झालेल्या आहेत त्या विभागाला जास्तीत जास्त पैसा मिळाला पाहिजे या पध्दतीचा प्रा.बी.टी.देशमुख यांचा अट्टाहास आहे. ज्या पध्दतीने आमचा हक्क आम्ही या ठिकाणी मांडतो त्याच पध्दतीने राज्यामध्ये विदर्भ असेल, मराठवाडा असेल, कोकण असेल किंवा अन्य मागास विभाग असेल त्याच्यामध्ये सुध्दा या पध्दतीने उपलब्ध होणारा जो फंड आहे तो ८६ हजार कोटी रुपये आहे.त्यातील आमचा समतोल हिस्सा उपलब्ध करण्याच्या दृष्टीने त्यांचा हा अट्टाहास आहे. सन्माननीय प्रा.बी.टी.देशमुख साहेबांना मी एका गोष्टीची आठवण करुन देऊ इच्छितो. की, १९८४ साली त्या वेळचे मुख्यमंत्री श्री. वसंतदादा पाटील यांनी सर्व लोकप्रतिनिधींबरोबर चर्चा करुन त्यांच्या भावनांची खऱ्या अर्थाने कदर केलेली होती. त्याच वेळेला त्यांनी सांगितले होते की, महाराष्ट्रामध्ये दांडेकर समिती नियुक्त करायची आहे आणि त्या अनुषंगाने राज्यामध्ये विविध विभागात, विविध क्षेत्रात असणारा अनुशेष भरुन काढण्याचा प्रयत्न करायचा आहे. हे स्व. वसंतदादांनी त्यावेळेला केलेले आहे. आणि त्यांनंतरच्या काळामध्ये आपण या बाबतीत सातत्याने अट्टाहास केलेला आहे. प्रा. बी.टी.देशमुख साहेब, मी आपल्याला सांगू इच्छितो की, वैधानिक विकास मंडळाच्या अनुषंगाने दिल्लीला जी मिटींग झाली होती त्या मिटिंगला सुध्दा आम्ही काही सदस्य उपस्थित होतो. त्याच्या अगोदरसुध्दा विधानसभा आणि विधानपरिषदेमध्ये त्या अनुषंगाने एक ठराव एक मताने पास झालेला आहे. म्हणून महाराष्ट्रामध्ये विदर्भ, मराठवाडा,उर्वरित महाराष्ट्र या पध्दतीने वैधानिक विकास मंडळे निर्माण झाली, ती सगळ्यांच्या विचाराने आणि एकमताने निर्माण झालेली आहेत. **मला असे वाटते की, या अनुषंगाने आपला जो अट्टाहास आणि आग्रह आहे तो खऱ्या अर्थाने माणुसकीला न्याय मिळावा या अनुषंगाने आहे.** सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावते साहेबांनी कृष्णा खो-यातील मराठवाडयातील पाणी या अनुषंगाने जेव्हा चर्चा केली होती. तेव्हा मी याच सत्ताधारी बाकावरुन सन्माननीय सदस्य श्री. दिवाकर रावतेसाहेबांना सुध्दा सांगितले होते की, कृष्णा खो-यातील तुमच्या वाटयाला आलेले पाणी कितीही अडचणी आल्या आणि कितीही दुराग्रह केला तरी

*सहपत्र : तिन :* *: परिच्छेद १२९ पहा*

# निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम

*औद्योगीक विकास महामंडळाचे लक्षावधी रुपये खर्च होऊन या प्रकल्पाचे सर्वेक्षण पूर्ण झाले होते. आद्योगीक विकास महामंडळाने आम्हाला हे धरण नको अशी भूमीका घेतल्यामूळे हे सर्व पाणी पिण्यासाठी व सिंचनासाठी उपलब्ध होणार ही अतिशय आनंदाची गोष्ट होती व आम्ही त्याचा सभागृहामध्ये तडाखेबंद पाठपुरावा सुरु केला. वर नमूद केल्याप्रमाणे या प्रवासाचे प्रतिबिंब पडलेल्या सभागृहातील सर्व चर्चा खाली दिलेल्या आहेत.*
*२३ जुलै १९९७ ते २ ऑगस्ट २००७ ह्या १०-११ वर्षाच्या काळात हा प्रश्न सभागृहामध्ये निरनिराळ्या*
*२३ वेळेला चर्चेसाठी वा उत्तरासाठी आला. त्या चर्चेची प्रतिवेदने*
*या सहपत्रात दिलेली आहेत. - **बी.टी.देशमुख***

## (१)
## पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम

*दुसरे अधिवेशन १९९७ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, दिनांक २३ जुलै, १९९७*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १११, क्रमांक १०, पृष्ठ १५४*

(१४) १५५४५(५-३-९७) **सर्वश्री. सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, जयवंत ठाकरे, व्ही.यू.डायगव्हाणे** : सन्माननीय उप मुख्य मंत्री (पाटबंधारे) पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) पुर्णा उपखोऱ्यातील पेढी नदी प्रकल्पाचे सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याचे काम पाटबंधारे विभागाच्या बुलढाणा पाटबंधारे प्रकल्प मंडळातर्फे हाती घेतलेले आहे किंवा घेण्यात येत आहे, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, पाटबंधारे विभागातर्फे अन्वेषणाधीन असलेले सदर पेढी धरण,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळासाठी ठेव तत्त्वावर बांधून देण्यासाठी पाटबंधारे विभागाने आपल्या दिनांक ३१ जुलै १९९६ च्या शासन ज्ञापनाअन्वये संमती दर्शविली आहे, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, या सर्वेक्षण व अंदाजपत्रके तयार करण्याच्या कामाची सद्यःस्थिती काय आहे ?

**श्री.गोपीनाथ मुंडे** (२-५-९७) : (१) होय.

(२) होय.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास मंडळाकडून निधी उपलब्ध झाल्यावर सर्वेक्षण व त्यानंतर अंदाजपत्रके तयार करण्यात येईल.

******

## (२)
## औद्योगिक क्षेत्रासाठी कायमस्वरूपी पाणीपुरवठ्याची व्यवस्था

*दुसरे अधिवेशन १९९७ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, २३ जुलै, १९९७*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १११, क्रमांक १०, पृष्ठ २३९*

**१०. १५४८६ (१०-४-९७) सर्वश्री जयवंत ठाकरे, बी.टी.देशमुख, पी.जी.दस्तुरकर, व्ही.यू.डायगव्हाणेः** तारांकित प्रश्न क्रमांक ११८९७ ला दिनांक १२ डिसेंबर १९९६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय उद्योग मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील कायः-

(१) नांदगाव पेठ येथे विकसित होत असलेल्या मोठ्या औद्योगिक क्षेत्रामध्ये पाणी पुरवठ्याचा स्वतंत्र स्त्रोत म्हणून पेढी नदीवर धरण बांधण्याचा पाटबंधारे विभागाने सुचविलेला प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ६ जून, १९९६ रोजी सचिव, पाटबंधारे यांच्या दालनात झालेल्या बैठकीमध्ये मान्य केला, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, ७ जून १९९६ रोजीच्या पत्रान्वये महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या मुख्य कार्यकारी अधिकाऱ्यांनी संमती कळविल्यानंतर ३१ जुलै १९९६ रोजी पाटबंधारे विभागाने याबाबतचे शासन ज्ञापन निर्गमित केले, हेही खरे आहे काय;

(३) असल्यास, २८ ऑक्टोबर १९९६ व ६ नोव्हेंबर १९९६ रोजी मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग, अमरावती यांनी वेगवेगळी पत्रे पाठवून उपरोक्त

---

१०० टक्के पाणी तुम्हाला मिळाले पाहिजे, याकरिता मी स्वतः प्रयत्न करीन. हे करणे जरुरीचे आहे. अध्यक्ष महाराज, आज दुर्दैवाने असे झाले आहे की, एका तालुक्यातील पाणी पलीकडच्या तालुक्यात देण्यासाठी सुध्दा लोक विरोध करतात.

**सभापती** :एका तालुक्यात सुध्दा खालचा भाग आणि वरचा भाग यांच्यामध्ये भांडणे असतात..

**श्री. शिवाजीराव देशमुख** : अशा तऱ्हेने सध्या पाणी मिळविण्यासाठी भांडणे केली जात असतील आणि ती सगळी भांडणे जर मिटवावयाची असतील तर आपण निग्रही असले पाहिजे. काही तत्व आपण कृतीने राबविली पाहिजेत. या दृष्टीने राष्ट्रीय पातळीचा जो प्रकल्प आहे, त्या प्रकल्पातील पाण्याचा महाराष्ट्राचा हिस्सा आपल्याला मिळावा या अनुषंगाने या ठरावाला अनन्यसाधारण महत्व आहे. सन्माननीय प्रा. बी.टी.देशमुख साहेबांनी या ठिकाणी अत्यंत तीव्र पध्दतीने सुधारणेच्या निमित्ताने आपली भावना व्यक्त केलेली आहे, आणि ती वस्तुस्थिती आहे. **प्रा. बी.टी. देशमुख साहेब मी तुम्हाला अभिमानाने सांगेन की, ज्या वेळेला केंद्राकडून यासाठी पैसे मिळतील त्यावेळेला त्याचा समतोल हिस्सा आपल्याला कसा मिळेल यादृष्टीने जे प्रयत्न होतील, त्या प्रयत्नामध्ये आम्ही सर्व कार्यकर्ते आपल्या बरोबर १०० टक्के सहभागी होऊ.** स्व. वसंतदादाचे अनुयायी यादृष्टीने वसंतदादांनी महाराष्ट्राला दिलेला जो शब्द होता, तो शब्द पाळण्याची सुध्दा आमची नैतिक जबाबदारी असणे गरजेचे आहे. म्हणून प्रा.बी.टी.देशमुख साहेबांना मी विनंती करील की, त्यांनी या ठिकाणी दिलेली सुधारणा मागे घ्यावी आणि पाटबंधारे राज्यमंत्र्यांनी जो ठराव मांडला आहे तो या सदनामध्ये मंजूर व्हावा, अशी अपेक्षा व्यक्त करतो आणि मी माझे भाषण पूर्ण करतो.

**श्री. अजित घोरपडे** ( पाटबंधारे राज्यमंत्री ) : सभापती महोदय, नद्या जोडणी कार्यक्रमाच्या बाबतीत जो ठराव या ठिकाणी मांडलेला आहे त्याबाबतीत सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख साहेबांनी सुधारणा सुचविलेली आहे. त्यांच्या भावनांची निश्चितपणे शासनाला जाणीव आहे. या राज्यातील अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीने त्यांनी ही सूचना या ठिकाणी आणलेली आहे. हा अनुशेष भरुन काढण्याच्या दृष्टीनेच आर्थिक तरतूद करण्यासाठी ही मदत केंद्र शासनाकडे मागण्यासाठी हा ठराव या ठिकाणी करण्यात आलेला आहे. दोन्ही सदनाचा ठराव महाराष्ट्रातर्फे एका पध्दतीने वर जावा, **एकमताने ठराव वर जावा अशी शासनाची भावना आहे परंतु त्याचबरोबर सन्माननीय सदस्य श्री. देशमुख साहेब यांनी ज्या काही सूचना या ठिकाणी आणल्या त्याप्रमाणे या पुढील काळात कामांना प्राधान्य देण्याच्या बाबतीत निश्चितपणे शासन प्रयत्नशील राहील आणि त्यांच्या सूचनांची कदर करील याबाबतीत मी ग्वाही देतो.** सभापती महोदय, मी आपल्यामार्फत सन्माननीय सदस्य श्री. बी.टी.देशमुख यांना विनंती करतो की, त्यांनी ही सूचना मागे घ्यावी आणि हा ठराव एकमताने संमत करण्याच्या दृष्टीने मदत करावी.

**श्री. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, माननीय राज्यमंत्री महोदयांनी जो प्रस्ताव मांडला आणि त्यानंतर मी सुधारणा मांडली. या सुधारणेला माननीय विरोधी पक्ष नेते तसेच सन्माननीय सदस्य श्री. दिवाकरराव रावते यांनी पाठिंबा दिला त्याबद्दल मी त्यांचा आभारी आहे. सन्माननीय सदस्य श्री. शिवाजीराव देशमुख यांनी सुध्दा त्या संदर्भात अतिशय उपयुक्त विचार मांडले. त्यांनी मांडलेल्या विचाराबद्दल मी जरुर आभारी आहे. त्यांनी केलेल्या सूचनेच्या बाबतीत मात्र मतभेद असू शकतो. माननीय राज्यमंत्र्यांनी याबाबतीत अतिशय स्टिरीओ टाईप जे उत्तर आहे ते उत्तर दिलेले आहे. सभापती महोदय, सामान्यपणे हे खरे आहे की, सदस्यांची भावना अशी असते की, शासनाची भूमिका किती पोकळ आहे किंवा भरीव आहे ते त्या निमित्ताने आपल्या विषयाच्या बाबतीत रेकॉर्डवर यावे. तो हेतू तर जवळजवळ साध्य झालेलाच आहे. परंतु **सभापती महोदय असे काही प्रसंग असतात की ज्यावेळेला अशा प्रकारचा आग्रह मान्य करता येत नाही. माझी सुधारणा मान्य होवो अगर न होवो. पण एक गोष्ट मी स्पष्ट करु इच्छितो की, महाराष्ट्राची विनंती ही केंद्रासमोर एकमतानेच जावी हे मी मघाशी सांगितले. आता त्याचा पुन्हा उच्चार करतो. मात्र ही सुधारणा मी मागे घ्यावी या विषयीचा आग्रह मी मान्य करु शकत नाही.** म्हणून मी आपल्याला विनंती करतो की, ही सूचना सभागृहाच्या निर्णयासाठी टाकावी. सभागृहाला अशी विनंती करतो की सभागृहाने ती मान्य करावी.

**सभापती** : आता मी सुधारणा मतास टाकतो.

सुधारणा मतास टाकून असंमत झाली.

**सभापती** : आता मी ठराव सभागृहाच्या मतास टाकतो.

ठराव मतास टाकून संमत झाला.

**- समाप्त -**

प्रकल्पाच्या सर्वेक्षण व अंदाजपत्रकासाठी अंदाजे ३० लक्ष रुपयांची मागणी मुख्य अभियंता, महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, अंधेरी, मुंबई यांचेकडे केलेली आहे, हे ही खरे आहे काय;

(४) असल्यास, याबाबत महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने काय कारवाई केलेली आहे;

(५) अद्याप कारवाई केलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**ॲड. लिलाधर डाके (२४-६-९७)** : (१) होय. तत्वतः प्रस्ताव मान्य केला आहे.

(२) व (३) होय.

(४) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक २७ मार्च १९९७ रोजी ३०.२० लक्ष रुपये पाटबंधारे प्रकल्प अन्वेषण विभाग, बुलढाणा यांच्याकडे भरणा केले आहेत.

(५) प्रश्न उद्भवत नाही.

*****

## (३)

## पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम

*दुसरे अधिवेशन २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*मंगळवार, दिनांक २४ जुलै, २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२५, क्रमांक ७, पृष्ठ १ व २*

* १६०६५ **सर्वश्री बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील, नानासाहेब बोरस्ते** : दिनांक २३ जुलै १९९७ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या पहिल्या यादीतील प्रश्न क्रमांक १५५४५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग, बुलढाणा यांनी दिनांक २ मार्च २००१ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग यांना मंजुरीसाठी विस्तृत अंदाजपत्रक सादर केले, हे खरे आहे काय;

(२) असल्यास, सदरहू प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रदान करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

(३) अजून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**श्री. बाळासाहेब थोरात, डॉ.पद्मसिंह पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) सर्वेक्षण व अन्वेषणाचे काम पूर्ण होऊन प्रकल्प अहवालाची छाननी मुख्य अभियंता कार्यालयात चालू आहे.

(३) प्रकल्प अहवालाची तांत्रिक तपासणी करण्यात येत आहे.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, येथील अमरावती जवळ नांदगाव पेठ पंचतारांकित एम.आय.डी.सी.ला पाणी पाहिजे आणि त्यांनी ३६ द.ल.घ.मी. ची मागणी पाटबंधारे विभागाकडे केली होती. शेतीच्या सिंचनामध्ये महत्तम अनुशेष असलेला हा जिल्हा असल्यामुळे २१९ हजार हेक्टरचा अनुशेष आणि रुपयामध्ये १०९५ कोटी रुपयाचा अनुशेष असल्यामुळे पाटबंधारे विभागाने कायम स्वरुपी आरक्षण देण्यासाठी 'नाही' असे सांगितले. तात्पुरती व्यवस्था २० द.ल.घ.मी. इतकी करुन दिली आणि असे सांगण्यात आले की, तुमच्यासाठी वेगळे धरण बांधून देतो. त्याचे पैसे तुम्ही खर्च करा. सर्व्हेक्षणासाठी १७ ऑक्टोबर ९६ ला ३० लाखाची मागणी केली आणि ते एम.आय.डी.सी. ने पाटबंधारे विभागाला दि.२७-३-९७ ला दिले. दोन-तीन वर्षे झाली तरी सर्व्हेक्षण पूर्ण होत नाही. प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविला जात नाही. माझे म्हणणे आहे की, या कामासाठी तीन वर्षाचा म्हणजे बराच विलंब झालेला आहे. याठिकाणी तिसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की,"प्रकल्प अहवालाची तांत्रिक तपासणी करण्यात येत आहे." तसेच दुसऱ्या प्रश्नाच्या उत्तरामध्ये म्हटलेले आहे की,"प्रकल्प अहवालाची छाननी मुख्य अभियंता कार्यालयात चालू आहे." तेव्हा माझे म्हणणे असे आहे की, पुढच्या १५ दिवसामध्ये किंवा महिन्याभरामध्ये आपल्या लेव्हलवरील तांत्रिक मान्यता देऊन प्रशासकीय मान्यतेसाठी हा प्रस्ताव त्यांच्याकडे पाठविणार आहात का?

**श्री.बाळासाहेब थोरात** : सभापती महोदय, पाटबंधारे खात्याकडून १० ऑगस्ट पूर्वी तांत्रिक मान्यता दिली जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, माननीय मंत्रिमहोदयांनी १० ऑगस्टपूर्वी तांत्रिक मान्यता पाटबंधारे विभागाकडून दिली जाईल असे सांगितले, त्याबद्दल मी माननीय मंत्री महोदयांचा आभारी आहे. माझ्या महत्वाच्या प्रश्नाचे उत्तर आले आहे. त्यांच्याकडून आता मला एकच माहिती हवी आहे की, प्रशासकीय मान्यता आल्यानंतर, कारण ही ५ स्टार डेसीग्नेशन झालेली एम.आय.डी.सी. आहे आणि जलसिंचनाच्या बाबतीत लोकांचे, शेतकऱ्यांचे नुकसान होऊ नये म्हणून हा प्रकल्प हाती घेतला आहे. त्याचे प्लॅन एस्टीमेट झाले आहे. त्यांनी मान्यता दिल्यानंतर २ किंवा ३ किंवा ४ वर्षामध्ये हा प्रकल्प पूर्ण करता येईल का?

**श्री.बाळासाहेब थोरात** : सभापती महोदय, हे डिपॉझिटरी वर्क आहे. तांत्रिक मान्यता दिल्यानंतर एम.आय.डी.सी. चे चीफ इंजिनिअर त्याला प्रशासकीय मान्यता देतील. मग त्यांनी डिपॉझिट करुन आम्ही टेंडर काढावयाचे आहे. त्यांनी डिपॉझिट द्यावे, तीन वर्षामध्ये काम पूर्ण केले जाईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, शासनाने ३१ जुलै ९६ मध्ये ज्ञापन निर्गमित केले आहे. त्यामध्ये शेवटी म्हटलेले आहे की,"आवश्यक निधी उपलब्ध करुन न दिल्यास तात्पुरत्या आरक्षणाची मान्यता रद्द समजण्यात येईल." प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर तीन वर्षामध्ये हे काम करण्यात येईल असे आपण सांगितले तेव्हा त्यांनी शक्य तेवढ्या लवकर प्रशासकीय मान्यता देण्याच्या बाबतीत काम करावे अशा प्रकारच्या स्पष्ट सूचना त्यांना देणार का?

**श्री.बाळासाहेब थोरात** : सभापती महोदय, त्यांनी याला ३१ ऑगस्ट पर्यंत मान्यता द्यावी असा आमचा आग्रह आहे.

******

## (४)

## पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम

*तिसरे अधिवेशन २००१ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*गुरुवार, दिनांक ६ डिसेंबर, २००१*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२६, क्रमांक ४, पृष्ठ ९ ते ११*

* **१९४०२. सर्वश्री सुरेश पाटील, बी.टी.देशमुख, व्ही.यु.डायगव्हाणे, नानासाहेब बोरस्ते, विलास अवचट,रविंद्र मिर्लेकर,बाळासाहेब साळुंखे,अरविंद सावंत,विजय वडेट्टीवार** : ता.प्र.क्र.१६०६५ ला दिनांक २४ जुलै,२००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय -

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन, अधिक्षक अभियंता, पाटबंधारे विभाग,बुलढाणा,यांनी दिनांक २ मार्च,२००१ च्या पत्रान्वये मुख्य अभियंता, पाटबंधारे विभाग यांना मंजुरीसाठी विस्तृत अंदाजपत्रक सादर केले, हे खरे आहे काय ;

(२) असल्यास,सदरहू प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रदान करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे ;

(३) अजून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. बाळासाहेब थोरात, डॉ.पदमसिंह पाटील यांच्याकरिता** : (१) होय.

(२) मुख्य अभियंता, पा.वि.नागपूर ह्यांनी पाटबंधारे विभाग,मंत्रालय,मुंबई यांच्या सहमती नंतर त्यांचे कार्यालयीन पत्र क्र.५५६० दि. ६-१०-२००१ अन्वये प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई यांना सादर केलेला आहे.

(३) हा प्रकल्प प्रशासकीय मान्यते संदर्भात महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ,मुंबई यांचे अधिकार कक्षेत येत असल्यामुळे त्यांचेतर्फे निर्णय अपेक्षित असून सदर प्रकरणी उद्योग,उर्जा व कामगार विभागामार्फत कार्यवाही चालू आहे.

**श्री.सुरेश पाटील** : अध्यक्ष महोदय, प्रश्न क्रमांक २ च्या उत्तरामध्ये असे म्हटले आहे की, दिनांक ६.१०.२००१ अन्वये प्रकल्पाचा सविस्तर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी मुख्य कार्यकारी अधिकारी,महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, मुंबई ह्यांना सादर केलेला आहे. तरी या प्रस्तावामध्ये वन जमीन किती येत आहे ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : या प्रकल्पाखाली एकूण २८३४ हेक्टर जमीन येत आहे.

**श्री.सुरेश पाटील** : त्यामध्ये वन जमीन किती आहे.

**श्री.बाळासाहेब थोरात** : वनजमीन त्यामध्ये येत नाही.

**श्री.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय,दिनांक २४ जुलै २००१ रोजी तारांकित प्रश्न क्रमांक १६०६५ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात आज पुन्हा प्रश्न विचारण्यात आला असून त्या प्रश्नाला माननीय मंत्रिमहोदयांनी उत्तर दिलेले आहे. २४ जुलै २००१ रोजी विचारण्यात आलेल्या प्रश्नाला उत्तर देत असतांना माननीय मंत्रिमहोदयांनी स्पष्टपणे असे म्हटले होते की, "या प्रकल्पाला दिनांक १० ऑगष्ट २००१ पूर्वी तांत्रिक मान्यता दिली जाईल, आणि औद्योगिक विकास महामंडळाने दिनांक ३१ ऑगष्ट २००१ पर्यंत मान्यता द्यावी असा आमचा आग्रह राहील." त्याप्रमाणे दिनांक १० ऑगस्ट २००१ पर्यंत पाटबंधारे विभागाने मान्यता दिलेली नाही. ही मान्यता त्यानंतर ६ ऑक्टोबर २००१ रोजी दिलेली आहे. एक दोन महिना उशीर झालेला आहे. त्यामुळे त्याबाबत मी आता तक्रार करु इच्छित नाही. या प्रकल्पाला अजून प्रशासकीय मान्यता मिळालेली नाही.या बाबतीत माझे एवढेच म्हणणे आहे की, अप्पर वर्धा प्रकल्प हा शेतीसाठी आहे या प्रकल्पातील १० टक्के पाणी पिण्यासाठी राखून ठेवण्यात आलेले आहे. एम.आय.डी.सी.ने पिण्याच्या पाण्यासाठी रिझर्व्हेशन मागितले होते. दिनांक ६ जून १९९६ रोजी पाटबंधारे विभागाच्या सचिवांच्या दालनात महाराष्ट्र औद्योगिक

विकास महामंडळाच्या वरिष्ठ अधिकाऱ्यांबरोबर एक बैठक झाली होती. त्या बैठकीत स्पष्टपणे असे ठरले होते की, "उर्ध्व वर्धा जलाशयातून त्यांना कायम स्वरुपी पाणी दिले जाणार नाही. पेढी प्रकल्प आमच्या अन्वेषणाखाली आहे आणि त्यांनी स्वतंत्रपणे प्रकल्प करुन घेतला तर तो एम.आय.डी.सी.ला बांधून देऊ." त्यानंतर शासनाने दिनांक ३१ जुलै २००१ रोजी एक शासन ज्ञापन काढले होते. त्यात असे म्हटलेले आहे की, "महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने उर्ध्व वर्धा जलाशयातून केलेली २० द.ल.घ.मी. पाण्याची मागणी पूर्णपणे कायम स्वरुपात मान्य करता येणार नाही. सदर पाणी पुरवठा महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ स्वतःच्या योजनेमार्फत उपलब्ध करुन घेवू शकेल." त्या ज्ञापनात पुढे असेही म्हटलेले आहे की, " सदर पेढी धरण पाटबंधारे विभागाच्या अन्वेषणाधीन असून ते महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाच्या खर्चाने बांधून देण्याची पाटबंधारे विभागाची तयारी आहे." त्यात पुढे असे म्हटलेले आहे की, "सदर प्रस्ताव महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाला मान्य असून त्या धरणासाठी येणारा आवर्ती व अनावर्ती खर्च देण्यासाठी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने त्यांच्या दिनांक ७-६-९६ च्या पत्रानुसार तयारी दर्शविली आहे." दिनांक ६ जून १९९६ रोजी बैठक झाली होती आणि दुसऱ्याच दिवशी हे पत्र पाठविण्यात आले होते. तेव्हा या अटीवर तात्पुरत्या स्वरुपात पाण्याची व्यवस्था करण्यात आलेली आहे. कायम स्वरुपात ही मागणी मान्य केलेली नाही. या निमित्ताने मी माननीय मंत्रिमहोदयांना हे सांगू इच्छितो की, अमरावती जिल्ह्यात अनुशेष आहे तो जलसिंचनाचा महत्तम आहे. त्यामुळे शेतीचे पाणी तोडून देता येत नाही. म्हणून आपण ती ठाम भूमिका घेतली होती. या शासन निर्णयातील पाचव्या परिच्छेदामध्ये असे म्हटलेले आहे की, "धरणाच्या सर्वेक्षणासाठी,धरणाचे अंदाजपत्रक तयार करण्यासाठी, संकल्पने तयार करण्यासाठी, तसेच धरण बांधण्यासाठी आवश्यक असलेला निधी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने अधीक्षक अभियंता, उर्ध्व वर्धा प्रकल्प,अमरावती यांना त्यांच्या मागणीप्रमाणे वेळोवेळी उपलब्ध करुन द्यावा. आवश्यक निधी उपलब्ध करुन न दिल्यास तात्पुरत्या आरक्षणाची मान्यता रद्द समजण्यात येईल." या बाबतीत माझे असे म्हणणे आहे की या प्रकल्पामध्ये वन जमीन काहीही नाही, असे मा. मंत्रिमहोदयांनी मघाशी सांगितले आहे. प्रशासकीय मान्यता मिळाल्याशिवाय वन जमिनीचा प्रस्ताव पाठविता येत नाही. त्यानंतर जल आयोगाची मान्यता पाहिजे. आपण त्यांना दोन गोष्टी स्पष्टपणे सांगावयास पाहिजे या दोन गोष्टी आपण त्यांना सांगणार आहात काय ? पहिली गोष्ट अशी आहे की, प्रकल्पात वन जमीन जातच नाही. परंतु काही वन जमीन जात असेल तर तुमची प्रशासकीय मान्यता असल्याशिवाय असा प्रस्ताव पाठवता येत नाही. तेव्हा या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता प्रथम मिळाली पाहिजे. या प्रकल्पात वन जमिन जात नाही हे खरे आहे परंतु जर काही जात असेल तर प्रशासकीय मान्यता पहिल्यांदा दिली गेली पाहिजे आणि त्यानंतर जल आयोगाची मान्यता मिळेल आणि त्यानंतर वन जमिनीची मान्यता मिळेल. तेव्हा कबूल केल्याप्रमाणे प्रोसेसिंग करुन अमुक इतक्या दिवसाच्या आत ती प्रशासकीय मान्यता द्यावी, नाही तर तुमची तात्पुरती मान्यता तोडू असे आपण आजच सांगू नका. पण याबाबतीत आपल्याला चार दिवसांनी सांगावेच लागेल. **शेतीचे पाणी तोडण्याचा जो प्रयोग त्या ठिकाणी होत आहे त्याला आम्ही ठाम विरोध करु इच्छितो.** या संदर्भात मी माननीय मंत्रिमहोदयांना प्रश्न विचारु इच्छितो की, या प्रकल्पामध्ये वन जमीन जात नाही. परंतु जर जात असेल तर तुमची प्रशासकीय मान्यता पहिल्यांदा लागेल त्यानंतर जल आयोगाची मान्यता लागेल. तेव्हा या संदर्भात प्रशासकीय मान्यता आल्यानंतर आम्ही तावडतोब आमच्या विभागामार्फत प्रोसेस करु असे आपण त्यांना स्पष्टपणे कळविणार आहात काय ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : कळविण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : केव्हा कळविणार आहात ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : आठ दिवसात कळविण्यात येईल.

**श्री.बी.टी.देशमुख** : ऑगष्ट महिन्यात मान्यता देतो असे सांगितले होते परंतु ऑक्टोबरमध्ये मान्यता दिली. आठ दिवसात आपण त्यांना कळविणार आहात परंतु या नोटीफिकेशनप्रमाणे त्यांच्यावर हे बंधनकारक आहे. तेव्हा आपण त्यांना एक मुदत द्या की, अमुक तारखेच्या आत प्रशासकीय मान्यता दिली पाहिजे. त्याबाबतीत आपण मागे सांगितलेले आहे. तेव्हा त्याही बाबतीत आपण त्यांना स्पष्टपणे कळविणार आहात काय ?

**श्री.बाळासाहेब थोरात** : प्रशासकीय मान्यता लवकरात लवकर देण्याबाबत त्यांना कळविण्यात येईल.

******

**(५)**

**पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम**

*पहिले अधिवेशन २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*शुक्रवार, दिनांक १५ मार्च, २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२७, क्रमांक २, पृष्ठ*

(७५) * २२७७८ **सर्वश्री.नानासाहेब बोरस्ते, बी.टी.देशमुख, व्हि.यू.डायगव्हाणे, सुरेश पाटील, प.म.पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक १९४०२ ला दिनांक ६ डिसेंबर २००१ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय ;

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण करुन,मुख्य अभियंता पाटबंधारे विभाग यांनी पाटबंधारे विभाग, मंत्रालय,मुंबई यांच्या सहमतीनंतर प्रशासकीय मान्यतेसाठी कार्यकारी अधिकारी महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ मुंबई यांना दिनांक ६.१०.२००१ रोजी सादर केलेल्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नाची सद्यस्थिती काय आहे.

(२) अजून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ.पद्मसिंह पाटील** : (१) **अमरावती औद्योगिक क्षेत्रातील रासायनिक क्षेत्र रद्द केल्यामुळे महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास प्रस्तावित पेढी प्रकल्पातील पाण्याची आता गरज न राहिल्यामुळे पेढी नदी प्रकल्पाचा प्रस्ताव त्यांचेतर्फे रद्द झालेला आहे.**

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

**(६)**

**पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम**

*तिसरे अधिवेशन २००२ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*बुधवार, दिनांक १८ डिसेंबर, २००२*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १२९, क्रमांक ५, पृष्ठ*

**(१) २५०४१ (१८-७-२००२) सर्वश्री नानासाहेब बोरस्ते, बी.टी.देशमुख, व्ही.यू.डायगव्हाणे, प.म.पाटील** : तारांकित प्रश्न क्रमांक २२७७८ ला दिनांक १५ मार्च २००२ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय–

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यानंतर पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ, यांना या प्रकल्पाची गरज नसल्याने पाटबंधारे विभागातर्फे या प्रकल्पाच्या प्रस्तावास मान्यता प्रदान करुन प्रत्यक्ष काम सुरु करण्याच्या प्रश्नाची सद्यःस्थिती काय आहे;

(२) अजून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.पद्मसिंह पाटील** (९-१०-२००२) : (१) "**अतिरिक्त अमरावती औद्यागिक रासायनिक क्षेत्र" रद्द झाल्यामुळे या सविस्तर प्रकल्प अहवालास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यास औद्योगिक विकास महामंडळाने असमर्थता दर्शविली आहे.** त्यामुळे या ठिकाणी सिंचन प्रकल्पाचा अभ्यास सुरु आहे. सिंचन प्रकल्प म्हणून प्रशासकीय मान्यता नसल्याने काम सुरु करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

(२) सिंचन प्रकल्पाच्या दृष्टीने सखोल सर्वेक्षण झाल्यानंतर प्रकल्प अहवाल प्रशासकीय मान्यतेसाठी सादर करण्यात येईल.

******

**(७)**

**पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम**

*तिसरे अधिवेशन २००३ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*गुरुवार, दिनांक २४ जुलै, २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३२, क्रमांक ९, पृष्ठ*

(२) ३०३२० (१३-३-२००३). **श्री.नानासाहेब बोरस्ते, प्रा.बी.टी.देशमुख, श्री.व्ही.यु.डायगव्हाणे, श्री.वसंतराव खोटरे, श्री.प.म.पाटील, श्री.जी.एल.ऐनापूरे** : दिनांक १८ डिसेंबर २००२ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तरांच्या सहाव्या यादीतील प्र.क्र.२५०४१ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय:-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करून दिल्यानंतर व पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना या प्रकल्पाची गरज नसल्याने पाटबंधारे विभागातर्फे सखोल सर्वेक्षणानंतर या प्रकल्पाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय;

(२) असल्यास, याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरूप काय आहे;

(३) अद्याप प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास, याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ.पद्मसिंह पाटील** (१२-६-२००३) : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) हा प्रकल्प सर्वेक्षण स्तरावर असल्यामुळे प्रकल्पास सध्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही.

******

(८)

## पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम

*तिसरे अधिवेशन २००३ : : महाराष्ट्र विधानपरिषद कार्यवाही*
*मंगळवार, दिनांक १६ डिसेंबर, २००३*
*अधिकृत प्रतिवेदन, खंड १३३, क्रमांक ७, पृष्ठ*

(३) * ३६७८८ **श्री. नतिकोद्दीन खतिब, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. प.म. पाटील** : दिनांक २४ जुलै २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या अतारांकित प्रश्नोत्तराच्या चौथ्या यादीतील प्रश्न क्रमांक ३०३२० ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयाचा निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना या प्रकल्पाची गरज नसल्याने पाटबंधारे विभागातर्फे सखोल सर्व्हेक्षणानंतर या प्रकल्पाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय ;

(२) झालेला असल्यास याबाबत शासनाने घेतलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे ;

(३) अजून प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. पद्मसिंह पाटील** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाले असून प्रशासकीय मान्यतेसाठी प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे. त्यामुळे याबाबत विलंब होत आहे असे म्हणता येणार नाही.

******

(९)

## पेढी नदी प्रकल्पाचे बांधकाम

*दुसरे अधिवेशन २००४ : : महाराष्ट्र विधानपरिषद*
*गुरुवार, दिनांक ३ जून, २००४*

(२७) * ४३५७४ **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. प.म. पाटील, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे** : मंगळवार दिनांक १६ डिसेंबर २००३ रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या दिनांक १५ डिसेंबर २००३ रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादीतील प्रश्न क्रमांक ३६७८८ ला दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पाटबंधारे मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळाने ३०.२० लक्ष रुपयांचा निधी उपलब्ध करुन दिल्यामुळे पेढी नदी प्रकल्पाच्या सर्वेक्षणाचे काम पूर्ण झाल्यानंतर महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळ यांना या प्रकल्पाची गरज नसल्याने पाटबंधारे विभागातर्फे सखोल सर्व्हेक्षणानंतर या प्रकल्पाच्या प्रस्तावास प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याच्या विचाराधीन प्रस्तावावरील शासनाचा विचार पूर्ण झालेला आहे काय ;

(२) असल्यास, याबाबत शासनाने कोणता निर्णय घेतला आहे ;

(३) तसेच अद्याप प्रशासकीय मान्यता प्रदान करण्यात आलेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. पद्मसिंह पाटील** : (१) नाही.

(२) प्रश्न उद्‌भवत नाही.

(३) महाराष्ट्र औद्योगिक विकास महामंडळास सदर प्रकल्पाची आवश्यकता नसल्याने सदर प्रकल्प नव्याने पाटबंधारे प्रकल्प म्हणून अभ्यासण्यात येत आहेत.

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, दोन-चार मिनिटांचा वेळ आपण या प्रश्नाला दिलेला आहे त्याबद्दल मी आपला अत्यंत आभारी आहे. महत्तम अनुशेष असलेल्या, २१९ हजार हेक्टरचा अनुशेष असलेल्या अमरावती जिल्हयातील हा प्रश्न आहे. सभापती महोदय, उत्तर मागे मागे चाललेले आहे. दिनांक २४ जुलै,२००३ ला ३०३२० या तारांकित प्रश्नाला असे उत्तर दिले होते की, "हा प्रकल्प सर्वेक्षण स्तरावर असल्यामुळे या प्रकल्पास सध्या प्रशासकीय मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न उद्‌भवत नाही." त्यानंतर दिनांक १६ डिसेंबर २००३ रोजी उत्तर असे दिले की, "सर्वेक्षणाचे काम पूर्ण झालेले आहे. आणि प्रशासकीय मान्यतेसाठी प्रकल्पाचा सविस्तर अहवाल तयार करण्याचे काम प्रगतीपथावर आहे." आज उत्तर असे दिले आहे की, "सदर प्रकल्प नव्याने पाटबंधारे प्रकल्प म्हणून अभ्यासण्यात येत आहेत." माझे म्हणणे असे आहे की, हा मोठा प्रकल्प असून या प्रकल्पामध्ये बुडीत क्षेत्रात एक हेक्टर देखील वन जमीन जात नाही. म्हणून माझा पॉईंटेड प्रश्न असा आहे की, याचे सर्वेक्षण पूर्ण झाले आणि मे,२००४ पर्यंत याला प्रशासकीय मान्यता देण्याचे वेळापत्रक पाटबंधारे विभागाने ठरविले होते , निश्चित केले होते ही गोष्ट खरी आहे काय?

**श्री. बाळासाहेब थोरात** : सभापती महोदय, या प्रकल्पाला लवकरात लवकर मंजुरी देण्याचा ....

**प्रा. बी. टी. देशमुख** : सभापती महोदय, लवकरात लवकर हे व्हेग उत्तर आहे. माझा पॉईंटेड प्रश्न आहे. तेव्हा त्या प्रश्नाचे उत्तर देखील पॉइंटेड मिळाले पाहिजे. मंत्रिमहोदय, लवकरात लवकर कशाला म्हणता? माझे म्हणणे असे आहे की, १९९७ पासून हा प्रकल्प एम.आय.डी.सी.ला दिला. २७.३.९७ ला त्यांच्याकडून ३०.२० लाख रुपये आपण घेतले. त्यातून सर्वेक्षण करुन घेतले. मग त्यांनी म्हटले आम्हाला हा प्रकल्प नको. म्हणून यांनी म्हटले आता आम्ही हा प्रकल्प जलसिंचनासाठी पाहतो. हे तीन-चार वर्षे चालू आहे.हा मेजर प्रॉजेक्ट आहे आणि महतम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील आहे. मंत्रिमहोदय, आपण माझा प्रश्न ऐकून घ्या. याबाबतीत "लवकरात लवकर असे सांगू नका" मे,२००४ पर्यंत या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता देण्याचा कार्यक्रम आपल्या पाटबंधारे विभागाने ठरविला होता काय? 'होय' म्हणा, नाही तर 'नाही' म्हणा.

**श्री. बाळासाहेब थोरात** : सभापती महोदय, प्रशासकीय मान्यता देण्याचा कार्यक्रम पाटबंधारे विभागाने ठरवला होता.

**प्रा. बी. टी. देशमुख** : आता जून महिना लागला आहे प्रशासकीय मान्यता देण्याचा कार्यक्रम पाटबंधारे विभागाने ठरवला होता तर ती मान्यता दिली काय? नसेल दिली तर मे २००४ मध्ये ती किती दिवसात देणार?

**श्री. बाळासहोब थोरात** : सभापती महोदय, या प्रकल्पामध्ये जे बदल झाले त्या सगळयाचे सर्वेक्षण करुन हा अहवाल आता पूर्णपणे शासनाकडे आलेला आहे.दोन महिन्यात त्याला मान्यता देण्यात येईल.

******

(१०)

## निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन, २००५*
*सोमवार, दिनांक २१ मार्च, २००५*

(१७) * १७९८ **प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. नानासाहेब बोरस्ते, प्रा. शरद पाटील : तारांकित प्रश्न क्रमांक ४३५७४ ला दिनांक ३ जून, २००४ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किंमतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यात आला आहे काय,

(२) असल्यास, प्रत्यक्ष काम सुरु करण्याबाबतची सद्यःस्थिती काय आहे,

(३) उक्त प्रकरणी कोणतीही कार्यवाही केली नसल्यास याबाबत होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार** : (१) निधी उपलब्ध करुन देण्याबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(२) निधी उपलब्ध करुन दिल्यावर प्रकल्पाचे काम सुरु करणे शक्य होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

(११)

## निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन, २००५*
*गुरुवार, दिनांक १४ जुलै, २००५*

(५३) * ५६९८ **श्री. नतिकोद्दीन खतिब , प्रा. बी. टी. देशमुख ,श्री. वसंतराव खोटरे, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. नानासाहेब बोरस्ते, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. संजय दत्त, मेजर सुधीर सावंत, श्री. जगन्नाथ शेवाळे, श्री. जितेंद्र आव्हाड, श्रीमती मंदा म्हात्रे, श्री. राजेंद्र जैन, प्रा. फौजीया खान, श्री. सदाशिवराव पोळ, प्रा. जोगेंद्र कवाडे** : तारांकित प्रश्न क्रमांक १७९८ ला दिनांक २१ मार्च, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किंमतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्याने प्रकल्पाचे काम प्रत्यक्षात सुरु झाले हे खरे आहे काय,

(२) असल्यास, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास केंव्हा सुरुवात झालेली आहे किंवा केंव्हा होण्याचे नियोजन आहे,

(३) याबाबत नियोजन झालेले नसल्यास त्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री. अजित पवार** : (१) नाही.

(२) या कामाची निविदा प्रक्रीया डिसेंबर, २००५ मध्ये चालू होणार आहे. सद्य:स्थितीत संकल्पनाच्या कामाकरिता आवश्यक असणारी आधारसामग्री ( उदा. धरणस्थळी विंधनछिद्रे व चाचणी खड्डे ) घेण्याचे काम सुरु आहे. निविदा निश्चितीनंतर प्रकल्पाच्या कामास सुरुवात करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

******

## (१२)
## निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन, २००५*
*मंगळवार, दिनांक १३ डिसेंबर, २००५*

**(३) * ९२९६ श्री. रमेश निकोसे , प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे , श्री. नानासाहेब बोरस्ते : तारांकित प्रश्न क्रमांक ५६९८ ला दिनांक १४ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात :** सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किमतीला प्रशासकिय मान्यता प्राप्त निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यात आलेला असल्याने प्रकल्पाच्या निविदा निश्चितीमध्ये निश्चित कोणत्या अडचणी आहेत,

(२) असल्यास, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(३) उपाययोजना केलेली नसल्यास त्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**डॉ. सुनील देशमुख,श्री. अजित पवार यांचेकरिता** : (१) निम्न पेढी प्रकल्पाची निविदा काढण्यात आलेली आहे.

(२) प्रत्यक्ष बांधकाम सुरुवात करण्याचे दृष्टीने पुनर्वसन कायद्याअंतर्गत कलम-११ (१) ची सुचना दिनांक २२.९.२००५ रोजी प्रसिद्ध झालेली असून भूसंपादन प्रस्तावाबाबतची कार्यवाही सुरु आहे.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, निम्नपेढी प्रकल्पास दिनांक १२ ऑगस्ट २००४ रोजी प्रशासकीय मान्यता मिळाली. हा मिडीयम प्रोजेक्ट आहे. या संदर्भात माझे दोन प्रश्न आहेत. या प्रकल्पाची वर्क ऑर्डर देण्यात आलेली आहे काय? नसल्यास ती केव्हा देणार आहात ? मोठे प्रोजेक्ट तीन-चार वर्षात पूर्ण होतात. तेव्हा आपण हा प्रकल्प किती वर्षात पूर्ण करणार आहात ?

**डॉ.सुनील देशमुख** : सभापती महोदय, या प्रकल्पाच्या निविदा काढलेल्या आहेत. दिनांक ६ जानेवारी २००६ रोजी या निविदा उघडण्यात येणार आहेत. हे सोपस्कार पूर्ण झाल्यानंतर मार्च अखेरपर्यंत प्रत्यक्ष कामास सुरुवात करण्यात येईल. हा प्रकल्प साधारणतः सहा वर्षात पूर्ण करण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, सन्माननीय राज्य मंत्रिमहोदयांनी मार्च अखेरपर्यंत कामास सुरुवात करण्यात येईल असे सांगितले. तेव्हा ३१ मार्च पर्यंत प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल अशा प्रकारचे ठाम आदेश विभागाला देण्यात येतील काय ?

**श्री.अजित पवार** : सभापती महोदय, विभागाला तसे ठाम आदेश देण्यात येतील.

**श्री.जगदीश गुप्ता** : सभापती महोदय, या भागातील शेतकरी शेतीसाठी पाण्याचा वापर मोठ्या प्रमाणावर करतात, त्यामुळे शेतीमध्ये क्षार जमा होतात. तेव्हा याबाबतची चाचणी शासनाने केली आहे काय ?

**डॉ.सुनील देशमुख** : सभापती महोदय, ही चाचणी पूर्ण झाल्यानंतरच प्रशासकीय मान्यता दिलेली आहे. त्यामुळे आपण जे म्हणता त्याप्रमाणे काही घडणार नाही.

******

## (१३)
## अमरावती जिल्ह्यातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २००६*
*मंगळवार , दिनांक १८ एप्रिल, २००६*

अमरावती जिल्ह्यातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे या विषयावरील नियम ९३ च्या सूचनेवर शासनाने लवकरात लवकर निवेदन करावे असे मा. सभापतींनी सभागृहात आदेश दिले.

*****

## (१४)
## अमरावती जिल्ह्यातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन , २००६*
*गुरुवार , दिनांक २० एप्रिल, २००६*

अमरावती जिल्ह्यातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे याबाबत **प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी.एल.अैनापूरे, श्री. नानासाहेब बोरस्ते वि.प.स.**यांनी दिलेली नियम ९३ अन्वये सूचना.

**डॉ. सुनिल देशमुख (पाटबंधारे राज्यमंत्री) :** सभापती महोदय, प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी.एल.अैनापूरे, श्री. नानासाहेब बोरस्ते यांनी "अमरावती जिल्ह्यातील निम्नपेढी प्रकल्पाचे बांधकाम सुरु न होणे" या विषयावर नियम ९३ अन्वये जी सूचना दिली होती. तिला अनुलक्षून आपण निदेश दिल्याप्रमाणे मला निवेदन करावयाचे आहे. निवेदनाच्या प्रती मा. सदस्यांना अगोदरच वितरीत केलेल्या असल्याने मी हे निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवतो.

**उपसभापती :** निवेदन सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आले आहे.

**निवेदन**

ज्याअर्थी जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यातील १६१.१७ कोटी रुपये किमतीला दिनांक १२ ऑगस्ट २००४ च्या शासन निर्णयान्वये प्रशासकिय मान्यता प्राप्त निम्नपेढी प्रकल्पाच्या बांधकामाला अजूनही सुरुवात झालेली नाही व ३१ मार्च २००६ पर्यंत प्रत्यक्ष "कामाला सुरुवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील" असे मा. पाटबंधारे मंत्र्यांनी दिनांक १३ डिसेंबर २००५ रोजी (पृष्ठ डी-२) सभागृहात घोषित केल्यानंतर सुद्धा बांधकामाला सुरुवात होणे तर दूरच राहिले पण कामाचे कार्यारंभ आदेश सुद्धा अजून निर्गमित करण्यात आले नाहीत आणि;

ज्याअर्थी याच जिल्ह्यातील १५ जून २००५ च्या शासननिर्णयान्वये १८० कोटी रुपये किमतीला प्रशासकिय मान्यता प्राप्त वर्धा डायव्हर्शन कॅनॉल प्रकल्पाच्या बाबतीत "नागपूरचे अधिवेशन सुरु होण्यापूर्वी टेंडर काढले जाईल" असे मा. पाटबंधारे मंत्र्यांनी दिनांक १४ जुलै २००५ रोजी (पृष्ठ एम-१) सभागृहात घोषित केल्यानंतर, या बांधकामाचे सुद्धा कार्यारंभ आदेश (वर्कऑर्डर) देण्यात आलेले नाहीत आणि;

ज्याअर्थी या दोनही प्रकल्पाचे कार्यारंभ आदेशच देण्यात आलेले नसल्यामुळे सन २००६-२००७ च्या अर्थसंकल्पामध्ये या प्रकल्पावर करण्यात आलेली तरतुद व्यपगत होण्याची शक्यता निर्माण झाली आहे आणि;

ज्याअर्थी उभय प्रकल्पाचे कार्यारंभ आदेश निर्गमित न झाल्याने महत्तम अनुशेष असलेल्या या जिल्ह्यामध्ये तीव्र असंतोष निर्माण झाला आहे

त्याअर्थी हे सभागृह तीव्र चिंता व्यक्त करित आहे.

**श्री. अजित पवार मा. जलसंपदा (म.कृ.खो.म.वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री यांचे निवदेन**

**निम्मपेढी मोठा पाटबंधारे प्रकल्प ता. भातकुली, जि. अमरावती**

निम्न पेढी प्रकल्पाच्या निविदा ८.३.०६ रोजी उघडण्यात आल्यात. या निविदा अंदाजित दरापेक्षा जास्त असल्याने त्यांना दि. ८.३.०६ ला वाटाघाटीबाबतचे पत्र दिले. दि. ४.४.०६ रोजी संबधीत कंत्राटदाराने सादर केलेल्या जास्तीच्या दराच्या समर्थनार्थ पत्र दिले. कंत्राटदाराने दिलेले दर विश्लेषण अभ्यासून मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांचेकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर निम्न पेढी प्रकल्पाच्या निविदेस शासन मंजूरी लवकरात लवकर देण्यात येईल. त्यानंतर कार्यारंभ आदेश देण्यात येतील. त्याचप्रमाणे सन २००६-०७ मध्ये उपलब्ध असलेले अनुदान २३.०५ कोटी रुपये खर्च करण्यात येतील.

**वर्धा डायव्हर्शन अंतर्गत पंढरी मध्यम प्रकल्प ता. वरुड जि. अमरावती**

वर्धा डायव्हर्शन अंतर्गत पंढरी मध्यम प्रकल्पाच्या निविदा ८.३.०६ रोजी उघडण्यांत आल्यात ही निविदा अंदाजपत्रकीय दरापेक्षा जास्त असल्यामुळे दिनांक ८.३.२००६ रोजी संबंधीतास वाटाघाटीबाबत पत्र दिले त्यावर दि. १४.३.२००६ संबंधित मक्तेदाराने जास्तीच्या दराबाबत समर्थनार्थ पत्र दिले. दि. १४.३.०६ च्या पत्रान्वये कंत्राटदाराने दिलेले दर विश्लेषण अभ्यासून सदर निविदा मा. मुख्य अभियंता, जलसंपदा विभाग, नागपूर यांच्याकडून शासनास प्राप्त झाल्यानंतर ह्या निविदेस शासन मंजूरी लवकरात लवकर देण्यात येईल. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर संबंधीत कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात येतील. सन २००६-०७ मध्ये प्रकल्पास उपलब्ध असलेले २०.०४ कोटी रुपये अनुदान खर्च करण्यांत येतील.

**बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, जे निवेदन आलेले आहे ते वाचून मनापासून वाईट वाटते. महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यामध्ये या प्रकल्पाचे काम सुरु करण्यासाठी महत्तम दिरंगाई कशी केली जाते हे उत्तम उदाहरण आहे. १२ ऑगस्ट, २००४ रोजी प्रशासकीय मान्यता दिल्यानंतर अजून कामाची वर्क ऑर्डर झालेली नाही. वर्षानुवर्षे एखाद्या जिल्ह्यामध्ये इतका मोठी अनुशेष असताना

प्रशासकीय मंजूरी मिळाल्यानंतर इतका उशीर झाला तरी वर्क ऑर्डर ४-८ दिवसामध्ये काढण्यासाठी सरकारला कोणती अडचण आहे? वर्क ऑर्डर न काढण्यासाठी कोण जबाबदार आहे?

**डॉ.सुनिल देशमुख :** सभापती महोदय, निविदा काढण्यात आल्या असून दर जास्त असल्यामुळे वाटाघाटी सुरु आहेत. पूर्ण माहिती घेऊन मुख्य अभियंता याची चाचपणी करीत आहेत आणि या महिन्याच्या शेवटच्या आठवड्यापर्यंत याबाबतीत निर्णय घेऊ. निविदा आठ दिवसात फायनल होत आहेत असे ठेकेदाराला समजल्यानंतर ज्या निगोशिएबल पॉवर आहेत त्या वापरता येत नाहीत आणि ठेकेदार दक्ष होतात. ८ दिवसात आपल्याला वर्क ऑर्डर मिळण्याची शक्यता आहे असे ठेकेदाराला समजल्यावर वाटाघाटी करता येत नाहीत असा पूर्वानुभव आहे. तरीसुद्धा लवकरात लवकर हे काम करु.

**प्रा. बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, ही अतिशय दुर्दैवाची गोष्ट आहे की, २-५ रुपये जास्त खर्च येत असेल म्हणून वर्क ऑर्डर निघत नाही. कोणती वर्क ऑर्डर आणि कोणते निगोशिएशन? मा. मंत्रिमहोदयांनी सभागृहात दिलेल्या अभिवचनाचे पालन झाले पाहिजे. मंत्रिमहोदयांनी या सभागृहात स्पष्ट सांगितले होते की "३१.३.२००६ पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील." मा. राज्य मंत्रिमहोदय कशाच्या गोष्टी करीत आहेत? आम्हाला जर शासनाच्यावतीने येथे उत्तर मिळणार नसेल तर मग आम्हाला सभात्याग करावा लागेल. म्हणूनच सभापती महोदय, आपले मला संरक्षण पाहिजे आहे. जलसिंचनाच्याबाबतीत महत्तम अनुशेष असलेला हा अमरावती जिल्हा आहे. प्रशासकीय मान्यता होऊन आज जवळ जवळ दीड वर्ष झाले तरी या प्रकल्पाची कामे सुरु होत नाहीत. हे बरोबर नाही. ही निषेधार्ह गोष्ट आहे. तेंव्हा मंत्रिमहोदयांनी येत्या आठ, दहा, पंधरा दिवसांमध्ये वर्क ऑर्डर दिली जाईल असे आश्वासन द्यावे. तसे ते देतील काय?

**श्री.अजितदादा पवार :** सभापती महोदय, अमरावती भागामध्ये जलसिंचनाची कामे मोठ्या प्रमाणावर केली पाहिजेत. या दोन्ही प्रकल्पाचे काम लवकर सुरु झाले पाहिजे हे मलाही मान्य आहे. या निमित्ताने मी सभागृहाला सांगू इच्छितो की, सन २००६-२००७ या वर्षामध्ये निम्नपेढी मोठा पाटबंधारे प्रकल्पासाठी रुपये २३.०५ कोटी आणि वर्धा डायव्हर्शन अंतर्गत पंढरी मध्यम प्रकल्पासाठी रुपये २०.०४ कोटी हे १०० टक्के खर्च केले जातील. एका कामामध्ये ३२ टक्के आणि दुसऱ्या कामामध्ये ३७ टक्के अबाऊव्हने निविदा आलेल्या आहेत. त्यामुळे येथे ठोस आश्वासन दिले तर दरासंबंधी निगोशिएशन करता येणार नाही. निविदेतील दर कसे खाली करता येतील व त्यातून महामंडळाचा व शासनाचा कसा फायदा करता येईल हे आम्ही पाहत आहोत. व्हॅट, डी.एस.आर., स्टील, सिमेंट, वर्क कॉन्ट्रॅक्ट इत्यादीमुळे दर वाढवून निविदा दिलेल्या आहेत. म्हणूनच यासंबंधीचे ठोस असे आश्वासन देता येत नाही. तरी पण यंदाच्या बजेटमध्ये जेवढी म्हणून तरतूद या प्रकल्पांवर करण्यात आली आहे. तेवढी १०० टक्के रक्कम दोन्ही कामांवर निश्चितपणे खर्च केली जाईल. याची खबरदारी जलसंपदा विभाग घेईल.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, वर्क ऑर्डरशिवाय खर्च कसा काय होणार आहे? दीड दोन वर्ष प्रशासकीय मान्यता मिळून देखील वर्क ऑर्डर दिली जात नाही "३१ मार्च २००६ पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील." असे आश्वासन देऊनसुद्धा काम का सुरु झाले नाही? असा माझा या निमित्ताने प्रश्न आहे.

**डॉ.सुनिल देशमुख :** सभापती महोदय, या दोन्ही प्रकल्पाच्या निविदा ३२ आणि ३७ टक्क्यांनी अबाऊव्ह आलेल्या आहेत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, सर्वात जास्त अनुशेष असलेल्या एका जिल्ह्यातील कामासाठी अबाऊव्हने निविदा आल्या तर जाऊ द्याना. अबाऊव्ह आणि बिलो निविदा येण्यासंबंधीची काळजी इतके दिवस शासनाने का घेतली नाही? दीड वर्षापूर्वी प्रशासकीय मान्यता देऊन देखील शासनाने आजपावेतो वर्क ऑर्डर दिलेली नाही. **इतरत्र बिगर अनुशेष भागात शासनाने किती प्रकल्पांना प्रशासकीय मान्यता आणि वर्क ऑर्डर किती जलद गतीने दिलेली आहे. यासंबंधीची दहा उदाहरणे मी आपल्याला देऊ शकतो.** सभापती महोदय, आमचे ओठ भाजलेले आहेत. त्यामुळे आमच्यावर ताकसुद्धा फुंकुन पिण्याची वेळ आली आहे. ३१ मार्च २००६ पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरुवात करण्याचे ठाम आदेश मंत्रिमहोदयांनी दिलेले आहे. असे असतांना १५ दिवसात वर्क ऑर्डर काढण्यासंबंधीचे आदेश देणार नसाल तर मग ही निषेधार्ह गोष्ट आहे. अशा प्रकारे महत्तम अनुशेष असलेल्या भागावर अन्याय करणे चुकीचे आहे. एखाद्या जिल्ह्यामध्ये ५-१० रुपयाने अबाऊव्ह टेंडर आले असेल तर त्याचा विचार कशाला करत बसता. मी पुन्हा सांगतो की, "३१ मार्च २००६ पर्यंत प्रत्यक्ष कामाला सुरु वात करण्याचे ठाम आदेश देण्यात येतील" असे आश्वासन मंत्रिमहोदयांनी दिले आहे. त्यामुळे मंत्रिमहोदयांनी या प्रकल्पाच्या कामासंबंधीची वर्क ऑर्डर किती दिवसात काढणार हे ठामपणे सांगावे. त्यांना जर ठामपणे सांगता येत नसेल तर ही निषेधार्ह गोष्ट आहे.

**डॉ.सुनिल देशमुख :** सभापती महोदय, अमरावतीमध्ये एका वर्षामध्ये ३ प्रकल्प सुरु करीत आहोत.

**प्रा.बी.टी.देशमुख :** सभापती महोदय, मी ते विचारलेले नाही. मी जो प्रश्न विचारला आहे त्या प्रश्नाचे उत्तर न देता मा. मंत्री महोदय दुसऱ्याच प्रश्नाचे उत्तर देत आहेत. म्हणून त्यांनी आमच्या प्रश्नाला स्पेसिफिक उत्तर दिले पाहिजे.

**डॉ.सुनिल देशमुख :** महोदय, हा जिल्हा महत्तम अनुशेष असल्यामुळे तीन प्रकल्प एका वर्षात सुरु केले आहेत. वास्तविक पाहता हा अनुशेष भरुन निघाला पाहिजे. हे खरे आहे की, याबाबत प्रक्रिया सुरु असली पाहिजे. १८८ कोटी आणि १६६ कोटी रुपयांच्या निविदा अबव्हने घ्यावयास लागलो तर, तशीच प्रक्रिया संपूर्ण महाराष्ट्रात सुरु होईल आणि ती विभागाला थांबविणे शक्य होणार नाही.

**प्रा. बी.टी.देशमुख :** विकसित भागामध्ये नका अबव्ह करु. माननीय मंत्री महोदयांनी ३१ मार्च प्रर्यंत हे काम पूर्ण करतो असे सांगूनही ते काम सुरु न झाल्याबद्दल आम्ही शासनाचा निषेध करतो व सभात्याग कतो.

*****

**(१५)**

## निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकाम

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००६*
*सोमवार, दिनांक ३ जुलै २००६*

**(९) * १७३४७ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे, श्री. रमेश निकोसे** : तारांकित प्रश्न क्रमांक ५६९८ ला दिनांक १४ जुलै, २००५ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किमतीला प्रशासकिय मान्यता प्राप्त निम्न पेढी प्रकल्पाचे बांधकामास निधी उपलब्ध करुन देण्यात आलेल्या असल्याने प्रकल्पाच्या निविदा निश्चितीमध्ये निश्चित कोणत्या अडचणी आहेत,

(२) असल्यास, जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाच्या प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात करण्याच्या दृष्टीने या अडचणी दूर करण्यासाठी शासनाने काय उपाययोजना केलेली आहे,

(३) उपाययोजना केलेली नसल्यास त्यास होणाऱ्या विलंबाची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार** : (१) निविदा शासनस्तरावर कार्यवाही मध्ये आहे.

(२) निविदा निश्चितिची कार्यवाही सुरु आहे. निविदा प्रक्रिया पूर्ण झाल्यावर प्रत्यक्ष कामास सुरुवात होईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

**(१६)**

## निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : तिसरे अधिवेशन २००६*
*मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर, २००६*

**(५३) * २२१९० श्री. राजेंद्र जैन, श्री. जितेंद्र आव्हाड, श्री. वसंतराव खोटरे, प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. जी. एल. अैनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक १७३४७ ला दिनांक ०३ जुलै, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) विदर्भातील निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामासाठी निविदा प्रक्रिया पूर्ण झाली आहे काय,

(२) असल्यास, त्यानुसार पुढे कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) उक्त प्रश्न (१) मधील प्रकरणी अद्याप कोणतीही कार्यवाही केली नसल्यास, विलंबाची सर्वसाधारण कारणे काय आहेत तसेच सदर प्रकरणी करण्यात येत असलेल्या कार्यवाहीची सद्यस्थिती काय आहे?

**श्री. अजित पवार** : (१) होय.

(२) कार्यारंभ आदेश दि.२०/६/२००६ रोजी कंत्राटदारास देण्यात आलेत (धरणाच्या कामासाठी आवश्यक जमीनीचे भुसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी अमरावती यांना पाठविण्यात आले आहेत)

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

**(१७)**

## निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

*महाराष्ट्र विधानपरिषद : ; तिसरे अधिवेशन २००६*
*मंगळवार, दिनांक ५ डिसेंबर, २००६*

**(६५) * २०४२८ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे** : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात समाविष्ट असलेल्या मौजे कुंड

(खु.) व अळणगाव या दोन गावांच्या पुनर्वसनासाठी स्थळनिश्चिती करणारे काही निर्णय कार्यकारी अभियंता, पाटबंधारे विभाग यांच्या अध्यक्षतेखाली दिनांक ३ ऑक्टोबर, २००६ रोजी किंवा त्या दरम्यान अमरावती येथे त्यांच्या कार्यालयात झालेल्या, संबंधित गावांचे सरपंच व जिल्हास्तरीय पूनर्वसन समितीचे सदस्य यांच्या बैठकीत घेण्यात आले ही गोष्ट खरी आहे काय,

(२) खरी असल्यास या बैठकीत घेण्यात आलेल्या निर्णयाचे स्वरुप काय आहे,

(३) या निर्णयांच्या अंमलबजावणीसाठी शासनातर्फे काय कारवाई करण्यात आलेली आहे?

**श्री. अजित पवार** : (१) होय.

(२) हया बैठकीमध्ये मौजे कुंड खुर्द व मौजे अळणगाव ह्या दोन्ही गावांचे ग्रामपंचायती ठरावानुसार पुनर्वसन करावयाची जागा ठरविण्यात आली.

(३) पुनर्वसनासाठी भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी अमरावती कडे सादर करण्यात आले आहेत.

*****

## (१८)

## निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : ; पहिले अधिवेशन २००७*

*गुरुवार, २९ मार्च २००७*

**(१०) * २५४५७ प्रा. बी. टी. देशमुख , श्री. व्हि. यू. डायगव्हाणे , श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे , श्री. राजेंद्र जैन , श्री. जितेंद्र आव्हाड** : तारांकित प्रश्न क्रमांक २२१९० ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकासमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) दिनांक १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रुपये १६१.१७ कोटी किंमतीला प्रशासकीय मान्यता प्राप्त व कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाची सद्यःस्थिती काय आहे,

(२) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात या प्रकल्पावर किती निधी खर्च होण्याचे नियोजन आहे,

(३) जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या जिल्ह्यातील या प्रकल्पाचे बांधकाम पूर्ण करण्याचे काय नियोजन करण्यात आले आहे ?

**डॉ. सुनील देशमुख, श्री. अजित पवार यांच्याकरिता** : (१) मुख्य कामाच्या निविदा निश्चित झाल्या असून भूसंपादनाची व पुनर्वसनाची प्रक्रिया प्रगतीपथावर आहे. भूसंपादनाची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर कामास सुरुवात करण्यात येईल.

(२) सन २००६-२००७ या आर्थिक वर्षात ७.५० कोटी रुपये इतका निधी खर्च होण्याचे सुधारीत नियोजन आहे.

(३) निम्न पेढी प्रकल्प ता. भातकुली, जि. अमरावती ह्या प्रकल्पाचे बांधकाम पुर्ण करण्याचे सुधारीत नियोजन खालील प्रमाणे आहे.

**प्रशासकीय मान्यता किंमत - १६१.१७ कोटी रुपये**

| अ.क्र. | वर्ष | नियोजन कोटी रुपये |
|---|---|---|
| १. | २००५-२००६ | २.५१ |
| २. | २००६-२००७ | ७.५० |
| ३. | २००७-२००८ | ६०.०० |
| ४. | २००८-२००९ | ६०.०० |
| ५. | २००९-२०१० | २०.०० |
| ६. | २०१०-२०११ | ११.१६ |
| | | १६१.१७ |

**प्रा. बी.टी.देशमुख** : या प्रकल्पाला प्रशासकीय मान्यता आणि कार्यारंभ आदेश ताबडतोबीने दिले त्याबद्दल मी शासनाला जरुर धन्यवाद देतो. परंतु काम सुरु करण्यासाठी भूसंपादन होत नाही अशी यामध्ये स्थिती असल्याचे दिसते. या स्थितीतून हा प्रकल्प बाहेर काढणे अत्यंत आवश्यक आहे. तेव्हा भूसंपादन अधिका-याला निश्चित मुदतीच्या आत डॅमसाईटच्या भागाचे भूसंपादन करण्याचे आदेश दिले जातील काय ?

**डॉ. सुनील देशमुख** : एकूण ७०६ हेक्टर जमिनीचा प्रस्ताव जिल्हाधिका-यांकडे दिलेला आहे. डॅमसाईटच्या कामाबद्दल तातडीने आदेश दिले जातील. डॅमसाईटच्या भूसंपादनाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल.

**प्रा. बी.टी.देशमुख** : या प्रकल्पाचे वैशिष्ट्य आणि महत्वे असे आहे की, हा खारपाण पट्टयातील प्रकल्प आहे. याबाबतीत धवडगावकर ते चितळे पर्यन्त जल आयोगाने अहवाल दिलेले आहेत. जलसिंचन आयोगाने याबाबतीत विशेष शिफारस करुन निश्चित मुदत घालून दिलेली होती. म्हणून याबाबतीत निश्चित मुदत घालून दिली जाईल काय आणि ती किती दिली जाईल ?

**डॉ. सुनील देशमुख** : हा खारपाण पट्टयातील प्रकल्प असल्यामुळे सिंचनामुळे जमीन खराब होईल अशी शंका त्या परिसरातील शेतक-यांमध्ये होती. त्यामुळे वाल्मिचा रिपोर्ट येईपर्यन्त हा प्रकल्प सुरु करु नये अशी भूमिका घेतली होती. वाल्मिचा रिपोर्ट नुकताच प्राप्त झालेला आहे. सिंचनामुळे जमीन खराब होणार नाही असा सुस्पष्ट अभिप्राय वाल्मिने दिलेला आहे. त्यानंतर संबंधित लोकांची बैठक घेऊन त्यांचा विरोध मावळावा म्हणून प्रयत्न करण्यात आले. तेथील लोकांचे समाधान झाले नसले तरी जिल्हाधिका-यांमार्फत भूसंपादनाचे काम तातडीने सुरु करण्यात येईल.

**प्रा. बी.टी.देशमुख** : तातडीने म्हणजे केव्हा सुरु करण्यात येईल ?

**श्री. अजित पवार** : या बाबतीत अधिका-यांना आणि अमरावतींच्या पालकमंत्र्यांना तातडीने सूचना दिल्या जातील. महसूल विभागाच्या अधिका-यांना कार्यवाही करण्यासाठी जे काही १५-२० दिवस लागतील तेवढा अवधी त्यांना दिला जाईल. त्यांनी २१ दिवसात कार्यवाही करतो असे सांगितले तर त्यांना आणखी ५-६ दिवस जास्त देऊन एक महिन्याच्या आत ते काम पूर्ण करण्यास सांगितले जाईल. ज्या ठिकाणी मोठ्या प्रमाणावर अनुशेष आहे तेथे माननीय राज्यपालांच्या निर्देशानुसार मोठ्या प्रमाणावर निधी दिलेला आहे. भौगोलिकदृष्टया हा प्रकल्प होणे गरजेचे आहे. म्हणून अधिका-यांनी महिन्याचा वेळ लागेल असे सांगितले तर महिना पूर्ण झाल्यानंतर पुढचे काम सुरु करण्याच्या सूचना दिल्या जातील. दर आठवड्याला कामाची देखरेख करावी असे तेथील पालकमंत्र्यांना सांगितले जाईल.

**श्री.जगदीश गुप्ता** : सभापती महोदय, त्या भागामध्ये दोन मतप्रवाह आहेत. नागपूर अधिवेशनामध्ये सन्माननीय मंत्र्यांना मी या संदर्भात प्रश्न विचारला होता. त्या भागातील माझे मित्र आहेत, त्यांनी इरिगेशन केले आणि त्यांच्या शेतीचे नुकसान झाले. त्यामुळे हा विषय अतिशय गांभीर्याने हाताळण्याची आवश्यकता आहे. जिल्हयातील सर्व लोकप्रतिनिधींना विश्वासात घेऊन प्रश्न हाताळला पाहिजे. घाईघाईने निर्णय घेतला आणि तेथे इरिगेशन होऊ शकले नाही तर शासनाचा पैसा वाया जाईल आणि जो अपेक्षित हेतू आहे तो साध्य होणार नाही. वाल्मीचा अहवाल आला आहे त्या संदर्भात तेथील लोकांनी जे काही आंदोलन सुरु केले आहे. त्या भागामध्ये इरिगेशन झाले पाहिजे या मताशी आम्ही सगळेच सहमत आहोत. जो काही अहवाल आला आहे त्याबद्दल जी शंका व्यक्त होत आहे ती विचारात घेता त्या परिसरातील सर्व लोकप्रतिनिधी सुध्दा लोकांची समजूत घालण्याचा प्रयत्न करतील. याबद्दल शासन काही विशेष प्रयत्न करणार आहे का?

**डॉ.सुनील देशमुख** : वाल्मीचा अहवाल सर्व लोकप्रतिनिधींना पाठविण्यात येईल.

**प्रा.बी.टी.देशमुख** : सभापती महोदय, वाल्मीचा अहवाल गेल्या दीड-दोन महिन्यातील आहे. सिंचन आयोगाच्या अहवालात सुद्धा ठिबक सिंचनाबाबत स्पष्टपणे म्हटले आहे निसर्गाच्या गोड्या पाण्याने जून-जुलैमध्ये शेती खराब होत नाही ती त्याच गोड्या पाण्याने ऑक्टोबर, नोव्हेंबर आणि डिसेंबरमध्ये तुषार सिंचनामुळे कशी खराब होते? Rehabilitation is a painful process. तो वेगळा विषय आहे. पुनर्वसनाच्या कारणामुळे लोक विरोध करतात, हा त्यातील मुख्य भाग आहे. त्याबाबतीत सर्व मगत केली पाहिजे प्रथम पूनर्वसन झाले पाहिजे. माननीय मंत्रीमहोदयांनी सांगितल्याप्रमाणे एक ते दीड महिन्यात कारवाई पूर्ण करण्यास सांगणार का? वाल्मीच्या अहवालासोबत चितळे आयोगाच्या अहवालातील रिलेव्हंट चॅप्टर लोकप्रतिनिधींकडे पाठविला जाईल काय?

**डॉ.सुनील देशमुख** : होय.

*****

## (१९)

## निम्न पेढी प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन २००७*

*गुरुवार, २९ मार्च २००७*

**(३४) * २५८३२ श्री. गोविंदराव आदिक, श्री. संजय दत्त, श्री. रमेश निकोसे, श्री. धनाजी साठे , प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी. एल. अैनापूरे** : तारांकित प्रश्न क्रमांक २०४२८ ला दिनांक ५ डिसेंबर, २००६ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात : सन्माननीय पुनर्वसन व मदत कार्यमंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात समाविष्ट असलेल्या मौजे कुंड (खु.) व अळणगाव या दोन गावांच्या पुनर्वसनासाठी भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आला आहे, हे खरे आहे काय,

(२) असल्यास, सदर प्रस्तावावर कोणता निर्णय घेण्यात आला व त्यानुसार प्रकल्पग्रस्तांचे पुनर्वसन करण्याबाबत शासनाने कोणती कार्यवाही केली वा करण्यात येत आहे,

(३) अद्याप, कोणतीच कारवाई केली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. पतंगराव कदम** : (१) होय.

(२) शासनाच्या प्रचलित धोरणानुसार पुनर्वसन अधिनियमाच्या कलम १३ (३) च्या अधिसूचनेची प्रसिध्दी झाल्यानंतर भूसंपादनाच्या प्रस्तावाबावत पुढील

कार्यवाही करण्यात येते. प्रकल्प यंत्रणेकडून निम्न पेढी प्रकल्पासंबंधीचा कलम १३ (३) नुसारच्या अधिसूचनेचा प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास प्राप्त झालेला नाही. त्यांच्याकडील प्रस्ताव प्राप्त झाल्यानंतर कलम १३ (३) ची अधिसूचना प्रसिध्द करण्यात येईल व त्यानंतर भूसंपादनाच्या प्रस्तावाबाबतची कार्यवाही पूर्ण करण्यात येईल.

(३) प्रश्न उद्‌भवत नाही.

*****

## (२०)
## निम्न पेढी प्रकल्पाच्या धरणस्थळी काम सुरु करण्यासाठी भूसंपादनाचा प्रस्ताव

*महाराष्ट्र विधानपरिषद : : पहिले अधिवेशन २००७*

*मंगळवार, १७ एप्रिल २००७*

**श्री.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे, श्री. जी.एल.ऐनापूरे, प्रा.दिलीपराव सोनवणे** वि.प.स. यांनी महाराष्ट्र विधानपरिषद नियम १०१ अनुसार दिलेली सूचना (लक्षवेधी सूचना पुढीलप्रमाणे आहे.

"जलसिंचनाचा महत्तम अनुशेष असलेल्या अमरावती जिल्ह्यामध्ये निम्नपेढी प्रकल्पाच्या पुनर्वसनासाठी व धरणस्थळी काम सुरु करण्यासाठी ऑक्टोबर २००६ ते जानेवारी २००७ या काळात अंदाजे ७०६ हेक्टर जमिनीच्या भुसंपादनाचा प्रस्ताव भुसंपादन अधिकारी यांचेकडे सादर करण्यात आल्यानंतर त्याबाबतीत कोणतीही कारवाई न होणे, परिणामी या प्रकल्पासाठी या आर्थिक वर्षामध्ये (सन २००६-०७) शासनाने उपलब्ध करुन दिलेला फार मोठा निधी व्यपगत होण्याची निर्माण झालेली शक्यता, त्यामुळे जनमानसात निर्माण झालेला असंतोष व याबाबतीत शासनाची भूमिका व प्रतिक्रिया."

**मा. श्री. अजित पवार, जलसंपदा (म.कृ.खो.वि.म.वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री यांचे निवेदन**

ह्या प्रकल्पासाठी एकूण २७१३ हेक्टर क्षेत्र संपादित करावयाचे असून त्यापैकी २२७ हेक्टर सरकारी क्षेत्र असून उर्वरीत क्षेत्र खाजगी आहे. ७०६.६१ हे खाजगी जमिनीचे भूसंपादन प्रस्ताव जिल्हाधिकारी कार्यालयास सादर करण्यात आले असून त्याच्या अग्रिम मोबदला वाटपासाठी ७८१.२८ लक्ष रुपये निधी जिल्हाधिकारी कार्यालयास पुरविण्यात आला आहे.

ह्या प्रकल्पास सन २००६-०७ मध्ये रु. २३.०५ कोटी निधी उपलब्ध झाला सुधारित नियोजन करण्यात आले आहे. **धरणाच्या कामाच्या पेढी प्रकल्प संघर्ष समितीच्या विरोधामुळे कामास अद्याप सुरवात न झाल्याने १५.४२ कोटी रु. पूनर्विनियोजनाद्वारे समर्पीत करण्याचे प्रस्तावित असून आता २००६-०७ चे सुधारित नियोजन ७.६४ कोटी रुपये खर्चाचे करण्यांत आले आहे.** त्यामध्ये मुख्यत्वे करुन भूसंपादनासाठी खर्च होणार असून त्यापैकी सन २००६-०७ मध्ये ६.३४ कोटी रुपये इतका निधी जिल्हाधिकारी, अमरावती ह्यांना भूसंपादनासाठी पुरविण्यांत आला आहे.

धरणाच्या कामाच्या निविदा निश्चिती पूर्ण झाली असून कंत्राटदारास कार्यारंभ आदेश देण्यात आला आहे. प्रकल्पग्रस्तांच्या विरोधामुळे अद्याप धरणाच्या मुख्य कामास सुरुवात झालेली नाही. तसेच धरण स्थळापर्यंत पोहच रस्ते, प्रकल्प स्थळी भांडार गृह, तात्पुरते शाखा कार्यालय इमारत इ.चे बांधकामे करण्याबाबत ची कार्यवाही स्थानिक लोकांच्या विरोधामुळे बंद आहे. काम त्वरीत सुरु करण्याबाबत आवश्यक कार्यवाही पूर्ण करण्याची शासनाची भूमिका आहे.

*****

## (२१)
## निम्न पेढी प्रकल्प ग्रस्तांचे पुनर्वसन

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००७*

*गुरुवार, दिनांक २ ऑगस्ट २००७*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या*

*सोमवार, १६ जुलै २००७रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील*

*प्रश्न क्रमांक (४९)*

(४९) * २९४३८ **प्रा.बी.टी.देशमुख, श्री. व्ही.यु.डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे** : तारांकित प्रश्न क्रमांक २५८३२ ला दिनांक २९ मार्च २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात सन्माननीय पूनर्वसन मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :

(१) निम्न पेढी प्रकल्पाच्या बुडीत क्षेत्रात समाविष्ट असलेल्या मौजे कुंड (खु) व अळणगाव या दोन गावांच्या पुनर्वसनासाठी स्थळनिश्चितीची जागा ठरविण्यात आल्यानंतर पुनर्वसनासाठी भूसंपादनाचे जे प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावती यांचेकडे सादर करण्यात आले त्याकामीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती काय आहे?

(२) या बाबत कारवाई झालेली नसल्यास विलंबाची कारणे काय आहेत?

**डॉ. पतंगराव कदम :** (१) व (२) महाराष्ट्र प्रकल्पबाधित व्यक्तींचे पुनर्वसन अधिनियम, १९९९ मधील कलम १३ (३) अनुसार दिनांक ७ जून २००७ रोजी अधिसूचना प्रसिद्ध करण्यात आली असून भूसंपादनाची कार्यवाही सुरु करण्यात आली आहे.

*****

## (२२)
## निम्न पेढी प्रकल्पाच्या बांधकामाबाबत

*महाराष्ट्र विधानपरिषद : : दुसरे अधिवेशन २००७*

*गुरुवार, दिनांक २ ऑगस्ट २००७*

*रोजी सभागृहाच्या पटलावर ठेवण्यात आलेल्या*

*शुक्रवार, २७ जुलै २००७रोजीच्या तारांकित प्रश्नोत्तराच्या यादितील*

*प्रश्न क्रमांक (१)*

**(१) * २९४४० प्रा. बी. टी. देशमुख, श्री. व्हि. यू. डायगव्हाणे, श्री. वसंतराव खोटरे : तारांकित प्रश्न क्रमांक २५४५७ ला दिनांक २९ मार्च, २००७ रोजी दिलेल्या उत्तराच्या संदर्भात** : सन्माननीय जलसंपदा (कृष्णा खोरे पाटबंधारे महामंडळ वगळून) व लाभक्षेत्र विकास मंत्री पुढील गोष्टींचा खुलासा करतील काय :-

(१) १२ ऑगस्ट, २००४ च्या शासन निर्णयान्वये रूपये १६१.१७ कोटी किमतीला प्रशासकिय मान्यता प्राप्त व कार्यारंभ आदेश निर्गमित झालेल्या निम्न पेढी प्रकल्पाच्या धरणस्थळ बांधकामासाठीच्या भूसंपादनाची सद्यस्थिती काय आहे,

(२) भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली असल्यास प्रत्यक्ष बांधकामाला सुरुवात केव्हा झाली आहे,

(३) नसल्यास, याबाबत विलंब होण्याची कारणे काय आहेत ?

**श्री.अजित पवार :** (१) निम्न पेढी प्रकल्प ता.भातुकली, जि.अमरावती प्रकल्पाच्या धरणस्थळ बांधकामाकरिता २३२.५२ हे. भूसंपादन करणे आवश्यक असून त्याचे प्रस्ताव जिल्हाधिकारी, अमरावतीकडे सादर झालेले आहे. संघर्ष समितीच्या विरोधामुळे त्या जमिनीबाबत अद्याप संयुक्त मोजणी व्हावयाची आहे. ४.०७ हेक्टर इतक्या जमिनीची शासनाने परिपत्रक दिनांक ६ जून, २००६ चे खाजगी व्यवहाराने सार्वजनिक योजनांसाठी खाजगी जमीन खरेदी करणे या पध्दतीने जमीन खरेदी केली आहे.

(२) भूसंपादन प्रक्रिया पूर्ण झालेली नाही त्यामुळे प्रत्यक्ष बांधकामास सुरुवात व्हावयाची आहे.

(३) संघर्ष समितीच्या विरोधामुळे आवश्यक असलेल्या २३२.५२ हेक्टर जमीनीची संयुक्त मोजणी व्हावयाची आहे. त्यामुळे भूसंपादन प्रक्रियेस विलंब होत आहे.

*****

**NUTA BULLETIN** (Official Journal of NAGPUR UNIVERSITY TEACHERS' ASSOCIATION) **CHIEF EDITOR :** Dr.A.G.Somvanshi,Shankar Nagar, AMRAVATI-444 606. **EDITOR :** Prof. S.S. Gawai 1,Abhinav State Bank Colony, Chaprashi Pura, Camp, AMRAVATI 444 602. **PUBLISHER :** Prof. S.R. Kalmegh, Lahari Apartment, Keshao Colony, Camp, AMRAVATI 444 602. Type Setting at NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, Amravati-444 601. **PRINTED AT** Bokey Printers, Gandhi Nagar, Amravati. (M.S) **REGD NO**. MAHBIL/2001/4448 Postal Registration No. ATI/RNP/78/2005-08 WPP Registration No. NR/ATI/WPP-01/2005-08 Price : Rs. Five / Name of the Posting office : **R.M.S. Amravati.** Date of Posting : **20.09.2007**

**If Undelivered , please return to :** NUTA Bulletin Office, Phundkar Bhavan, Behind Jain Hostel, Maltekadi Road, **Amravati-444 601**.

---

To,..........................................................

..............................................................

..............................................................

..............................................................

..............................................................